22-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A 1
VTG/ ST/ KGS/ 10:30

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.चंद्रकांत पाटील )**

**पृ.शी.** सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविण्याची आवश्यकता

**मु.शी.** सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविण्याची आवश्यकता या विषयावर सर्वश्री संजय दत्त,सुरेशदादा देशमुख,ॲड. गुरुनाथ कुलकर्णी, श्री.उल्हास पवार,डॉ.वसंत पवार,श्री.भाई जगताप, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री.भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो : -

" राज्यातील लोकसंख्येच्या प्रमाणात सर्वात जास्त प्रमाण तरुण वर्गाचे असून, सध्याचा तरुण वर्ग विविध समस्यांनी, अडचणींनी ग्रासला असल्याचे चित्र निर्माण झालेले असणे, शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तरुणांचा कल कोणत्या शाखेकडे आहे, त्यावर त्यांचे भवितव्य अवलंबून असणे, नोकरी, व्यवसायाची संधी, इत्यादीबाबत त्यांना मिळणा-या सोयी सुविधा उपलब्ध होण्याची निर्माण झालेली आवश्यकता, युवक कल्याणकारी योजना पध्दतशीरपणे उपलब्ध न होणे, तसेच, योग्य मार्गदर्शन न मिळाल्याने व रोजगार उपलब्ध न झाल्याने न्युनगंडामुळे तरुणांमध्ये वाढत चाललेले आत्महत्येचे प्रमाण, परिणामी गुन्हेगारी प्रवृत्ती वाढत असणे, कॉल सेंटरमध्ये भरमसाठ पगाराची नोकरी व 24 तास कामाच्या ताणामुळे अंमली पदार्थाचे सेवन व गैरमार्ग अवलंबत असल्याने तरुण वर्ग दिशाहीन होऊन मृत्यूला जवळ करत असणें, सध्याच्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकाचे स्थान भक्क्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविणे आवश्यक असून त्यावर करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी. "

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री चंद्रकांत पाटील)** : नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चा माननीय मंत्रिमहोदयांच्या उत्तरासह दुपारी 12.00 वाजेपर्यत संपवावयाची असल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात भाषणे करावीत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,या देशात 60 ते 65 टक्के तरुण असून राज्यातील तरुण देखील त्या प्रमाणातच आहेत. या सर्व तरुणांचा विचार केला तर 10 ते 24 वयोगटातील तरुण किंवा 19 ते 35 वयोगटातील तरुणांची संख्या 65 टक्के असतांना त्यांच्यासाठी कमी वेळेत चर्चा आटोपण्याचा विचार केला तर या विषयाला न्याय दिल्यासारखे होणार नाही असे मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, देशातील आणि राज्यातील तरुण वयोगटाकडे लक्ष देण्याची खरोखरच गरज आहे. मी तर असे म्हणेन फक्त त्यांच्याकडे लक्ष देण्याचीच गरज आहे असे नव्हे तर त्यांच्यासाठी विविध योजना अंमालात आणण्यासाठी सविस्तर चर्चा करणे आवश्यक असून तोच हा प्रस्ताव मांडण्या मागचा उद्देश आहे .सभापती महोदय,या प्रस्तावावरील चर्चेच्या निमित्ताने जेवढे सन्माननीय सदस्य चर्चेत भाग घेणार आहेत त्या सर्व सन्माननीय सदस्यांना आपण बोलण्याची संधी द्यावी व त्यांना पुरेसा वेळ द्यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच हा प्रस्ताव मांडतांना सांगितल्याप्रमाणे हा विषय केवळ राज्यपुरताच मर्यादित नाही तर संपूर्ण देशापुरता हा विषय मर्यादित आहे. परंतु असे असले तरीसुध्दा आता आपल्याला राज्यातील तरुण पिढीसाठी धोरण ठरविण्या संबंधाने विचार करावयाचा आहे. त्या अनुषंगाने विचार करीत असतांना देशातील संदर्भसुध्दा देण्यात येतील. ही तरुण पिढी राज्यातील आहे. ही तरुण पिढी तुमच्या आमच्या सगळयांचीच आहे. त्यांच्यासाठी धोरण ठरविणे आवश्यक आहे. ही तरुण पिढी ख-या अर्थाने ॲसेटस् आहे. 2020 साली हा देश महासत्ता बनल्याचे पहावयास मिळावे हे तुमचे आमचे सर्वाचेच स्वप्न आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

हे स्वप्न साकार करण्याच्या प्रक्रियेमध्ये खऱ्या अर्थाने कुणाचे योगदान असेल तर ते तरुण पिढीचे आहे असे मी म्हटले तर ती अतिशयोक्ती होऊ नये. या तरुण पिढीच्या समस्या काय आहेत? या तरुण पिढीला आवश्यक असणारी मार्गदर्शक तत्वे आपण त्यांना देतो की नाही? त्यांच्यासमोर आपण रोड मॅप ठेवणार आहोत की नाही? या सर्व गोष्टींची चर्चा होणे आवश्यक आहे असे मला वाटते. सभापती महोदय, सर्वसाधारणपणे या राज्यामध्ये युवा धोरण येऊ घातले आहे, त्यादृष्टीने हे सरकार अतिशय चांगले पाऊल उचलत आहे त्याबद्दल या सरकारचे मी अतिशय मनापासून अभिनंदन करतो व आभार व्यक्त करतो. याठिकाणी आपण करीत असलेल्या चर्चेच्या माध्यमातून येऊ घातलेल्या युवा धोरणामध्ये आपल्याला बऱ्याच सुधारणाही करता येतील. या प्रस्तावावर सभागृहामध्ये चर्चा घडवून आणण्याकरिता आम्हाला चार दिवस वाट पहावी लागली तर मग युवा धोरणामध्ये सुधारणा करावयास किती अवधी लागेल हे माहीत नाही. सभापती महोदय, विधानसभेमध्ये असलेल्या अनेक नवनिर्वाचित आमदारांमध्ये 40 ते 50 टक्के आमदार हे युवक आहेत. त्याचप्रमाणे वरिष्ठांच्या असलेल्या आपल्या विधानपरिषदेच्या सभागृहामध्ये सुध्दा अनेक युवक आमदार आपणास पहावयास मिळतात. या सभागृहामधून राज्याचा कारभार होत असतांना व या राज्यासाठी आपण या सभागृहामध्ये विविध प्रकारचे कायदे तयार करीत असतांना ज्या प्रश्नासंबधी याठिकाणी चर्चा होणे आवश्यक होते ती चर्चा आपण आज याठिक्राणी करीत आहोत. त्याबद्दल मी समाधान व्यक्त करीत आहे. त्यामुळे या राज्याचे युवा धोरण आपण कशापध्दतीने करणार आहोत याचा खुलासा होणे गरजेचे आहे. मी कामगार क्षेत्रामध्ये काम करणारा कार्यकर्ता आहे. त्या क्षेत्रामध्ये काम करीत असतांना आपण अनेक कायदे केले आहेत. किंबहुना, विधानसभागृहामध्ये बाल कामगार कायदा संमत करण्यात आला. तशाप्रकारचे अनेक कायदे संमत होऊन त्याप्रमाणे आपण काम करण्याचा प्रयत्न करीत आहोत. याठिकाणी एक गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही की, बाल कामगार प्रथा बंद झाली आहे काय? मी जबाबदारीने याठिकाणी सांगू इच्छितो की, बाल कामगार प्रथा बंद झालेली नाही. वयाच्या दहाव्या वर्षापासून ते चोवीसाव्या वर्षापर्यंत किंवा वयाच्या दहाव्या वर्षापासून ते एकोणिसाव्या वर्षापर्यंत जो वर्ग आहे, या वयातील तरुणांना आपण योग्य तो आकार देऊ शकतो. आपली संस्कृती, आपल्या प्रथा व परंपरा, आपली भाषा या सर्वांच्या माध्यमातून सर्वांगीण विकास होणारे हे वय आहे. त्यामुळे जर आजचा बाल कामगार तरुण वयामध्ये मजूरी करीत असेल तर त्यासाठी हे युवा धोरण नक्की काय करणार

22-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) B 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ ST/

श्री.भाई जगताप....

आहे? असा मला प्रश्न विचारावयाचा आहे. आणि म्हणून या युवा धोरणासंदर्भात मला आपल्यासमोर एक गोष्ट ठेवणे गरजेचे वाटते. युवा धोरण ठरवीत असतांना महाविद्यालयीन तरुण असेल किंवा इतर क्षेत्रामधील तरुण वर्ग असेल या लहान वयोगटातील मुलांसाठी आपण काय करु शकणार आहोत यासंबंधी एक आकृतिबंध तयार करण्यात आला पाहिजे. त्यादृष्टीने आपण जे धोरण तयार करणार आहोत त्यामध्ये या गोष्टींचा सुध्दा अंतर्भाव असला पाहिजे. वयोगट 10 ते 19 यामधील तरुणांचा सुध्दा त्यामध्ये अंतर्भाव असला पाहिजे. सभापती महोदय, युवा धोरण ठरविण्याकरिता गठीत करीत असलेल्या समितीमध्ये या विधीमंडळातील अनेक तरुण आमदारांचा समावेश करीत असतांना मुंबई विद्यापीठातील, शिवाजी विद्यापीठातील, नागपूर विद्यापीठातील किंवा विविध विद्यापीठातील तरुणांना त्यामध्ये सहभागी करुन घेण्यासाठी त्यांना आमंत्रित केले पाहिजे, किंवा त्या समितीवर त्यांना सदस्य म्हणून घेतले पाहिजे. त्यादृष्टीने आज शाळा-कॉलेज मधून बाहेर पडणा-या तरुणांना भेडसावणाऱ्या समस्यांच्या बाबतीत आपण त्यांना जाणीव करुन देण्याची गरज आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

सभापती महोदय, मला असे वाटते की, कॉलेजमधून बाहेर येणारा तरुण एक वेगळा दृष्टिकोन उराशी बाळगून बाहेर येऊ शकतो. मला आठवते की, 20-25 वर्षापूर्वी टी.व्ही.वर हमलोग नावाची एक नवीन मालिका सुरु झाली होती. ती अतिशय लोकप्रिय झाली होती. खऱ्या अर्थाने आपल्या समाजातील कुटुंब व्यवस्था कशी असावी, या कुटुंब व्यवस्थेमधील अडचणींना सामोरे जाण्याचे प्रतिबिंब आपण सर्वांनी या मालिकेमध्ये पाहिले होते. त्या काळात ती मालिका अतिशय प्रभावी ठरली. माझा प्रश्न असा आहे की, आज त्या मालिकेप्रमाणे घडत आहे काय? तर त्याचे उत्तर नाही असे येते. पूर्वी आपला समज असा होता की, दोन पिढयांमधील अंतर साधारणपणे 50 ते 100 वर्षाचे आहे. आज तशी परिस्थिती राहिलेली नाही. दर 20 वर्षानंतर नवीन पिढी, नवीन प्रकारची विचारधारा या राज्यामध्ये, देशामध्ये आणि जगामध्ये तयार होत आहे. दर 20 वर्षाला नवीन पिढी तयार होत आहे. ही नवीन पिढी अतिशय अनुकरणप्रिय आहे. ते प्रत्येक गोष्टीचे अनुकरण करतात. 10-15 वर्षापूर्वी सेलफान ठराविक लोकांकडे असल्याचे आपण पहात होतो. आज कॉलेजमधील विद्यार्थ्यांकडेच नव्हे तर शाळेमधील काही विद्यार्थ्यांकडे सेलफोन असल्याचे आपणा सर्वांना पहावयास मिळते. अशा प्रकारची ही अनुकरणप्रियता आपल्याला पहावयास मिळते. म्हणून 0 ते 19 या वयोगटातील मुलांवर काही विशिष्ट प्रकारचे संस्कार, देशप्रेम, राज्यप्रेम आणि आपल्या संस्कृतीच्या बाबतीत काही गोष्टी आपण शिकवू शकलो तर मला असे वाटते की, जे युवक धोरण तयार करण्यात येणार आहे ते केल्याचे समाधन तुम्हाला, आम्हाला आणि या सभागृहाला मिळू शकेल.

सभापती महोदय, या ठिकाणी हे जाणणे गरजेचे आहे की, या राज्यातील तरुण दिशाहीन होत आहेत ते स्वत: विचार करु शकत नाहीत. मी नेहमी अनेक तरुणांबरोबर सवाद साधत असतो. तरुणांच्या संदर्भात माझ्या अनेक संस्था देखील आहेत. त्यासंदर्भात मी सगळीकडे फिरत असताना हे तरुण आम्हाला विचार असतात की, आता आम्ही पुढे काय करायचे? याचा अर्थ त्यांच्याकडे दिशा नाही. दृष्टिकोन नाही. म्हणून आपल्यावर ही जबाबदारी येऊन पडणार आहे. आपण त्यांना ही सगळी दिशा दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तशा प्रकारचे शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याची गरज आहे. युवक धोरणामध्ये युवकांचा देखील अंतर्भाव असला पाहिजे. त्या

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

श्री. भाई जगताप.....

माध्यमातून या युवकांनी आम्हाला सांगितले पाहिजे, शिकविले पाहिजे. आमच्या शिक्षण पध्दतीमध्ये काय बदल करावे लागतील काय, बाकीच्या पध्दतीत काय बदल करावे लागतील काय? हे त्यांनी आपल्याला सांगितले पाहिजे. या दृष्टिकोनातून या कार्यक्रमाध्ये युवक असले पाहिजेत असे माझे मत आहे.

सभापती महोदय, कॉलेजच्या बाहेर पडलेले बरेच युवक आज नशेच्या आहारी गेलेले आहेत. माननीय मंत्रिमहोदय, या ठिकाणी बसलेले आहेत. क्रीडा व युवक कल्याण हे विभाग त्यांच्याकडे आहेत. ते स्वत: तरुण आहेत. या राज्याचे मंत्री आहेत. सभापती महोदय, कॉलेजच्या उपाहारगृहात किंवा बाकीच्या परिसरात काय चाललेले आहे, नाक्यानाक्यावर किंवा गल्लीबोळात काय चालले आहे हे या ठिकाणी सांगण्याची गरज नाही. युवक नशेच्या आहारी गेलेले आहेत. त्यांच्यासाठी या युवक धोरणात काय प्रोग्रॅम करण्यात येणार आहे? यासंदर्भात सगळे कायदे आहेत पण त्यांचा उपयोग होत नाही. सभापती महोदय, मी याठिकाणी जबाबदारीने सांगू इच्छितो की, विधानभवनाच्या बाजूला असलेल्या तिन्ही आमदार निवासांच्या आजूबाजुला राजरोसपणे ड्रग्स विकले जात आहेत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप.....

मी जबाबदारीने बोलतो. या ठिकाणी चर्चा झाली आणि आम्ही युवक धोरणाच्या नावाखाली केवळ युवक धोरणच बनविणार असू तर ते धोरण सर्वंकष होणार नाही. युवक धोरण तयार करीत असताना नुसते युवकच नाही तर इतर जी खाती आहेत त्यांचाही विचार करावयास पाहिजे. यामध्ये पोलीस खात्याचा महत्वाचा भाग राहणार आहे. त्या ठिकाणी अलीकडे खानेपूर्ती करण्याची फॅशन झालेली आहे. याबाबत मी अनेक वेळा सांगितले आहे. पोलीस स्टेशनमध्ये फक्त रकाने भरावयाचे अशी परिस्थिती आहे. त्या पोलीस स्टेशनमध्ये किती अदखलपात्र गुन्हे नोंदले, किती बलात्कार झाले, किती गुन्हेगारांना पकडले याचे रकाने भरावयाचे असतात. कोण ड्रग विकतो हे पोलिसांना बरोबर माहीत असते. त्या लोकांना आणून बंद करणार. केवळ रकाने भरण्याचे काम होत असेल तर ते योग्य नाही. युवक धोरणाच्या माध्यमातून राज्य महत्वाचे पाऊल पुढे टाकत असताना ही सर्व खाती एकत्रित करुन आपल्याला काही तरी परिणामकारक यंत्रणा तयार करता येईल काय, याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, हा जो तरुणवर्ग आहे त्याच्यासमोर सगळ्यात मोठी विवंचना जर कोणती असेल तर ती रोजगाराची आहे. आज बेरोजगार तरुणांची संख्या लाखोच्या संख्येने वाढत आहे. आपण प्रत्येक वर्षी पाहतो की, हजारो विद्यार्थी पदवीधर होऊन बाहेर पडतात किंवा इतर कोर्सेस करुन बाहेर पडतात. त्या सगळ्या तरुणांच्या हाताला आपण काम देऊ शकतो काय ? याचे उत्तर 'नाही' असे आहे. हे फ्रस्टेड झालेले तरुण मग इतर चुकीच्या मार्गाला लागतात. मी त्याचे समर्थन करीत नाही. परंतु आपल्याला असे धोरण तयार करीत असताना त्यांना रोजगार कसा उपलब्ध करुन देता येईल या गोष्टीचाही अंतर्भाव करावा लागेल. तरुणांना असे वाटते की, काही कंपन्या येतील आणि आपल्याला रोजगार मिळेल. परंतु त्यांना रोजगार मिळणार नाही. कारण या देशात एकेकाळी ऑर्गनाईज्ड सेक्टर 13 टक्के होता तो आज 7 टक्क्यावर आलेला आहे आणि उद्या तो 5 टक्क्यापर्यंत खाली जाणार आहे. हे आंतरराष्ट्रीय सर्व्हेक्षण आहे.

**तालिका सभापती** ( श्री. चंद्रकांत पाटील ) : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात संपवावे. या प्रस्तावावरील सन्माननीय सदस्यांनी भाषणे 11.30 पर्यंत संपवावयाची आहेत.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आणखी अनेक महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. तरुणांचे अनेक प्रश्न आहेत. या ठिकाणी केवळ चर्चा झाली असे होऊ नये. या चर्चेला मी सुरुवात

...2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ ST/

श्री. भाई जगताप ....

केलेली आहे. मी तरुणांच्या बाबतीत बोलत असताना 10 ते 19 वर्षे या वयोगटाबाबत सांगितले. अजून 19 ते 35 वयोगटापर्यंत जावयाचे आहे. कॉलेजमधून किंवा आय.टी.आय.मधून डिप्लोमा घेऊन जे तरुण बाहेर पडतात त्यासंदर्भात पूर्वी एखाद्या ठिकाणी आय.टी.आय. असावयाचा पण आता प्रत्येक जिल्ह्यामध्ये आणि तालुक्यामध्ये आय.टी.आय. व्हावेत असे धोरण आपण घेतले. त्या आय.टी.आय.मधून बाहेर पडणारे तरुण हे 19 ते 35 या वयोगटातील आहेत. या तरुणांच्या आयुष्याला आकार देण्याच्या बाबतीत काय करणार याचे प्रतिबिंब युवक धोरणामध्ये आले पाहिजे. आयुष्यातील एखादा मार्ग त्याला दिसला पाहिजे आणि तो चोखाळता आला पाहिजे. तरुणांच्या बाबतीत देशभर तसेच राज्यामध्ये अनेक संघटना काम करीत आहेत तसेच काही राजकीय पक्ष काम करीत आहेत. युवक काँग्रेस असेल किंवा युवा मोर्चा असेल त्या माध्यमातून काम करीत आहेत. त्या ठिकाणी आम्ही पक्षाची ध्येयधोरणे सांगतो. या तरुणांनी फक्त पक्षाचा झेंडा खांद्यावर घेऊन यावयाचे किंवा आपला कोणी नेता आल्यानंतर त्यांनी आपली उपस्थिती दर्शवावी एवढेच जर आम्हाला अपेक्षित असेल तर ते योग्य होणार नाही. त्या युवकांना दिशा देण्याच्या दृष्टीने खऱ्या अर्थाने त्यांच्या रोजगाराचा प्रश्न आम्ही कसा सोडविणार याचा विचार झाला पाहिजे. उद्योगधंदे येत आहेत आणि ते येतच राहणार आहेत. परंतु त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नोकऱ्या कमी होत चालल्या आहेत. वैश्विकीकरणाच्या काळामध्ये आज सर्वात जास्त सर्व्हिस सेक्टर वाढत आहे. आपल्याला अनेक उदाहरणे माहीत असतील. आज आय.टी. सेक्टरमध्ये महाराष्ट्रात जवळजवळ 5 लाखापेक्षा जास्त चांगल्या नोकऱ्या आहेत. जो तरुण कॉलेजमधून बाहेर पडतो आणि ज्याला अस्खलित इंग्रजी बोलता येते त्याला त्या ठिकाणी नोकरी मिळते. परंतु त्या नोकरीचा कालावधी जर आपण बघितला तर ते तरुण 24 तास संगणकासमोर बसून काम करीत असतात. त्यांना पगार चांगला असतो. एकेकाळी त्या ठिकाणी 25 हजार रुपये पगार मिळत होता पण मध्ये रिसेशनमुळे त्यांचा पगार 10 हजार रुपयांवर आला आणि आता त्यांना 10 ते 15 हजार रुपये पगार मिळतो. त्या तरुणांना संरक्षण नाही. त्या ठिकाणी युनियन करता येणार नाही असा कायदा आपण केला. मी युनियनचे काम करतो म्हणून हे सांगत नाही तर त्यांचेही काही प्रश्न आहेत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/ प्रथम श्री.बरवड 10:50

श्री.भाई जगताप....

हिंजवडी येथे तरुणीवर अन्याय झाला तो तुम्हा आम्हाला दिसतो. परंतु ते एकच उदाहरण आहे असे समजण्याचे कारण नाही. प्रत्येक ठिकाणी काहीना काही घडत असते. त्यांना संरक्षण मिळत नाही. आपण कायदा बनवितो. उद्योगधंद्यांना, उद्योग क्षेत्राला प्रोत्साहन दिले पाहिजे हे खरे आहे. राज्यातील उद्योगधंदे वाढले पाहिजेत याबद्दल दुमत नाही. परंतु उद्योग वाढत असताना कायद्याची चाकोरी असणे आवश्यक आहे. तरुणांच्या बेरोजगारीबद्दल बोलत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, मी अनेक ठिकाणी, अनेक देशामध्ये फिरत असतो. आज त्या देशामध्येही हीच समस्या आहे. तेथील तरुणांना सुध्दा आम्हाला कोणत्या मार्गाने नोकरी मिळणार आहे असे वाटत असते. सुदैवाने आज जग पुढे गेलेले आहे. जागतिकीकरणामुळे त्याचा फायदा आम्हाला मिळत आहे. जागतिकीकरणामुळे सर्व्हिस सेक्टर प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. परंतु या युवक वर्गाला त्याची कल्पनाच नाही. त्यांना हेच सांगण्याची भूमिका असावयास पाहिजे. हे सांगण्यासाठी यंत्रणा उपलब्ध असली पाहिजे. जेणेकरुन साध्या साध्या गोष्टींच्या माध्यमातून त्यांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल. स्वत:चे कुटुंब सांभाळू शकतो. एक चांगले आयुष्य जगू शकतो. त्यामुळे शासनाने रोजगाराचा प्रश्न हाताळणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, युवा धोरणामध्ये खेळ हा विषय अपरिहार्य आहे. शासनाने नोक-यांमध्ये खेळाडूंसाठी 5 टक्के जागा राखीव ठेवण्याचा निर्णय घेतलेला आहे ही चांगली बाब आहे. आजची परिस्थिती अशी आहे की, केवळ क्रिकेट या खेळात प्राविण्य मिळविलेल्या खेळाडूला नोकरी मिळते. क्रिकेट हा खेळ धर्मासारखा झाला आहे. आम्ही सुध्दा गल्ली बोळात क्रिकेट खेळलो आहे. इंटर कॉलेजमध्ये क्रिकेटच्या स्पर्धांमध्ये भाग घेतलेला आहे. परंतु आपण राजकारणात आल्यामुळे सफेद कपडे परिधान करुन इकडे आलो आहोत.

सभापती महोदय, या राज्याच्या मातीतील खेळ म्हणजे कबड्डी हा आहे. या देशाला खाशाबा जाधव यांनी पहिले ब्रान्झ पदक मिळवून दिले होते. पण आज कुस्तीच्या खेळाची काय स्थिती आहे ? कुस्तीची मैदाने वा केंद्रे बंद करण्यात आली आहेत. आम्ही यासाठी सातत्याने भांडत असतो. सुदैवाने मी कबड्डी खेळाच्या संदर्भातील कमिटीवर आहे. कबड्डी वा कुस्ती

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

खेळणारा हाच वयोगट आहे. आजची मुले त्याच्या पुढे गेली आहेत. आज प्रत्येकाला असे वाटते की, माझे करियर झाले पाहिजे, रेल्वेत, बँकेत नोकरी मिळाली पाहिजे. पण त्यामध्ये त्यांना यश मिळत नाही. बॉडी बिल्डिंग हा एक उत्कृष्ट खेळ आहे. गेल्या महिन्यामध्ये रशियामध्ये 'मिस्टर युनिव्हर्स' या किताबाची स्पर्धा झाली होती. या स्पर्धेत भारताला गोल्ड मेडल मिळाले आहे हे कितीजणांना माहीत आहे ? अलिबागच्या आशिष साखळकर या बॉडी बिल्डरने हा किताब पटकावला आहे. या बॉडी बिल्डरला विमानतळावर घेण्यासाठी कोणी गेले नव्हते. परंतु मी त्याला घेण्यासाठी गेलो होतो. या खेळाकडे तरुण वर्ग आकर्षित होतील यासाठी शासनाने योजना आखली पाहिजे. त्याचप्रमाणे शासनाने युवक धोरण राबविताना याकडेही जाणीवपूर्वक लक्ष देणे आवश्यक आहे. हे सर्व एका दिवसात होईल असे अपेक्षित नाही. परंतु त्यासाठी शासनाने पावले उचलली पाहिजेत, रोड मॅप दिला पाहिजे. युवक धोरण ठरविताना प्रत्येक खेळाला महत्व दिले पाहिजे. आज क्रीडा विभागासाठी राज्याच्या बजेटमधून किती निधी दिला जातो हे देखील महत्वाचे आहे. राज्यातील शेतक-यांचे, कष्टक-यांचे, शिक्षकांचे प्रश्न सुटले पाहिजेत हे खरे आहे. पण या घटकासाठी शासन काही मार्ग काढणार की नाही ? माननीय वित्त मंत्र्यांनी, क्रीडा मंत्र्यांनी या विषयाकडे लक्ष दिले नाही, तरुणांना संधी उपलब्ध करुन दिली नाही तर हा तरुण वर्ग भरकटल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, सध्या इंटरनेटचा विषय महत्वाचा झाला आहे. या क्षेत्राला तुम्ही आम्ही थांबवू शकत नाही. परंतु या क्षेत्रातूनच सायबर क्राईमची संख्या वाढत आहे. या क्राईममध्ये 90 टक्के युवक आहेत. ते का घडत आहे ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. भाई जगताप पुढे सुरु...

कारण आम्हाला त्याचा प्रसार कसा होतोय हे कळतेय. त्यामधील जे जे काही वाईट आहे ते ते तरुण घ्यायला लागले आहेत. पोलीस खात्यामध्ये सायबर क्राईमसारखा सेल निर्माण करण्यात आला. पोलीस या बाबतीतील गुन्हे शोधून काढतात. आपण एवढेच केले की मग हा विषय संपला म्हणून समजायचे. परंतु असे करता येणार नाही. आपल्याला ही जी कम्युनिकेशनची अत्याधुनिक सुविधा उपलब्ध झालेली आहे तीचा आपण चांगल्या गोष्टीसाठी कसा उपयोग करु शकू हे पाहिले पाहिजे. पूर्वी कम्युनिकेशनच्या संदर्भात अडचणी होत्या. कम्युनिकेशन होत नव्हते. पण आज प्रत्येकाकडे सेलफोन आहेत. कितीही चांगल्या गोष्टी केल्या तरी चोर आहेतच. परंतु त्या निगेटीव्ह भागामध्ये मी जाऊ इच्छित नाही. आज कम्युनिकेशनसाठी आपल्याकडे सगळे काही उपलब्ध आहे. इंटरनेट उपलब्ध आहे. या इंटरनेटच्या माध्यमातून युवकांना आपण प्रशिक्षित करु शकतो का, त्यांना काही गोष्टीबाबत अवेअरनेस देऊ शकतो काय ? असे प्रश्न पुढे येतात आणि त्याचे उत्तर "होय" असेच देता येईल. आपल्यासमोर इंटरनेटसारखा एक ऑप्शन उपलब्ध आहे. या ऑप्शनचा फायदा घेऊन या सगळया युवा पिढीसाठी आपल्याला अवेरनेस प्रोग्रॅम करावा लागेल. मग नशाबंदीचा विषय असेल..(अडथळा).. नशाबंदी मंडळाचा मी सदस्य आहे. दुर्दैवाने त्या मंडळाच्या बैठका होत नाहीत. काही ठिकाणी या मंडळाचे काम अतिशय चांगले आहे. न्यायमूर्ती चंद्रचूड हे त्या मंडळाचे अध्यक्ष आहेत. अतिशय चांगली माणसे त्या मंडळावर आहेत. काम करण्याची ऊर्मी आणि धमक त्यांच्यामध्ये आहे. परंतु पैसे नाहीत. हा केवळ एवढाच विषय नाही. अशा प्रकारचे जे जे काही उपक्रम आपण हाती घेतलेले आहेत ते नुसते कागदावर राहून चालणार नाही. त्याला आवश्यक असणारा निधी उपलब्ध करुन दिला नाही तर त्या उपक्रमाने पुढे कशी वाटचाल करायची हा माझ्यापुढे असलेला प्रश्न आहे... (बेल वाजविण्यात येते)...

सभापती महोदय, आपण बेल वाजविल्यानंतर मी काही लिहून आणलेले मुद्दे खाली ठेवले. या विषयावर आणखीन सविस्तरपणे आणि आकडेवारीसहीत बोलता येईल. माझे सहकारी देखील या विषयावर बोलणार आहेत. युवकाचे धोरण ठरवित असताना स्काय इज दि लिमिट. या चर्चेसाठी किमान चार-पाच तासाचा वेळ दिला जाईल अशी माझी अपेक्षा होती. आजचे तरुण हे देशाचे उद्याचे भवितव्य घडविणारे आहेत. 2020साली आपला भारत देश महासत्ता बनण्याची स्वप्ने आपण

..2..

(श्री. भाई जगताप...

पहात आहोत. अशा महत्वाच्या विषयावरील चर्चेच्या वेळी सभापती महोदय, आपण बेल वाजविणार असाल तर मग आपण फक्त नाममात्र चर्चा करणार आहोत काय असा माझ्यासारख्याचा समज होतो. मी ब-यापैकी तरुण आहे. त्यामुळे तरुणांची चिंता मला अधिक भेडसावत आहे. आमचे गुरुजी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी हे देखील या विषयावर बोलणार आहेत. त्यांना देखील तेवढीच चिंता आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांनी हा प्रस्ताव दिला. परंतु या प्रस्तावाची सुरुवात करण्यास त्यांनी मला दूरध्वनीवरुन सांगितले. सभापती महोदय, या विषयाची व्याप्ती इतकी मोठी आहे की कोणत्याही मुद्याची पुनरावृत्ती होणार नाही. मी फक्त बेरोजगार आणि सायबर हे दोनच मुद्दे मांडले. या तरुणांच्या संबंधात 100 मुद्दे मांडता येतील. पावलो पावली त्यांच्या विषयीचे मुद्दे आपल्याला सापडतात. मला सगळे मुद्दे मांडता येणार नाहीत. माझ्या अन्य सहका-यांना बोलण्यासाठी वेळ मिळाला पाहिजे. मला एवढेच सांगायचे आहे की, या चर्चेतून अमृतासारखे काही तरी बाहेर पडू द्या. अमृत निघण्यासाठी प्रचंड मंथन करावे लागते. सभागृहामध्ये या विषयावर विचारमंथन होऊन जे काही अमृत बाहेर निघेल ते ख-या अर्थाने देशाच्या आणि राज्याच्या युवा पिढीला लाभदायक ठरेल अशी अपेक्षा करतो आणि माझे विचार थांबवितो. जय हिंद ! जय महाराष्ट्र !!

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, म.वि.स.नियम २६० अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, लोकमान्य टिळक हे जहालमतवादी होते. न्या.रानडे, न्या.गोपाळकृष्ण गोखले हे मवाळ म्हणून ओळखले जात होते. लोकमान्य टिळक जहालमतवादी, क्रांतीकारक विचाराचे म्हणून ओळखले जात होते. या दोन्ही विचारांच्या कार्यपध्दतीमध्ये मोठा फरक होता. लोकमान्य टिळकांना विचारण्यात आले होते की, आज तुम्ही मोठया प्रमाणात सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करण्याची चळवळ सुरु केली, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्याचा कार्यक्रम सुरु केला, कामगारांमध्ये स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने संघर्ष पेटविला. उद्या या देशाला स्वातंत्र्य मिळाले तर तुम्हाला कोण व्हावेसे वाटेल? लोकमान्य टिळकांनी सांगितले की, ज्या दिवशी या देशाला स्वातंत्र्य मिळेल त्यावेळेस मी हयात असलो तर मला शिक्षकी पेशा स्वीकारण्यास आनंद वाटेल.

सभापती महोदय, महात्मा गांधीजींनी दक्षिण आफ्रिकेमध्ये संघर्षमय जीवन जगून या देशात परत येण्याचा निर्णय घेतला. न्या.गोपाळकृष्ण गोखले हे त्यांचे गुरु होते. न्या.गोखले यांच्याकडे महात्मा गांधीजी गेले आणि त्यांना विचारले की, मी काय करु? त्यांनी सांगितले की, या देशातील माणसांची जीवनपध्दती जाणून घेण्यासाठी तुम्ही संपूर्ण देशभर फिरा, म्हणजे तुम्हाला या देशाची खरी परिस्थिती समजेल. त्यानंतर महात्मा गांधीजींनी बॅरिस्टरची पदवी मिळवूनही वकिली व्यवसाय सोडून दिला व सन्यासी जीवन जगले. त्यांनी या देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात अशा मंतरलेल्या पिढीचा मोठा हातभार लागलेला आहे. त्यांच्या दैदिप्यमान नेतृत्वामुळे या देशातील त्या काळातील तरुण पिढी त्यांच्याच आदर्श विचाराने प्रेरित झाली होती. स्वातंत्र्योत्तर काळात पहिली ३०-४० वर्षे या देशामध्ये सुसंस्कृत सामाजिक, राजकीय जीवन पध्दतीचा आदर्श निर्माण झाला. या देशामध्ये आपल्यापुढे कोणाचा तरी आदर्श आहे, ज्यांच्या नेतृत्वामुळे माझ्या जीवनामध्ये फरक पडू शकतो असे त्या काळातील तरुणांना वाटू लागले. आज आपण इतिहासाची पाने चाळताना आपल्या नजरेसमोर या थोर पुरुषांच्या जीवनाचा पट उलगडू लागतो.

सभापती महोदय, माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार या देशातील १४ ते ३५ वयोगटातील तरुण पिढीचे प्रमाण ४६ टक्के आहे. १४ ते ४५ वयापर्यंतची आकडेवारी विचारात

..२...

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.........

घेतली तर या देशातील तरुण पिढीचे प्रमाण साधारणत: ६२ ते ६२.५ टक्के इतके आहे. म्हणूनच भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो.

सभापती महोदय, चीन हा देश लोकसंख्येच्या मानाने जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. युरोपीय देश, अमेरिका, कॅनडा, इंग्लंड या देशांची लोकसंख्या विचारात घेतली तर त्या देशांमध्ये युवकांचे प्रमाण आपल्या देशाच्या मानाने फारच कमी आहे. चीन या देशाने कुटुंब नियोजन सक्तीचे केल्यानंतर त्या देशात नवीन पिढी निर्माण होण्याचे प्रमाण घटले. चीन या देशात एका कुटुंबात दोन मुलांची मर्यादा निश्चित केली गेली. काही काळानंतर एकच मूल असावे अशी सक्ती करण्यात आली व ज्या कुटुंबाला मूल नसेल त्यांना प्रोत्साहनात्मक बक्षिस देण्याची योजना राबविण्यात आली. त्यामुळे चीन देशात एकूण लोकसंख्येपैकी वयस्कर मंडळींचे प्रमाण मोठे आहे. भारत देश हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. आजची युवा पिढी उद्याच्या भारत देशाचा खरा आधारस्तंभ आहे.

नंतर एच.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी........

असे वारंवार म्हटले जाते ते सत्यही आहे. देशाची उद्याची सुत्रे ही आजच्या युवा पिढीच्या हातात आहे. आजच्या युवकातून उद्याचे राज्यकर्ते, प्रशासनकर्ते तसेच लोकप्रतिनिधी निर्माण होणार आहेत. म्हणून आजच्या युवकांनी आपल्या सामाजिक, राजकीय व शैक्षणिक युवा शक्तीचा सदुपयोग देशाच्या विकासासाठी करायला हवा. आपला देश आज विकासात फार पुढे आहे. यासाठी युवकांमधील कार्य कुशलता, सहकार्य, संघटन शक्ती, कार्य करण्याची जिद्द या देशाला फायद्याची आणि लाभाची ठरणार आहे. युवकांची देशांतर्गत प्रश्न सुटण्यासाठी मोलाचे सहकार्य लाभते. युवा वर्गाला त्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळाले पाहिजे. जेणेकरुन या युवा शक्तीचा उपयोग सक्षमतेने देशाच्या विकासासाठी होऊ शकतो आणि युवा वर्ग म्हणजे एक महान शक्ती म्हणून महान आधार असतो, ही वस्तुस्थिती आहे. पण आपण पाहिले तर आज जरी युवा धोरणाबाबत चर्चा करीत असलो तरी आजपर्यंत या राज्याचे युवा धोरण ठरविलेलेच नव्हते. मी मघाशी माननीय मंत्री श्री. सुरेश शेट्टी यांच्याशी याच विषयाच्या अनुषंगाने बोलत होतो. देशाला स्वातंत्र्य मिळून 60 वर्षे निघून गेली, संयुक्त महाराष्ट्राला सुध्दा 50 वर्षे होऊन गेली तरी देखील या पुरोगामी राज्यात, या प्रगत राज्यात युवा धोरणच ठरविलेले नाही. देशातील म्हणजेच पंजाब, हरियाना, नागालँड, आसाम आणि त्रिपुरासारख्या छोट्या छोट्या राज्यांचा विचार करता त्यांनी युवा धोरण ठरविले असून खेळाडूंना प्रोत्साहन दिले आणि खेळाडू सुध्दा निर्माण करीत आहेत. पण आपल्या राज्यात आज क्रिकेट सोडले तर दुसऱ्या कोणत्या खेळांना प्रोत्साहन दिले जाते याचा विचार केला पाहिजे. क्रिकेटच्या बाबतीत सुध्दा अमुक पैसे देऊ नका, अमुक सूट देऊ नका अशा प्रकारे विरोध होतो. पण ऑलिम्पीकच्या सामन्यांसाठी 100 कोटी रुपयाची मागणी दुसरीकडे केली जाते. आपल्या राज्यात खो-खो तसेच कबड्डीसारख्या मैदानी खेळांना आपण काय आणि किती निधी उपलब्ध करुन देतो याचा विचार करावा. तसेच रेसलिंगमध्ये प्रसिध्द असलेले मारुती मानेसारखे कुस्तीगीर कोल्हापूर भागात तयार होतात आणि देशाचे नाव उज्जवल करतात. पूर्वीच्या काळात शाहू महाराजांमार्फत अशा खेळाडूंना आखाड्याच्या ठिकाणीच दुधाचा पुरवठा केला जात होता पण आज आपल्या राज्याची अशा खेळ आणि खेळाडूंच्या बाबतीत काय परिस्थिती आहे. असे विषय या धोरणात किंवा नवीन संकल्पनेत शासनाला घ्यावे लागतील. दुसऱ्या बाजूने तसेच

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ........

आजच्या युवा पिढीबाबत विचार केला तर विल्सन किंवा सेंट झेव्हियर कॉलेजसारखे मुंबईतील धनाढ्य पालकांची मुले जातात अशा कॉलेजेसमध्ये अनेक दुर्व्यसन लागलेली मुले दिसून येतात. दिवसाला 10-10 पाकिटे गुटखा खाताना दिसतात तर काही ठिकाणी ड्रग्जच्या आहारी गेलेली युवा पिढी सुध्दा दिसून येते. अशा प्रकारे या धनाढ्य पालकांना सर्व साहित्य व साधने उपलब्ध असताना देखील आपल्या मुलांकडे पाहण्यास वेळ नसतो. आपला मुलगा काय करतो याचा विचार करण्यासाठी देखील त्यांना वेळ नाही, अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ....

सभापती महोदय, इंटरनेटमुळे लॅपटॉपमुळे किंवा कंप्युटरमुळे जग तुमच्या समोर उभे राहिलेले आहे. जगात आज जे काही चालले आहे त्याची बित्तंबातमी तुम्हाला कळत असते. जगामध्ये आज जे काही चालले आहे ते तरुण पिढीला दिसत असते. आज या तरुण पिढीचे आदर्श महात्मा गाधी, पंडित जवाहरलाल नेहरु, भगत सिंग, लोकमान्य टिळक, सुभाष चंद्र बोस हे नाही तर तरुण पिढीचे आदर्श् डिंग डॉंग करणारे, नाचणारे, बोंबा मारणारे झालेले आहेत.

आज आपल्या टीव्हीवरील ज्या सिरीअल चालू आहेत त्यामध्ये मध्ये काय चालले ते एकदा बघा. या सिरीअलने आता किळसवाणे स्वरुप धारण केलेले आहे. सर्व कुटुंबाला बसून बघता येतील अशा सिरीअल्स आता राहिलेल्या नाहीत त्यामुळे नांदेडच्या 40 बागवान कुटुंबांनी आपले टीव्ही रस्त्यावर नेऊन फोडले होते. नांदेडमध्ये दीड ते दोन हजार बागवान समाजाची लोकसंख्या आहे. या कुटुंबांनी टीव्ही का फोडले याचा आपण विचार करण्याची आवश्यकता आहे. घाणेरडया, किळसवाण्या, ओंगळ अशा सिरीअल आम्हाला बघावयाच्या नाहीत त्यामुळेच या बागवान समाजातील 40 कुटुंबाने आपले टीव्ही फोडले. आता टीव्ही वर ज्या काही सिरीअल्स चालू आहेत त्या सिरीअल्स आजोबा, आजी, वडील, आई, नातू आणि नातवंडे पाहत असतात. परंतु सर्व कुटुंब एकत्र बसून पाहता येतील अशा सिरीअल्स आहेत काय ?

सभापती महोदय, आज कुटुंब व्यवस्था संपूर्णपणे कोलमडून पडलेली आहे. अगोदर एकत्र कुटुंब पध्दती होती व त्या कुटुंबात एक प्रमुख असायचा परंतु आता एकत्र कुटुंब पध्दती लोप पावून आता विभक्त कुटुंब पध्दती उदयास आलेली आहे. हम दो, हमारे दो अशी कुटुंब पध्दती निर्माण झ ाालेली आहे. आता या विभक्त कुटुंब पध्दतीवर कोणाचेही नियंत्रण राहिलेले नाही. विभक्त कुटुंब पध्दतीमध्ये चंगळवाद रुजला आहे. आज महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत आहेत. आज महिला सर्व क्षेत्रात काम करीत आहेत. आज महिला इंजिनिअर, डॉक्टर, वकील, सॉफ्टवेअर इंजिनिअर होत आहेत. नव-याला जर 50 हजार पगार असेल तर बायकोला सुध्दा 50 हजार रुपये पगार मिळतो. त्यामुळे चंगळवादाला आपल्याकडे सुरुवात झालेली आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. चंगळवादामुळे आज घटस्फोटाचे प्रमाण सुध्दा वाढलेले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी ....

आपल्याकडील फॅमिली कोर्टात घटस्फोटाचे दावे मोठया प्रमाणात येत आहेत. लग्न होऊन दोन महिने होत नाहीत तोच ही मंडळी घटस्फोट घेण्यास तयार होत असतात. या मंडळींना खरे म्हणजे कौन्सिलंगची गरज आहे परंतु या मंडळींना कौन्सिलींग मिळत नाही. आज कोर्टात सुध्दा ताबडतोब घटस्फोट मिळतो.

सभापती महोदय, आता जग हे स्पर्धेचे झालेले आहे. स्पर्धेच्या युगात तरुण वैफल्यग्रस्त झालेला आहे. आपल्याकडील तरुण मंडळी ग्लॅमरकडे आकर्षली जात आहे. मॉडेल विवेका बाबजीचे काय झाले ते आपल्याला माहिती आहे. ग्लॅमरच्या दुनियेत तरुणपणी सर्व ऐश्वर्य मिळत असते परंतु जसजसे तुमचे वय वाढते तसतसे तुम्ही ग्लॅमरच्या जगातून बाहेर फेकले जातात व पर्यायाने पैसा येण्याचे प्रमाण कमी होते त्यामुळे या ग्लॅमरच्या जगातील बरीच मंडळी आत्महत्या करीत असतात. त्यामुळे या तरुण पिढीला सुधारावयाचे असेल तर त्यासाठी चांगले वातावरण निर्माण करण्याची आवश्यकता आहे. या तरुणांमध्ये आपल्याला नवा आदर्शवाद तयार करावा लागणार आहे. सामाजिक जबाबदारी म्हणून, अवेअरनेस कॅम्पेन आपल्याला करावे लागणार आहेत. आज जग आपल्या मांडीवर आलेले आहे आणि हे जरी खरे असले तरी जगाला अजून जवळ आणण्याचा प्रयत्न मिडीयाद्वारे सतत होत असतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.परशुराम उपरकर)**

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी ...

आज आपल्याला तरूण पिढीचे भवितव्य घडवायचे आहे. उद्याची तरूण पिढी ही देशाचा आधार आहे. सन 2020 मध्ये भारत महासत्ता होणार आहे. केवळ पायाभूत सुविधा निर्माण करून, उंच टॉवर बांधून हे होणार नाही. आपल्याला जर महासत्ता बनायचे असेल तर त्यासाठी मनुष्यबळाचा विकास करावा लागेल. आज अमेरिकन लोक भारतीयांचा हेवा करतात. याला कारण कुशल मनुष्यबळ हे आहे. आज अमेरिकेमध्ये आय.टी.क्षेत्रात, इंजिनिअरिंग क्षेत्रात तसेच वैद्यकीय क्षेत्रात भारतीयच पुढे आहेत. म्हणजे कुशल मनुष्यबळ हा देखील आता भविष्यामध्ये महत्त्वाचा भाग होणार आहे, याकडे आपल्याला दुर्लक्ष करून चालणार नाही. उद्याचा युवा हा देशाचा कणा राहणार आहे. मी जास्त वेळ घेऊ इच्छित नाही. या प्रस्तावावर अन्य सन्माननीय सदस्यांना देखील आपले विचार मांडावयाचे आहेत. आपल्या राज्यात, देशात चांगले एनजीओ आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्यावतीने सौ.सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्त्वाखाली चांगले काम करण्यात आले आहे. त्यांनी कित्येक घटकांना प्रोत्साहित केले आहे. त्यांनी 2000 तरूणांच्या मुलाखती घेऊन, त्यांचे मत काय आहे, मन काय आहे हे जाणून घेतले व त्यासंबंधीचा सर्वसमावेशक अहवाल शासनाला सादर केला आहे. तो अहवाल चांगला असेल तर जरूर विचारात घ्यावा. त्यात काही सुधारणा करायच्या असतील तर त्या जरूर कराव्यात. आपले युवा धोरण हे सर्वसमावेशक असले पाहिजे. ग्रामीण,शहरी,आदिवासी भागातील तरूण ज्या ज्या क्रीडा क्षेत्रात प्राविण्य दाखवत असतील त्यांचा सुद्धा समावेश युवा धोरणामध्ये करावा. युवा धोरणासाठी जे सहकार्य आमच्याकडून पाहिजे असेल ते आम्ही निश्चितपणे देऊ एवढेच या निमित्ताने सांगतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप, संजय दत्त आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी म.वि.प.नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडला आहे, त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

माझ्यासह सभागृहामध्ये असलेले सन्माननीय सदस्य हे युवक चळवळीमधून राजकीय पक्षामध्ये आलेले आहेत. त्याबद्दल मला अभिमान आहे. मी युवक चळवळीमध्ये असताना तरूण मुलीच्या अत्याचाराचे प्रकरण माझ्यासमोर आले होते. त्यासाठी चर्चा सत्र आयोजित करण्यात आले होते. अडीच ते तीन तास अनेकजण बोलल्यानंतर मला बोलण्याची संधी मिळत नव्हती. शेवटी मला बोलण्याची संधी मिळाल्यानंतर मी प्रॅक्टीकल बाबींवर बोलण्यास सुरूवात केली. या सदनातील सदस्य हे 45 ते 50 या वयोगटामधील आहेत. ते युवक चळवळीतून आलेले आहेत. सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये काम करणारे वयोवृद्ध युवकांची आठवण ठेवणार की नाही हा हे एक विचार करायला लावणारा प्रश्न आहे. आज बेरोजगारांचा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. शहरी आणि ग्रामीण भागामध्ये मराठी भाषिक बेरोजगारांची संख्या वाढत आहे. बेरोजगारांवर बोलल्याशिवाय राज्याचे युवा धोरण पूर्ण होणार नाही. युवक धोरण असले पाहिजे हे मी गेली दोन वर्षे ऐकत आहे. सन 1994 मध्ये महिलांविषयक धोरण जाहीर झाले.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सन 1960 पासून 1995 पर्यंत या 30 वर्षाच्या कालावधीत महिलांची प्रगती झाली किंवा कसे याची माहिती घेण्यासाठी महिला धोरण करण्यात आले. मला चांगले आठवते की मी एका वयोवृध्द स्वातंत्र्यसैनिकांना विचारले की, "एखादे धोरण केल्यानंतर आपणास काय वाटते ? कारण आपण अनेक चढउतार पाहिलेले आहेत." त्यावर त्यांनी मला सांगितले की, "एखाद्या जीवंत असणाऱ्या चळवळीमधून जेव्हा एखादे धोरण तयार होते तेव्हा ते शरीरामधून प्राण निघून गेल्यावर फक्त कलेवर राहते तशाप्रकारे धोरणाची अवस्था होते."

सभापती महोदय, आपण युवा धोरण केले पाहिजे ही चांगली बाब आहे. परंतु गेल्या 20-25 वर्षाच्या कालावधीत युवकांनी काय साध्य केले आहे ? युवक कुठे अपयशी ठरत आहेत ? यापूर्वी आपले युवासंबंधी धोरण नव्हते काय ? सन्माननीय खासदार श्रीमती सुप्रिया सुळे राजकारणात आल्यानंतर आपण धोरणांचा विचार करायला लागलो आहेत काय ? यापूर्वीची धोरणे अपयशी झ ाली आहेत काय ? यापूर्वीच्या धोरणामध्ये कायदे विषयक बदल केले पाहिजेत का ? यापूर्वीच्या धोरणांसाठी निधी प्राप्त झाला नाही का ? असे अनेक प्रश्न उभे राहतात. माझ्या मते केंद्र आणि राज्यातील कायद्यामध्ये बदल करुन स्थानिक युवकांना प्राधान्य दिल्याशिवाय बेरोजगारीचा प्रश्न सुटणार नाही. अशाप्रकारचा कृती आराखडा केल्याशिवाय काही होणार नाही. अन्यथा पायाचे दगड त्याच ठिकाणी राहतील आणि शिल्पकार एका बाजूला राहतील. ज्यांच्यासाठी धोरण केले तो समूह एका बाजूला राहील अशी परिस्थिती दिसेल.

सभापती महोदय, मला येथे आवर्जून सांगितले पाहिजे की, रोजगार संदर्भातील कायद्याची अंमलबजावणी करुन आपण स्थानिक युवकांना प्राधान्य देण्यासाठी कोणती पावले उचलतो याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

युवक पिढी कशी वाईट मार्गाला लागली आहे याची चर्चा सातत्याने होत असते. खरे म्हणजे आजची तरुण पिढी आधीच्या तरुण पिढीपेक्षा खूप हुशार आहे. त्यांच्यात सतत कोणत्या ना कोणत्या गोष्टींमध्ये शोध घेण्याची वृत्ती आहे. जगामध्ये जे काही नवीन घडते ते भारतामध्ये घडावे असे वाटणारे अनेक तरुण-तरुणी आहेत. कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये तरुण पुढे जात आहेत. झी चॅनेलवरील लिटील चॅम्पस् असो की सा रे ग मा प सारखा कार्यक्रमा असो. लहान

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

मुलांपासून तरुण-तरुणीं मोठ्या प्रमाणावर या कार्यक्रमात सहभागी झालेली दिसतात. आज विविध वाहिन्यांवर अनेक प्रकारच्या स्पर्धा होत आहेत त्यामध्ये तरुण तरुणी मोठ्या प्रमाणावर सहभागी होताना दिसत आहे. तेव्हा आजची तरुण पिढी भरकटलेली आहे हे पूर्ण सत्य नाही. विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या किंवा देशभर ऑनर किलिंगची चर्चा सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी राज्यातील कीडापट्टुंना प्रोत्साहन देण्यासाठी आपण कोणती पावले उचलतो असा महत्वाचा प्रश्न उपस्थित केला.

याठिकाणी युवा धोरणावर चर्चा होत असताना देशाच्या कीर्तिला कलंक लागावा अशी घटना चर्चिली जात आहे. महिला हॉकीपट्टुंचे शोषण त्यांचे कोच करीत आहेत अशी चर्चा आहे. मला वाटते की, Don't take us for granted. युवक म्हटले की युवतींना गृहीत धरले जाते. मला कोणावर टीका करायची नाही. युवकांमध्ये युवती आल्याच असे गृहीत धरुन आपण समोर जातो असे गृहीत धरण् बरोबर नाही. ज्या युवती प्रतिनिधीत्व करतात त्यांच्या सुरक्षिततेच्या संदर्भात आपण काय पावले उचणार आहोत हा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच क्रीडा क्षेत्रातील खेळाडूंची सातत्याने उपेक्षा होते त्यांच्याबाबत आपण कोणती पावले उचलणार आहात ? त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी काय करणार आहोत याबद्दल देखील विचार करणे गरजेचे आहे.

युवकांच्या संदर्भातील आणखी एक महत्वाचा प्रश्न म्हणजे जास्तीत जास्त श्रम करणारी युवा शक्ती देशस्तरावरुन आंतरराष्ट्रीय स्तरावर जात आहे. स्वदेश सारखा सिनेमा खूप गाजला. परदेशात 10-15 वर्षे काम केल्यानंतर त्यास पुन: येथे यावयाचे असेल तर अशांना येथे संधी नाहीत. परदेशातील कार्य संस्कृती आणि येथे परत आल्यानंतर काय काम करायचे यामध्ये मोठी दरी आहे. आज अनेक तरुण तरुणी परदेशात मोठमोठ्या हुद्दांवर आहेत. त्यांच्या बुध्दीचा शक्तीचा व श्रमाचा उपयोग भारताला अप्रत्यक्षरित्या होत असला तरी प्रत्यक्षरित्या तेवढ्या मोठया प्रमाणात होत नाही. परदेशातून येथे आल्यावर त्यांना याठिकाणी संधी नाही याकडे मी लक्ष वेधू इच्छित आहे.

सभापती महोदय, आपण जेव्हा युवकांबद्दल बोलतो, तेव्हा आपल्या डोळ्यासमोर, झेंट झ ेव्हीयर, विल्सन कॉलेज किंवा अन्य कॉलेजजवळ घुटमळणारे युवक दिसतात.

यानंतर श्री.गायकवाड..

अप्रुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KGS/ ST/ KTG/ प्रथम श्री.अजित शिगम 11.25

डॉ.नीलम गो-हे .......

श्री.भालचंद्र नेमाडे यांनी लिहिलेल्या कादंबरीतील पांडुरंग सांगवीकर हा नायक पहिल्यांदा डेक्कन जिमखान्यावर आल्यानंतर तेथील तरुण मुली पाहून भांबावून जातो. येथील तरुणी आणि त्याच्या खेडयातील तरुणी यामध्ये मोठया प्रमाणावर फरक या नायकाला पहावयास मिळतो. वेगवेगळया ठिकाणचे वेगवेगळे युवक वेगवेगळी अपेक्षा ठेवून या युवा धोरणाकडे आज पहात आहेत असे मला वाटते.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. युवा पिढीसाठी धोरण ठरविण्याचा निर्णय शासनाने तत्वतः घेतला आहे काय ? जर अशा प्रकारचे धोरण ठरविण्याचा निर्णय शासनाने तत्वतः घेतला असेल तर त्यासाठी आतापर्यतच्या धोरणामुळे काय काय प्राप्त झाले आहे असा एक स्टेटस पेपर तयार केला पाहिजे. यामध्ये आपण तयार केलेली धोरण् कोठे कोठे बदलण्याची गरज आहे याचा विचार केला पाहिजे. यातील दुसरा भाग हा सामाजिक स्तराचा असून सामाजिक स्तरावर विचार करीत असतांना व्यसनाधिनता, फसवणूक, एकतर्फी प्रेमातून होणा-या हत्या, विद्यार्थी आणि युवकांच्या आत्महत्या या चार विषयांवर मार्गदर्शनासाठी कोठून केन्द्रे मिळू शकतील, याचा विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, आजच्या युवकांची जर मानसिकता आपण पाहिली तर आपल्या असे लक्षात येईल की, त्यांच्या पेक्षा वयाने मोठा असलेला एखादा माणूस जर त्यांना काही बोलला तर ते त्यांना आवडत नाही. युवकामधील राष्ट्रीय सेवा योजने सारखे कार्यक्रम,एन.एस.एस. सारखे कार्यक्रम आज निष्प्राण झालेले दिसत आहेत. या योजनेअंतर्गत काही प्रमाणात कामे चालू आहेत. 1990 साली वा 1980 साली राष्ट्रीय सेवा योजनेचे जे कार्यक्रम सुरु होते तेच कार्यक्रम आजही सुरु आहेत. या युवकांना नक्षलवादाचा धोका मोठया प्रमाणावर आहे. त्यामुळे या गोष्टीची त्यांना सातत्याने जाणीव करुन दिली पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे. जी हुशार मुले आणि मुली आहेत, जी मुले आणि मुली संघर्षामध्ये उतरली आहेत, ती आज नक्षलवादाकडे ओढली जातांना दिसत असून हीच मुले आणि मुली दिल्ली, हैद्राबाद व मुंबईमध्ये नक्षलवादी संघटनांना कव्हर

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .......

म्हणून काम करीत असतांना दिसत आहेत. राजकीय प्रस्थापितांना शह देण्याची प्रवृत्ती या युवकांमध्ये मोठया प्रमाणावर असते. त्यामुळे युवकांसाठी धोरण ठरवित असतांना याबाबीचा देखील जरुर विचार शासनाने केला पाहिजे, असे मला सांगावयाचे आहे. सामना या चित्रपटामध्ये राजकीय बंड होत असल्याचे दाखविण्यात आलेले आहे. विधानसभेमध्ये तरुण आमदार म्हणून निवडून आल्याचे आज पहावयास मिळत आहे. परंतु मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते की, महाराष्ट्रात राजकारणामध्ये जी 120 घराणी आहेत, ज्याचा उल्लेख स्वर्गीय पत्रकार वरुणराज भिडे नेहमी करीत असावयाचे, त्या 120 घराण्या व्यतिरिक्त इतर किती व्यक्तींना राजकारणात स्थान मिळते ? सगळीच राजकीय घराणी बंद करावीत, असे माझे म्हणणे नाही. तरी सुध्दा मला हे सांगावयाचे आहे की, ज्या कार्यकर्त्याच्या पाठीमागे राजकीय वारसा नाही, अशा कार्यकर्त्याला जर राजकारणात स्थान मिळाले नाही तर त्यामुळे राजकारणात बंडखोरी वाढत जाईल. मग ही बंडखोरी पक्षातील असो वा नक्षलवादाच्या संदर्भात असो. जे कोणी महत्वाकांक्षी आहेत, त्यांना सामावून घेण्यासाठी आपण सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिकदृष्टया कशा प्रकारे विचार करतो, यासंबंधी निर्णय घेण्याची आज वेळ आलेली आहे.

सभापती महोदय, शेवटी मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. आज जी मधली पिढी आहे आणि जिचे वय 50 च्या आसपास आहे, त्यांची अशी अपेक्षा असते की, आपल्याला तरुणांकडून न्याय मिळाला पाहिजे. वयोवृध्द व्यक्तींच्या मार्गदर्शनाचा उपयोग आपल्याला झाला पाहिजे. परंतु कोणीही स्वत:च्या हातातील सत्ता सहजासहजी सोडण्यास तयार नसतो. युवकांच्या संदर्भात निर्णय घेत असतांना त्या निर्णय प्रक्रियेमध्ये त्यांना सामावून घेतले पाहिजे. प्रत्येक जिल्हयात ज्याप्रमाणे जिल्हा नियोजन मंडळ असते, त्याप्रमाणे युवा संसद जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखाली निर्माण करण्यात आले पाहिजे. या युवा संसदेमध्ये त्या जिल्हयातील शिक्षण क्रीडा नोक-या इत्यादी संबंधी युवकांमध्ये सातत्याने संवाद साधला गेला पाहिजे. युवा संसदेमध्ये त्यांच्याशी चर्चा करीत असतांना त्यांना शासनाबरोबर देखील संवाद साधण्याची संधी मिळेल.

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .......

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी इंटरनेटच्या संदर्भात एक मुद्दा मांडला होता. परंतु इंटरनेटवर चॅटीग करणारे किती अधिकारी आणि लोकप्रतिनिधी असतील ? सर्वात जास्त इंटरनेटचा वापर तरुण मुलेच करीत असतात. दिवसभरात तरुण मुले - मुली दिवसभर एकमेकांशी न बोलता टिव्टर वर वा ऑन लाईन बोलत असतात. तसेच काही मुले घरातल्या घरात सुध्दा एकमेकांना एस.एम.एस.पाठवत असतात. ही मुले इंटरनेटचा आणि एस.एम.एसचा मोठया प्रमाणावर वापर करीत असतात. त्यांच्या विषया बाबत बोलल्यास ही मुले कान टवकारतात मात्र इतर कोण्ंत्याही विषयावर चर्चा करीत असतांना एक मिनिट ती चर्चा ऐकल्यासारखे ही मुले करतात. नंतर "कुल आई" किंवा "कुल ममा "असे सांगतात. त्यांच्यामध्ये कुलचा फंडा मोठया प्रमाणावर तयार झाला आहे. आपल्या वयाची पिढी ही तगमगणारी आहे आणि ही मुले मात्र कुल राहतात. याचे कारण असे की, ही मुले कानात सतत गाणी ऐकत असतात, ऑन लाईन असतात. त्यांचा जगाशी काहीही सबंध नसतो. त्यांना एकमेकांशी कसे जोडावयाचे हेच आव्हान आहे. ते आव्हान आपण पेलण्याचे ठरविले नाही तर पाश्चात्य जगातील सर्वात अयोग्य गोष्टी आहेत त्याच आपण स्वीकारु...

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

याठिकाणी घटस्फोटासंबंधी वारंवार उल्लेख करण्यात येतो. दूरदर्शनवरील कौटुंबिक मालिकांचा उल्लेख होतो. आजच्या तरुण मुली या मालिका पहात नाहीत. आजचे तरुण व तरुणी मोठया प्रमाणात त्यांचे आवडते चॅनेल्स पहातात, त्यामध्ये "फ्रेंडस" ही त्यांची आवडती मालिका आहे, किंवा ते एमटीव्ही चॅनेल पहातात. मला सात वर्षाची एक लहान मुलगी भेटली असता मी तिला विचारले की, तू कोणते चॅनेल पहाते? त्यावेळी तिने मला "पोगो चॅनेल" पहाते असे सांगितले. त्यामधील मिस्टर बीन त्यांना फार आवडतो. त्यामुळे आजच्या सर्व तरुण पिढीच्या सांस्कृतिक आणि सामजिक कल्पना बदलत चालल्या आहेत. त्यांना आपण कशापध्दतीने सामोरे जाणार आहोत हा मला महत्वाचा प्रश्न वाटतो. एका दुर्लक्षित विषयाकडे लक्ष देत असतांना आपण जेव्हा समित्या स्थापन करतो, किंवा योजना आखतो त्यामध्ये या तरुण मुला-मुलींसाठी मोठया प्रमाणात संधी कशी देता येईल हे आपण पाहिले तर त्याचा निश्चितपणे उपयोग होईल. महाराष्ट्र राज्याने ऑनर किलिंगला विरोध करणारा व त्या संदर्भात आपली भूमिका स्वीकारणारा कायदा करावा अशी माझी मागणी आहे. याचे कारण असे की या राज्यामध्ये ऑनर किलिंगचे प्रकार होत नाहीत अशातला भाग नाही. हे प्रकार गुपचूप होतात. घरातील कुटुंबियांच्या मनाविरुध्द लग्न केल्यानंतर हे ऑनर किलिंगचे प्रकार सातत्याने होतात. क्रीडा क्षेत्रातील सुरक्षिततेच्या दृष्टीने किंवा आपले खेळाडू इतर देशात जातात तेव्हा त्यांनाही रॅगिंगचा वाईट अनुभव येतो. त्या खेळाडूंना त्या देशातील भाषा समजत नाही. या करिता त्या सुरक्षिततेच्या दृष्टीने, त्यांच्या मार्गदर्शनाच्या दृष्टीने आणि त्यांच्यामध्ये नेतृत्व विकासाच्या दृष्टीने राज्य स्तरावरील खेळाडूंसाठी एखादी मोहीम हाती घ्यावी एवढे सांगून मी माझे दोन शब्द संपविते. धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप, ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी युवकांच्या संदर्भातील प्रस्ताव सभागृहामध्ये चर्चेकरिता मांडला आहे. एका अत्यंत चांगल्या विषयासंदर्भातील या प्रस्तावामध्ये आपल्याला सात मुद्दे दिसतात.

आजचा तरुण वर्ग विविध समस्यांनी ग्रासलेला आहे. माध्यमिक शाळेतील शिक्षण संपल्यानंतर त्यांचा कल कोणत्या विद्या शाखेकडे जावा या संदर्भात मार्गदर्शन, नोकरी व्यवसायाची संधी संदर्भात आपली जबाबदारी, रोजगाराची उपलब्धता, युवकांमधील न्यूनगंड, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि आत्महत्त्या, अंमली पदार्थाचे सेवन आणि जागतिक अर्थव्यवस्थेमधील युवकांचे स्थान असे विषय यामध्ये अंतर्भूत आहेत. सभापती महोदय, विद्यार्थ्यांच्या आत्महत्त्येच्या संदर्भात मागील अधिवेशनामध्ये चर्चा उपस्थित करण्यात आली. अशाप्रकारे विद्यार्थ्यांच्या अनेक विषयांचे कंगोरे या प्रस्तावाला आहेत. त्या दृष्टीकोनातून विचार होणे आवश्यक आहे. युवकांची व्याख्या करीत असतांना एका व्यक्तीने असे म्हटले आहे की, "Youth is not just a time of life, it is a State of mind." "Youth is tinkle of Wheel, Youth is vigour of imagination." "You are as young as hope and as old as despair. You are as young as courage and as old as cowardice." ज्यामध्ये आशावाद आहे, ज्यामध्ये धैर्य आहे तो तरुण. "Youth is Action, Youth is Motion, Youth is Activity and Youth is Adventure." असा एक तरुण निर्माण करण्यासंदर्भात राज्याच्या माध्यमातून धोरण आखले जावे या दृष्टीकोनातून आपण या प्रस्तावाकडे पहातो. शासनाने याठिकाणी पाच उप समित्या नेमल्या आहेत. त्या समित्यांच्या माध्यमातून कशापध्दतीचे युवक धोरण स्वीकारावे याचा देखील आपण आपल्या भाषणामध्ये उल्लेख करावा अशी विनंती करतो. मागील काळात युवक धोरण होते की नव्हते याचाही उल्लेख आपण केला पाहिजे. शासनाने वेगवेगळया योजना राबविल्या, कदाचित ते धोरण नसेल, परंतु योजना राबवितांना त्या किती यशस्वी झाल्या हे देखील आपण पाहिले पाहिजे. शासनाच्या कार्यक्रम अदांपजत्रकामध्ये रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत युवकांसाठी पाच-सहा योजना राबविल्या जातात. त्यामध्ये अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळामार्फत दुर्बल घटकांना स्वयं रोजगारासाठी किती प्रमाणात आर्थिक सहाय्य दिले याचा उल्लेख मला सापडलेला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/ KGS/ KTG/

श्री. अरुण गुजराथी....

नाही. दिनांक 6 सप्टेंबर 2000 पासून बेरोजगारांसाठी सेवा सोसायटया स्थापन करण्यास सुरुवात झाली. त्या सोसायटयांच्या माध्यमातून युवकांना किती लाभ मिळाला? सहकारी सेवा संस्थांना आर्थिक सहाय्य देणे यामधून बेरोजगारांना फक्त तीन वर्षासाठी प्रतिवर्षी 1200 रुपये दिले जातात.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय,आपण व्यवसाय मार्गदर्शन ही योजना राबविली. तरुणांची आवड,कल, आशा, आकांक्षा, शैक्षणिक अर्हत याप्रमाणे मार्गदर्शन. मी मघाशी सांगितल्याप्रमाणे रोजगार प्रोत्साहन योजने अंतर्गत वर्षाला 1200 रुपये. महिन्याला 100 रुपये तीन वर्षासाठी देण्यात येणार होते. याचा किती तरुणांना फायदा मिळाला? बेरोजगारांना स्वंय रोजगाराचे प्रशिक्षण ही शॉपिंग मॉल, ब्रँडेड कंपन्यांमध्ये नोकरी देण्याच्या दृष्टिकोनातून एक चांगली योजना राबविली परंतु त्याचा लाभ किती लोकांना दिला? सभापती महोदय, मी या ठिकाणी काही आकडेवारी देतो. सन 2007-2008 या वर्षात मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे अशा दहा शहरांसाठी 50 लाख रुपये प्रशिक्षणासाठी निधी देण्यात आला. या महाराष्ट्रात 42 टक्के युवक असताना त्यांच्यासाठी सन 2007-2008 मध्ये 50 लाख रुपये निधी दिला आणि 49,68,000/- रुपये खर्च झाले. 2190 युवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी 2129 युवकांना प्रशिक्षण दिले. आज 28 लाख बेरोजगारांची संख्या आहे. ते बेरोजगारच असतील असे मी म्हणत नाही पण पटावरची संख्या 28 लाख आहे. त्यापैकी 2129 उमेदेवांराना प्रशिक्षण दिले आहे. सन 2008-2009 मध्ये अनुदान अडीच कोटी रुपये मिळाले त्यापैकी 2.44 कोटी रुपये खर्च झाले. यावर्षी 5223 युवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी 5112 युवकांना प्रशिक्षण दिले व 3143 युवकांना नोकरी दिली. सन 2009-2010 ला फक्त 83 लाख रुपये अनुदान दिलेले आहे. हे एक कोटी रुपये देखील नाही. म्हणून हे अनुदान वाढवावे लागेल अशी माझी विनंती आहे. फक्त धोरण करुन चालणार नाही तर त्या धोरणाची अंमलबजावणी, त्यासाठी उपलब्ध निधी आणि अंमलबजावणी करण्याच्या संदर्भातील शासनाची, प्रशासनाची आणि आपल्या सर्वांची सामुदायिक जबाबदारी आहे. या ठिकाणी एक स्टेटमेंट दिलेले आहे. व्यवस्थापकीय अनुदान वाटप केलेल्या सेवा-संस्था व सोसायटयांना 2007-2008 ला 6 कोटी रुपये,2008-2009 ला 8 कोटी आणि 2009-2010 ला 6 कोटी रुपये अनुदान दिलेले आहे. हे फक्त बेरोजगारांच्या प्रशिक्षणाच्या संदर्भात मी सांगत आहे. युवा धोरण आखताना कशा पध्दतीने आणि कोणत्या बाबतीत निधी देण्यात येणार आहे? याबाबतीत वेगवेगळया उप समित्या करण्यात येणार आहेत. त्या उप समित्यांनी याची फार चांगल्या प्रकारची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी एक चांगली सूचना केलेली आहे. युवा धोरण स्वीकारत असताना राज्यातील तरुणांच्या आशा आकांक्षा काय आहेत, मागण्या काय आहेत हे देखील लक्षात घेतले पाहिजे. युवक म्हणजे जो फक्त कॉलेजमध्ये जातो तो युवक नाही तर ग्रामीण भागात राहणारा आदिवासी युवक, अनुसूचित जातीचा,अनुसूचित जमातीचा युवक, ज्याला शाळेत जायला मिळत नाही अशा पध्दतीचा युवक यामध्ये सामील झाला पाहिजे. म्हणून या संदर्भात शिक्षण हे अत्यंत महत्वाचे आहे. शिक्षणाची संजीवनी दिल्या शिवाय युवक धोरणात कोणत्याही पध्दतीने यश मिळणार नाही. ज्याला गरज असेल त्याला डोक्यासाठी शिक्षण देण्यात यावे आणि ज्याला गरज असेल त्याला पोटासाठी शिक्षण देण्याची गरज आहे. युवकांमध्ये गुन्हेगारी वाढत आहे ती कां वाढत आहे? त्याला रोजगार मिळत नाही म्हणून गुन्हेगारी वाढत आहे. त्याला पदवी मिळाल्यानंतर देखील नोकरी मिळत नाही म्हणून गुन्हेगारी वाढत आहे. म्हणून शिक्षणाची संजीवनी देण्याचे आपले लक्ष्य असले पाहिजे. युवा धोरण स्वीकारत असताना मी मघाशी सांगितल्याप्रमाणे शिक्षण, प्रशिक्षण, रोजगार, आरोग्य, पर्यावरण, क्रीडा व मनोरंजन, कला व संस्कृती, विज्ञान व तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग, रोजगार व निर्णय शक्ती हा त्याचा अत्यंत महत्वाचा भाग आहे. जर युवकांना निर्णय शक्ती दिली नाही, निर्णय घेण्याची संधी दिली नाही तर युवक पुढे कसे जातील? युवकांना पुढे आणावयाचे आहे, त्यांना उमेदवारी देणार असे राजकीय पक्ष सांगतात. हे फार उत्तम आहे पण आपल्याला इतिहास वाचणारा नाही तर इतिहास निर्माण करणारा युवक तयार करायचा आहे. इतिहास उधर मुढ़ जाता है जिस ओर जवानी बढ़ती है. इतिहास निर्माण करण्याची शक्ती युवकांमध्ये आहे. ज्याचे हितसंबंध प्रस्तापित झालेले आहेत तो इतिहास बदलू शकत नाही.

या नंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी ....

वारसा चालविणारा युवक आपल्याला नको तर वारसा निर्माण करणारा युवक आपल्याला पाहिजे. डॉक्टरचा मुलगा डॉक्टर होतो. त्याला संधी मिळते. त्याच्या घरातील वातावरण तसे असते. चार्टर्ड अकाऊंटंटचा मुलगा चार्टर्ड अकाऊंटंट होईल. इंजिनिअरचा मुलगा इंजिनिअर होईल. परंतु ज्याच्या चार पिढ्या शिकलेल्या नाहीत त्यांना संधी कशी देणार ? त्या युवकांना कसे पुढे नेणार ? ही अत्यंत महत्वाची बाब आहे. त्या दृष्टीकोनातून नवा वारसा, नवी परंपरा, नवीन दिशा देणारा युवक निर्माण करण्याच्या संदर्भात राज्याचे धोरण असावे असे मी या ठिकाणी नमूद करीत आहे.

सभापती महोदय, जेब्रॉन असे म्हणतो की, युवकांना आपले बुरसटलेले विचार देऊ नका. युवकांना आपण स्वातंत्र द्या. युवकांना आपण पंख द्या आणि त्या पंखाने त्यांना पुढे जाऊ द्या. तुमच्या जुन्या पिढीचे विचार युवकांना नको आहेत. म्हणजे स्वातंत्र्य देत असताना युवकांकडून देखील आपल्या काही अपेक्षा आहेत. युवकांनी काय पाहिले पाहिजे, युवकांनी कशा पध्दतीने पुढे गेले पाहिजे याबाबतीत आपल्या अपेक्षा आहेत. युवकांच्या संदर्भात मी असे सांगेन की, शिक्षणाची शेवटची पायरी ही संशोधन आहे. त्या संशोधनाची जबाबदारी आपण नव्या पिढीवर टाकली पाहिजे. जे संशोधन जनतेसाठी, देशासाठी उपयुक्त आहे अशा पध्दतीचे संशोधन युवकांच्या माध्यमातून होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे हे आपल्या धोरणामध्ये निश्चितपणे नमूद केले पाहिजे.

सभापती महोदय, मघाशी सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी उल्लेख केला की, चव्हाण प्रतिष्ठानने देखील यासंदर्भातील एक धोरण तयार केले आहे. 12 जानेवारी हा राष्ट्रीय युवक दिन आहे. 12 जानेवारी, 2010 ला त्यांनी तयार केलेला एक अहवाल त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सादर केला. त्यामध्ये युवकांच्या संदर्भात 'युवक विकास' अशा पध्दतीचे खाते असले पाहिजे असे म्हटले आहे. युवक कल्याण आणि युवक विकास यामध्ये थोडे अंतर आहे असे मला वाटते. क्रीडासाठी वेगळे खाते असावे आणि युवकांसाठी वेगळे खाते असावे. क्रीडा खात्याला वेगळा निधी द्यावा. क्रीडा ही अत्यंत महत्वाची आहे. जीवनात जो खेळला नाही त्याचे तारुण्यच संपून गेले. क्रीडा आणि युवक याचा फार जवळचा संबंध आहे पण दोन वेगळी खाती असली पाहिजे. ज्या पध्दतीने जिल्ह्यामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी असतो त्या पध्दतीने जिल्हायुवा अधिकारी



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ SBT/

श्री. अरुण गुजराथी ....

प्रत्येक जिल्ह्यामध्ये असला पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यामध्ये युवकांच्या संदर्भातील कार्यालय असले पाहिजे आणि त्यात वेगवेगळे सेक्शन करुन आपण युवकांना कशा पध्दतीने उभे करु शकतो याची देखील व्यवस्था असली पाहिजे. आजच्या वृत्तपत्रात मुंबईचे माननीय व्हाईस चान्सलर यांनी निवडणुका घेण्याच्या संदर्भातील एक विचार मांडला. मी माननीय मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, शिक्षणाच्या संदर्भात असेल, क्रीडाच्या संदर्भात असेल, मध्यंतरीच्या काळामध्ये आपण त्या निवडणुका बंद केल्या होत्या. शिस्त, अनुशासन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या अनेक बाबी त्यामुळे त्या निवडणुका बंद झाल्या होत्या. पण जर विद्यापीठात खुल्या पध्दतीने निवडणुका झाल्या, माध्यमिक शाळेमध्ये देखील जर मॉनिटरची निवड चांगल्या पध्दतीने झाली तर त्या माध्यमातून युवकांमध्ये एक नेतृत्व तयार करणे, कर्तृत्व तयार करणे हे देखील अत्यंत महत्वाचे आहे. 'अर्न अँड लर्न's म्हणजे कमवा व शिका अशी योजना गरिबांसाठी जर आपल्या युवक धोरणामध्ये आणली तर त्याची देखील आवश्यकता आहे. कारण जे गरीब युवक आहेत ते केवळ निधीच्या अभावी पुढे जाऊ शकत नाहीत. म्हणून त्या पध्दतीचे प्रयत्न होणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, युवकांसाठी वसतिगृह निर्माण करणे आवश्यक आहे. विशेषत: युवतींसाठी वसतिगृहाची आत्यंतिक आवश्यकता आहे. म्हणून आपल्या धोरणामध्ये वसतिगृहाचा समावेश करणे आवश्यक आहे. त्यांच्या शिक्षणाच्या दृष्टीकोनातून विविध योजना असतील त्या त्यांना देणे, त्यांनी दहावीनंतर, बारावीनंतर कोणते कोर्सेस घ्यावेत यासंदर्भातील माहिती देणे तसेच युवकांना परदेशात देखील नोकरीच्या कोणत्या संधी मिळतील याचे मार्गदर्शन करणे अत्यंत गरजेचे आहे. पण फार ब्रेन ड्रेन सुध्दा होता कामा नये. त्यांनी या ठिकाणी शिक्षण घ्यावयाचे, शासनाने अनेक कोटी रुपयांचा खर्च करावयाचा, पाच पंचवीस कोटी रुपये खर्च झाल्यानंतर एम.डी. झाल्यानंतर, एम.एस. झाल्यानंतर त्यांनी परदेशात जाऊन आपल्या अभ्यासाचा, आपल्या कौशल्याचा त्या ठिकाणी फायदा द्यावयाचा हे देखील फार योग्य आहे असे मला वाटत नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी....

हा जो युवक वर्ग आहे तो समाजव्यवस्थेतील महत्वाचा घटक आहे. या युवकाच्या माध्यमातून देशाला पुढे न्यावयाचे असेल तर या युवकांना संधी द्यावी लागेल. अशाप्रकारचा युवक आणि देश यांचा पारस्पारिक संबंध आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांनी लहान वयातच स्वातंत्र्याची मोहिम सुरु केली होती. यशवंत, कीर्तीवंत, वरदवंत, नीतीवंत, प्रज्ञावंत, गुणवंत जाणता राजा असे शिवाजी महाराजांबद्दल म्हटले जाते. ज्ञानेश्वर महाराजांनी संपूर्ण ज्ञानेश्वरी युवा अवस्थेतच लिहिली.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी टी.व्ही.चॅनेलवर काय दाखविले जाते ते सांगितले आहे. परंतु त्याबाबतची जबाबदारी पालकांची, युवकांची, समाजाची व सरकारची आहे. युवकांना चांगले वळण कसे लागेल यासाठी सर्वांनीच जागरुक राहिले पाहिजे. सभापती महोदय, दोन पिढीतील अंतर देखील महत्वाचे आहे. सध्या चालू असलेली पिढी मागील पिढीला दोष देते, ती पिढी त्यांच्या मागील पिढीला दोष देते. म्हणून पिढीतील अंतर संपविले पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी युवकांच्या व्यसनाबद्दल आपले मत मांडले आहे. कोठे काय विकले जाते याची त्यांना चांगली माहिती आहे. या युवकांना व्यसनापासून मुक्त केले पाहिजे. एका व्यक्तीने व्यसनाबद्दल असे म्हटले की, "हाथ में गुटखा, गले को चटखा, खींसे को झटका, ऊपर जल्दी सटका." म्हणून युवकांना व्यसनापासून मुक्त होण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहेत.

सभापती महोदय, 2020 साली भारत हा देश महासत्ता होणार आहे असे म्हटले जाते. त्यादृष्टीकोनातून युवा वर्गाला संधी मिळावी, युवा शक्तीचा प्रत्येक क्षेत्रातील सहभाग वाढावा यासाठी प्रयत्न झाला तर 2020 साली भारत देश महासत्ता होईल याबद्दल शंका नाही. त्या अनुषंगाने शासनाने धोरण तयार करावे अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2.....

NTK/ SBT/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे.

सभापती महोदय, प्रस्तावातील विषय अतिशय महत्वाचा आहे. जी नवीन पिढी आहे तिला नोक-या मिळत नसल्यामुळे ती उद्वेगाकडून उद्रेकाकडे जात आहे. त्यामुळे या विषयाकडे वेळीच लक्ष देऊन त्यांना नीट मार्गाला लावणे हे शासनाचे तसेच समाजाचे कर्तव्य आहे. मी खूप आकडेवारी सांगणार नाही. पण सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, महाराष्ट्र रोजगार हमी योजना, अशाप्रकारच्या अनेक योजनांच्या माध्यमातून तरुणांना प्रशिक्षण दिले जाते. त्याची आकडेवारी दिली जाते. पण प्रत्यक्षात ग्रामीण भागातील युवकांना नोकरीच मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे हा तरुण वर्ग रोजगारासाठी मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात या राज्यांमध्ये जात आहे. राज्यामध्ये नोक-या उपलब्ध होत नसल्यामुळे बेरोजगारांची फौज निर्माण करण्याचे काम शासन करीत आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेंतर्गत तरुणांना प्रशिक्षण दिले जाते. पण प्रत्यक्षात या योजनेच्या माध्यमातून तरुणांना स्वत:च्या पायावर उभे करणे आवश्यक आहे. ते केले जात नाही, त्याकडे लक्ष दिले जात नाही. केवळ प्रशिक्षण देण्याचे लक्ष्य ठरविले जाते. त्याचे पुढे काय होते ते समजत नाही. त्याचा आढावा घेतला जात नाही त्याचे दु:ख होते. शिकलेली मुले काही दिवस मुलाखतीला जातात, नोकरी मिळाली नाही तर छोटासा धंदा करतात. बँकांनी कर्ज दिले नाही तर पान टपरीवर किंवा चहाच्या टपरीवर जाऊन देशाच्या गोष्टी करतात. त्यांच्यात एक उद्वेगाची भावना तयार होते. 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या पुस्तकात राज्यातील बेरोजगारांची किती संख्या आहे ते नमूद केलेले आहे. माननीय उद्योग मंत्र्यांनी परवा बेरोजगारांची संख्या 28 लाख असल्याचे सांगितले आहे. परंतु या पुस्तकात 2 कोटी 87 लाख 29 हजार इतकी बेरोजगारांची संख्या असल्याचे नमूद केलेले आहे. हे बेरोजगार म्हणजे महाराष्ट्राची शक्ती आहे. या युवकांच्या उसळत्या रक्ताचा वापर केला नाही तर शासनाने खूप विकास केला, खूप प्रगती केली असे म्हणता येणार नाही.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्रीमती शोभा फडणवीस...

सन 2009मध्ये रिक्त पदांची संख्या 17,66,000 इतकी होती आणि भरलेल्या पदांची संख्या 1,72,000 इतकी होती. ही एवढीच पदे का भरली ? आपल्याकडे एवढी मोठी काम करणारी शक्ती आहे, त्यांच्यामध्ये या देशाची प्रगती करण्याची हिंमत आहे त्यांना आपण साध्या नोक-या देऊ शकत नाही. एकीकडे राज्यातील बेरोजगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत असताना दुसरीकडे राज्य शासनाने वर्ग-3 आणि वर्ग-4 या संवर्गातील पदे न भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. सभापती महोदय, खरे म्हणजे प्रशासनामध्ये वर्ग-3 आणि वर्ग-4चीच पदे आवश्यक आहेत आणि तीच पदे न भरण्याचा निर्णय घेतलेला आहे. मात्र अधिका-यांच्या एकेका पदाऐवजी दोन दोन पदे भरलेली आहेत. उदाहरणार्थ एका जिल्हाधिका-या ऐवजी दोन दोन जिल्हाधिकारी, एका मुख्य कार्यकारी अधिका-या ऐवजी दोन दोन मुख्य कार्यकारी अधिकारी, एका वन अधिका-या ऐवजी दोन दोन वन अधिकारी, अशा प्रकारे पदे निर्माण करुन ती भरली जातात. हे अधिकारी वरच्या पदावर बसून काम करतात. पण हे काम केव्हा करणार ? जेव्हा खालच्या स्तरावरुन त्यांच्याकडे माहिती जाईल त्याचवेळी ते काम करणार. पण खालच्या स्तरावरील पदे रिक्त ठेवलेली आहेत. मग वरचे अधिकारी कसले डोंबलाचे काम करणार ? ते फक्त राज्याला आणि जनतेला मूर्ख बनविण्याचेच काम करतात. सभापती महोदय, वर्ग-3 आणि वर्ग-4 या संवर्गातीलन भरती थांबविली तर भविष्यामध्ये फार मोठा धोका निर्माण होईल.

सभापती महोदय, मला एक गोष्ट या ठिकाणी आवर्जून नमूद करावीशी वाटते ती म्हणजे आपल्या राज्याचा विकास दर. हा विकास दर कशावर अवलंबून आहे ? ज्याला आपण जीडीपी किंवा जीडीएचपी म्हणतो त्यावर तो अवलंबून आहे. कृषी, उद्योग आणि सेवा या तीन गोष्टी त्यामध्ये येतात. कृषीच्या बाबतीत बोलण्यासारखे काहीच राहिलेले नाही. कारण या वर्षी कृषीक्षेत्राचा विकास दर 1.8 टक्के आहे. मागील वर्षी हा विकास दर मायनसमध्ये गेला होता. या वर्षी तो 1.8 टक्क्यावर आलेला आहे. उद्योग क्षेत्रामध्ये महत्वाचा बदल व्हायला पाहजे. सन 2008-2009मध्ये उद्योग क्षेत्राचा विकास दर 6.4 टक्के होता आणि 2009मध्ये तो 7 टक्के इतका झालेला आहे. सेवाक्षेत्रामध्ये मात्र विकासदर वाढलेला आहे आणि तो 10.4 टक्के इतका झालेला आहे. यानुषंगाने मला एका गोष्टीकडे सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे ते म्हणजे चीन हा देश

..2..

22-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) Q-2

श्रीमती शोभा फडणवीस...

आपल्या पेक्षा किती तरी मागे होता. चीनमध्ये लोकांना खायला अन्न मिळत नव्हते, रहायला जागा मिळत नव्हती. पण तो चीन आज बघता बघता किती तरी मोठा झालेला आहे. तेव्हा या गोष्टीचा देखील आपण कुठे तरी विचार केला पाहिजे. केवळ बेरोजगारांच्या बाबतीत चर्चा करुन चालणार नाही तर त्याबाबतीत आपण ठोस असा निर्णय घेतला पाहिजे. या महत्वाच्या विषयावर या सभागृहामध्ये चर्चा घडवून आणली त्याबद्दल सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे मी आभार मानते. सभापती महोदय, चीनने आपली प्रगती कशी घडवून आणली ? तर चीनने स्वत:चा विकास करण्याकरिता महिला आणि पुरुषांना एकत्रितरित्या उद्योगामध्ये आणले. 40 टक्के महिला आणि 50 टक्के पुरुष याप्रमाणे स्त्री-पुरषांना मानव संसाधनात आणले. त्यांच्या हाताला काम देऊन देशाची प्रगती घडवून आणण्याचे काम चीनने केले. आज चीनच्या वस्तू भारतीय बाजार पेठातून मोठ्या प्रमाणात पहावयास मिळतात. त्या युज ॲण्ड थ्रो अशा वस्तू असल्या तरी सुबक आणि आकर्षक असतात. या वस्तुच्या विक्रीवरील नफा हा चीनमध्ये जातो. आज चीन दिवसेंदिवस मोठया प्रमाणावर प्रगती करीत आहे. आपल्याला प्रगती करावयाची असेल तर उद्योग आणि कृषी या दोन क्षेत्रावर आपल्याला जास्त लक्ष केन्द्रित करण्याची आवश्यकता आहे. सेवाक्षेत्र हा वैयक्तिक विषय आहे. आज ते क्षेत्र देखील आपण संपविण्यास निघाला आहात. बँका, दळणवळण या माध्यमातून जरी पैसा येत असला तरी तो कायम स्वरुपाचा नसतो. आपल्याला बेरोजगारांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी उद्योग क्षेत्राची व्याप्ती खूप मोठ्या प्रमाणावर वाढवायला पाहिजे. ज्यावेळी आपण वस्तू निर्माण करु त्याच वेळी दोन हात कामाला लागतील.

सभापती महोदय, आपण शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर असे दिसून येते की, 10वीमध्ये शिक्षण घेणा-या मुलांची संख्या 65 टक्के आणि मुलींची संख्या 61 टक्के आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ KTG/ ११:५५

श्रीमती शोभा फडणवीस.....

परंतु उच्च व तंत्रशिक्षणाचा विचार केला तर केवळ १० टक्के प्रमाण आहे. त्यामध्ये महिलांचे प्रमाण फक्त ३ टक्के आहे. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी या पुस्तकामध्ये १.२२ लाख एवढ्याच युवकांनी उच्च शिक्षण घेतल्याचे नमूद केले आहे. आपल्या देशातील तरुण मुले डॉक्टर होतात, इंजिनिअर होतात, शास्त्रज्ञ होतात व विदेशात का जातात? याबाबत गांभीर्याने अभ्यास करण्याची गरज आहे. विदेशात एवढ्यासाठीच जातात की, त्यांच्या शिक्षणाला, त्यांच्या बुध्दीला या देशात वाव मिळत नाही. त्यांना पुरेसे वेतन मिळत नाही.

सभापती महोदय, डॉक्टरांचे संप का होतात? खाजगी रुग्णालयात डॉक्टरांना भरपूर पगार मिळतो. परंतु सरकारी रुग्णालयात नोकरी पत्करली तर कमी पगारात काम करावे लागते. यामुळेच उच्चशिक्षण प्राप्त केल्यानंतर आपले भविष्य घडविण्यासाठी विदेशात जाण्याची प्रवृत्ती निर्माण होत आहे. ही प्रवृत्ती थांबविली गेली पाहिजे, बुध्दीजीवी वर्ग याच देशात रहावा असे वाटत असेल तर त्यांच्या स्टेटस्‌मध्ये वाढ करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, बँकांचे उदाहरण द्यायचे झाले तर २००९ मध्ये भारतीय स्टेट बँकेने २० पदांची भरती केली. यापूर्वी फक्त मुंबई आणि पुणे शहरामध्ये परीक्षा केंद्र असायची. मागील वर्षी स्टेट बँकेच्या नोकर भरतीसाठी नागपूर येथेही परीक्षा केंद्र ठेवण्यात आले होते. परंतु गडचिरोली जिल्हयातील आदिवासी क्षेत्रात राहणारी मुले, मागास क्षेत्रात राहणारी मुले बुध्दीने कमी असतात, मूर्ख असतात, त्यांना काही येत नाही असे समजू नये. त्यांच्याकडे प्रचंड टॅलेंट असते. त्यांच्यात जी मानसिक धडाडी हवी ती निर्माण होऊ शकत नाही. म्हणून परीक्षा केंद्र नागपूर येथे ठेवण्यात आले. इंडियन बँक, कॉर्पोरेशन बँक, बँक ऑफ इंडिया यांनी नोकर भरती करताना नागपूर येथे परीक्षा केंद्राची व्यवस्था केली नाही. फक्त मुंबई आणि पुणे येथे परीक्षा केंद्रांची व्यवस्था केली आहे. मुंबई आणि पुणे येथे परीक्षा केंद्र असल्यामुळे गडचिरोली, चंद्रपूर जिल्हयातील आदिवासी क्षेत्रात राहणारी मुले तेथे काय बोलणार? मुंबईतील मुलांना पाहिल्यानंतर त्यांची हिंमत खचून जाते. शासनाने आरक्षण कशासाठी लागू केले आहे? शिकलेल्या व प्रशिक्षित मुलाबरोबर धावत असताना आमच्या भागातील मुले त्यांच्याशी स्पर्धा् करु शकत नाहीत. म्हणूनच मागास भागातील मुलांसाठी शासनाने आरक्षणाद्वारे वेगळी हिंमत दिली. त्यांना स्पर्धेमध्ये उतरवायचे असेल तर प्रशिक्षित मुलांबरोबर त्यांना सामावून घेतले पाहिजे. त्यामुळे मराठवाडा, विदर्भ भागात चार-पाच

...२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

ठिकाणी परीक्षा केंद्राची व्यवस्था केली तर मागास भागातील मुले मोठया प्रमाणात स्पर्धेमध्ये उतरु शकतील. हायकोर्टाने निर्णय दिला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात कुठेही, कोणालाही मुलाखत देता येते. आम्ही तो निर्णय मान्य केला. मध्यंतरी रत्नागिरी जिल्हयामध्ये शिक्षण सेवक पदाची भरती करण्यात आली. विदर्भ आणि मराठवाड्यातील उमेदवार रत्नागिरी येथे मुलाखतीसाठी गेले असताना त्यांना मारहाण करण्यात आली. असे प्रकार होणार असतील तर या मुलांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊन भविष्यात स्पर्धात्मक विचार न करता एकमेकाविषयी इर्ष्या निर्माण होईल आणि त्याचा विपरित परिणाम या राज्यामध्ये दिसून आल्याशिवाय राहणार नाही. विदर्भातील आदिवासी क्षेत्रात नक्षलवाद का वाढीस लागला आहे? याचा कधीतरी अभ्यास करणार आहात की नाही? नक्षलवाद कमी करण्याकरिता शासनाकडून वेगवेगळे विकासाचे कार्यक्रम राबविले जात आहेत. नक्षलवाद चळवळीमध्ये मोठया प्रमाणात तरुण मुलांची भरती होण्याचे कारण बेरोजगारी हे आहे. आदिवासी आश्रमशाळा सुरु झाल्यामुळे मुलांना शिक्षण मिळाले. परंतु त्यांना स्पर्धेमध्ये उतरता येत नाही. नोकरीमध्ये स्थान मिळत नाही. घरच्या गरिबीचा शाप असल्यामुळे नोकरी मिळण्यासाठी ते पैसे देऊ शकत नाही. त्यामुळे ३-४ हजार रुपयांसाठी ते नक्षलवादी चळवळीमध्ये सामील होतात. त्यांना नक्षलवादाचे शिक्षण दिले जाते. मरतात कोण? माझाच मुलगा माझ्याच मुलाला मारतो. आदिवासी मुलगा, आदिवासी मुलांना मारतो. ते नेतृत्व करीत नाहीत तर सैनिक म्हणून काम करतात. हे प्रकार थांबवायचे असतील तर आदिवासी क्षेत्रातील तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार मिळाला पाहिजे, त्यांना स्थानिक पातळीवर नोकरी मिळाली पाहिजे. ८० टक्के उमेदवारांना स्थानिक पातळीवर नोकरी मिळाली तर मोठया प्रमाणात न्याय दिल्यासारखे होईल....

(नंतर एस.१....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री. परशुराम उपरकर)** : या प्रस्तावावरील चर्चा येथेच थांबविण्यात येत असून सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस ऑन-लेग राहतील. आता सभागृहाची विशेष बैठक स्थगित होत असून नियमित बैठक दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 12.00 ते 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

-------

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

**<u>नियम 289 च्या प्रस्तावाबाबत</u>**

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत प्रस्ताव दिलेला असून दुसरा नियम 289 चा प्रस्ताव अन्वयेचा सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्मानननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी दिलेला आहे. दोन्ही प्रस्तावाच्या आशय एकच असल्यामुळे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या प्रस्तावाच्या अनुषंगाने आपले विचार थोडक्यात मांडावेत.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, विधान परिषद नियम 289 अन्वये आम्ही दोन प्रस्ताव दिलेले आहेत. दोन्ही प्रस्तावांचा आशय एकच आहे. काल आषाढी एकादशी होती. या राज्यातील परमेश्वराला मानणारे सर्व हिंदू या आषाढी एकादशीचा दिवस सणासारखा साजरा करीत असतात. आषाढी एकादशीला लाखो लोक पंढरपूरला एकत्र येऊन विठ्ठलाची पूजा करीत असतात. अशा या पवित्र दिवशी नाशिक जिल्हयातील मालेगाव-मनमाड रस्त्यावर 33 कोटी देवांचा वास असलेल्या, हिंदूंचे श्रध्दास्थान असलेल्या पवित्र 8 गायींची हत्या मुसक्या बांधून तीक्ष्ण हत्यारांनी करुन त्यांना छिन्नविछीन्न अवस्थेत रस्त्यावर फेकून देण्यात आले. आषाढी एकदशीच्या दिवशी असा प्रकार या राज्यात होणे, जे राज्य शिव छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने ओळखले जाते त्या राज्यात होणे हे काही योग्य नाही. या प्रकरणाच्या संदर्भात प्रशासनाने गायींचा मृत्यू गुदमरुन झाला असावा असा अंदाज व्यक्त करुन या प्रकरणाला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न केला. हे शासन हिंदुच्या भावनांशी खेळ खेळत आहे. इलेक्ट्रॉनिक मिडीयास ही बातमी प्रसारित करण्यावर बंदी आणली होती अशी माझी माहिती आहे. ही बातमी दाखवू नये अशा प्रकारचे बंधन मिडीयावर आणले गेले होते. या घटनेमुळे काल नाशिक जिल्हा बंद होता.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

तिथल्या सर्व राजकीय पक्षांनी बंद पाळला. बजरंग दल, शिवसेना, भारतीय जनता पार्टी, विश्वहिंदू परिषद यांनी देखील बंद पाळला. तिथले वातावरण आज प्रक्षोभक झाले आहे. कारण नसताना पोलिसांनी निरपराध लोकांना पकडले आहे. या राज्यात मिरजमध्ये दंगल झाली होती, त्यावेळी देखील निरपराध लोकांना पकडले होते. दंगल शांत होईपर्यंत, शेकडो लोकांना अटक होईपर्यंत तिथला पोलीस अधीक्षक काहीही बोलला नाही. पण त्याची बदली झाली त्यावेळी त्याने पत्रकार परिषद घेतली आणि सांगितले की, ही दंगल राष्ट्रवादीच्या नेत्याने घडविली. या बाबींचा उल्लेख आमच्या प्रस्तावामध्ये आहे. नंतर या राज्याच्या गृहमंत्र्यांनी असे वक्तव्य केले की, या दंगलीमध्ये सर्व राजकीय पक्षांचा हात आहे. त्यामुळे राज्यामध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झालेले आहे. दंगलीत निरपराध लोकांना पकडले आहे. तसेच मालेगावमध्ये घडलेल्या घटनेसंबंधातील आरोपी अजूनही पकडलेले नाही. त्यामुळे राज्यभर असंतोष पसरलेला आहे. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, आजचे सभागृहाचे संपूर्ण कामकाज बाजूला सारून गोमातेच्या हत्येबद्दल चर्चा करावी. या राज्याने युतीच्या काळात गोहत्या बंदी संबंधातील कायदा केला होता. असे असताना त्या कायद्याला मान्यता मिळाली नाही. उलट, गाईंची हत्या, अवैध गाईंची वाहतूक या राज्यात मोठ्या प्रमाणावर सुरू आहे. या सर्व बाबींची चर्चा सभागृहात झाली पाहिजे. म्हणून आजचे सभागृहाचे कामकाज स्थगित करून या विषयावर चर्चा करण्यासाठी आपण अनुमती दिली पाहिजे अशा प्रकारची मागणी मी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मालेगावमध्ये काल जी घटना घडली, ती आषाढी एकादशीच्या मुहूर्तावरच घडलेली आहे. हिंदुंच्या भावना प्रक्षुब्ध करून पुन्हा दंगल माजविण्याच्या कटकारस्थानाचा हा एक भाग आहे, अशी आमची धारणा आहे. काल संपूर्ण मालेगाव, नाशिकच्या ग्रामीण भागामध्ये देखील उत्स्फूर्त बंद पाळण्यात आला आणि ह्या घटनेचा निषेध नोंदविला. ही घटना गंभीर परिस्थितीमध्ये स्वीकारली आणि लोकांनी त्याचा निषेध केला. दुःख हेच वाटते की, प्रशासनाने मिडियावर दबाव आणून त्याचे प्रसारण होणार नाही याची देखील व्यवस्था केली. नाही तर कुठेही खट झाले की, मिडिया पहिल्यांदा पोचते व ती घटना तासनतास दाखवते. येथे गंभीर घटना घडली. रस्ता रोको झाला. लोकांचा उद्रेक झाला. कडकडीत बंद पाळल्यानंतर लोकांच्या प्रक्षोभक भावना पुढे जाऊ नये म्हणून संपूर्ण काळजी प्रशासनाने घेतली. सदर घटना ही गंभीर होती. या प्रस्तावामध्ये आम्ही मिरज दंगलीचा देखील उल्लेख केला आहे. महाराष्ट्रातील दंगली सत्तेच्या माध्यमातून दडपण्याचे काम करून, नको ती संभ्रमाची परिस्थिती निर्माण करण्याचे काम शासनातर्फे करण्यात येत आहे. तेथे नक्की काय झाले हे लोकांना समजले पाहिजे. प्रशासन वेगळ्या पद्धतीने लोकांना सांगत आहे आणि वर्तमानपत्राच्या माध्यमातून लोकांपर्यंत वेगळी माहिती येत आहे. गाईंची हत्या जाणीवपूर्वक केली अशा प्रकारची बातमी वर्तमानपत्रातून येत आहे. अधिवेशन सुरू असताना ही घटना घडली आहे. त्यामुळे सभागृहात तातडीने या विषयावर चर्चा होणे आवश्यक आहे. म्हणून आजचे कामकाज बाजूला सारून सदर विषयावर चर्चा घ्यावी अशी मी विनंती करीत आहे. या चर्चेच्या अनुषंगाने आम्हाला जे काही मुद्दे मांडावयाचे असतील ते आम्ही मांडू. आपण गो-ब्राह्मण-प्रतिपालक म्हणून छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयजयकार करणारे आहोत. पण अशा प्रकारे गो हत्या होत असतील तर त्याचा निषेध या सदनामध्ये होणे आवश्यक आहे. किंबहुना त्यावर चर्चा घडवून सत्य सदनासमोर आणले पाहिजे अशी आग्रहाची विनंती. या प्रश्नाला तातडी असल्यामुळे आजचे कामकाज बाजूला सारून चर्चेला सुरुवात करावी अशी देखील मी विनंती करीत आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, आम्ही जो नियम 289 प्रस्ताव दिला आहे. त्याला दोन कारणे आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते यांनी सांगितले की, गो रक्षणासंबंधी तयार करण्यात आलेल्या कायद्याचा मसुदा केंद्र शासनाने मान्य केला आहे. तो मुसदा केंद्र सरकारने राज्य सरकारकडे मान्यतेसाठी पाठविला आहे. तो मसुदा आता राज्य सरकार स्वीकारण्यास तयार आहे काय ? सन्माननीय उप मुख्यमंत्री आता सभागृहात उपस्थित आहेत. यासंबंधी माजी न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी देखील वारंवार शासनाचे लक्ष याकडे वेधले आहे. केंद्र सरकारने मान्य करून देखील राज्य सरकारने मसुद्यावर सही वेळेवर न केल्यामुळे तो कायदा तसाच राहिला आहे. आपण कायदा तयार करून पाठविला. आपल्याकडून दिरंगाई झाली तर मग भावना प्रक्षुब्ध होतात. म्हणून गो हत्या बंदीसंबंधातील विधेयकाबाबत या अधिवेशनात निर्णय होणे आवश्यक आहे. मी काही जास्त तपशीलात जाणार नाही.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

मिरज आणि सांगली दंगली संदर्भातील बातम्या सातत्याने वाहिन्यांवर दाखविल्या जात आहेत. या दंगलीतील आरोपींची नार्को टेस्ट घेण्यात आली त्यामध्ये त्याने पैसे घेऊन दंगल घडविली अशी कबुली दिलेली आहे. तेव्हा या बद्दलची वस्तुस्थिती समोर आली पाहिजे. कारण आता गणेशोत्सव जवळ आला आहे. सुखकर्त्या दु:खहर्त्याचे आगमन आणि विर्सजन व्यवस्थित व्हावे आणि त्याठिकाणी शांतता नांदावी असे वाटत असेल तर माननीय गृहमंत्र्यांनी या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. तेव्हा आपण 289 प्रस्तावावरील चर्चेस परवानगी द्यावी अशी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मालेगाव येथे मृतअवस्थेत 8 गायी आढळून आल्या ही वस्तुस्थिती खरी आहे. नाशिक ग्रामीण जिल्ह्यातील मनमाड,चौफुली व कवळाणी फाटा, मालेगाव येथे मृत अवस्थेत 8 गायी आढळून आल्या. या घटनेच्या निषेधार्थ बारा ठिकाणी लोकांनी तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. अज्ञात मालट्रकचा ड्रायव्हर आणि त्याच्या जोडीदाराने संगनमताने रात्री 11.00 च्या दरम्यान टाकल्या अशी माहिती तपासातून पुढे आली आहे. गायींच्या मृत्युचे कारण अजून समजू शकले नाही. गायींचा मृत्यू विषबाधेमुळे की सफोकेशनमुळे झाला हे पोस्ट मार्टेमचा रिपोर्ट आल्यानंतर स्पष्ट होईल. या गायी कोणी टाकल्या, कोणी मारल्या यासाठी शोध घेण्यासाठी नाशिक पोलीस स्टेशनने दोन स्वतंत्र टीम तयार केल्या असून त्या टीम आरोपींचा कसून शोध घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझी निश्चितपणे खात्रा आहे की, यातील आरोपी निश्चिपणे पकडले जातील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आम्ही प्रस्तावामध्ये दोन विषय दिलेले आहेत. पहिला विषय म्हणजे सांगलीतील दंगली संदर्भातील आहे. या दंगली संबंधी ज्या अधिकाऱ्यांनी अशाप्रकारचे वक्तव्य केले त्याचे कारण काय आहे ? त्या अधिकाऱ्याने वक्तव्य केल्यानंतर माननीय गृहमंत्र्यांनी जे वक्तव्य केले त्यामुळे सर्व राजकीय पक्ष मिळून दंगली घडवतात की काय असा राज्यातील लोकांमध्ये संभ्रम आहे. तेव्हा या विषयावर चर्चा झाली पाहिजे. माननीय गृहमंत्र्यांनी फक्त स्टेटमेंट करुन चालणार नाही. यामध्ये अनेक कंगोरे आहेत. म्हणून या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी माझी विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, या दोन्ही विषयांवर चर्चा करण्याची सरकारची तयारी आहे. मी उद्या दुपारी बाहेरगावी जाणार असल्यामुळे आपण ही चर्चा सोमवारी घ्यावी अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरग फुंडकर आणि इतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्याबाबत जी सूचना दिलेली आहे तो विषय आजच्या कामकाजपत्रिकेत नसल्यामुळे मी त्यांची सूचना मान्य करीत नाही. या विषयावरील चर्चा केव्हा घ्यावयाची याबाबत मी सत्ताधारी पक्षाशी चर्चा करुन नंतर निर्णय देईन. आता मी प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करीत आहे.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**राज्यातील दलित अत्याचार कायद्यांतर्गत (ॲट्रॉसिटी) नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी कारवाईचे प्रमाण फक्त 3 टक्केच असल्याबाबत**

**(1) * 7599 डॉ.निलम गोऱ्हे , डॉ.दीपक सावंत, श्री.किरण पावसकर** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील दलित अत्याचार (ॲट्रॉसिटी) कायद्यांतर्गत नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्यांपैकी कारवाईचे प्रमाण फक्त 3 टक्केच असल्याचा आरोप राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाने केला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरहू खटले हे विशेष न्यायालयात चालविण्याचा कायदा आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, राज्यात या प्रकरणाचा तपास पोलिस करीत असून त्यांची सुनावणी जिल्हा न्यायालयात होते, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, सदरहू खटले लवकरात लवकर निकालात काढण्याकरिता शासनाने कोणते विशेष प्रयत्न केले आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) अध्यक्ष, राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोग यांच्या अध्यक्षतेखाली दि. 29/4/2010 रोजी झालेल्या बैठकीत सन-2009 मध्ये निकाली निघालेल्या खटल्यांमध्ये दोषीसिध्दीचे प्रमाण 3 टक्के असल्याचे निदर्शनास आले.

(2),(3) व (4) होय. अनुसूचित जाती जमाती (अ.प्र.) कायदा-1989 च्या कलम-14 नुसार विधी व न्यायविभागाच्या दि.10/6/1994 च्या अधिसूचनेने प्रत्येक जिल्ह्यातील सत्र न्यायालयास या कायद्यांतर्गत खटले चालविण्यासाठी "विशेष न्यायालय" म्हणून घोषित केले आहे. तसेच कलम-15 नुसार प्रत्येक जिल्ह्यातील शासकीय अभियोक्त्यास आणि अतिरिक्त शासकीय अभियोक्त्यास या कायद्यांतर्गत खटले चालविण्यासाठी विशेष शासकीय अभियोक्ता म्हणून घोषित केले आहे. तसेच प्रलंबित खटले निकाली काढण्याच्यादृष्टीने प्रत्येक न्यायालयाने किमान 2 ते 3 खटले दरमहा निकाली काढण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात अशी विधी व न्याय विभागाने दि. 27/5/2009 च्या पत्रान्वये प्रबंधक, (निरीक्षणे) उच्च न्यायालय यांना विनंती केली आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7599....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, राज्यात खैरलांजींच्या खटल्याबाबत पुन्हा एकदा त्याबाबत चर्चा सुरु आहे. आपण प्रत्येक वेळी एखादा स्फोट झाल्यानंतर विचार करतो. दलितांच्या प्रश्नासंबंधी एक केंद्रीय आयोग नेमलेला आहे. या आयोगाच्या अध्यक्षाने सांगितले की "बिहार राज्यामध्ये 33 जिल्हे अत्याचार प्रवण विभाग असून त्याठिकाणी 11 विशेष न्यायालये आहेत. राजस्थानमध्ये अत्याचार प्रवण जिल्हे नाहीत. छत्तीसगड येथेही अत्याचार प्रवण जिल्हे नाहीत, परंतु त्याठिकाणी एक विशेष न्यायालय आहे." महाराष्ट्रामध्ये मात्र विशेष न्यायालयांची संख्या अपुरी आहे. उत्तरात नमूद केलेले आहे की, आम्ही विशेष न्यायालये स्थापन करु. माझा प्रश्न आहे की, महाराष्ट्रात जे जिल्हे अत्याचार प्रवण आहेत त्याठिकाणी किती दिवसांत विशेष न्यायालय स्थापन करणार आहात ?

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7599.....

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाची माहिती विचारली आहे. मी आपल्या मार्फत त्यांना सांगू इच्छितो की, ॲट्रॉसिटी ॲक्टच्या कलम 151 अन्वये 9 राज्यामध्ये एक्सक्लुजिव्ह स्पेशल कोर्ट स्थापन केलेले आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्रामध्ये अशा प्रकारचे न्यायालय स्थापन करण्यासाठी गृह विभागाने दिनांक 6.1.2010 रोजी विधी व न्याय विभागाकडे प्रस्ताव पाठविला असून त्या अनुषंगाने ज्या जिल्हयात अशा प्रकारच्या केसेस जास्त आहेत, त्या जिल्हयात लवकरात लवकर एक्सक्लुजिव्ह स्पेशल कोर्ट स्थापन करण्यात येईल.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, ॲट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर करुन अनेक ठिकाणी बोगस केसेस दाखल केल्या जातात. तेव्हा अशा प्रकारे राजकीय हेतूने वा अन्य हेतूने बोगस केस दाखल करणा-या व्यक्तीविरुध्द शासन कोणंती कारवाई करणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, अशा प्रकारची विशिष्ट बाब निदर्शनास आणून दिल्यास, त्याबाबत निश्चित विचार करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ॲट्रॉसिटी ॲक्टखाली गुन्हा दाखल केल्यानंतर गुन्हे सिध्द होत नाहीत, असे चित्र सातत्याने पहावयास मिळते. तेव्हा हे गुन्हे सिध्द न होण्याची कारणे काय आहेत ? काही प्रकरणामध्ये सबंधितावर दबाव टाकण्यात आल्यामुळे, साक्षीदार होस्टाईल झाल्यामुळे वा साक्षी पुरावे व्यवस्थित नोंदविण्यात न आल्यामुळे हे गुन्हे सिध्द झाले नाहीत काय ? ॲट्रॉसिटी कायद्या अंतर्गत नोंदविण्यात आलेले गुन्हे सिध्द का होऊ शकत नाहीत, यासबंधीची कारणमिंमासा सभागृहासमोर मांडणे आवश्यक आहे किंवा सरकार याबाबतीत काय विचार करणार आहे, हे समजणेही आवश्यक आहे. रस्त्यावर कोणी आंदोलन केले की, सीबीआय कडे प्रकरण पाठविले जाते. खैरलांजी प्रकरणामध्ये सीबीआयने अपीलच केले नाही, असे आता निकालपत्रातून सिध्द झालेले आहे. मला माननीय मत्रिमहोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा नोंदविल्यानंतर, सबंधित व्यक्ती सुटून जाते त्याची कारणे काय आहेत तसेच त्या संदर्भात शासनाने काय उपाययोजना केलेली आहे ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाच्या बाबीसंबंधीचा प्रश्न सभागृहात विचारलेला आहे. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की,

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7599.....

श्री.आर.आर.पाटील.....

राज्यामध्ये दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्यातील प्रकरणे सिध्द व्हावीत, गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, गुन्हयाचे निकाल लवकर लागावेत या करिता एक्सक्लुजिव्ह स्पेशल कोर्ट राज्यामध्ये स्थापन केले पाहिजेत. यासाठी गृह विभागाने विधी व न्याय विभागाला विनंती केली आहे. सभापती महोदय, हायकोर्टाच्या मान्यते नंतरच अशा प्रकारचे कोर्ट स्थापन केले जाते. राज्यात अशा प्रकारचे कोर्ट लवकरात लवकर निर्माण केली जावीत, असा गृह विभागाचा प्रयत्न राहील. सभापती महोदय, या प्रकरणामध्ये कनव्हीक्शनचा रेट कमी आहे, संबधित व्यक्तीला शिक्षा होण्याचे प्रमाण कमी आहे. त्याची कारणे काय आहेत, असा सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न विचारला आहे. मी या संदर्भात आपणास सांगू इच्छितो की, या बाबत विभागाने ॲनालिसीस केले असून फिर्यादीने उशिरा फिर्याद दाखल केल्यामुळे तसेच विलंबामुळे अनेक वेळा गुन्हा शाबित होणे अशक्य होत असते. काही फिर्यादी दोन - दोन वर्षानंतर दाखल करण्यात आल्या होत्या. काही वेळा फिर्यादी कोर्टात साक्ष देण्यासाठी हजर न राहणे, साक्षीदार फितूर होणे, आरोपीची ओळख परेड न घेणे, तलाठयाने दिलेले जातीचे प्रमाणपत्र न्यायालयाने ग्राहय न ठरविणे, आरोपीने कोणत्या जातीवाचक शब्दाचा उल्लेख केलेला आहे, यासंबंधी फिर्यादीमध्ये स्पष्ट उल्लेख फिर्यादीने न करणे, अशा प्रकारच्या जवळजवळ 22 कारणांमुळे आरोपींना फायदा होत असतो. अशा प्रकारे आरोपींना फायदा होऊ नये व जे गुन्हेगार आहेत त्यांना शिक्षा व्हावी, यासाठी वरिष्ठ अधिका-यांची एक समिती निर्माण करण्यात आलेली आहे. यामध्ये ज्या काही त्रृटी राहत आहेत, त्या त्रृटी भविष्यात राहू नये, कनव्हिक्शनचा रेट वाढावा व ख-या गुन्हेगारांना शिक्षा व्हावी, यासाठी विभागाने प्रयत्न केलेले आहेत. या शिवाय आणखी प्रयत्न करण्यात येतील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, ॲट्रॉसिटी कायद्याखाली गुन्हा नोंदविण्यासंबंधी निकष काय आहेत ? मी आपणास एक उदाहरण देतो. सन्माननीय राज्यमंत्री श्री रमेश बागवे हे दलित आहेत किंवा नाहीत हे मला माहीत नाही. परंतु ते एका अधिका-याच्या खुर्चीवर बसलेले आहेत आणि मी त्यांच्याकडे एक काम घेऊन गेलो. परंतु ते काम करीत नाहीत म्हणून आम्हा दोघांचे भांडण झालेले आहे. ते दलित आहेत म्हणून भांडण झालेले नाही. समोर बसलेली व्यक्ती

..3...



VTG/ KTG/ KGS/ SBT/ ST/ प्रथम श्री.शिगम 12.30

दलित आहे किंवा नाही हे मला माहीतही नाही. परंतु दोघांमध्ये भांडण झाल्यामुळे, ती व्यक्ती माझ्याविरुध्द ताबडतोब अॅट्रोसिटीच्या कायद्याखाली गुन्हा दाखल करते.असा प्रकार घडल्यामुळे, महाराष्ट्रात दलित अत्याचार प्रतिबंधक कायद्याखाली जास्तीत जास्त गुन्हे नोंदविले गेले आहेत. माझ ो असे म्हणणे आहे की, एखाद्या मागासवर्गीय व्यक्तीला नोकरी लागेपर्यंत त्याला अधिकार आहे, त्याप्रमाणे ती व्यक्ती नोकरीस लागते. परंतु एकदा ती व्यक्ती खुर्चीत बसली की, त्या व्यक्तीला जात, धर्म वगैरे काहीही नसते. त्या ठिकाणी ती व्यक्ती अधिकारी म्हणून खुर्चीत बसलेली असते. म्हणून मी मघाशी म्हटल्याप्रमाणे, अॅट्रॉसिटी कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल केले जातात. तेव्हा असे जर घडत असेल तर संबंधित अधिका-याच्या खुर्चीसमोर असा बोर्ड लावावा लागेल की, समोरचा अधिकारी दलित आहे आणि त्याच्याशी नीट वागावे. तो अधिकारी दलित आहे किंवा नाही हे अन्य व्यक्तीला माहीत नसते. त्यामुळे हा अधिकारी दलित आहे हे लोकांना कसे समजावयाचे असा प्रश्न निर्माण झाला आहे. तेव्हा अशा प्रकारचे जे गुन्हे नोंदविले जातात ते पोलिसांनी स्वीकारले आहेत काय ? चुकीच्या पध्दतीने गुन्हा नोंदविणारासुध्दा दोषी आहे, अशा प्रकारची तरतूद अॅट्रॉसिटी अॅक्टमध्ये असावी असा माझा समज ओाहे. या विषयातील मी काही तज्ज्ञ नाही. तेव्हा अशा प्रकारचे कोठे गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7599...

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जर अशापध्दतीने किंवा चुकीच्या पध्दतीने गुन्हा दाखल केला असला व त्याबाबत फिर्याद दाखल केली असली तरी ती कोर्टामध्ये प्रूव्ह होत नाही, त्या संदर्भात शिक्षा होत नाही. आणि हे सर्व पहाण्यासाठी कोर्ट आहे.

(गोंधळ)

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी अतिशय स्पेसिफिक प्रश्न विचारला होता. आणि त्याला उत्तर देतांना मंत्रिमहोदयांनी सांगितले की, खोटे गुन्हे नोंदविले गेले तरी ते कोर्टामध्ये सिध्द होत नाहीत. परंतु मला सांगावयाचे आहे की, सद्याच्या अस्तित्वात असलेल्या कायद्याचा आधार घेऊन महाराष्ट्रामध्ये हजारो खोटे गुन्हे नोंदविले जातात, आणि त्याव्दारे सर्वसामान्य लोकांना टॉर्चर केले जाते. अशाप्रकारे कोणतीही घटना घडलेली नसतांना केवळ तक्रार करुन हे गुन्हे नोंदविले जातात व त्यामध्ये निरपराध व्यक्तींना त्रास दिला जातो. त्यामध्ये त्या माणसांना अटक करुन चार ते पाच दिवस तुरुंगामध्ये पाठविले जाते. नंतर त्यामधून काहीही निष्पन्न होत नाही. त्याकरिता अशाप्रकारे खोटे गुन्हे नोंदविले जाऊ नयेत यासाठी आपण कायद्यामध्ये दुरुस्ती करुन प्रतिबंधात्मक उपाय योजना करणार काय? आजच्या कायद्यामधील एका तरतुदीमुळे हजारो निरपराध लोक सफर होत आहेत त्याकरिता आपण कायद्यामध्ये दुरुस्ती करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हा केंद्र सरकारचा कायदा असल्यामुळे शासनाचा तसा कोणताही विचार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाला उत्तर मिळाले नाही. शासनाचा कायदा करण्याचा विचार नसला आणि हा केंद्र सरकारचा कायदा असला तरी आपण डीवाय.एस.पी. यांच्या धर्तीवर फेर चौकशी करण्यास सांगितले. त्याचा आधार घेऊन त्या पध्दतीने फेर चौकशी करुन त्यानंतरच गुन्हे नोंदविले पाहिजेत. अशाप्रकारची एखादी तक्रार आल्यानंतर त्याबाबत फेर चौकशी करुन त्यामध्ये निष्पन्न झाल्यानंतरच गुन्हे नोंदविले गेले पाहिजेत. तशाप्रकारचे आदेश आपण देणार काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, गरीब माणसांना न्याय देण्यासाठी, त्यांच्यावर अन्याय होऊ नये, त्या माध्यमातून राज्यामध्ये अॅट्रॉसिटीच्या केसेस होऊ नयेत यासाठी आपण हा कायदा केला आहे. त्यामुळे आपण म्हटल्याप्रमाणे जर या कायद्यामध्ये बदल केला तर दलितांना



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7599...

श्री. आर. आर. पाटील...

न्याय मिळणार नाही. खोटया केसेसचा आधार घेऊन तक्रारी करुन लोकांना त्रास दिला जाऊ नये यासाठी पोलीस विभागाकडून दक्षता घेतली जाते. हे काम डीवाय.एस.पी. सारखे अधिकारी पहात असतात. आणि म्हणून दलितांना न्याय देण्यासाठी करण्यात आलेल्या कायद्यामध्ये कोणताही बदल करण्याचा शासनाचा विचार नाही.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, दलितांवर अन्याय, अत्याचार होत असतील तर त्यासंदर्भात तात्काळ गुन्हे दाखल झाले पाहिजेत यासाठी आपण कायदा केला. परंतु आज राज्यामध्ये कित्येक ठिकाणी दुर्दैवाने राजकीय वैमनस्यामधून मोठया प्रमाणात गुन्हे घडत असतात. त्यामुळे ॲट्रॉसिटीखाली गुन्हा दाखल करावयाचा की नाही हे ठरविण्याचे काम आपण संबंधित पोलीस स्टेशनच्या इनचार्जकडे सोपविले तर त्याठिकाणी चुकीच्या गोष्टी घडू शकतात.म्हणून माझा प्रश्न असा आहे की, या कायद्यातील तरतुदीव्दारे आपल्याला गुन्हे नोंदवून कारवाई करावयाची असेल तर ती जरुर करावी. परंतु त्यापूर्वी संबंधित जबाबदार पोलीस अधिकाऱ्याच्या माध्यमातून त्याची पहाणी व्हावयास पाहिजे. प्रत्येक जिल्हयामध्ये एस.पी. आणि डीवाय.एस.पी. यांनी पहाणी केल्यानंतर जो गुन्हा लावणे आवश्यक असेल तो लावण्यासाठी कायद्यामध्ये बदल करणार काय?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, गुन्हयाची नोंद करुन घेणे किंवा गुन्हा नोंदविणे हे कायद्याने बंधनकारक आहे. परंतु त्या गुन्हयाचा अंतिम तपास करीत असतांना व त्यानंतर चार्जशीट तयार करीत असतांना डी.वाय.एस.पी. सारख्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पातळीवर ते काम केले जाते. आणि जर त्या गुन्हयामध्ये तथ्य नसल्याचे आढळले तर ते तपासणी अहवालामध्ये येते. त्यामुळे कायद्याने कुणावरही अन्याय होतो अशातला भाग नाही. आपण याठिकाणी दलितांना न्याय देण्यासाठी हा कायदा केला असतांना एखाद्या ठिकाणी या कायद्याचा गैरवापर केला जात आहे असे जर आपले म्हणणे असेल तर त्याला कोर्टामध्ये न्याय मागण्याचा अधिकार आहे. आणि म्हणून या कायद्याचा गैरवापर होत आहे असे सांगून दलितांच्या हितासाठी व त्यांच्या हक्कासाठी केलेल्या कायद्यामध्ये बदल करण्यासंबंधीची कोणतीही बाब राज्य सरकारच्या विचाराधीन नाही. त्यामुळे राज्य सरकार या कायद्यामध्ये कोणताही बदल करु इच्छित नाही.

------

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**जळगांव जिल्ह्यात मांडुळ जातीच्या सापाची होत असलेली तस्करी**

**(२) * ६९२१ श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्ह्यात मांडुळ जातीच्या सापाची नागमणी साठी तस्करी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) नाही. तथापि दि.२६/०४/२०१० रोजी मुक्ताईनगर पोलीस स्टेशनच्या पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या बातमीवरुन वाहनांची चेकिंग दरम्यान नवीन बोदवड चौफूली जवळ मुक्ताईनगर ते मलकापूर रोडवर टाटा सफारी गाडी क्र.एम.एच.-१५/बी.एक्स-७४७१मध्ये रेड सॅड ओ एरिस जातीचा दुतोंड्या सापाची व्यापाराकरीता शिकार करुन संगनमताने वाहतूक करताना आरोपी क्र.१ विनोद ज्ञानदेव चव्हाण वगैरे ७ सर्व रा.मधापूरी ता.मुक्ताईनगर हे मिळून आले.

(२) नमूद घटनेसंदर्भात मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला आरोपी क्र.१ विनोद ज्ञानदेव चव्हाण वगैरे ७ सर्व रा.मधापूरी ता.मुक्ताईनगर यांचेविरुध्द मुक्ताईनगर पोलीस स्टेशनला भाग-६ गु.र.नं. ३०१२/२०१० वन्यजिव संरक्षण कायदा कलम १९७२ चे कलम ३,३९,५१,४४,४८ अ.ब.व भा.दं.वि. कलम ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून दुतोंड्या साप वाहनांसह जप्त करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा पुढील तपासकामी जप्त मुद्येमालासह उपवनसंरक्षक अधिकारी जळगांव जिल्हा यांचेकडे वर्ग करण्यात आलेला असून पुढील तपास वनविभाग जळगांव हे करीत आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6921..

श्री. दिलीपराव सोनवणे : सभापती महोदय, जळगाव जिल्हयात मांडुळ ज्याला दुतोंडया, माती सावरा आणि शासकीय भाषेत रेड् सॅड ओ एरिस असे म्हणतात. या जातीच्या सापाची शिकर करुन मोठया प्रमाणात तस्करी करण्यात येत आहे. पाचोरा वन परिक्षेत्रात मोनाळे शहरामध्ये त्याचप्रमाणे नवीन बोदवड चौफुलीवर दिनांक 26/04/2010 ला अशा प्रकारच्या सापासह आणि वस्तुंसह तस्करी करणारी मंडळी सापडलेली आहे. या मांडुळ सापाचा उपयोग औषध तयार करण्यासाठी, जादूटोण्यासाठी, गुप्त धन व सट्टयाचे आकडे काढण्यासाठी होतो असे म्हटले जाते. मात्र प्रत्यक्षात या सापाचा उपयोग कशासाठी होतो हे कोणालाच माहीत नाही. या सापाची तस्करी मोठया प्रमाणात होत आहे. आणि लाखो रुपयाचा धंदा केला जात आहे. पुणे , मुंबई आणि औरंगाबाद या ठिकाणी या सापाची विक्री होत असून त्याची किंमत लांबीवर आधारित नसून वजनावर आधारित असते. परंतु उत्तर क्रमांक 3 मध्ये "प्रश्न उदभवत नाही" असे म्हटलेले आहे. सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, या सापाचा उपयोग नेमका कोणत्या कामासाठी होतो? या सापांचा छळ थांबेल काय? या सापाची तस्करी थांबेल काय? उत्तर क्रमांक 2 मध्ये "सदरचा गुन्हा पुढील तपासकामी जप्त मुद्येमालासह उपवनसंरक्षक अधिकारी जळगांव जिल्हा यांचेकडे वर्ग करण्यात आलेला असून पुढील तपास वनविभाग जळगांव हे करीत आहेत" असे म्हटले आहे. त्यासंबंधीचा अहवाल प्राप्त झालेला आहे काय?

श्री. रमेश बागवे :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्या अनुषंगाने सदर तस्करी करणाऱ्यांवर वन्यजीव संरक्षण कायदा कलम 1972 नुसार कारवाई करण्यात आलेली आहे. मुंक्ताईनगर भागात दुतोंडया सापाची तस्करी करणाऱ्यांच्या संबंधात श्री. कैलाश वामन सोनवणे यांच्या माध्यमातून फिर्याद दाखल करुन सात लोकांना अटक करण्यात अलेली आहे. कायद्यातील कलम 55 च्या अनुषंगाने पोलिसांना याबाबत दोषारोपपत्र दाखल करण्याचा अधिकार नाही म्हणून कायद्यातील कलम 55 च्या अनुषंगाने वन खात्याच्या अधिकाऱ्याकडे हा तपास दिलेला असून वन खात्याचे अधिकारी हा तपास करीत आहेत.

..2...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.6921..

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, नागमणी ही संकल्पना चुकीची आहे. त्यामुळे याबाबतीत अशी अंधश्रध्दा आहे की, मांडुळ मारल्यानंतर नागमणी मिळतो ती दूर करण्यासाठी पोलीस विभागामार्फत काही विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत काय किंवा जनजागृतीची मोहिम राबविण्यात येणार आहे काय?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, अंधश्रध्देच्या माध्यमातून अनेक लोकांना फसविण्याचे प्रकार या सापाची तस्करी करणारे गुन्हेगार करतात तेव्हा याबातीत शासनाच्या वतीने जनजागृती करण्याचा जरुर प्रयत्न केला जाईल.

----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

**कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व पुणे या पाच जिल्ह्यांत**
**71 लाचखोरांना पकडण्यात आल्याबाबत**

**(3) * 7795 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे : तारांकित प्रश्न क्रमांक 6386 ला दिनांक 6 एप्रिल, 2010 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) शासनाच्या विविध विभागातील भ्रष्टाचार रोखण्यासाठी लाचलूचपत प्रतिबंधक खात्याच्या पोलिसांची विशेष नेमणूक केली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलिसांनी लाच स्वीकारणाऱ्यांना अटक करुन जप्त केलेल्या रकमेपैकी 17 लाख रुपये कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर व पूणे जिल्ह्यातील तक्रारधारकांना अद्यापपर्यंत परत दिले नसल्याचे माहे जानेवारी, 2010 च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, तक्रारदारांना रक्कम परत मिळणेसाठीचे अर्ज तपास अधिकाऱ्यांमार्फत ब्युरोकडे प्राप्त झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, आवश्यक त्या प्रक्रिया पूर्ण करुन सदर तक्रारदारांची रक्कम परत करण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,
(5) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता**: (1) होय, हे खरे आहे
(2),(3),(4) व (5) दिनांक 01/01/2009 पासून दिनांक 31/12/2009 या कालावधीत पुणे परिक्षेत्रात एकूण 71 सापळा प्रकरणी करण्यात आलेल्या कारवाईमध्ये एकूण रुपये 10,91,890/- इतकी सापळा रक्कम जप्त करण्यात आलेली आहे. एकूण 71 सापळा प्रकरणांपैकी 5 प्रकरणांमध्ये लाचेचा प्रत्यक्ष स्वीकार झालेला नसून, लाचेची मागणी केल्याबाबत गुन्हे नोंद असलेने त्यामध्ये तक्रारदारांना सापळा रक्कम परत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. उर्वरित 66 प्रकरणांपैकी 60 तक्रारदारांचे सापळा रक्कम परत मिळणेसाठीचे अर्ज तपास अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त झालेले असून, 6 तक्रारदारांचे अर्ज अद्याप प्राप्त झालेले नाहीत. प्राप्त 60 तक्रारदारांचे अर्जापैकी 59 तक्रारदारांची सापळा रक्कम परत करण्याचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. 1 तक्रारदार प्रकरणी सादर केलेल्या अर्जाबाबत आदेश पारीत करण्याची प्रक्रीया पूर्ण करण्यात येत आहे. 59 प्रकरणांपैकी आतापर्यन्त 49 तक्रारदारांची सापळा रक्कम रुपये 4,49,290/- त्यांना परत करण्यात आलेली आहे. उर्वरित तक्रारदारांची सापळा रक्कम त्यांना परत करण्याबाबत, निधीचे उपलब्धतेनुसार, कार्यवाही करण्यात येत आहे.

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/

ता.प्र.क्र.7795...

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, लाचलूचपत प्रतिबंधक विभागामार्फत गेल्या वर्षी पुणे विभागामध्ये 71 जणांना सापळा लावून अटक करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यापैकी 66 जणांना पकडण्यामध्ये यश मिळाले. सभापती महोदय, सापळा लावून पकडल्यानंतर त्यांची जप्त केलेली सापळा रक्कम परत करायची असते. ती रक्कम परत करण्यामध्ये खूप दिरंगाई झालेली आहे. सरकारने सापळा रक्कम परत करण्याचे आदेश दिले त्याप्रमाणे 49 तक्रारदरांची सापळा रक्कम परत करण्यात अली. 10 जणांची सापळा रक्कम परत न करण्याचे कारण "निधीच्या उपलब्धतेनुसार कार्यवाही करण्यात येत आहे" असे दिलेले आहे. याचा अर्थ ही रक्क्म दुसऱ्या ठिकाणी वापरली जाते काय? माझा दुसरा प्रश्न असा की, ज्या 66 जणांना सापळा लावून पकडण्यात आले त्यांच्यावर लावण्यात आलेल्या केसेसची स्थिती काय आहे?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, ती रक्कम दुसरीकडे वापरण्यात येत नाही. ज्या तक्रारदारांने लाच देण्याच्या संदर्भात रक्कम दिलेली आहे त्यालाच ती परत दिली जाते. परंतु जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे तो दिला जातो. सभापती महोदय, गृह विभागाच्या दिनांक 26 मार्च,2008 च्या शासन निर्णयानुसार सापळयाच्या दिनांकापासून एका महिन्याच्या कालावधीनंतर उपलब्धतेनुसार त्या व्यक्तीला परत दिली जाते. ज्या संबंधित आरोपीवर केस दाखल केलेली आहे ती केस न्यायालयात चालू आहे.

यानंतर श्री. बरवड...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7795 .....

श्री. भगवान साळुंखे : 6 तक्रारदारांनी पैसे परत मागण्यासाठी अर्ज केलेला नाही असा उत्तरात उल्लेख केलेला आहे. त्यांनी पैसे परत मागितले नाही तर त्यांचे पैसे परत दिले जाणार की नाही ?

श्री. रमेश बागवे : जर अर्ज प्राप्त झाला तर लगेच त्यांचे पैसे परत दिले जातील.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/ KGS/

**मुंबईतील प्रभादेवी येथून 40 किलो चरस जप्त केल्याची घडलेली घटना**

**(4) * 7330 श्री.हेमंत टकले , श्रीमती उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे, श्री.अरुण गुजराथी , श्री.सतीश चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चरणसिंग सप्रा, श्री.सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई, श्री.रमेश शेंडगे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईतील प्रभादेवी येथून 40 किलो चरस जप्त केल्याची घटना दिनांक 11 मे, 2010 रोजी वा त्या सुमारास घडली हे खरे आहे काय,

(2) उक्त प्रकरणी शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) प्रभादेवी मुंबई येथील दि. 8 व 9 मे, 2010 रोजी केलेली कारवाई पोलीस विभागामार्फत करण्यात आली नसून केंद्र शासनाच्या अखत्यारीतील नार्कोटीक्स कंट्रोल ब्युरोने केली आहे.

(2), (3) व (4) या प्रकरणी नार्कोटीक्स कंट्रोल ब्युरोने दोन व्यक्तींना अटक केली आहे. त्यांचे विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट, 1985 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात सुधारित उत्तर वितरित केले आहे. ही कारवाई पोलीस विभागामार्फत केली नसून केंद्र शासनाच्या अखत्यारीतील विभागातर्फे केलेली आहे असे उत्तरात नमूद केले आहे. एकूणच या अंमली पदार्थांच्या वाहतुकीबद्दल आणि ते बाळगण्याबद्दल जी प्रकरणे गेल्या काही वर्षात सातत्याने वाढत चालली आहेत ते पाहता जर हे सर्व केंद्रीय विभागाकडे देण्यात आले असेल तर महाराष्ट्र पोलिसांची यामधील नक्की भूमिका काय आहे ? हे रोखण्यासाठी आतापर्यंत किती प्रकरणांमध्ये विशेष उपाययोजना केली आहे ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, यामध्ये एनडीपीएस ॲक्ट, 1985 या केंद्र शासनाच्या कायद्यांतर्गत गुन्हा दाखल झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न विचारला की, केंद्राप्रमाणे राज्यामध्ये कारवाई झाली काय ? मे 2010 अखेर संपूर्ण महाराष्ट्रामध्ये एकूण 350 गुन्हे दाखल झ ाले. त्यामध्ये 7334 किलो माल जप्त झाला आणि त्याची किंमत 7 कोटी 35 लाख

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

42 हजार रुपये आहे. मे, 2009 अखेर 572 गुन्हे दाखल झाले. त्या गुन्ह्यामध्ये 4935 किलो माल जप्त करण्यात आला आणि त्यांची किंमत 3 कोटी 70 लाख रुपये आहे. त्यामध्ये 1927 आरोपींना अटक केली. जो 7 कोटी 35 लाख 42 हजार रुपयांचा माल पकडला त्यामध्ये 623 आरोपींना अटक केलेली आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, असे असेल तर ही बाब जास्त गंभीर आहे. जर केंद्रीय दल येऊन 40 किलो चरस जप्त करीत असेल तर स्थानिक पोलीस काय करीत होते हा प्रश्न यातून निर्माण होतो. 40 किलो चरस ज्या भागामध्ये किंवा ज्या पोलीस स्टेशनच्या अंतर्गत पकडला त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, यासाठी केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा असे दोन्ही नार्कोटीक सेल कार्यरत ठेवण्यात आले आहेत. गेल्या वर्षभरामध्ये राज्य शासनाच्या पोलिसांनी टाकलेल्या धाडी पाहिल्या तर एकूण जे अंमली पदार्थ आहेत त्यासंदर्भात मागच्या वर्षीच्या तुलनेमध्ये जवळजवळ दहापट अधिकच्या धाडी महाराष्ट्राच्या पोलीस दलाने टाकलेल्या आहेत. बऱ्याच वेळा हा माल बाहेरच्या राज्यातून येत असताना त्याची कल्पना राज्य पोलिसांना नसते परंतु ट्रॅपिंग करीत असताना केंद्रीय एजन्सीला त्याची कल्पना येऊ शकते. अनेक वेळा अंमली पदार्थ परदेशातून येतात आणि बॉर्डरवर आपली यंत्रणा नसते. म्हणून जाणीवपूर्वक केंद्र सरकारने आणि राज्य सरकारने या देशातील सर्व राज्यांमध्ये या दोन्ही यंत्रणा एकाच कामासाठी कार्यरत ठेवलेल्या आहेत. या वर्षी मुंबई पोलिसांनी टाकलेल्या धाडी पाहिल्या तर मागच्या वर्षीच्या तुलनेमध्ये दहापट अधिकच्या धाडी मुंबई पोलिसांनी यशस्वीपणे टाकलेल्या आहेत. प्रत्येक गोष्टीची माहिती राज्य पोलिसांना मिळतेच असे नाही. ती माहिती केंद्रीय एजन्सीला मिळू शकते. कधी कधी ती माहिती केंद्रीय एजन्सीला मिळत नाही परंतु राज्य एजन्सीला मिळते. म्हणून दोन्ही यंत्रणांकडून कारवाई सुरु आहे आणि गेल्या वर्षभरातील कामगिरी लक्षणीय आहे.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, प्रभादेवी भागामध्ये 40 किलो चरस पकडण्यात आला. त्यामध्ये ज्या आरोपींना पकडले त्यांची नावे काय आणि ते कोणत्या राज्यातील आहेत ? त्यांच्याकडे चरसशिवाय आणखी काय काय सापडले ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7330 ....

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, या आरोपींमध्ये एक श्री. गुरमितसिंग हरजितसिंग ऊर्फ पप्पू हा चरस विक्रेता असून तो नानकनगर, सेक्टर 2, जम्मू-काश्मीर येथील राहणारा आहे. दुसरा आरोपी श्री. प्यारेलाल उर्फ पैलवान असून तो रुम नंबर 7, शिवराम सदन, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी येथील राहणारा आहे. त्या ठिकाणी जो 40 किलो चरस पकडला त्याची किंमत 5 लाख रुपये असून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील किंमत 30 लाख रुपये आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7330......

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय गृहमंत्र्यांनी राज्य पोलीस यंत्रणा व केंद्रीय पोलीस यंत्रणा अशा दोन्ही यंत्रणा कार्यरत आहेत असे सांगितले आहे. तरी देखील असे गुन्हे घडत आहेत. हे अंमली पदार्थ सीमा भागातून येतात असेही त्यांनी म्हटले आहे. परंतु हा गुन्हा प्रभादेवी पोलीस स्टेशनच्या बाजूला घडला आहे. त्यामुळे त्या पोलीस स्टेशनची काही जबाबदारी आहे की नाही ? मी सीमा भागाचा उल्लेख केला नव्हता. जेथे हा माल सापडला आहे त्या प्रभादेवी पोलीस स्टेशनची जबाबदारी आहे की नाही, असेल तर तेथील पोलीस अधिका-यांविरुध्द शासन काय कारवाई करणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, गुप्त विभागाकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे अशाप्रकारची कारवाई पोलिसांनी केलेली आहे. अशाप्रकारच्या गुन्हयात आंतरराष्ट्रीय टोळीतील लोक सामील असतात. ज्याप्रमाणे माहिती मिळते त्याप्रमाणे संशयितांवर नजर ठेवली जाते. त्यानंतर आरोपींना अटक केली जाते.

डॉ.एन.पी.हिराणी : सभापती महोदय, या गुन्हयामधील 40 किलो चरस जप्त केलेला आहे. अशाप्रकारे नेहमी चरस, गांजा, अफू पोलिसांकडून जप्त केला जातो. त्याची विल्हेवाट कशी लावली जाते ते समोर येत नाही. या धाडीत सापडलेल्या अंमली पदार्थाची किंमत 4-5 कोटी आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. एवढया किंमती वस्तू पुन्हा चुकीच्या मार्गाने बाजारामध्ये जातात काय ? या अंमली पदार्थाची विल्हेवाट लावण्याची पध्दत कशी आहे ते सांगावे.

श्री.रमेश बागवे : अशा गुन्हयातील प्रत्येक केसचा निकाल लागल्यानंतर न्यायालयाच्या आदेशानुसार तो माल जाळून टाकला जातो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज गृह खात्याने लेखी उत्तराच्या माध्यमातून विनोद करण्याचे ठरविले आहे की काय अशी स्थिती आहे. यापूर्वीच्या प्रश्नामध्ये 'सापळा रक्कम' असे छापले होते. ही सापळा रक्कम म्हणजे काय ते मी विचारण्यासाठी उभा राहिलो होतो, परंतु तेव्हा मला संधी मिळाली नाही. याही प्रश्नाबाबत सत्तारुढ पक्षातील सन्माननीय सदस्यांकडून चिंता व्यक्त केली जात आहे. कारण त्यांच्याकडूनच अधिक प्रश्न विचारले जात आहेत. त्याचप्रमाणे

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7330.... श्री.दिवाकर रावते.....

सकाळच्या सत्रातही तरुण पिढीबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली होती. सभापती महोदय, दादरच्या नाक्यावर रोज नाकाबंदी असते, आम्हाला त्याचा रोज अनुभव येतो. सीमा भागावर नसेल इतकी कडक नाकाबंदी तेथे करण्यात आलेली आहे. असे असतानाही हा माल राज्यामध्ये आला आहे. या प्रकरणात 40 किलो चरस पडकण्यात आला आहे. त्याची आंतरराष्ट्रीय बाजारात किती किंमत आहे ते माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. या किंमतीचा अंदाज त्यांनी कसा काय व्यक्त केला आहे, अशाप्रकारच्या मालाची कोठे जाहीरपणे विक्री केली जाते का ते सांगावे.

श्री.रमेश बागवे : गुप्त विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार कारवाई केली जाते. या गुन्हयातील आरोपींविरुध्द एनडीपीएस ॲक्ट, 1985 नुसार कारवाई केली जाते. सन 2010 मध्ये 6 गुन्हे दाखल झाले आहेत. या गुन्हयांमध्ये अंमली पदार्थ उघडकीस आला आहे. त्याचप्रमाणे गुप्त माहिती विभागाकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर आतापर्यंत 14 ठिकाणी धाडी टाकल्या आहेत. आंतरराष्ट्रीय बाजारभावाप्रमाणे अशा मालाची जी किंमत असते ती मी येथे सांगितली आहे.

-----

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ ST/

**मुंबईत कुलाबा येथील लष्कराच्या आपत्ती व परिवहन विभागात काम करणाऱ्या कर्नलवर कारवाई करण्याबाबत**

**(५) * ७२०७ श्री.मोहन जोशी, श्री.सुभाष चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयप्रकाश छाजेड, प्रा.सुरेश नवले, श्री.चरणसिंग सप्रा :** सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत कुलाबा येथील लष्कराच्या आपत्ती व परिवहन विभागात काम करणाऱ्या कर्नल याने लहान मुलांचे अश्लील चित्रण करुन इंटरनेटवर टाकले असल्याची धक्कादायक बातमी माहे मे, २०१० मध्ये वा त्यासुमारास उघडकीस आली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अश्लील चित्रण करुन ते इंटरनेटवर माहिती देणाऱ्या कर्नलवर कठोर कारवाई करण्याबाबत, तसेच अशा प्रकारांना आळा बसण्यासाठी शासनाने कोणती प्रतिबंधात्मक उपाययोजना केली आहे, वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता :** (१) होय.

(२) याप्रकरणी एक लेफ्टनंट कर्नल (आर्मी) यांनी चाईल्ड पोर्नोग्राफीची व्हिडीओक्लिप अपलोड केली असल्याचे निष्पन्न झाल्यामुळे स्थानिक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद क्र. ०१/१०, कलम ६७ (बी) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये दिनांक ५.५.२०१० रोजी गुन्हा नोंद करुन आरोपीस दिनांक ६.५.२०१० रोजी अटक करण्यात आली आहे. तसेच आर्मीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.

अशा प्रकारांना आळा बसावा याकरीता सायबर क्राईम पोलीस ठाणे तसेच सायबर सेल या ठिकाणी अशा वेब साईट चालू आहेत काय याबाबत गस्त करण्यात येत आहे. सायबर क्राईम सेल यांच्याकडून बृहन्मुंबईतील शाळा कॉलेज मधील विद्यार्थ्यांकरीता सायबर क्राईम बाबत चर्चासत्र आयोजित केली जातात व चर्चासत्रामध्ये सायबर क्राईमबाबत सविस्तर माहिती दिली जाते. तसेच बृहन्मुंबई पोलीस ठाण्यांना त्यांच्या हद्दीतील सायबर कॅफेमध्ये गस्ती करण्याचे तसेच अश्लील चित्रांबाबत माहिती मिळताच योग्य ती कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांना लेखी उत्तरात दुरुस्ती करावयाची आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे नेहमी मराठी भाषेचा आग्रह धरत असतात. शासकीय कामकाजात मराठी भाषेच्या वापरासाठी 10 कोटी रुपये खर्च केला जातो अशी माहिती मिळाली आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात "लेफ्टनंट कर्नल (आर्मी) यांनी चाईल्ड पोर्नोग्राफीची व्हिडीओक्लिप अपलोड केली असल्याचे" असे छापलेले आहे. शासनाने लेखी उत्तर देताना मराठीचा वापर केला पाहिजे की नाही ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रत्येक अधिवेशनात सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मराठी भाषेच्या वापराबाबत आग्रह धरीत असतात. उत्तरामध्ये वापरण्यात आलेल्या इंग्रजी शब्दांचे मराठीत भाषांतर करायला पाहिजे होते. म्हणून उत्तरामध्ये सुधारणा करायची आहे काय, असा प्रश्न मी विचारलेला आहे.

**सभापती** : या सभागृहामध्ये शासकीय उत्तर हे मराठी भाषेमध्ये दिले पाहिजे ही वस्तुस्थिती आहे. एखादा इंग्रजी शब्द वापरला असेल तर तो सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते म्हणतात त्याप्रमाणे कंसात वापरणे गरजेचे आहे.

श्री. मोहन जोशी : या सभागृहामध्ये सायबर क्राईमच्या संदर्भात प्रश्नाच्या माध्यमातून, लक्षवेधीच्या माध्यमातून अनेक वेळा चर्चा होत असते. परंतु हे गुन्हे काही कमी होत नाहीत. उत्तरामध्ये "पोलीस गस्त घालतात" असे सांगितलेले आहे. या राज्यामध्ये ज्या ज्या पोलीस आयुक्तांच्या विभागामध्ये सायबर सेल आहेत त्यामध्ये कर्मचारी वर्ग अत्यंत अपुरा आहे. कर्मचारी वर्ग अपुरा असेल तर गस्त कशी काय घालणार ? आज राज्यामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले असून त्यामध्ये सायबर क्राईमच्या गुन्ह्यांचे प्रमाण फार मोठे आहे. तेव्हा ज्याप्रमाणे राज्य गुन्हे शाखेमध्ये 50 टक्के कर्मचारी हे एमपीएससीच्या माध्यमातून भरले जातात त्याप्रमाणे सायबर सेल मध्येही आय.टी. इंजिनिअर अर्हता असलेल्या कर्मचा-यांची भरती एमपीएससीच्या माध्यमातून करण्यात येणार आहे काय ?

श्री. रमेश बागवे : ही गोष्ट खरी आहे की, सायबर कॅफेच्या माध्यमातून तरुण पिढीवर विपरीत परिणाम होत आहेत. याची शासनाने गंभीरपणे दखल घेतलेली आहे. सायबर गुन्ह्यांच्या संदर्भात आपण कायदा केलेला असून त्या कायद्यानुसार कारवाई केली जाते. सायबर कॅफेतून अश्लील वेबसाईटस् वापरल्या जाणार नाहीत याची खबरदारी त्या त्या पोलीस स्टेशनवर टाकलेली आहे. नेट पेट्रोलिंग सुरु करुन सायबर कॅफेवर नियंत्रण ठेवलेले आहे. सायबर कॅफेमध्ये अश्लील वेबसाईट दाखविली गेली तर त्याबाबतीत संबंधित पोलीस अधिका-याला जबाबदार धरुन त्याच्यावर कारवाई केली जाईल. सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम शासन करीत आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.७२०७........

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

**सभापती** : मी आपल्याला पुरवणी प्रश्न विचारण्याची संधी देईन.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, मी प्रश्न असा विचारला होता की, पोलीस कर्मचाऱ्यांची भरती करताना शैक्षणिक पात्रता १२ वी उत्तीर्ण असणे आवश्यक असते. त्यांच्याकडून सायबर क्राईमचे गुन्हे शोधले जातील का? त्यामुळे पोलीस भरती करताना ज्यांच्याकडे आय.टी.ची पदवी असेल अशा उमेदवारांची सायबर सेलसाठी लोकसेवा आयोगामार्फत भरती करण्यात येईल काय?

श्री.रमेश बागवे : सभातपी महोदय, सायबर सेलमध्ये कार्यरत असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना सायबर क्राईमबाबतचे प्रशिक्षण दिले जाते. जे पूर्णपणे प्रशिक्षित असतात, त्यांनाच सायबर सेलमध्ये नियुक्त केले जाते.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, छोट्या मुलांच्या जीवनाशी निगडित असा प्रश्न आहे. तयार केलेल्या अश्लील चित्रफितीची विक्री संगणकाच्या माध्यमातून जगामध्ये कशा पध्दतीने केली जाते याबद्दल कोणतेही नियंत्रण नाही. एका अमेरिकन दाम्पत्याने छोट्या मुलावर लैंगिक अत्याचार केल्याबद्दल त्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला व या दाम्पत्याला शिक्षा देखील झाली. मुंबई उच्च न्यायालयातील एका खटल्याचा निकाल देत असताना न्या.मृदुला भाटकर यांनी अशा प्रकरणी तपासाच्या दृष्टीने पोलिसांना मार्गदर्शक तत्वे आखून दिली आहेत. अश्लील चित्रफित निर्माण केल्याबद्दल जे गुन्हे दाखल होतात त्या गुन्हयांचा तपास कशा पध्दतीने झाला पाहिजे यादृष्टीने न्या.मृदुला भाटकर यांनी जो निकाल दिला त्यातील मार्गदर्शक तत्वानुसार अशा प्रकारच्या सर्व गुन्ह्यांमध्ये तपासाच्या दृष्टीने दक्षता घेतली जाईल काय? मंत्रीमहोदयांनी या निकालाची माहिती घ्यावी.

श्री.रमेश बागवे : सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे नक्की या मार्गदर्शक तत्वांचा अंमल केला जाईल आणि त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लहान मुलांच्या लैंगिक शोषणाबद्दल गुन्हा दाखल करुन सायबर सेलच्या माध्यमातून कारवाई करण्यात आली. परंतु ज्या विकृत माणसाने हा गुन्हा केला त्याच्याविरुध्द आयपीसी अंतर्गत कारवाई केली जाणार आहे का? ज्या ठिकाणाहून ही

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.७२०७........ श्री.भाई जगताप.....

अश्लील चित्रफित अपलोड करुन घेण्यात आली त्याच्या मुळाशी पोलीस खाते पोहोचले आहे का? अन्यथा रोग एका ठिकाणी असताना औषध दुसऱ्या ठिकाणी लावले असे होता कामा नये. ज्या कर्नलने अश्लील चित्रफित निर्माण केली त्या प्रकरणाच्या मुळाशी पोलीस खाते पोहोचले आहे का? या कर्नलविरुध्द आयपीसी अंतर्गत गुन्हा दाखल केला जाईल काय?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, संबंधित आरोपी हा भारतीय लष्करातील लेफ्टनंट कर्नल आहे. त्याच्याविरुध्द माहिती व तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६७ (बी) अंतर्गत कारवाई केली आहे. भारतीय लष्कराला याबद्दलची माहिती देऊन कोर्ट मार्शल करण्याची विनंती केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या कर्नलविरुध्द गुन्हा नोंदविण्यात येऊन आर्मीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येत आहे व सायबर क्राईम पोलीस ठाणे तसेच सायबर सेल यांच्याकडून अशा वेब साईट चालू आहेत काय याबाबत गस्त करण्यात येत आहे असे उत्तरात म्हटले आहे. ज्या कर्नलने लहान मुलांचे अश्लील चित्रण करुन इंटरनेटवर अपलोड केले ती क्लिप इंटरनेटवरुन काढून टाकणे महत्वाचे आहे. अन्यथा सायबर सेलचे अधिकारी गस्त करण्यासाठी सायबर कॅफेमध्ये जातील त्यावेळी वेब साईट बंद केली जाईल आणि पोलीस गेल्यानंतर ती वेब साईट पुन्हा सुरु केली जाईल किंवा गस्त घालण्यासाठी आलेल्या पोलिसांना कारवाई होऊ नये म्हणून हप्ता दिला जाईल. त्यामुळे इंटरनेटवरुन ही क्लिप काढण्याबाबत शासन कारवाई करणार आहे का?

नंतर २डी.१...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 7207........

श्री. रमेश बागवे : शासनाच्या माध्यमातून सदर साईटला कळविलेले असून ती साईट संपूर्णत: नष्ट करण्याची कारवाई केली आहे.

श्री. राजेंद्र मुळक : महोदय, सायबर कॅफेजमध्ये असे दिसून येईल की, इंटरनेटवरील काही साईट्स अशा सायबर कॅफेमध्ये अपलोड केल्या जातात. माझा प्रश्न असा आहे की, ज्या सायबर कॅफेच्या आतमध्ये अशा प्रकारच्या "एक्स" कॅटेगरीजच्या साईट्स असतील त्यांच्यावर शासन बंदी घालणार काय ? कारण या साईट्सचे व्हेरिफिकेशन करण्याची जबाबदारी गृह विभागाची असते. परंतु खुले आमपणाने अशा साईट्स वापरताना दिसून येतात, म्हणून त्या बंद करण्यासाठी शासन कायदा आणणार आहे काय ?

श्री. रमेश बागवे : अश्लिल वेबसाईट्सवर बंदी घालण्याच्या बाबतीत शासन नेहमीच गंभीर आहे. त्यादृष्टीने कायद्यात बदल करुन एखादा नवीन कायदा आणता येतो काय याचा विचार करुन कडक कारवाई करण्यात येईल.

श्री. मोहन जोशी : महोदय, राज्यात वाढत चाललेले सायबर गुन्हे थांबविण्यासाठी प्रोहिबिटेड सॉफ्टवेअर नसल्याने अशा प्रकारे अपयश येत आहे. म्हणून असे सायबर गुन्हे रोखण्यासाठी प्रोहिबिटेड सॉफ्टवेअर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही शासन करणार काय ?

श्री. रमेश बागवे : अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी कायद्यात नक्कीच बदल करण्याबाबत भारत सरकारकडे शिफारस करण्यात येईल. तसेच अशा सायबर गुन्ह्यांसाठी नेटवर्क निर्माण करण्याची मोहीम सुध्दा शासनाने सुरु केली व त्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथक निर्माण करण्यात आले आहे.

---------

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भिमपूर (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील सर्वसामान्य गावकऱ्यांवर खोटे आरोप करुन त्यांना पोलीसांकडून वारंवार होत असलेली मारहाण**

**(6) * 7545 श्रीमती अलका देसाई, प्रा.सुरेश नवले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.सुभाष चव्हाण, श्री.चरणसिंग सप्रा** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) भिमपूर (ता.धानोरा, जि.गडचिरोली) येथील सर्वसामान्य गावकऱ्यांवर, नक्षलवाद्यांना सहकार्य केल्याचे खोटे आरोप करुन त्यांना पोलीसांकडून वारंवार मारहाण होत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2010 मध्ये वा त्या दरम्यान उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, त्यानुसार संबधितांविरुद्ध कोणती कारवाई केली आहे, वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (1) नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती अलका देसाई : या प्रश्नाचे उत्तर इतके गोंधळाचे दिलेले आहे की, जणू काहीच झ ालेले नाही असे शासन दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. तसे नसेल तर त्या गावचे सरपंच श्री. शंतनु अत्राम यांना पोलिसांनी बाकीच्या लोकांना घेऊन येण्यास का सांगितले ? त्यामध्ये सुखदेव नरोरा, माधव अत्राम, सावजी यांना पोलीस स्टेशनमध्ये उचलून नेण्याचे कारण काय ? हे उचलून नेलेले लोक जर आरोपी नसतील तर त्यांच्यावरील गुन्हे काढून टाकण्यात येणार काय ? त्याचबरोबर नक्षलवाद्यांना जेवण व झाडे तोडण्यासाठी जे मदत करतात ते वस्तुस्थितीला धरुन असल्याचे निवेदन करुन प्रश्न उद्‌भवत नाही असे उत्तर विभागाकडून दिले जाते. मग अशा लोकांना नक्षलवादी ठरवून पोलिसांकडून नेहमी त्रास का होत आहे ? तसेच हा त्रास होणार नाही यासाठी शासन काय करणार आहे ?

श्री. रमेश बागवे : ही गोष्ट खरी आहे की, भिमपूर गावातील गावकऱ्यांवर खोटे आरोप करुन मारहाण होत असल्याचे सांगण्यात आले. त्या अनुषंगाने चौकशी केली असता विभागीय पोलीस अधिकारी धानोरा, जिल्हा पोलीस अधीक्षक गडचिरोली यांच्याकडे कुठलीही तक्रार प्राप्त झालेली नाही त्यानुसार हे उत्तर योग्य आहे.

....3....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 7545.........

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, पोलीसवाल्यांनीच अन्याय करायचा आणि त्यांनीच चौकशी करायची असा प्रकार या भागात सुरु आहे. यापूर्वी भामरागड भागातील लाहेरी येथे 17 पोलिसांना नक्षलवाद्यांनी मारले होते तरी देखील नक्षलवाद्यांना पकडण्यात शासनाला यश आले नाही. त्या गावातील लोकांना 17 ऑक्टोबर रोजी पकडले आणि त्याचा गुन्हा मात्र 1 नोव्हेंबरला गुन्हा दाखल केला. केवळ गुन्हा दाखल करायला 15 दिवस लागले. एवढे 15 दिवस ती व्यक्ती कोठे होती ? जेव्हा सापडली तेव्हा त्याच्या पाठीला प्रचंड मार लागलेला होता, पायाची बोटे फुटली होती......

यानंतर श्री. जुन्नरे ......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 7545....

श्रीमती शोभा फडणवीस .....

या गावातील 20 लोकांची गुन्हेगार म्हणून नोंद करण्यात आली. या ठिकाणी मी स्वत: गेले होते. शासन म्हणते की, या ठिकाणच्या लोकांवर अशा प्रकारे अन्याय होत नाही. परंतु आदिवासींवर पोलीस मोठया प्रमाणात खोटया केसेस नोंदवत असतात. पोलीस या गावामध्ये जात सुध्दा नाही उलट आदिवासींनाच पोलीस स्टेशनमध्ये बोलवतात. पोलीस नक्षलवादी एरियात जाण्यास घाबरत असतात. त्यामुळे या प्रकरणाच्या संदर्भात स्पेशल व्यक्तीकडून चौकशी करावी व त्यात आदिवासींवर खोटे गुन्हे दाखल केले असतील असे चौकशीत सिध्द झाले तर आपण आदिवासींचे गुन्हे वापस घेणार आहात काय ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, आदिवासींवर खोटया स्वरुपाचे गुन्हे दाखल झाले असतील तर दुस-या अधिका-यामार्फत चौकशी केली जाईल व त्या प्रमाणे योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आदिवासींवर पोलीस खोटे गुन्हे दाखल करीत असतात. मला असे विचारावयाचे आहे की, गेल्या 10 वर्षात आदिवासींना त्रास दिल्याच्या किती तक्रारी शासनास प्राप्त झालेल्या आहेत ?

श्री. रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाचा विस्तार मोठा असल्यामुळे सदर प्रश्नाची माहिती घेऊन सभागृहापुढे ठेवली जाईल.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**नेरपिंगळाई ते पिंगळादेवीगड रस्त्याचे बांधकाम**

**(७) * ७०८० प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्न क्रमांक २५८२ ला दिनांक ६ एप्रिल, २०१० रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**

सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरपिंगळाई ते पिंगळादेवीगड या रस्त्याच्या बांधकामासाठी ३.०२ हेक्टर वन जमिनीच्या हस्तांतरणास पर्यायी जमिनीवर वृक्ष लागवड व वनसंवर्धनाकरिता लागणाऱ्या १७.५१६ लक्ष रुपये रकमेचा भरणा वन विभागाकडे करण्यात आलेला असल्याने प्रत्यक्षात वनजमिनीचे हस्तांतरण होण्याच्या प्रश्नाची सद्यस्थिती काय आहे,

(२) वन विभागाची परवानगी प्राप्त झालेली असल्यास, ती केव्हा प्राप्त झालेली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. अब्दूल सत्तार, श्री.छगन भुजबळ यांच्या करिता :** (१),(२) व (३) वन जमिनीतून जाणाऱ्या रस्त्याच्या बांधकामाकरीता लागणाऱ्या पर्यायी वनजमीन ३.०२ हेक्टर हस्तांतरणाच्या प्रस्तावास केंद्र शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे. तथापि, अद्याप अंतिम मान्यता प्राप्त झाली नसल्याने वनजमिनीचे हस्तांतरण यंत्रणेस करण्यात आलेले नाही.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नेरपिंगळाई ते पिंगळादेवीगडा पर्यंतच्या रस्त्याच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. या ठिकाणचे देवस्थान शेकडो वर्षापूर्वीचे आहे. या ठिकाणच्या १५-२० हजार वस्तीच्या गावाला "नेरपिंगळाई" हे नाव शेकडो वर्षापूर्वी पडलेले आहे. हे गाव गोदावरी आणि तापीच्या खो-याच्या रिजचे सर्वात उंच ठिकाणी अमरावती जिल्हयात आहे. वर्धा प्रकल्पातून पाणी या ठिकाणी पंपिंगने आणावे लागते तसेच त्या ठिकाणी प्रेशर टँक बसवला आहे व ग्रॅव्हीटीने हे पाणी अमरावती पर्यंत येते. त्यावेळचे पर्यावरण मंत्री माननीय श्री. सुरेश प्रभू यांनी १९९६ मध्ये राज्याच्या त्या वेळच्या पर्यावरण मंत्र्यांना जे पत्र लिहिले होते त्यातील एक पत्र मी आपल्याला वाचून दाखवतो. "श्री. सुधाकर जोशी, नेरपिंगळाई तालुका-बोर्शी, जि. अमरावती यांनी नेरपिंगळाई ते पिंगळाईदेवी रस्त्याचे ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत निवेदन केले आहे. सदर

निवेदन





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. **७०८०....**

प्रा. बी.टी.देशमुख.....

आपल्याकडे पाठवित आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करावी ही विनंती." अमरावती पाणी पुरवठयाच्या कामानिमित्त मला अनेकदा या ठिकाणी जावे लागले होते. माझे काही विद्यार्थी मला त्या ठिकाणी भेटले व काही गोष्टी माझ्या निदर्शनास आणून दिल्या होत्या. २७ जून, २००७ रोजी या रस्त्यास प्रशासकीय मान्यता दिली गेली. या रस्त्यास पूर्ण प्रशासकीय मान्यता दिली गेली. त्यामध्ये २.८० कि.मी.चे खडीकरण व काही डांबरीकरण सुध्दा झाले. परंतु ३.०२ हा रस्ता वन विभागाचा आहे. या ३.०२ च्या रस्त्याला केंद्राने तत्वत: मान्यता दिलेली असून यासंदर्भातील पैसे सुध्दा राज्य शासनाने भरलेले आहे. या रस्त्यावर खर्च कमी झाला अशातला भाग नाही. या रस्त्याला प्रशासकीय मान्यता देऊन ३ वर्ष उलटून गेलेली आहेत. त्यामुळे कोणत्या अटीमुळे केंद्राने ही जमीन हँड ओव्हर केली नाही, याची माहिती मंत्री महोदयांनी कृपया द्यावी.

श्री. अब्दूल सत्तार : सभापती महोदय, या रस्त्याच्या संदर्भात आपल्या पीडब्ल्यूडी विभागाकडून वन खात्याला पैसे दिलेले आहेत. यामध्ये काही त्रुटी आढळून आल्या होत्या त्या सर्व त्रुटी दूर करुन सर्व माहिती वन खात्याला देण्यात आलेली आहे. एक महिन्याच्या आत... पहिली तत्वत: मान्यता मिळालेली आहे. ही मान्यता अंतिम टप्प्यात आहे. या रस्त्याच्या संदर्भात टेंडर व सर्व नियोजन झालेले आहे त्यामुळे हा रस्ता सहा महिन्याच्या आत पूर्ण होईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, सहा महिन्याच्या आत काय पूर्ण होईल हे माझ्या लक्षात आले नाही. एक महिन्याच्या आत वन विभागाची मान्यता मिळेल असे त्यांनी सांगितले आहे असे मला वाटते. आपल्या विभागाने सगळी प्रक्रिया करून पैसे भरून बरेच दिवस झाले आहेत. तेव्हा एक महिन्याच्या आत या कामाला वन विभागाची मान्यता येईल आणि सहा महिन्याच्या आत काम पूर्ण केले जाईल, असेच आपण सभागृहाला सांगितले आहे ना ?

श्री.अब्दुल सत्तार : होय.

.......

यानंतर श्री.भारवि....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे उद्‌गीर (ता.उद्‌गीर, जि.लातूर) येथील मातोश्री मीनाताई ठाकरे प्राथमिक आश्रमशाळेतील मुलीवर शिक्षकाने बलात्कार केल्याची घटना**

(8) * 7262 **ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, श्री.हेमंत टकले, ॲड.उषाताई दराडे, श्री.विक्रम काळे, श्री.सतीश चव्हाण, श्री.दिलीपराव सोनवणे, श्री.रमेश शेंडगे, श्री.अरुण गुजराथी, श्री.वसंतराव खोटरे** : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मौजे उद्‌गीर (ता.उद्‌गीर, जि.लातूर) येथील मातोश्री मीनाताई ठाकरे प्राथमिक आश्रमशाळेतील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या 10 वर्षीय मुलीवर त्याच शाळेतील शिक्षकाने दिनांक 7 फेब्रुवारी, 2010 रोजी बलात्कार केल्याची घटना, दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त घटनेबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर शिक्षकावर कोणती कडक कारवाई केली, वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रमेश बागवे, श्री.आर.आर.पाटील** : (1),(2), (3) व (4) फिर्यादी महिलेची पिडीत मुलगी उदगीरमधील आश्रम शाळेत शिकत असतांना तिच्यावरील अत्याचाराबाबत दिनांक 7.2.2010 रोजी घडलेल्या घटनेच्या अनुषंगाने सदर महिलेने दिनांक 26/4/2010 रोजी दिलेल्या तक्रारीनुसार पोलीस स्टेशन उदगीर येथे गु.र.नं. 61/2010, भा.द.वि.कलम-376 (2) (सी) (एफ) 366 (ए), 506 अन्वये गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्ह्यातील आरोपी शिक्षकास दिनांक 26/04/2010 रोजी अटक करण्यात आली. गुन्ह्याच्या तपासाअंती दिनांक 22-6-2010 रोजी दोषारोप पत्र क्र. 65/2010 अन्वये मा.प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, उदगीर यांच्या न्यायालयात दाखल केले असून त्याचा कोर्ट केस क्र. 149/2010 आहे. प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मातोश्री मीनाताई ठाकरे प्राथमिक आश्रमशाळेतील इयत्ता चौथीत शिकणाऱ्या 10 वर्षीय मुलीवर त्याच शाळेतील शिक्षकाने दिनांक 7 फेब्रुवारी, 2010 रोजी बलात्कार केल्याची घटना, दिनांक 23 एप्रिल, 2010 रोजी वा त्यासुमारास उघडकीस आली, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारण्यात आला असून आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे असे उत्तर देण्यात आले आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये आश्रमशाळा झाल्या आहेत. शासनाकडून अनुदान मिळते म्हणून आश्रमशाळा सुरू करण्याची स्पर्धा सुरू झालेली आहे. बहुतेक सर्व आश्रमशाळांमध्ये ज्या पद्धतीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7262

ॲड्.गुरूनाथ कुलकर्णी ......

आश्रमशाळेची देखभाल ठेवायला पाहिजे ती ठेवली जात नाही. शिक्षकवर्ग नीट काम करीत नाही. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे अन्न देखील मिळत नाही, त्यांची व्यवस्था देखील नीट केली जात नाही. आज राज्यातील सर्व आश्रमशाळांची अवस्था अत्यंत वाईट आहे. तेथील परिस्थिती चिंताजनक आहे. सदर घटना घडणे हे दुर्दैवी आहे. मध्यंतरी टी.व्ही.चॅनेलवर एक शिक्षक दारूची बाटली घेऊन बसल्याचे, हावभाव करीत असल्याचे दाखविण्यात आले.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

ॲड.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सदर दुर्दैवी घटना घडल्यानंतर आपण कारवाई केली आहे. त्यामुळे आज गुन्ह्याची काय परिस्थिती आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.गुरूनाथ कुलकर्णी यांनी सध्या गुन्ह्याची परिस्थिती काय आहे? असा प्रश्न विचारला आहे. या प्रकरणामध्ये ज्या शिक्षकाने गुन्हा केला आहे, त्याला अटक करण्यात आली आहे. तो चार दिवस रिमांडमध्ये होता. सध्या तो जेलमध्ये आहे. या आरोपीला, वसतिगृहाच्या अधीक्षकाला निलंबित करण्यात आले आहे. तसेच, मुख्याध्यापकांची वेतनवाढ रोखली आहे. दोन व्यक्तींवर कडक कारवाई करून निर्बंध घातले आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. शिक्षण विभाग आणि गृह विभाग यांचा टास्क फोर्स निर्माण करणे गरजेचे आहे. ज्या मुलीवर बलात्कार झाला त्या मुलीची शाळा बंद झाली असणार. आतापर्यंत जेवढ्या म्हणून अशा प्रकारच्या घटना घडल्या आहेत त्या सर्व मुलींच्या शाळा बंद झालेल्या आहेत. या पीडित मुलीला दुसऱ्या शाळेत प्रवेश मिळवून देण्याचा प्रयत्न शिक्षणाधिकारी करणार नाहीत. ते चुकीचे आहे. पोलीस अधिकारी सुद्धा तसा प्रयत्न करणार नाही. कारण ते फक्त तांत्रिक बाजू सांभाळतात. ज्या ज्या शाळांमध्ये मुलींवर शिक्षकांनी बलात्कार करण्याच्या घटना घडल्या आहेत त्या मुलींना दुसऱ्या शाळेमध्ये प्रवेश मिळवून देण्यासंबंधी पोलिसांचा तपास अधिकारी आणि शिक्षण विभागाचा शिक्षणधिंकारी या दोघांचा मिळून टास्कफोर्स राज्य स्तरावर स्थापन करण्यासंबंधी पाठपुरावा करण्यात येईल काय ? अनेक वेळा शिक्षक असे वर्तन करतात हे मुख्याध्यापक व पर्यवेक्षकांना माहिती असून देखील ते त्याकडे कानाडोळा करतात.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7262..

डॉ.नीलम गोऱ्हे..

यापूर्वी अशाप्रकारच्या तक्रारी केल्यानंतरही त्याकडे मुख्याध्यापकांनी व अधीक्षकांनी दुर्लक्ष केले त्यांना दोषी ठरविण्याबाबत सरकार कोणती पावले उचलणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे उत्तर अगोदर दिलेले आहे. या प्रकरणी मुख्याध्यापकांवर कारवाई केलेली आहे. वसतिगृहाच्या अधीक्षकांना निलंबित केलेले आहे. पीडित मुलीचे समाज कल्याण विभागामार्फत पुनर्वसन करण्यात येते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या संदर्भात निवृत्त न्यायाधीश न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आली होती. त्या समितीने काही सूचना केल्या आहेत काय ? आज अनेक ठिकाणी आश्रमशाळांतील मुलींवर अत्याचार होत आहेत. तेव्हा या संदर्भात कायदा होणे आवश्यक आहे. तेव्हा न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी यांच्या समितीने कोणत्या सूचना केलेल्या आहेत याची माहिती मंत्रिमहोदय देतील काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, दिनांक 9 जुलै, 2010 रोजी समिती गठीत करण्यात आली. या संदर्भात काही सन्माननीय सदस्यांनी अशा भावना व्यक्त केल्या की, या समितीवर महिला सदस्यांचा देखील समावेश असावा. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असून समितीवर महिला सदस्यांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने एक महिन्यात आपल्यापुढे प्रस्ताव ठेवण्यात येईल.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, ज्या मुलीवर अत्याचार होतो तिचे पुनर्वसन करण्यात येते काय ? पीडित मुलगी आता शाळेत जाते काय ? नसल्यास तिला कोणत्या शाळेत प्रवेश देणार आहात ? सदर प्रकरणातील आरोपीची जामिनावर सुटका न होण्यासाठी कोणती खबरदारी घेण्यात येत आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सदर प्रकरणातील आरोपी जेलमध्ये आहे. मुलीला तिच्या मर्जीप्रमाणे कोणत्याही शाळेत प्रवेश देण्यात येईल. तसेच समाज कल्याण विभागामार्फत त्या मुलीचे पुनर्वसन केले जाईल. आता ती मुलगी आईवडिलांच्या घरी आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.7262..

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, त्या मुलीला कोणत्या शाळेत प्रवेश दिला जाणार आहे ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, मुलीच्या आणि आईवडिलांच्या इच्छेप्रमाणे कोणत्याही शाळेत प्रवेश दिला जाईल.

**सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: शोक प्रस्ताव

**मु.शी.**: श्री.नवनाथ आव्हाड, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.छगन भुजबळ (उपमुख्यमंत्री): सभापती महोदय, श्री.नवनाथ आव्हाड, माजी वि.प.स. यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री.नवनाथ आव्हाड, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. नवनाथ भाऊराव आव्हाड यांचा जन्म 15 फेब्रुवारी 1950 रोजी बीड जिल्ह्यातील, आष्टी तालुक्यात आरण विहीरा येथे झाला. त्यांचे शिक्षण बी.ए. पर्यंत झाले होते.

कै. आव्हाड यांनी भारतीय जनता पक्षाचे चिटणीस व भारतीय जनता पक्षाच्या भटके, विमुक्त आघाडीचे प्रभारी म्हणून कार्य केले. वसंतराव नाईक भटक्या, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी कार्य केले.

कै. आव्हाड यांनी विवेकानंद व चाणक्य शिक्षण संस्थेचे अध्यक्ष, गो-विज्ञान संस्थेचे कार्यवाह, बहुजन महासंघाचे संस्थापक व महासचिव, भटके विमुक्त समिती महाराष्ट्र प्रदेशचे सदस्य, ऊस तोडणी कामगार संघटनेचे संघटक, भगवान सेना, माधवसेना व लोकमंगल प्रतिष्ठान या संस्थांचे अध्यक्ष म्हणून कार्य केले.

कै. आव्हाड 2004 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारे विधानपरिषदेवर निर्वाचित झाले होते. 2008 पर्यंत या सभागृहाचे ते सदस्य होते.

अशा या समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 19 जुलै 2010 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, कै.नवनाथ भाऊराव आव्हाड,माजी वि.प.स.यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी जो शोक प्रस्ताव मांडला आहे, त्याबद्दल माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै.नवनाथ भाऊराव आव्हाड हे भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी होते. ते भटक्या व विमुक्त समाजाच्या चळवळीतील एक तरुण कार्यकर्ते होते. भटक्या व विमुक्त समाजासाठी ते काम करणारे एक चांगले कार्यकर्ते होते. त्यांचा आणि माझा अत्यंत जवळचा सबंध होता. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश शाखेचा मी जेव्हा अध्यक्ष होतो, तेव्हा ते देखील आमच्या टीममध्ये पदाधिकारी म्हणून काम करीत होते. महाराष्ट्राच्या अनेक जिल्हयांमध्ये त्यांनी माझ या बरोबर प्रवास केला होता. मी सुरुवातीलाच सांगितल्याप्रमाणे, भटक्या व विमुक्त समाजाच्या चळवळीत काम करणारे ते कार्यकर्ते होते. भारतीय जनता पक्षाच्या महाराष्ट्र प्रदेश शाखेचे ते सरचिटणीस होते त्याचबरोबर विमुक्त व भटक्या समाजासाठी भारतीय जनता पक्षाचा जो सेल आहे, त्या सेलचे ते अध्यक्षसुध्दा होते. या समाजातील व्यक्तीला प्रतिनिधित्व द्यावे या उद्देशाने विधानसभा सदस्याव्दारे विधान परिषदेमध्ये 2004 साली ते निवडून आले होते. या सभागृहाचे सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर शपथविधीसाठी ते उपस्थित झाले होते आणि शपथविधीचा कार्यक्रम झाल्यानतर अधिवेशन संपले म्हणून पुणे येथे देवीसमोर आरती करण्याकरिता त्यांना बोलाविण्यात आले होते. त्यावेळी आरती करीत असतांना धूप नाकावाटे त्यांच्या शरीरामध्ये गेला आणि त्यांना सफोकेशन झाले. त्यामुळे ते ताबडतोब त्या ठिकाणाहून घरी गेले. त्यावेळी त्यांना हार्ट अटॅक आला होता. म्हणून त्यांना ताबडतोब मंगेशकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यावेळी डॉक्टरांनी प्रयत्न करुन त्यांचे हार्ट सुरु केले मात्र त्यांचे ब्रेन डेड झाले होते. डॉक्टरांनी प्रयत्न करुन त्यांचा जीव वाचवला होता. परंतु जीवंत असूनही मृत व्यक्तीसारखी त्यांची अवस्था होती. त्यावेळी डॉक्टरांनी असे सागितले की आम्ही प्रयत्न करुन त्यांचा जीव वाचवला आहे परंतु त्यांचा ब्रेन डेड झाला असल्यामुळे हा ब्रेन सक्रिय होण्यासाठी जगाच्या पाठीवर असा कोणताही उपाय नाही. त्यांचा ब्रेन सक्रिय करण्यासाठी डॉक्टरांनीसुध्दा हात टेकले होते. त्यामुळे काही दिवस हॉस्पिटलमध्ये आणि काही दिवस घरी अशा प्रकारे जवळजवळ चार वर्षे ते जगले. त्यांच्या

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर ......

निधनामुळे आमच्या पक्षाचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. परंतु सभागृहामध्ये सुध्दा ते पूर्णवेळ कामकाज करु शकले नाही. सभापती महोदय, या सभागृहात येण्यासाठी भाग्य लागते. परमेश्वराने त्यांना या सभागृहात येण्याचे भाग्य एका हाताने दिले आणि दुस-या हाताने हे भाग्य काढूनही घेतले होते.

सभापती महोदय, त्यांचे वय फार नव्हते. 1950 साली त्यांचा जन्म झाला होता असा उल्लेख शोक प्रस्तावात करण्यात आलेला आहे. अत्यंत कमी वयामध्ये त्यांनी विविध स्तरावर काम केले होते. इतकेच नव्हे तर समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता . भटक्या आणि विमुक्त समाजाला न्याय मिळाला पाहिजे याचा ध्यास त्यानी घेतला होता. या समाजाच्या चळवळीमध्ये ते सतत अग्रेसर राहत असत. तसेच शासनाच्या माध्यमातून आणि पक्ष्ांच्या माध्यमातून या समाजाला न्याय देण्याचा त्यांनी सातत्याने प्रयत्न केले होते. अशा प्रकारे आमच्या पक्षातील एका हाडाच्या कार्यकर्त्याचे दुःखद निधन झाल्यामुळे, आम्हाला निश्चितपणे दुःख झाले आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....

आणि म्हणून माझ्या पक्षाच्या वतीने त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो. तसेच, सभापती महोदय, अशाप्रकारचे दु:ख किंवा अशाप्रकारचे दुर्दैवी मरण कुणाच्याही नशिबी येऊ नये अशी भावना व्यक्त करुन माझे वक्तव्य संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, कै. नवनाथ आव्हाड, माजी वि.प.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ यांनी मांडलेल्या शोकप्रस्तावावर माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी म्हणून कार्यरत असतांना इथून-तिथून आमच्या कानावर कै. नवनाथ आव्हाड यांचे नाव यायचे. भटक्या विमुक्त अशा वंचित समाजासाठी ते कार्य करीत होते. या समाजाला आपल्या पक्षाबरोबर जोडण्यासाठी त्यांनी अविरत काम केले. त्याचप्रमाणे ऊस तोडणी करणाऱ्या कामगारांच्या संघटनेमध्ये कार्यरत राहून त्यांनी महत्वाचे काम केले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ऊस तोडणी कामगारांसाठी ते नेहमी सक्रिय असत. पहिल्या अधिवेशनामध्ये आपला शपथविधी झाल्यानंतर ते या सभागृहामध्ये उपस्थित होते. त्यानंतर कै. नवनाथ आव्हाड आम्हाला दिसले नाहीत.दुर्दैव असे की, ते एका आरतीला गेले काय आणि त्याठिक्‍ाणी त्यांना सफोकेशन झाले काय, त्यानंतर ते ब्रेनडेड या आजारामध्ये चार वर्षे होते. याठिकाणी एक गोष्ट खेदाने नमूद करावीशी वाटते की, ते हयात होते परंतु आपल्यामध्ये नव्हते. आमदार असून ते आमदार नव्हते. या सभागृहाचे एक सदस्य आमदार आहेत, परंतु ते आमदारपदी कार्यरत नाहीत असे माननीय माजी सदस्या श्रीमती मधू जैन त्यांच्या जागेवर निवडून आल्यानंतर आपल्या लक्षात आले. सभापती महोदय, या सदनामध्ये अमुक एक सदस्य सतत गैरहजर राहिल्यानंतर त्याचे सदस्यत्व बाद होते, त्यामुळे कधी कधी आपले मन थिजून जाते. या सदनातील अनेक माननीय सदस्यांना माहीत आहे की, या सदनातील काही माननीय सदस्य हे पाच-सहा वर्षामध्ये कधीतरी येतात, सह्या करतात आणि जातात. त्यांचे दर्शन कधीतरी होते. एकदा सभागृहामध्ये शपथ घेतल्यानंतर ते पाच वर्षे दिसत नाहीत, परंतु ते सदस्य असतात, तांत्रिकदृष्ट्या त्यांचा सहा वर्षाचा कालावधी पूर्ण होतो. परंतु याठिकाणी कै. नवनाथ आव्हाड यांना सभागृहामध्ये उपस्थित रहाता आले नाही म्हणून त्यांचे सदस्यत्व बाद झाले. त्यामुळे ते आमदार होतेही आणि नव्हतेही, या जगामध्ये असून नसल्यासारखे होते, ते पूर्णपणे निस्तेज होते. आज ते आपल्यामध्ये नाहीत. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी त्यांच्या आत्म्यास सदगती लाभो अशी माझ्या पक्षाच्या वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.धन्यवाद.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी कै. नवनाथ आव्हाड यांच्या दु:ख निधनाबद्दल मांडलेल्या शोकप्रस्तावावर सद्‌भावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

आता माननीय विरोधी पक्षनेत्यांनी म्हटल्याप्रमाणे तसेच माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे सभागृहामध्ये येण्यापूर्वी त्यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये काम केले होते. भटक्या विमुक्त जातीसाठी काम केले होते. मागासलेल्या वर्गाच्या विकासासाठी काम करीत असतांना ते आपल्या पक्षाच्या माध्यमातून या सभागृहामध्ये आले. अशाप्रकारचे सदस्यत्व कुणालाही मिळू नये असे याठिकाणी सांगण्यात आले. ते या सभागृहामध्ये आल्याबरोबर त्यांच्यावर जी नैसर्गिक आपत्ती म्हणा, किंवा शारीरिक व्याधी आली, त्यामुळे या सभागृहामध्ये शपथ घेतल्यानंतर त्यांना काम करण्याची संधी मिळू शकली नाही. त्यामुळे त्यांच्या बाबतीत निरनिराळया पध्दतीने नवा इतिहास समोर आला हे अत्यंत दुर्दैव आहे. त्यांचे वय देखील फार नव्हते. ते सभागृहामध्ये आले त्यावेळी त्यांचे वय 50 ते 55 च्या जवळपास असेल. या वयाचा विचार करता या सभागृहामध्ये आल्यानंतर सुध्दा काम करण्यास संधी न मिळणे अशाप्रकारचे दुर्मीळ व दु:खद उदाहरण आहे. त्यांच्या दु:खद निधनाबद्दल मी मनापासून शोकभावना व्यक्त करतो.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते माननीय श्री. छगन भुजबळ साहेबांनी कै. नवनाथ आव्हाड यांच्या दु:खद निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आहे.त्यावर माझ्या सदभावना व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कै. नवनाथ आव्हाड यांनी सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर त्या अधिवेशनामधील काही दिवस ते सभागृहात उपस्थित होते. त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी सांगितल्याप्रमाणे अचानकपणे त्यांना अत्यंत गंभीर आजाराला सामोरे जावे लागले.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

त्यामुळे दुर्दैवाने ते या सभागृहामध्ये उपस्थित राहू शकत नव्हते. रुग्णालयामध्ये असतांनाच ते कोमामध्ये गेले. त्यांची संपूर्ण शुध्द हरपलेली होती. त्या ठिकाणी त्यांचे फक्त शरीर होते त्यांना कुठल्याही प्रकारच्या संवेदना नव्हत्या. ते कोमामध्येच होते. या सभागृहाच्या नियमाप्रमाणे एखादा सन्माननीय सदस्य कुठल्याही प्रकारची माहिती न देता गैरहजर राहिला तर दुर्दैवाने त्यांचे सभासदत्व रद्द करण्यात यावे अशा प्रकारची तरतूद कायद्यामध्ये असल्यामुळे त्यांच्या संदर्भात याच सभागृहामध्ये एक ठराव आलेला होता. माननीय श्री. विलासराव देशमुख हे त्यावेळी या राज्याचे मुख्यमंत्री होते. दुर्दैवाने तो ठराव मांडण्याची जबाबदारी माझ्याकडे आलेली होती. त्यावेळी माननीय विरोध पक्ष नेत्यांनी असे सांगितले होते की, हा अत्यंत निर्दयी अशा प्रकारचा निर्णय या ठिकाणी आपण घेत आहोत. ते सभासद आहेत याचे त्यांना भानही नव्हते आणि अशा परिस्थितीमध्ये ते सभागृहात येत नव्हते, ते गैरहजर होते या एकमेव कारणास्तव त्यांचे सभासदत्व रद्द करावे लागले त्यामुळे रिक्त झालेल्या जागेच्या संदर्भात त्याठिकाणी झालेल्या पोट निवडणुकीमध्ये श्रीमती मधु जैन या निवडून आल्या होत्या. सभापती महोदय, कै. नवनाथ आव्हाड हे गेले चार वर्षे मृत्युशी झुंज देत होते. दुर्दैवाने त्यांचे निधन झालेले आहे. मी माझ्या तर्फे आणि माझ्या पक्षाच्या वतीने कै. नवनाथ आव्हाड यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ SBT/

श्री. धनंजय मुंडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय श्री. भुजबळ यांनी कै. नवनाथ आव्हाड यांच्या दु:खद निधनाबद्दलचा शोक प्रस्ताव या सभागृहात मांडलेला आहे.

सभापती महोदय, एका गरीब कुटुंबात जन्माला येऊन त्यांना या सभागृहापर्यंत येता आले. मला आठवते की, सन 2004 ला विधानसभेच्या सदस्यांद्वारा कै. आव्हाड हे विधानपरिषदेवर निवडून आले. योगायोगाने ज्या दिवशी ते या सभागृहात शपथ घ्यायला आले त्या दिवशी मी सुध्दा त्यांच्या सोबत या सभागृहापर्यत आलो होतो. ते त्यावेळी खूप आनंदी होते त्याचे कारण ते माननीय आमदार झाले होते हे नव्हते तर त्याचे कारण असे होते की, त्यांनी मागच्या काळात भटक्या, विमुक्तासाठी, ऊसतोड कामगारांसाठी संघर्ष केला होता, त्यातल्या त्यात बीड आणि नगर जिल्हयामध्ये सर्वसामन्य माणसाच्या उत्कर्षासाठी त्यांनी जे प्रयत्न केले त्या प्रयत्नामध्ये आमदार

झाल्यानंतर भर पडेल. या सभागृहामध्ये मी ऊसतोड कामगारांचे प्रश्न मांडीन या सभागृहामध्ये भटक्या, विमुक्तांच्या प्रश्नासंबंधी झगडेन, अशी भावना त्यांच्या मनामध्ये होती. परंतु काही दिवसातच एक घटना घडली आणि त्यामुळे त्यांना पुन्हा या सभागृहात येता आले नाही. खरे म्हणजे ते देवीच्या आरतीला गेले होते. त्या धुरामुळे त्यांना थोडा त्रास झाला. त्यानां दम्याचा त्रास होता. त्यातून पुन्हा त्यांना हार्टअटॅक आला त्यामुळे ते रुग्णालयात ॲडमिट झाले. त्यानंतर पुन्हा ते या सभागृहात येऊच शकले नाहीत. भटक्या, विमुक्त महामंडळाचे अध्यक्ष असतांना त्यांनी जे काम या भटक्या, विमुक्तांसाठी केलेले आहे. ते काम खऱ्या अर्थाने मला असे वाटते की, या महाराष्ट्रात भटक्या,विमुक्तांच्या मनामध्ये कोरले गेलेले आहे. ऊसतोड कामगारांसाठी त्यांनी केलेले काम त्यांच्या मनामध्ये कोरले गेलेले आहे. म्हणून मी या ठिकाणी कै. नवनाथ आव्हाड यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो. धन्यवाद.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे ( नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, सभागृहाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री यांनी माजी विधान परिषद सदस्य श्री. नवनाथ भाऊराव आव्हाड यांच्या दु:खद निधनाबद्दल जो शोक प्रस्ताव मांडलेला आहे त्याबाबत माझ्या भावना व्यक्त करण्यासाठी व श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी मी उभा आहे. श्री. नवनाथ आव्हाड यांचे नेतृत्व एका शेतकरी परिवारातून, वंचित समाजातून उदयाला आले. राजकीय वारसा नसताना अतिशय संघर्ष करुन, परिस्थितीशी झगडून त्यांनी आपले नेतृत्व प्रस्थापित केले होते. सातत्याने समाजातील उपेक्षित आणि वंचित लोकांसाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. विशेषत: ऊसतोड कामगारांसाठी त्यांनी केलेले कार्य अतिशय उल्लेखनीय आहे. या सभागृहाचे सदस्य होऊनही त्यांना या सभागृहाचा आपल्या राजकीय संघर्षासाठी उपयोग करता आला नाही, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. त्यांचे एका दुर्धर अशा आजाराने निधन झाले. त्यांना मी माझी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

अॅड. उषा दराडे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, कै. नवनाथ आव्हाड यांना श्रध्दांजली वाहण्यासाठी मी उभी आहे. सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी सांगितल्याप्रमाणे साध्या शेतकरी कुटुंबातून विधान परिषदेपर्यंत येण्याचा त्यांचा प्रवास संघर्षमय होता. बीड जिल्ह्याने आणि अहमदनगर जिल्ह्याने त्यांचे काम जवळून पाहिलेले आहे. राजकीय पक्षाच्या भिंती तोडून सर्व राजकीय पक्षांशी चांगली जवळीक निर्माण करण्याची, त्यांच्याशी चांगले संबंध ठेवण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी होती. बीड जिल्हा हा ऊसतोड कामगार पुरविणारा जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यांच्या संदर्भात त्यांनी केलेले काम उल्लेखनीय होते. त्यांचा मृत्यू हा अत्यंत धक्का देणारा, दु:ख देणारा होता. कोणालाही एवढ्या वाईट पध्दतीने मृत्यू येऊ नये. ते अनेक वर्षे मृत्यूशय्येवर पडून मरणाची वाट बघत होते. "ये ये मरणा ये, मज वाटे मरणाचे भय" या काव्याची आठवण व्हावी असा मृत्यू त्यांच्या वाट्याला आला. कोणाच्याही वाट्याला असा दु:खद प्रसंग येऊ नये अशा प्रकारची भावना मी व्यक्त करते. त्यांच्या कुटुंबियांच्या दु:खामध्ये मी सहभागी आहे. त्यांच्या कुटुंबियांना हे दु:ख पेलण्याची शक्ती मिळो अशा प्रकारची भावना व्यक्त करुन मी भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करते.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**सभापती** : सदनाचे नेते माननीय उपमुख्यमंत्री श्री. छगन भुजबळ यांनी जो शोक प्रस्ताव सभागृहासमोर मांडलेला आहे त्या अनुषंगाने स्व. नवनाथ भाऊराव आव्हाड, माजी विधान परिषद सदस्य यांच्या बाबतीत मी माझ्या भावना या ठिकाणी व्यक्त करतो. स्व. नवनाथ भाऊराव आव्हाड यांचा जन्म बीड जिल्ह्यामध्ये 15 फेब्रुवारी, 1950 रोजी आष्टी तालुक्यात झाला. स्व. आव्हाड यांनी भारतीय जनता पक्षाचे चिटणीस आणि भारतीय जनता पक्षाच्या भटके, विमुक्त आघाडीचे प्रभारी म्हणून आयुष्यभर कार्य केले. वसंतराव नाईक भटक्या, विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट कार्य केले. स्व. आव्हाड 2004 मध्ये महाराष्ट्र विधानसभा सदस्यांव्दारे विधान परिषदेवर निर्वाचित झाले होते. 2008 पर्यंत या सभागृहाचे ते सदस्य होते. त्यांनी या सदनामध्ये गुप्ततेची शपथ घेतल्यानंतर दुर्दैवाने एका गंभीर आजाराने ते आजारी पडले. त्यांच्या कुटुंबियांनी, त्यांच्या पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांनी तसेच अन्य सर्व सहकाऱ्यांनी त्यांना वाचविण्याचे अतोनात प्रयत्न केले, ही वस्तुस्थिती आहे. दुर्दैवाने ते कोमामध्ये गेले. शेवटपर्यंत ते बोलू शकले नाहीत. अशा या समाजसेवकाचे सोमवार, दिनांक 19 जुलै, 2010 रोजी निधन झालेले आहे. त्यांना मी श्रध्दांजली अर्पण करतो. सन्माननीय सदस्यांनी दोन मिनिटे उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

( सदस्य उभे राहतात )

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकूल कुटुंबियांकडे पाठविण्यात येईल.

सभागृहाची बैठक मी 10 मिनिटांकरिता स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक दुपारी 1.45 ते 1.55 पर्यंत स्थगित झाली. )

------

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

**स्थगितीनंतर**

**सभापतीस्थानी माननीय उपसभापती**

**पृ.शी./मु.शी.**: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादितचा सन 2008-2009चा चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : चौथा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

--

श्री. पद्माकर वळवी (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने धातू (लोखंड व पोलाद वगळून) आणि कागद बाजार व दुकाने माथाडी कामगार मंडळाचा दिनांक 1 एप्रिल 2005 ते 31 मार्च 2006, दिनांक 1 एप्रिल 2006 ते 31 मार्च 2007 व दिनांक 1 एप्रिल 2007 ते 31 मार्च 2008चा अनुक्रमे तेहेतिसावा, चौतिसावा व पस्तिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, काही माथाडी मंडळाचे अहवाल 10-10 वर्षे सभागृहाला सादर केले जात नाहीत. जळगाव जिल्हा माथाडी कामगार मंडळाचा सन 2001-2002चा वार्षिक अहवाल परवा सभागृहाला सादर करण्यात आला. हे अहवाल वेळेत सादर करण्यासंबंधी आपण वारंवार या सभागृहामध्ये निर्देश दिलेले आहेत. तेव्हा विविध मंडळांचे अहवाल वेळच्या वेळी सादर करण्यासंबंधी आपण पुनश्च निर्देश द्यावेत अशी माझी आपणास विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, भगवान साळुंखे, विनोद तावडे व संजय केळकर यांनी "शिक्षण विभागातील उच्च माध्यमिक शिक्षकांचे पायाभूत पेक्षा वाढीव पदांचे 2005 ते 2008 या वर्षाचे 759 पदांचे प्रस्ताव तसेच गणित व संख्याशास्त्र या विषयांसाठीचे 1337 वाढीव पदांचे प्रस्तावही शासनाकडे प्रलंबित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांनी "श्रीगोंदा (जिल्हा अहमदनगर) कृषी उत्पन्न बाजार समितीचे चेअरमन प्रवीण उर्फ बाळासाहेब बन्सीलाल नाहटा यांच्याकडे 30 बनावट शिक्के आढळून आल्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने दिनांक 20 जुलै, 2010 रोजी अटक केल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी "ठाणे महानगरपालिकेच्या हद्दीतील कळवा-मुंब्रा परिसरामध्ये दररोज 12 ते 14 तास लोड शेडींग असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी "मौजे परखंदे (ता. खालापूर, जि. रायगड) येथील गावठाणाच्या भौगोलिक परिस्थितीनुसार भवानीवाडी येथील विस्तारित वस्तीमध्ये राहाणा-या ग्रामस्थांबरोरच प्रकल्पबाधीत ग्रामस्थांनी पिण्याचे पाणी मिळण्यासाठी केलेल्या विनंतीकडे स्थानिक कार्यालयाकडून अक्षम्य दुर्लक्ष होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी " बुलढाणा जिल्ह्याचे अपर जिल्हाधिकारी श्री. किशोर कामुने यांनी लिपिक टंकलेखक भरती प्रक्रियेत गैरव्यवहार केल्याबाबत परीक्षेस बसलेल्या उमेदवारांनी तक्रारी दाखल केल्याबाबत " या विषयावर

..3..



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:55

उपसभापती....

नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर व जगदीश गुप्ता यांनी "नवी मुंबईत सिडको प्रशासनाने स्थानिक प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के दराने मोबदला दिलेला नसतानाही काही मोठ्या विकासकांनी गैरमार्गाने प्रकल्पग्रस्तांच्या मध्यस्थीने मोक्याच्या ठिकाणचे भूखंड बळकावल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री व्ही. यू. डायगव्हाणे व जयंत प्र. पाटील यांनी "शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, वर्धा येथील 17 मागास व इतर मागासवर्गीय कर्मचा-यांच्या सन 2009-2010 च्या गोपनीय अहवालात प्राचार्यांच्या संगनमताने माननीय सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, नागपूर यांनी दिनांक 26 जून 2010च्या पत्राद्वारे प्रतिकूल शेरे नोंदविल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, गोपीकिसन बाजोरिया यांनी "शासनाने कृषी संचालक, गुणवत्ता, नियंत्रण व निविष्ठा यांचे बियाणे खते, औषधे व कापूस बियाणे परवाना वगळता परवाना अधिकारी म्हणून अधिकार कमी करुन कृषी आयुक्तांनी स्वत:कडे ठेवल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, रामनाथ मोते, संजय केळकर व चंद्रकांत पाटील यांनी "मुंबई महानगरपालिकेच्या एल प्रभागाच्या अंतर्गत येणा-या अंधेरी आकुर्ली रोडवरील काजूपाडा पाईप लाईन येथील भारत कोल कम्पाऊंड परिसरात सुमारे दहा हजार चौरस फुटाचे अनधिकृत बांधकाम केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...नंतर श्री. भोगले....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती**......

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "मेहकर, जि.बुलढाणा येथे सन 1997 मध्ये अतिरिक्त सत्र न्यायालय व दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर मंजूर होऊन न्यायालये अद्याप सुरु न होण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "खामगांव शहरातील बाळापूर नाका ते एमआयडीसी पर्यंतच्या 10 कि.मी.रस्त्याचे चौपदरीकरणाचे काम ईगल कन्स्ट्रक्शन कंपनीने निकृष्ट दर्जाचे केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

आज प्राप्त झालेल्या इतर सर्व सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

---

**नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक-1 व 2 संबंधी**

**उपसभापती** : आता नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक-1 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : ठीक आहे. संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय उपस्थित होईपर्यंत निवेदन क्रमांक-2 चर्चेला घेण्यात येत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, खालचे सभागृह स्थगित झालेले आहे. या सभागृहाचे कामकाज ठरल्याप्रमाणे होत आहे. असे असताना निवेदनाशी संबंधित असलेल्या विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित का झालेले नाहीत?

**उपसभापती** : मंत्रीमहोदयांना ताबडतोब सभागृहात येण्याबाबत कळविण्यात आले आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सभागृहात सात मंत्रीमहोदय उपस्थित आहेत.

श्री.दिवाकर रावते : ते वांझोटे ठरतात हे आपण प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अनुभवले आहे.

श्री.सुभाष झनक : सभापती महोदय, 'वांझोटे' हा शब्द रेकॉर्डवरुन वगळण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : वांझोटे ठरतात असे मी म्हटले आहे. तुम्ही उभे रहा आणि सामुदायिक जबाबदारी घ्या. वांझोटे हा शब्द असंसदीय नाही. शुचिर्भूत शब्द सुचवू का?

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, निवेदन क्रमांक-2 संबंधीच्या प्रश्नाला उत्तर कोण देणार आहे?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय,सभागृहाची बैठक पाच मिनिटाकरिता तहकूब करावी.

श्री.रामदास कदम : निवेदन क्रमांक-2 शी संबंधित विभागाचे मंत्रीमहोदय सभागृहात उपस्थित नाहीत, त्यामुळे सभागृहाची बैठक दहा मिनिटाकरिता तहकूब करावी. मंत्रीमहोदयांच्या पध्दतीप्रमाणे सभागृहाचे कामकाज चालणार आहे का?

**उपसभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.03 ते 2.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------------

नंतर 2ओ.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( स्थगिती नंतर )

( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )

**पृ. शी.** : वाशिम शहराचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु असताना विशिष्ट लोकांनी गैरमार्गाने मंजूर केलेले प्रस्ताव रद्द करणे

**मु. शी.** : वाशिम शहराचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु असताना विशिष्ट लोकांनी गैरमार्गाने मंजूर केलेले प्रस्ताव रद्द करणे याबाबत श्री गोपीकिसन बाजोरिया, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.अशोक चव्हाण ( मुख्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री. गोपीकिसन बाजोरिया यांनी "वाशिम शहराचा आराखडा तयार करण्याचे काम सुरु असताना विशिष्ट लोकांनी गैरमार्गाने मंजूर केलेले प्रस्ताव रद्द करणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : महोदय, वाशिम शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाने चार वर्षापूर्वी चांगला निर्णय घेतला होता. जवळपास 100 हेक्टर जागेचा सर्वकष प्लॅन तयार करण्याचा निर्णय शासनाने घेतला होता त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदनही केले होते. परंतु एमआरटीपी ॲक्ट, 1966 च्या कलम 162 नुसार निर्णय घेऊन चांगला प्लॅन तयार केला व तो शासनाने रद्द केला. मध्यंतरी एमआरटीपी ॲक्टच्या कलम 37 (1)(अ) प्रमाणे विशिष्ट लोकांनी काही ािाग गैरमार्गाने मंजूर करुन घेण्याची कारवा चालू केली आहे. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदात शासनाने असे म्हटले आहे की, वाशिम शहराच्या सुधारित विकास योजनेतील कलम 37 खालील फेरबदल प्रस्ताव शासनाने मंजूर केले आहेत. सदर फेरबदल प्रस्ताव कलम 37 खालील वैधानिक कार्यवाही नियमाप्रमाणे पार पाडून करण्यात आलेले असल्याने रद्द करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. नियमानुसार यासाठी वैधानिक कार्यवाही करताना 30 दिवसांची प्रसिध्दी देणे आवश्यक असते परंतु त्याला वाईडली प्रसिध्दी देण्याची गरज असताना एमआरटीपी ॲक्ट, 1966 च्या कलम 37 नुसार ही कार्यवाही केलेली आहे. अशा प्रकारे ही प्रसिध्दी वाईडली सर्क्युलट न करता पूर्ण प्लॅन रद्द करुन काही विशिष्ट लोकांनी कलम 37 (1)(ए) नुसार गैरमार्गाने कारवाई केली व त्यासाठी ठराविक पेपरमध्येच प्रसिध्दी दिली असून ते सर्व प्लॉट खरेदी करुन घेतले आहेत. अशा प्रकारची वाईडली प्रसिध्दी न दिल्यामुळे लोकांना त्याची माहिती मिळालीच नाही. म्हणून माझ ाा प्रश्न असा आहे की, एमआरटीपी ॲक्टच्या कलम 37 (1) नुसार वैधानिक कारवाई न करता छोट्या पेपरमध्ये प्रसिध्दी दिली अशा प्रकरणांची चौकशी शासन करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, शहराचा विकास आराखडा दर 20 वर्षांनी रिव्हाईज होत असतो. वाशिम शहराची सुधारित विकास योजना सन 1992 ला सुरुवातीला देण्यात आली परंतु सन 1998 मध्ये वाशिम जिल्ह्याची निर्मिती झाली. मला वाटते या विषयावर यापूर्वी चर्चा करीत असताना अर्थसंकल्पीय अधिवेशनात माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर सुध्दा दिलेले आहे. याबाबतचा सर्वंकष आराखडा तयार झाल्यानंतरच पुढील प्रस्ताव मंजूर करण्यात येतील. अशा प्रकारे पिसमिल प्रस्ताव करीत राहिलो तर सारखे नियम 37 (1) अन्वये प्रस्ताव शासनाकडे येतील म्हणून एकच प्रस्ताव पाठवावा असे अपेक्षित असते. यासाठी एमआरटीपी ॲक्टच्या कलम 162 नुसार सन 2005 मध्येच सह संचालक, नगररचना यांची नेमणूक झालेली आहे. नंतर अधिकाऱ्यांनी दि.

....3....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण........

16.5.2006 ला प्रस्ताव सादर केला आहे. अशा प्रकारे एकंदरित या सर्व गोष्टींचा विचार केला तर पुढील दीड ते दोन वर्षाच्या काळात अंतिम विकास आराखडा मंजूर करण्यात येईल. शेवटी ही प्रक्रिया असून विकास आराखड्याला विलंब झाला महणून कशी काळजी घेता येईल हे सुध्दा प्रयत्न सुरु आहेत. त्यानुसारच वाशिम शहराचेही काम हाती घेण्यात आले आहे आणि पुढील दीड ते दोन वर्षाच्या आत हा आराखडा मंजूर होईल.

श्री. गोपीकिसन बाजोरिया : महोदय, कलम 37 (1)(ए) अन्वये वैधानिक कार्यवाही न करता छोट्या छोट्या वर्तमानपत्रांमधून प्रसिध्दी देऊन जे प्रस्ताव मंजूर झाले आहेत ते प्रस्ताव शासन रद्द करणार काय ?

श्री. अशोक चव्हाण : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी यापूर्वीच अर्थसंकल्पिय अधिवेशनात सांगितलेले आहे. सर्वंकष आराखड्याचा निर्णय होईपर्यंत नियम 37 (1) अन्वये सादर झालेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

--------

....4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : वडाळा (मुंबई) येथे भुखंडाच्या फेरबदलात झालेला भ्रष्टाचार

**मु. शी.** : वडाळा (मुंबई) येथे भुखंडाच्या फेरबदलात झालेला भ्रष्टाचार याबाबत श्री रामदास कदम, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. अशोक चव्हाण ( मुख्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री. रामदास कदम, वि.प.स. यांनी "वडाळा (मुंबई) येथे भुखंडाच्या फेरबदलात झालेला भ्रष्टाचार " या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मौजे अणिक (वडाळा,मुंबई) येथील सीटी सर्व्हे नंबर 1 अे/1,2,3 व 1 अे/6,7,8,11,12 व 13 बी ही जागा नो डेव्हलपमेंट झोनमध्ये होती. मुंबईमध्ये नो डेव्हलपमेंटच्या जागा विकासकांच्या घशात कशा घातल्या जातात, त्याचे हे जिवंत उदाहरण आहे. ही जागा ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी आरक्षित केली होती. परंतु हे आरक्षण उठवले गेले. खरे म्हणजे ही जागा मॅन्ग्रोव्हची आहे. या पूर्ण भूखंडावर मॅन्ग्रोव्हज आहेत. मॅन्ग्रोव्हजच्या संदर्भात उच्च न्यायालयाचे स्पष्ट आदेश आदेश आहे की, " कोणत्याही परिस्थितीत मॅन्ग्रोव्हज तोडता येणार नाही." असे असतांना उच्च न्यायालयाचा आदेश डावलून, ब्रिमस्टोवेडसाठी जागा आरक्षित दाखवून मग हे आरक्षण उठवून ही जागा विकासकाच्या घशात टाकण्यात आली आहे. हा विकासक सरकारचा जावई लागतो काय ? या ठिकाणी उच्च न्यायालयाचा आदेश डावलण्यात आला आहे, ही गोष्ट खरी आहे काय ? मॅन्ग्रोव्हज तोडले गेले ही गोष्ट खरी आहे काय ? या ठिकाणी सुरुवातीला 100 मिटरचा नाला ठेवण्यात आला होता. परंतु विकासकासाठी 100 मिटरचा नाला 50 मिटरवर आणला गेला आहे. नो डेव्हलपमेंट झोनमध्ये असलेली जागा ब्रिमस्टोवॅडसाठी आरक्षित ठेवलेली असतांना पुन्हा ब्रिमस्टोवॅडचे आरक्षण उठवायचे आणि 100 मिटरचा नाला 50 मिटर करायचा व या ठिकाणी मॅन्ग्रोव्हजचे जंगल असतांना व मॅन्ग्रोव्हजच्या संदर्भात उच्च न्यायालयाचे आदेश असतांना उच्च न्यायालयाचे आदेश डावलून विकासकाला ही जागा दिलेली आहे, ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री. अशोक चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, आपल्याला कल्पना आहे की, कोणत्याही झोनमध्ये बदल करावयाचे असल्यास, त्याबाबत महानगरपालिकेच्या संमतीने कारवाई करणे अपेक्षित असते व त्यानंतरच फेरबदल केले जात असतात. मुंबई महानगरपालिकेने प्रस्तावित केलेली आरक्षणे कायम ठेवणे याबद्दलची सर्व वैधानिक कारवाई मुंबई महानगरपालिकेकडून पूर्ण करण्यात आली आहे. 37 चा प्रस्तावावर नियमाप्रमाणे महानगरपालिकेच्या बॉडीमध्ये चर्चा होते व चर्चेनंतर त्यासंदर्भातील कार्यवाही शासनाकडे येत असते. मॅन्ग्रोव्हजच्या बाबतीत बफर झोन सोडून विकासकाला परवानगी देण्यात आलेली आहे. यासंदर्भातील सर्व माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. मॅन्ग्रोव्हजसाठी जागा आरक्षित ठेवण्यात आली आहे. 50 मिटरचा बफर

..2...

श्री. अशोक चव्हाण .....

झोन सोडून विकासकाला परवानगी देण्यात आलेली आहे. ब्रिमस्टोवॅडसाठी जी जागा लागते त्यासाठी नाल्याची रुंदी बरोबर ठेवूनच परवानगी देण्यात आलेली आहे. या ठिकाणी जी कारवाई करण्यात आलेली आहे, त्याबाबतीत नोटीफिकेशन दि. 30.8.2007 रोजी 37(1) खाली काढण्यात आले. 3.5 मिटरचा बफर झोन ठेवण्यात आलेला आहे. ब्रिमस्टोवॅडसाठी जी काही परवानगी आवश्यक असते ती सुध्दा घेण्यात आलेली आहे. दिनांक 30.8.2001 रोजी नोटीफिकेशन काढून हरकती व सूचना मागवण्यात आलेल्या आहेत. 37(1) च्या कारवाईमध्ये प्राथमिक शाळा, क्रीडांगणे, माध्यमिक शाळा, प्रसूतीगृहे, वाचनालये, दवाखाना, समाजकल्याण केंद्र, मार्केट अशा ज्या ज्या गोष्टी डेव्हलपमेंट प्लॅनमध्ये ठेवणे आवश्यक आहेत, त्या त्या गोष्टी ठेवण्यात आलेल्या आहेत. वैधानिक कारवाई पूर्ण करुन पुढील अंतिम नोटीफिकेशन महानगरपालिकेच्या 37(1) कारवाई प्रमाणे करण्यात आलेले आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, या ठिकाणची सगळी जागा "नो डेव्हलपमेंट" झोनमध्ये होती. या सर्व जागेमध्ये मॅन्ग्रोव्हज होते. महानगरपालिकेने जरी प्रस्ताव पाठविला असला तरी उच्च न्यायालयाचा आदेश भंग करण्याचा अधिकार महानगरपालिकेला किंवा शासनाला आहे काय ? या ठिकाणी महानगरपालिका आणि शासनाने उच्च न्यायालयाच्या आदेशाचा भंग केलेला आहे.

यानंतर श्री. ओटवणेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

ब्रिमस्टोवॅडसाठी जागा घेतली व त्याचे आरक्षण उठविले आणि नंतर ती जागा विकासकाला दिलेली आहे. यासंबंधी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकाने पत्र पाठविले आहे. ते आपण वाचून घ्यावे. माझ्याकडे जी काही कागदपत्रे आहेत ती मी आपल्याकडे पाठवून देतो. सदर जागेवर खारफुटी आहे. तेव्हा माझा माननीय मुख्यमंत्री महोदयांना प्रश्न आहे की, या सगळ्या निर्णयाची फेर चौकशी शासनाकडून होईल काय ?

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, या संबंधी मी मघाशीच माहिती स्पष्ट केली आहे. त्यामुळे खारफुटीचा भाग बाधित होण्याच्या प्रश्नच उद्‌भवत नाही. खारफुटी सुरक्षित ठेवली पाहिजे. त्याबाबत सगळी दक्षता शासन घेत आहे. माझ्याकडे जी माहिती उपलब्ध आहे, त्यानुसार बफर झोन होता आणि ग्रीन बेल्ट दाखविण्यात आला आहे, तेवढया पुरतीच कारवाई करण्यात आली आहे. आपण सभागृहात निदर्शनास आणून दिलेल्या बाबींबाबत पूर्णपणे माहिती घेण्यात येईल आणि त्यात काही तथ्य आढळल्यास चौकशी करून पुढील कारवाई केली जाईल.

.............

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दापचरी दूध प्रकल्प बंद पडणे

**मु. शी.** :दापचरी दूध प्रकल्प बंद पडणे याबाबत सर्वश्री संजय केळकर विनोद तावडे,रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

डॉ.नितीन राऊत (दुग्धविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री सर्वश्री संजय केळकरविनोद तावडे,रामनाथ मोते, यांनी "दापचरी दूध प्रकल्प बंद पडणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

22-07-2010 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) QQ3

BGO/ KTG/ SBT/ जुन्नरे.. 14:25

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, शासकीय योजनेचा खेळखंडोबा झाल्याचे उत्तम उदाहरण म्हणजे दापचरी दूध प्रकल्प होय. 40 वर्षापूर्वी 6800 एकर जमिनीवर दूध प्रकल्प सुरू करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला. यासाठी जवळ जवळ 3500 एकर जमीन एकरी पाचशे रूपये या भावाने आदिवासींकडून संपादित करण्यात आली होती. तथापि, गेल्या 40 वर्षामध्ये हा प्रकल्प झालेला नाही. म्हणूनच मी काही स्पेसिफिक प्रश्न विचारणार आहे. या प्रकल्पाची वाट लागल्यानंतर शासनाने एक उच्चाधिकार समिती नेमली होती. खाजगी दुग्ध उत्पादक शेतकऱ्यांसाठी 800 युनिट उभारण्यात आले होते. ते निरनिराळ्या प्रकारच्या लोकांनी घेतले आहे. यात पुढारी आहेत, अधिकारी देखील आहेत. काहींनी तर तेथे रिझॉर्ट उभे केले आहे. अडीच एकर जमिनीचे एक युनिट आहे. हे युनिट बेसुमार पद्धतीने दिले गेले आहे. यासंबंधी उच्चाधिकार समितीने शिफारस केली आहे की, जे कृषि क्षेत्रधारक व्यवसाय करीत नाही त्यांच्याकडून शासन युनिट काढून घेणार आहे काय ? असे वर्षानुवर्षे सुरू आहे. त्यामुळे, ज्या अधिकाऱ्यांनी बघ्याची भूमिका घेतली आहे, त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? आज या प्रकल्पाचा बोजवारा उडाला आहे. हा प्रकल्प आता सुरू होणार नाही. सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण अजून 20 वर्षे सुरू राहील. त्यामुळे शासन आदिवासी लोकांना त्यांच्या जमिनी परत करणार आहे काय ? एका बाजूला आपण उत्तरामध्ये नमूद करता की, ही जमीन दुसऱ्या कामाकरिता विकता येणार नाही. परंतु, आपल्याच खात्याने दीड वर्षापूर्वी वर्तमानपत्रामध्ये नोटीस दिली होती की, दापचरी येथील युनिटची विक्री करायची आहे. यासंबंधी आवाज उठविल्यानंतर ती नोटीस मागे घेण्यात आली. तेव्हा यासंबंधी आपण सभागृहाला माहिती द्यावी.

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून सभागृहाला निवेदन करू इच्छितो की, सदर जमीन दूध प्रकल्पाच्या विकास कामाकरिता उपयोगी पडेल या नात्याने कार्यक्रम आखून संपादित करण्यात आली होती. त्या जागेवर कृषिक्षेत्रधारकांनी अनधिकृतपणे जमिनी बळकावल्या आहेत. त्यांना नोटीसासुद्धा माझ्या विभागाने दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नितीन राऊत..

त्यांच्याकडून खुलासा प्राप्त झाला असून येत्या काही दिवसांत निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. मी स्वत: दापचरी प्रकल्पास भेट दिली आहे. ज्या कारणासाठी जमिनी देण्यात आल्या होत्या ते कारण डिफीट झालेले आहे. तेव्हा त्यांना कंटीन्यू करण्याचा प्रश्न येत नाही. मी अगोदर सांगितल्याप्रमाणे याप्रकरणी निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, या आदिवासींच्या जमिनी आहेत. प्रत्येकवेळी नवीन दुग्ध विकास मंत्री येतात आणि नवीन आश्वासन देतात. परंतु प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होत नाही. गोकुळ, महानंदा सारखे प्रकल्प यशस्वीपणे राबविले जातात. ज्या कारणासाठी या जमिनी घेतल्या तो प्रकल्प यशस्वी करुन आपण स्वत:चे व माननीय मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण यांचे नाव पुढे आणणार आहात काय ? या संदर्भात सातत्याने आंदोलने होत आहेत. तेव्हा शासन या प्रकरणी एक टाईम बाऊंड कार्यक्रम आखणार आहे काय ?

डॉ.नितीन राऊत : सभापती महोदय, मागे काय झाले याबाबत मी येथे काही भाष्य करणार नाही. परंतु येणाऱ्या काही दिवसांत दापचरी येथे मोठा दुग्ध प्रकल्प झालेला आपणास दिसेल. दापचरी मुंबईपासून 150 कि.मी.अंतरावर आहे. त्याठिकाणी मुबलक पाणीसाठा आहे. शिवाय आमच्या विभागाचा डॅम आहे. तेथे विद्युत आणि लेबर उपलब्ध आहेत. क्लस्टर चेन पध्दतीने फॉडरचे उत्पन्न केले जाईल. तेथे 100-150 गायी म्हशी ठेवून डेअरी फार्म करण्याची योजना तयार केली आहे. डेअरी उद्योगासाठी तो भाग पूरक आहे. मुंबई शहराला दररोज 54 लाख लीटर दुधाची आवश्यकता आहे. हे सर्व दूध ग्रामीण भागातून आणावे लागते. तेव्हा याठिकाणी एक डेअरी करण्याचा विभागाने कार्यक्रम आखला असून तो ऑक्टोबर महिन्यापर्यंत निश्चितपणे पूर्ण करण्याचा आमचा मानस आहे.

------

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज देण्याचे घोषित करुनही त्याचा लाभ महिला बचत गटांना न मिळणे

**मु. शी.** : महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज देण्याचे घोषित करुनही त्याचा लाभ महिला बचत गटांना न मिळणे याबाबत सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे व डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा.फौजिया खान ( महिला व बालविकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज देण्याचे घोषित करुनही त्याचा लाभ महिला बचत गटांना न मिळणे" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज पुरवठा करण्याचे सरकारने घोषित केले. परंतु अनेक महिला बचत गटांना त्याचा लाभ मिळालेला नाही. राज्यात एकूण 3 लाख महिला बचत आहेत त्यातील फक्त दीड हजार महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज पुरवठा झालेला आहे. उत्तरात नमूद केलेले आहे की,"तीन लाख बचत गटांना लाभ देणे गृहीत धरले नव्हते तर फक्त 1 लाख 42 हजार 218 बचत गटांना लाभ देण्याचे गृहीत धरले होते." माझा प्रश्न आहे की, 3 लाख बचत गट असताना फक्त 1 लाख 42 हजार 218 बचत गट कोणत्या निकषावर पात्र ठरविले ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, "कर्ज रकमेची परतफेड" हा या योजनेचा मूळ उद्देश आहे. माविमचे 60 हजार, ग्राम विकास विभागाचे 51 हजार 108, नाबार्डचे 31 हजार 110 असे एकूण 1 लाख 42 हजार 218 बचत गटांना यासाठी गृहीत धरण्यात आले. त्याशिवाय डी.आर.डी.ए.च्या वेगळ्या स्कीमद्वारे 91 हजार इतक्या महिला बचत गटांना मदत देण्याची भूमिका घेतलेली आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ..

त्यांनी सहा महिने व्यवस्थितपणे परत फेड केली तर बॅकेचे सर्टिफिकेट घेऊन त्या बचत गटांनी माविमकडे जावयाचे असून त्यांनतर त्यांच्याकडून बॅकेत सबसिडी जमा करण्यात येते.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, महिलांच्या दृष्टीने ही योजना अतिशय क्रांतिकारक आहे. महिला बचत गटांना चार टक्के व्याजाने कर्ज देऊ, अशा प्रकारे विधानसभेमध्ये माजी मुख्यमंत्री सन्माननीय श्री. विलासराव देशमुख यांनी घोषणा केली होती. मात्र ठराविक महिला बचत गटांना चार टक्के दराने कर्ज देण्यात येईल, अशा प्रकारची कोणतीही कॅटेगिरी त्यावेळी तयार केलेली नव्हती. सरसकट सर्व महिला बचत गटांना चार टक्के व्याजाने पैसे देण्यात येतील असे त्यावेळी म्हटले होते. परंतु आज अशी परिस्थिती आहे की, ज्या बचत गटांना चार टक्के व्याजाने कर्ज देण्यात येईल, अशी घोषणा केली होती त्यांनासुध्दा चार टक्के व्याजाने कर्ज दिले जात नाही. राष्ट्रीयकृत बँका आणि जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅका या मधील अधिकारी शासनाने काढलेला जी.आर. मानण्यास तयार नाहीत. ते याप्रमाणे सवलत देण्यास तयार होत नाहीत. शासनाने जो शासन निर्णय काढला आहे, त्याला विरोध केला जात आहे. याबाबतीत माझे असे म्हणणे आहे की, महिला बचत गटांना सक्षम करावयाचे असेल व महिलांचे उद्योग उभे करावयाचे असतील तर त्यासंबंधी आढावा घेण्याची आज कोणतीही पध्दत अस्तित्वात नाही. या संदर्भात दर महिन्याला आढावा घेण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात यावी. त्याचबरोबर बॅकेच्या अधिका-यांना बोलावून त्यांना याबाबतीत असे सांगावे लागेल की, शासन बॅकांना पैसे देणार आहे. मात्र आज सरकारवर बॅकाचा विश्वास राहिलेला नाही. त्यामुळे या बॅका कोणत्याही प्रकारचे काम करण्यास तयार होत नाहीत. म्हणून बॅका, स्वयंसेवी संघटना, महिला बाल विकास विभागाचे मंत्री यांची एक समिती स्थापन करण्यात आली तर त्या समितीच्या मार्फत महिला बचत गटांना सक्षम कसे करता येईल, यासाठी एक प्लॅन तयार करता येईल. तेव्हा अशा प्रकारची समिती स्थापन करण्यात येणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, बॅकांकडून या प्रकरणी नकारात्मक भूमिका घेण्याचा प्रश्न येत नाही. कारण बॅकेचे इतर व्याजाचे पैसे शासनच भरणार आहे. बंक नकारात्मक भूमिका घेत असते, मात्र त्याची कारणे वेगळी आहेत. ती कारणे सुध्दा मी आपल्याला सांगू इच्छिते. शासनाने जी.आर. काढला आहे परंतु कॅश क्रेडिट लिमिटच्या लिंकेजच्या संदर्भात बॅकेसाठी जी तरतूद पाहिजे, ती तरतूद जी.आर.मध्ये नसल्यामुळे कॅश क्रेडिट योजनेमध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

50टक्के माविमचे बचत गट आहेत......

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय चुकीचे उत्तर देत आहेत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना मी सांगू इच्छिते की मी व्यवस्थित उत्तर देत आहे. माझे उत्तर पूर्ण् होऊ द्यावे.

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, त्यांच्या उत्तरालाच माझी हरकत आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला मी उत्तर देऊ इच्छिते. माझे उत्तर अर्धवट ऐकून आपण अडथळा आणू नका. माझ्या उत्तरामध्ये असत्य असे काहीही नाही.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सरसकट सर्वच बचत गटांना ही योजना लागू करण्यात येणार होती. त्यावेळी डीआरडीएचा विषय नव्हता. माविमचा विषय नव्हता. माविमचा विषय नंतर समाविष्ट करण्यात आला होता. आता शासन माविमच्या 50 टक्के बचत गटांसाठी फायदा देणार आहे. बाकीच्या महिला बचत गटांना आपण वा-यावर सोडून देणार आहात काय ? मग अगोदर हे बचत गट कशाला तयार केले होते ? त्यांना संमती कोणी दिली होती ? जिल्हा परिषदेच्या माध्यमातून आणि बॅंकेच्या माध्यमातून त्यांना संमती मिळालेली आहे ना ? अडीच लाख बचत गटाला या पूर्वीच संमती दिली होती आणि आता आपण चार टक्के व्याजाच्या संदर्भात माविमला डोक्यावर घेत आहात. असे करुन चालणार नाही. अशा प्रकारे आपण इतर महिला बचत गटांना वा-यावर सोडून देत आहात. त्यामुळे आपण म्हण्त आहात तसे मान्य केले जाणार नाही. सरसकट सर्व बचत गटाच्या संदर्भातील तो विषय होता. त्यामुळे माविमचा विषय आमचा नाही. सरसकट सर्वच महिला बचत गटांना या योजनेचा फायदा दिला गेला पाहिजे. अशा प्रकारे सर्व महिला बचत गटांना फायदा दिला जाणार आहे काय ?

प्रा.फोजिया खान : सभापती महोदय, ही चांगल्या प्रकारची योजना असून महिलांना स्वयंरोजगार मिळावा, यासाठी बाकीच्या व्याजदराची परत फेड शासनाकडून केली जात आहे.या संदर्भात अधिक प्रसार होण्याची गरज आहे

( एकाच वेळी अनेक सन्माननीय सदस्य बोलतात )

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये बचत गटाचा पहिला मेळावा माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांना बोलावून मंत्रिमहोदयांनी घेतला. त्यावेळी केवढी भव्यता निर्माण केली आहे असे त्यांनी सांगितले. आणि त्या बचत गटांना आता मारुन महिला आर्थिक विकास महामंडळाला पुढे केले जात आहे. त्यामुळे पहिल्यांदा आपण या अडीच लाख बचत गटांचा निर्णय घ्या आणि त्यानंतर माविमचा विचार करा.

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, आज राज्यामध्ये 3 लाख बचत गट आहेत. त्यामध्ये ग्राम विकास विभागाचे 51,108 बचत गट आहेत, माविमचे 60 हजार बचत गट आहेत, आणि नाबार्डचे 31,110 बचत गट आहेत. यामध्ये ग्रामीण व शहरी भागातील सर्व बचत गटांना न्याय देण्याचा आमचा प्रयत्न आहे. 4 टक्के व्याजाची सवलत देण्याचा सुध्दा आमचा प्रयत्न आहे. काही बँका देण्यास तयार नाहीत. त्यासंबंधीचे प्रस्ताव आम्ही बँकाकडे पाठविले आहेत.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री वेगळे उत्तर सांगत आहेत व माननीय मंत्रीवेगळी माहिती देत आहेत.

श्री.सुभाष झनक : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्रीही तेच उत्तर देणार होत्या. या बचत गटांना 4 टक्के व्याज दर देण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्याकरिता बँकर्सची एक बैठक बोलावून आणि आमच्या महिला व बाल विकास विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून महिला बचत गटांना न्याय देण्याचा माझ्या विभागाचा प्रयत्न आहे. त्याबाबत माननीय राज्यमंत्री उत्तर देत होत्या, परंतु आपण ते ऐकून घेतले नाही म्हणून आपला गैरसमज झाला आहे. यापूर्वी माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याबरोबर चर्चा झाली आहे. त्यांनी मांडलेल्या मुद्यांबाबत समाधान करुन दिले आहे, आणि माझे समाधान झाले आहे असे त्या म्हणाल्या आहेत. त्यामुळे शासनाच्या निर्णयाप्रमाणे महिला बचत गटांना न्याय मिळाला पाहिजे असा आमचा प्रयत्न आहे.

(गोंधळ)

श्री. विनोद तावडे : तुम्ही अगोदर बचत गटांना म्हणालात आता नाही म्हणता?

श्री. सुभाष झनक : मी नाही म्हटलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : बँका पैसे देण्यास तयार नाहीत असे आपण सांगितले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष झनक : मी असे सांगितले की, बँकाकडे प्रस्ताव देण्यात आले असून बँकर्सबरोबर बैठक घेऊन राहिलेल्या बचत गटांना न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाचे माननीय सदस्य "वेल"मध्ये येतात.)

**उपसभापती** : मंत्रिमहोदयांनी निवेदनावर उत्तर दिल्यानंतर आपले समाधान होईल अशाप्रकारचे उत्तर मिळाले पाहिजे असा आग्रह धरणे चुकीचे आहे.

श्री. विनोद तावडे : जनतेचे समाधान झाले पाहिजे.

**उपसभापती** : जनतेचे समाधान करण्याची जबाबदारी शासनाची आहे. आपणास निवेदन मान्य नसेल तर आपण सभागृहाचे कामकाज रोखू शकत नाही.

श्री. विनोद तावडे : याठिकाणी मंत्रिमहोदय वेगळे सांगतात व माननीय राज्यमंत्री वेगळे कसे काय सांगतात?

**उपसभापती** : माननीय सदस्यांनी आपल्या आसनावर जाऊन बसावे. मत्रिमहोदय आपल्या सर्व प्रश्नांना शांतपणे उत्तर देतील. आपले समाधान झाले नाही तर आपण पुन्हा हात वर करावे, परंतु आपण गडबड करु नये.

श्री. सुभाष झनक : सभापती महोदय, बचत गटांना 4 टक्के व्याज दराने कर्ज देण्याची शासनाची योजना आहे. त्या योजनेपासून जे बचत गट वंचित आहेत त्यांच्या संदर्भात शासनाने एक समिती गठीत करुन त्या बचत गटांना न्याय दिला पाहिजे यासाठी माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांच्याबरोबर सभागृह स्थगित झाल्यानंतर चर्चा झाली. त्यावेळी सर्व बचत गटांना न्याय देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत असे सांगितले. त्यामुळे सर्व महिला बचत गटांना न्याय देण्याच्या बाबतीत शासनाने घोषणा केली असल्यामुळे आम्ही सर्वांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत विहिरींचे निकृष्ट दर्जाचे झालेले बांधकाम

**मु. शी.** :सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत विहिरींचे निकृष्ट दर्जाचे झालेले बांधकाम याबाबत सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. लक्ष्मणराव ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री ) : सभापती महोदय, सर्वश्री किशनचंद तनवाणी, परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील भारत निर्माण कार्यक्रमांतर्गत विहिरींचे निकृष्ट दर्जाचे झालेले बांधकाम" या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

... ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयातील मालवण तालुक्यातील चार तळी व विहिरींचे काम गेल्या मे महिन्यात पूर्ण झाल्यानंतर एक महिन्याच्या आत त्या विहिरी कोसळल्याचे मी स्वत: जाऊन पहाणी केली आहे. ती पहाणी केल्यानंतर पत्रव्यवहार करुन सुध्दा संबंधित उप अभियंत्यांनी त्या कामाला भेट दिलेली नाही. म्हणून आपण त्यांच्यावर कारवाई करणार काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर...

त्याच प्रमाणे ज्या ठिकाणी तळी झालेली आहेत त्यांची रिकव्हरी करणार काय? या तळयांवर टक्केवारीवर बेरोजगार अभियंता काम करतात. या बेरोजगार अभियंत्याना कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने घेण्यात येईल काय?

श्री. लक्ष्मणराव ढोबळे : सभापती महोदय, चार ठिकाणी तळी करण्यात आली होती. त्यांचे उप अभियंत्यांनी वेळेवर सुपरव्हिजन केलेले नाही. ही सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती बरोबर आहे. त्याचबरोबर जी तळी बांधण्यात आली त्यांचा पाया खणून झाल्यानंतर काम सुरु करण्याआधी समितीने त्यास टेक्निकल मान्यता घेऊन किंवा उप अभियंत्यांची व्हिजिट ठेवून तो पाया व्यवस्थित खणला आहे की नाही हे पहावयास पाहिजे होते ते पाहिले गेले नाही. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितेलेल्या गोष्टींवर विश्वास ठेवून याची निश्चितपणाने चौकशी करण्यात येईल आणि यामध्ये ते दोषी आढळले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. त्याचप्रमाणे कंत्राटी म्हणून नेमण्यात येणारे लोक अनुभवी असले पाहिजेत. परंतु या ठिकाणी नेमलेल्या माणसाने योग्य असे मार्गदर्शन केले नाही म्हणून पॉलिटेक्निकच्या लोकांकडून याची तपासणी करण्यात आलेली आहे. ती तपासणी देखील योग्य झालेली नाही. वरची दरड कोसळून तो भराव त्या भिंतीवर पडला आणि ती कोसळली असे सांगण्यात आले. एकंदरीत सुपरव्हिजन योग्य झालेले नाही म्हणून दोघांचीही चौकशी करुन निश्चितपणाने कारवाई करण्यात येईल. आणि त्यांच्याकडून काम करुन घेण्यात येईल.

---

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत पुनर्बांधणीच्या नावाखाली नागरिकांची मोठया प्रमाणात होत असलेली फसवणूक.

**मु. शी.** : मुंबईत पुनर्बांधणीच्या नावाखाली नागरिकांची मोठया प्रमाणात होत असलेली फसवणूक यासंबंधी श्री. भाई जगताप,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"सन 1950 मध्ये महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या वतीने खार पश्चिम, येथे "रामकृष्ण नगर" या नावाने अल्प उत्पन्न गटातील लोकांसाठी बांधलेल्या 20 इमारती,, यातील इमारत क्र.16 मधील 17 रहिवाशांनी सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करुन म्हाडाकडे गृहनिर्माण संस्था होण्यासाठी अर्ज दाखल करणे, सन 2007 मध्ये म्हाडाने सदर मालमत्ता केवळ रुपये 1,38,178 (एक लाख अडतीस हजार एकशे अठ्ठयाहत्तर) इतक्या अत्यल्प किंमतीस या रहिवाशांना विकणे, सदर इमारतीची पुनर्बांधणी म्हाडाच्या वतीने करुन त्यात अल्प व मध्यम उत्पन्न गटातील गरजूंना आणखी सदनिका उपलब्ध झाल्या असत्या, तथापि, सदर मालमत्ता म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी संगनमत करुन स्वत:च्या फायद्यासाठी गैरव्यवहार व भ्रष्ट मार्गाने खाजगी बिल्डरांना विकणे, अशा प्रकारे मुंबईत पुनर्बांधणीच्या नावाखाली नागरिकांची मोठया प्रमाणात होत असलेली फसवणूक, या प्रकरणाबाबत संबंधित अधिकाऱ्यांची सखोल चौकशी करुन त्यांच्यावर दंडात्मक कारवाई होण्याची आवश्यकता, यावर शासनाची प्रतिक्रिया व भूमिका"

श्री. अशोक चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला जे उत्तर दिलेले आहे ते कायद्याच्या दृष्टीने बरोबर आहे. त्यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. सभापती महोदय, मी माहितीच्या अधिकाराखाली सेटयुल्ड क्रमांक -2  ज्याला आपण अनेक्श्चर -2 असे म्हणतो ते मिळविलेले आहे. त्यामध्ये एकाच व्यक्तीच्या नावावर तीन रुम ॲलॉट केल्या आहेत. मी या लक्षवेधी सूचनेकडे माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो याचे कारण असे की, तेथील अधिकाऱ्यांनी भ्रष्टाचार केल्यामुळे ही नावे आलेली आहेत. मूळ यादीमध्ये हे तीन नावे नव्हती. होनावर नावाच्या लाभधारकाचे एकच नाव होते आता त्यामध्ये तीन नाव आलेली आहेत. कु. अर्चना होनावर, आशिष होनावर आणि ज्योती होनावर अशी ही तीन नावे आलेली आहेत. एका नावाची तीन नावे कशी झाली? सभापती महोदय, ज्या अधिकाऱ्यांनी अशा प्रकारचा भ्रष्टाचार केलेला आहे त्यांच्यावर कारवाई करणार काय आणि या तीन ॲलोकेट झालेल्या सदनिकांच्या बाबतीत काय निर्णय घेणार?

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी रामकृष्ण नगर,खार(प) या वसाहतीचा उल्लेख या ठिकाणी केलेला आहे. 10950 साली महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या वतीने हा सगळा परिसर डेव्हलप करण्यात आलेला आहे. हे जुने बांधकाम असल्यामुळे त्याचवेळी नियमाप्रमाणे या सहकारी संस्थेचे कन्व्हेअन्स डीड झालेले आहे. एकाच घरातील तीन माणसांना सदनिकांची विक्री झालेली आहे असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे.

श्री. भाई जगताप : या इमारतीचे 2007 मध्ये रिडेव्हलपमेन्ट झालेले आहे.

श्री. अशोक चव्हाण : म्हाडाच्या इमारतीमध्ये एका पेक्षा जास्त सदनिका घेण्यावर काही बंधन नाही. एकाच व्यक्तीच्या नावावर तीन सदनिका असण्याचेही काही कारण नाही.यासंदर्भात स्पष्ट माहिती घेता येईल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, म्हाडाच्या सदनिका एका पेक्षा दोन घेतल्या तर चालू शकतात. मात्र आमदारांनी त्या दोन-तीन घेतल्या तर त्याबात आक्षेप घेण्यात येतो तेव्हा याबाबतचे शासनाचे धोरण आम्हाला कळले पाहिजे.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सगळया गोष्टींची तपासणी होते. तपासणी करुन एका बिल्डिंगमध्ये कोणाला ॲलोकेट करायचे आहे हे तपासल्यानंतरच ॲनेक्श्चर - 2 अंतिम केले जाते.

यांनतर श्री. बरवड...

श्री. अशोक चव्हाण ....

मला एवढेच सांगावयाचे आहे की, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला ती बाब तपासून घेऊ. त्यामध्ये नियमांचे उल्लंघन झाले आहे काय हे तपासण्यात येईल. मूळ जो प्रश्न आहे तो त्या इमारतीची जी किंमत आकारण्यात आली त्याबाबत आहे. त्या इमारतीची जी किंमत आकारण्यात आली त्यामध्ये 8128 रुपये प्रती गाळा अशी किंमत आकारण्यात आली. ही अल्प उत्पन्न गटाची कॅटेगरी आहे. कदाचित त्या इमारतीचा पुनर्विकास प्रस्तावित आहे. त्यांचा पुनर्विकास होणार असेल तर तो करीत असताना आजच्या बाजारभावाची जी रक्कम असेल ती चार्ज करावी लागेल. अल्प उत्पन्न गटाप्रमाणे केले तर आजच्या बाजारभावाच्या 40 टक्के रक्कम त्यांना भरावी लागेल आणि ती किंमत 5 कोटी 81 लाख रुपये होईल. मध्यम उत्पन्न गटाप्रमाणे केले तर आजच्या बाजार भावाच्या 60 टक्केप्रमाणे रक्कम भरावी लागेल आणि ती रक्कम 8 ते 8.5 कोटीपर्यंत जाईल. त्यामध्ये अधिक उत्पन्न कमावतो असे नाही तर आज पुनर्विकास करावयाचा असेल तर आजच्या बाजारभावाच्या 40 टक्के किंवा 60 टक्के प्रमाणे जी रक्कम असेल ती आकारण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, अधिकाऱ्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना व्यवस्थित माहिती दिलेली नाही. ही 17 नंबरच्या एका इमारतीची सोसायटी आहे. त्यांनी रजिस्ट्रेशन केलेले आहे. त्यांना घर मिळाले पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. जी प्रक्रिया आहे ती बरोबर आहे. पण त्या सोसायटीमध्ये मुळात होनावर नावाची एक व्यक्ती होती. आता त्यांच्या नावावर तीन घरे आहेत हा आक्षेप आहे. माझा प्रक्रियेबद्दल कोणताही आक्षेप नाही. त्या सोसायटीने पुनर्विकासाचे काम खाजगी बिल्डरला देऊन त्यांनी ही घरे घेण्याचा जो प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल आक्षेप आहे. त्या सोसायटीचे सचिव जर अशा प्रकारे करीत असेल तर बाकीच्या लोकांवर अन्याय होतो आणि अन्याय झालेला आहे. म्हणून मी ही बाब निदर्शनास आणून दिलेली आहे. होनावर नावाच्या 10 माणसांनी घरे घ्यावीत, त्याबद्दल आक्षेप नाही. सचिवाचे एक घर असताना त्याने दोन मुलांच्या नावावर घरे घेतलेली आहेत त्याबद्दल आक्षेप आहे. याबाबतीत अधिकाऱ्यांचा खुलासा पाहिजे. त्या ठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे असा माझा आक्षेप आहे.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सुरुवातीलाच जर यासंदर्भात माहिती मागितली असती तर ती देता आली असती. हे प्रकरण होनावर पर्यंत जाणार आहे हे माहीत नव्हते. या लक्षवेधी सूचनेमध्ये इमारतीच्या पुनर्विकासाबद्दल आणि जी आकारणी करण्यात आली त्याबद्दल माहिती विचारलेली आहे. हे होनावर कोण आहेत आणि त्यांना आवर कसा घालता येईल याबद्दल सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केलेला आहे. मला त्याची माहिती घ्यावी लागेल. त्यामध्ये काही आक्षेपार्ह असेल तर चौकशी करुन कारवाई करण्यात येईल. आम्ही माहिती घेऊ आणि आक्षेपार्ह असेल तर नक्की कारवाई करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : त्याचे अॅनेक्श्चर आहे. होनावर यांची तीन घरे आहेत.

श्री. अशोक चव्हाण : होनावर यांना आवर घालण्यासंबंधीचा आपला जो विषय आहे तो लक्षात आलेला आहे.

----

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

**पृ. शी.** : भामरागड, जि. गडचिरोली येथील आदिवासींची नक्षलवाद्यांनी केलेली निर्घृण हत्या

**मु. शी.** : भामरागड, जि. गडचिरोली येथील आदिवासींची नक्षलवाद्यांनी केलेली निर्घृण हत्या यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते

"दिनांक २४ जून, २०१० रोजी ता. भामरागड, जिल्हा गडचिरोली येथील दोन गरीब आदिवासींची नक्षलवाद्यांनी केलेली निर्घृण हत्या, तसेच, दिनांक ३ जून, २०१० रोजी ता.एटापल्ली, जिल्हा गडचिरोली येथील १२ जणांचे नक्षलवाद्यांनी केलेले अपहरण, जिल्ह्यात पोलीस भरतीसाठी अहेरी व भामरागड या परिसरातून आलेल्या उमेदवारांनी नक्षलवाद्यांच्या धमकीमुळे गावी परत जाणे टाळणे, नक्षलवाद्यांनी सदर उमेदवारांना परत आल्यास जिवानीशी मारण्याची धमकी देणे, गडचिरोलीतील ग्राम पंचायतीच्या निवडणुकीसाठी नक्षलवाद्यांच्या भीतीमुळे उमेदवारांनी अर्ज न भरणे, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात निरपराध आदिवासींचे बळी जाण्याच्या घटना सातत्याने घडणे, गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवादी कारवायांचा वेग दिवसेंदिवस वाढत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील राजूरा येथे सुध्दा नक्षलवाद्यांचे धमकीचे पत्र जुलै, २०१० च्या पहिल्या आठवड्यात प्राप्त होणे, नक्षलवादावर प्रतिबंध घालण्याच्या दृष्टीने राज्य शासनाला सातत्याने आलेले अपयश, शासनाचे याकडे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व कार्यवाही."

श्री. रमेश बागवे ( गृह राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा विषय अतिशय गंभीर आहे. कारण दिवसेंदिवस त्या नक्षलवादी एरियामध्ये नक्षली कारवाया प्रचंड वाढलेल्या आहेत. त्या ठिकाणी पोलिसांना आणि आदिवासींना मोठ्या प्रमाणावर जीव द्यावा लागला आहे. या ठिकाणी लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जे उत्तर दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, एकाला संशयित म्हणून मारले तर दुसऱ्याला खबऱ्या म्हणून मारले. त्याच्या अगोदर लाहेरी येथे जे प्रकरण झाले त्या ठिकाणी पोलिसांना मारले म्हणून जवळपासच्या गावातील 20 आदिवासींना पोलिसांनी नक्षलवाद्यांशी संबंध आहे म्हणून मारझोड करुन भीती निर्माण केली. सगळ्यात आक्षेपार्ह बाब अशी आहे की, या लोकांना नक्षलवादी जंगलात मारतात. त्यांना आणण्यासाठी पोलीस त्या ठिकाणी जात नाहीत. दहा बारा किलोमीटरवर मारुन टाकतात. पोलीस गावकऱ्यांना सांगतात की, तुम्ही आमच्याकडे ती प्रेते आणा मग आम्ही चौकशी करु. चौकशी जागेवर होत असते. प्रेत आल्यानंतर चौकशी केली जाते. याचा अर्थ असा की, पोलिसांचे मनोधैर्य खचलेले आहे त्यामुळे ते त्या ठिकाणी जात नाहीत. वीस वीस किलोमीटरवरुन लोकांनी नक्षलवाद्यांचे प्रेत घेऊन यावयाचे आणि मग त्यांनी बसल्या जागेवर चौकशी करावयाची हे कायद्याला धरुन नाही. याबाबतीत शासन पोलिसांवर कोणत्या पध्दतीची कारवाई करणार ? त्यांचे अशा पध्दतीचे कृत्य करणे बंद करणार काय ? लाहेरी येथे जे 17 पोलीस मारले गेले त्यामध्ये कोणाचा दोष आहे हे मी आज सांगत नाही. परंतु त्या ठिकाणी बाजूच्या गावातील सर्व लोकांना गुन्हेगार ठरवून टाकले. दर दुसऱ्या तिसऱ्या दिवशी त्या लोकांना वीस-वीस किलोमीटरवरुन पायी यावयास सांगतात. त्या ठिकाणी आल्यावर त्यांना शिवीगाळ करतात. त्यांना मारझोड करुन गुन्हेगार म्हणून त्यांच्याकडून लिहून घेण्याचा प्रयत्न करतात.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस.....

त्यातील एका आदिवासीला पोलीस स्टेशनमध्ये 15 दिवस डांबून ठेवले होते. याबाबत मी चौकशीसाठी गेले होते तेव्हा समजले की, त्याला दिनांक 17 ऑक्टोबरला डांबून ठेवले होते आणि रेकॉर्डवर 1 नोव्हेंबरला अटक दाखविण्यात आली होती. तो आदिवासी 15 दिवस कोठे होता हे माहीत नाही. त्याला पोलिसांनी खूप मारले होते, त्याचे पाय फोडून टाकले होते. अशाप्रकारे नक्षलवाद्यांच्या नावाने पोलिसांकडून आदिवासींचा जो छळ चालू आहे तो सरकार बंद करणार आहे की नाही ? पोलिसांकडून नक्षलवाद वाढविण्यासाठी जे खतपाणी घालण्याचे काम सुरु आहे ते बंद करुन आदिवासींना सामोपचाराने जवळ करुन नक्षलवाद्यांना विरोध करण्याची मानसिकता आदिवासींमध्ये तयार करण्याचे प्रयत्न शासनाकडून केले जाणार आहेत काय आणि पोलिसांकडून आदिवासींना जी वागणूक दिली जात आहे त्यासाठी त्यांना समज दिली जाणार आहे काय ?

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा तपासून घेतला जाईल आणि पाहणी केली जाईल. निष्पाप आदिवासींना पोलिसांकडून त्रास दिला जात असेल तर संबंधित पोलिसांना नक्कीच समज दिली जाईल आणि आदिवासींना देखील संरक्षण दिले जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना जे लोकप्रतिनिधी असतील, ग्रामपंचायत सदस्य असतील यांच्याकडून वेगवेगळया कारणावरुन केल्या जाणा-या मदतीच्या संदर्भात आहे. लोक सहभाग पाहिजे असे नेहमी म्हटले जाते. परंतु पोलीस आणि लोक यांच्यामध्येच सातत्याने वितुष्ट निर्माण झालेले आहे. पोलीस आणि लोक यांच्यात समन्वय साधण्यासाठी कोणत्या स्वरुपाचे प्रयत्न करण्यात आले आहेत ? विलास बर्डेकर, वनसंरक्षक यांचे अरुणाचल प्रदेश येथून दिनांक 18 मे रोजी अपहरण झालेले आहे. त्यांचा नक्षलवाद्यांशी संबंध आहे काय आणि विलास बर्डेकर यांना परत मिळविण्यासाठी शासनाकडून कोणते प्रयत्न करण्यात आले आहेत ?

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.रमेश बागवे : सभापती महोदय, पोलीस आणि आदिवासी यांच्यात समन्वय साधण्यासाठी शासनाच्या वतीने प्रयत्न केला जातो. छत्तीसगढ व आंध्र प्रदेश राज्याकडून नक्षलवाद्यांविरुध्द व्यापक मोहिम राबविली जाते. गडचिरोली या परिक्षेत्रात आदिवासी आहेत. तेथील जनतेला नक्षलवादापासून पोलिसांच्या माध्यमातून परावृत्त करण्यासाठी स्थानिक लोकांबरोबर जनसंपर्क मोहिम उघडण्यात आलेली आहे आणि त्याठिकाणी शासन स्तरावरुन व्यापक प्रमाणात बैठका घेण्यात येणार आहेत. स्थानिक नागरिकांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासन स्तरावरुन व्यापक प्रमाणात विकास कामे करण्यात येऊन....(अडथळा) शासनाच्या वतीने पोलीस दलाच्या माध्यमातून स्थानिक आदिवासींशी संपर्क साधून स्थानिक आदिवासींना नोकरीत प्राधान्य, स्थानिक आदिवासींचे वन पट्टे....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय,....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, या लक्षवेधी सूचनेवर नक्षलवादी भागातील सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी घेऊ द्या.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अतिशय महत्वाच्या विषयावर बोलण्याची आपण मला परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "पोलीस दलातील भरतीमुळे नक्षल चळवळीला धोका पोहोचत असल्यामुळे....

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांना मी सांगू इच्छितो की, मी आपल्याला बोलण्याची परवानगी दिली हे बळजबरीचे वाक्य आहे. आपण असे म्हणालात की, आपण मला बोलण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे, माझी परवानगी मिळण्यापूर्वीच तुम्ही बोलण्यास सुरुवात केली. हे नक्षलवादापेक्षाही भयंकर आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या चेह-यावर नक्षलवादी भागाविषयी जी चिंता दिसत होती, आपल्या नजरेतून जो भाव मला दिसला त्यामुळे मी बोलण्यास उभा राहिलो. माननीय मंत्री महोदय, हा गंभीर मुद्दा आहे. तुम्ही भरतीला गेलात तर तुम्हाला मारु अशाप्रकारच्या धमक्या आदिवासींना दिल्या आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री.खंदारे 15:00

श्री. विनोद तावडे...

तेथील युवक युवती आपल्या जीवावर उदार होऊन पोलीस दलात भरती होण्यासाठी आले. त्यांची निवड देखील करण्यात आली. त्यांच्या निवडीनंतर पुन्हा त्यांना धमक्या देण्यात आल्या. आता शासनाने निवड प्रक्रियेला स्थगिती दिलेली आहे. निवड झालेले सर्व उमेदवार घाबरलेले आहेत. शासनाने त्यांना सेवेत घेतले तरच ते सुरक्षित राहाणार आहेत. म्हणून या निवड प्रक्रियेवरील घातलेली बंदी शासन केव्हा उठाविणार आहे ?

श्री. रमेश बागवे : ही गोष्ट खरी आहे की, आदिवासी मुलांमध्ये भीतीची छाया पसरलेली आहे. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करुन ही स्थगिती लवकरात लवकर उठविण्यात येईल ?

श्री. विनोद तावडे : आदिवासी मुलांच्या जीवावर बेतलेले आहे. तेव्हा स्थगिती निश्चित किती दिवसात उठविणार ? ती सात दिवसात की आठ दिवसात उठविणार आहात ?

श्री. केशवराव मानकर : ही स्थगिती किती कालावधीत उठविणार आहात ?

श्री. रमेश बागवे : भरतीमध्ये गैरप्रकार झाल्यामुळे निवड प्रक्रियेला स्थगिती दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन 15 दिवसात स्थगिती उठविण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : हे अधिवेशन सुरु असताना माननीय पंतप्रधानांनी नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची बैठक बोलावलेली होती. त्या बैठकीत नक्षलग्रस्त राज्याला आर्थिक मदत देण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी दिलेले होते. तेव्हा नक्षलग्रस्त भागातील जनतेला चांगली वागणूक आणि त्यांचे जीवन सुरक्षित ठेवण्यासाठी केन्द्र शासनाने कोणती योजना मंजूर केलेली आहे आणि किती आर्थिक निधी राज्य शासनाला दिलेला आहे ?

श्री. रमेश बागवे : हा प्रश्न व्यापक आहे. या प्रश्नाबाबतची माहिती घेऊन ती पटलावर ठेवण्यात येईल.

----

...2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत**

**उपसभापती** : लक्षवेधी सूचना क्रमांक तीनमधील विषय न्यायप्रविष्ट असल्यामुळे ती पुढे ढकलण्यात आलेली आहे.

श्री. जयंत प्र. पाटील : हा विषय न्यायप्रविष्ट आहे हे आजच समजले का ? लक्षवेधी पुढे ढकलण्याचे कारण समजले पाहिजे. हा विषय जर न्यायप्रविष्ट होता तर या लक्षवेधी ऐवजी दुसरी लक्षवेधी लागली असती.

**उपसभापती** : ही लक्षवेधी पुढे ढकलण्यात आलेली आहे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ ST/ KGS/ पूर्वी श्री.खंदारे 15:00

**पृ.शी.** :तालुका यावल (जि.जळगाव) येथील भारत विद्यालय तसेच अन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांना अज्ञात रोगाची झालेली लागण

**मु.शी.** : तालुका यावल (जि.जळगाव) येथील भारत विद्यालय तसेच अन्य विद्यालयातील विद्यार्थ्यांना अज्ञात रोगाची झालेली लागण यासंबंधी सर्वश्री. दिलीपराव सोनवणे, अरुण गुजराथी, राजेंद्र जैन, हेमंत टकले, रमेश शेंडगे व ॲड. उषा दराडे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो अणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ता.यावल (जि.जळगाव) येथील भारत विद्यालय न्हावी, न्यू इंग्लिश स्कूल, भालोद, लोक विद्यालय, पाडळसे, नूतन विद्यालय, अंजाळे, अ.ध.चौधरी विद्यालय, डोंगरकठोरे, या शाळांमध्ये दिनांक १५.७.२०१० पासून अज्ञात आजाराने सुमारे २४७ विद्यार्थ्यांना चक्कर येणे, मळमळणे, डोकेदुखी या सारखी लक्षणे दिसणे, नुकतेच रावेर तालुक्यातील सरदार जे.जी. हायस्कूल या शाळेतील २२ विद्यार्थी व कमलाबाई कन्या विद्यालय येथील ३० विद्यार्थ्यांमध्ये देखील अशाच रोगाची लक्षणे आढळणे, हा आजार कशामुळे झाला याची अद्यापही उकल न होणे, हा आजार ठराविक वयोगटातील विद्यार्थी/विद्यार्थीनीना होणे, रोगाचे अजूनही निदान न झाल्यामुळे विद्यार्थ्यांत व पालकांत निर्माण झालेले भीतीचे वातावरण, या रोगास आळा घालण्यासाठी शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना"

प्रा. फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिलीपराव सोनवणे : एका गंभीर विषयावर लक्षवेधी सूचना विचारलेली आहे. जळगाव जिल्ह्यातील यावल, रावेर, चोपडा या तालुक्यात असलेल्या शाळातील विद्यार्थी दिनांक 15.7.2010 पासून आतापर्यन्त एका अज्ञात रोगाने आजारी आहेत. जामनेर तालुक्यातील शेंदुर्णे येथील विद्यार्थी देखील त्याच आजाराने बाधित झालेले आहेत. या शाळांतील विशिष्ट म्हणजे 10 ते 12 वयोटातील विद्यार्थी या आजाराने बाधित आहेत. त्यांनी औषधोपचाराची काळजी घेतल्यानंतरही त्यांना या आजाराची लागण होत आहे. यामुळे विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य नागरिक यांच्यामध्ये भीतीचे आणि चिंतेचे वातावरण निर्माण झालेले आहे.

...नंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीपराव सोनवणे....... लक्षवेधी सूचना क्र.४.......

पुण्याहून अहवाल प्राप्त झाला आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धुळे यांच्याकडून रक्त, मूत्र, घशातील स्त्राव, विष्ठा यांचे तपासणी नमूने प्राप्त झाले आहेत. परंतु या आजाराचे संभाव्य कारण किटकनाशकामुळे होणारी विषबाधा असे सांगितले आहे ते संयुक्तिक वाटत नाही. विशिष्ट शाळांमध्ये प्रार्थनेच्या वेळी आणि पहिल्या तासातच हे प्रकार आढळून आले. ठराविक वयोगटातील विद्यार्थ्यांनाच ही बाधा झाली. त्यापेक्षा कमी वयाचे किंवा जास्त वयाचे विद्यार्थी आहेत त्यांना ही बाधा झालेली नाही. पुणे व मुंबई येथून तज्ज्ञांची समिती पाठवून परिस्थितीची पाहणी केली जाईल काय? बालरोग तज्ज्ञ, औषधशास्त्र तज्ज्ञ, जीवशास्त्र तज्ज्ञ, विषाणू तज्ज्ञ यांच्यामार्फत तपासणी करुन खरे कारण उजेडात आणण्यात येईल काय? त्याठिकाणी जे भयभीत वातावरण निर्माण झाले आहे ते दूर करण्यात येईल काय? खाजगी रुग्णालयात ज्या मुलांना दाखल केले आहे त्यांचे पालक अतिशय गरीब आहेत. त्या मुलांच्या औषधोपचारावरील बिलाचे पैसे त्यांच्या पालकांना देण्यात येतील काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा अज्ञात आजार असल्याचे शासनाने उत्तरात मान्य केले आहे. रावेर तालुक्यातील २, यावल तालुक्यातील ५ आणि चोपडा तालुक्यातील एका शाळेमध्ये तसेच आज देखील जळगावमधील मुलांना अशा प्रकारचा त्रास झाल्याचे निदर्शनास आले आहे. डोकेदुखी, मळमळणे, चक्कर येणे, पोटदुखीची लक्षणे दिसून आली. या बाधित मुलांना रुग्णालयात दाखल करुन घेण्यात आले आणि दिवसभर उपचार करुन डिस्चार्ज देण्यात आला. या आजाराचे खरे कारण कळलेले नाही. या संदर्भात वेगवेगळया थिअरी आहेत. कशामुळे हा आजार झाला हे समजलेले नाही. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली आहे त्याचा विचार करण्यात येईल.

श्री.अरुण गुजराथी : माननीय सभापती महोदय, हा कोणता आजार आहे हे अजूनही सरकार सांगू शकत नाही. अज्ञात आजाराची बाधा झाली असून संभाव्य कारण किटकनाशकामुळे होणारी विषबाधा असे निवेदनात म्हटले आहे. नेमके कारण माहिती नाही असे निवेदनावरुन स्पष्ट होते. पुण्यामध्ये नमुने तपासणीसाठी पाठविले. परंतु नमुना तपासणी अहवाल १०-१० दिवस प्राप्त होत नाहीत. या संदर्भात शासन कोणती कारवाई करणार आहे? मी आपल्याला फोन केला आणि आपण सहकार्य केले. माननीय राज्यमंत्री आणि जळगाव येथील अधिकारी यांनीही सहकार्य दिले.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी........

परंतु किटकनाशकामुळे होणारी विषबाधा असे कारण दिले असेल तर संपूर्ण महाराष्ट्रात किटकनाशकाची फवारणी केली जाते. त्यादृष्टीने शासनाने वेगळा अभ्यास गट नेमून या संदर्भातील कारणांची चौकशी करावी. राष्ट्रीय विषाणू संस्थेची फिरती लॅबोरेटरी उपलब्ध करुन दिली तर फार बरे होईल. याबाबत शासन विचार करणार आहे काय?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, किटकनाशकामुळे होणारी विषबाधा हे कारण सांगितले आहे ते धुळे मेडिकल कॉलेजचे डीन यांनी ८ सदस्यांची टीम पाठविली होती त्यांना प्रायमाफेसी जे निदर्शनास आले त्याआधारे नमूद केलेले आहे. मी सुरुवातीलाच मान्य केले आहे की, अद्याप याचे कारण सिध्द झालेले नाही. या संदर्भातील तपास अजूनही सुरु आहे. एनआयव्हीचा अहवाल आलेला आहे. त्यामध्ये मलेरिया, फायलेरिया, डेंग्यू रुल आऊट झालेले आहे तशा प्रकारचा आजार नाही. रक्त, मूत्र, विष्ठा नमुने तपासण्यात आले आहेत. या संदर्भात अभ्यास करण्याची आवश्यकता आहे, त्यादृष्टीने शासन पावले उचलत आहे.

नंतर २झेड.१...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : महोदय, मंत्री महोदयांनी या लक्षवेधी सूचनेला अंदाजानेच उत्तर दिलेले दिसते. कारण ही सर्व लक्षणे दाखविल्यानंतर तशाच प्रकारची औषधे या मुलांना दिली काय यासंबंधीचा कोणताही बोध यातून होत नाही. याचा अर्थ या प्रकरणाकडे शासन गांभीर्याने पाहत नाही असेच दिसते. आताच सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत सोनवणे यांना आलेल्या फोननुसार जामनेर (जि.जळगांव) तालुक्यातील शेंदुर्णी या गावातील मुलांमध्ये सुध्दा हीच लक्षणे आढळून आल्याची माहिती मिळाली आहे. केवळ सात-आठ गावातीलच हा प्रश्न नसून अनेक भागात हा रोग पसरत चालला आहे म्हणून दिलेले उत्तर दिशाभूल करणारे आहे व त्याकडे शासन मात्र गांभीर्याने पाहत नाही. अशा प्रकारे हळूहळू हा रोग संपूर्ण राज्यात पसरण्याची भीती निर्माण होत आहे. असे झाले तर त्याला शासनच जबाबदार असणार आहे, याची जाणीव ठेवावी.

प्रा. फौजिया खान : महोदय, शासन या रोगाच्या संदर्भात अतिशय गंभीर असून कोणत्याही प्रकारे या लक्षवेधीला दिलेले उत्तर चुकीचे नाही. कीटकनाशकांचा वापर काही ग्रामपंचायतींच्या माध्यमातून गावांमध्ये झालेला होता पण ज्या ज्या ठिकाणी लागण झाली त्या सर्वच गावांमध्ये ही लागण झालेली नसल्यामुळे कीटकनाशकांमुळे हा रोग पसरला असे सांगता येत नाही. तरी देखील अद्यापही या रोगाचे कारण समजले नाही, ही वस्तुस्थिती आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : महोदय, जळगांव जिल्ह्यातील ज्या ज्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांना ही लागण झाली तेथे जिल्हा शल्य चिकित्सक, उप संचालक तथा संचालक आरोग्य विभाग यांनी किती वेळा भेटी दिल्या आहेत ? तसेच रोगाचे निदान न होताच औषधे देण्यात आली आहेत असेच यावरुन दिसून येते. या भागातील अधिकाऱ्यांनी दिलेल्या अपूर्ण माहितीवरच माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. तसेच माननीय मंत्री महोदय लेखी उत्तर इतक्या ठामपणे उत्तर देत आहेत त्याचा उत्तरामध्ये मात्र समावेश दिसत नाही म्हणून ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

श्री. सुरेश शेट्टी : महोदय, सन्माननीय राज्यमंत्र्यांनी व्यवस्थित उत्तर दिलेले आहे. यासंदर्भात जळगांव जिल्ह्याचे माननीय पालकमंत्री आणि आमदारांशी माझे फोनवर बोलणे झाले असता आरोग्य विभागाकडून अतिशय चांगले काम चालू असल्याचे मला त्यांनी फोनवरुन सांगितले आहे. मागील 15 तारखेला या रोगाची लागण जळगांव जिल्ह्यातील 10 शाळांमध्ये सुरु झाली आहे. त्यात भारत विद्यालय, न्हावी या शाळेत 1250 विद्यार्थी असून त्यापैकी 130 मुलांना अशी

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी .........

लागण झाल्याचे दिसून आले. त्यांच्यावर औषधोपचार करुन ताबडतोब या मुलांना डिस्चार्ज देण्यात आला आहे. न्यू इंग्लिश स्कूल, भालोद या शाळेत एकूण 1100 विद्यार्थी असून त्यातील फक्त 30 मुलांमध्येच ही लक्षणे आढळली. लोक विद्यालय, पाडळसे या शाळेत 900 विद्यार्थी आहेत. या सर्व खाजगी शाळा आहेत. जिल्हा परिषदेच्या एकाही शाळेतील विद्यार्थ्यांना ही लागण झाल्याचे आढळून आलेले नाही. या भागात 8 लोकांचे पथक पाठविले असून प्रत्येक गावात जाऊन या डॉक्टरांच्या पथकाने तपासणी केली आणि विद्यार्थ्यांचे ब्लड सॅम्पल्स कलेक्ट करुन एनआयव्ही, पुणे येथे तपासणीसाठी पाठविण्यात आले. तो अहवाल दि. 21 जुलै म्हणजेच कालच प्राप्त झाला असून त्यात स्पष्ट म्हटले आहे की, हा आजार पाणी अथवा मच्छरांपासून झालेला नाही. तर तो नेमका कोणत्या प्रकारचा आजार आहे त्याचे कारण शोधण्यात येत आहे. तसेच आज सकाळी जामनेर तालुक्यातील शेंदुर्णी येथील शाळेत सुध्दा हीच घटना घडली असून आरोग्य खात्याची टीम याबाबत पुढील कार्यवाही करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी....

अशा प्रकारे शासन सर्व मदत करण्यास तयार असून या ठिकाणी सर्व प्रकारची औषधे सुध्दा पुरविण्यात आलेली आहेत. एन.आय.व्ही. लॅबमध्ये या आजाराच्या संदर्भात तपास सुरु असून त्यांच्याकडून रिपोर्ट आल्यानंतर कोणता आजार आहे, हे समजू शकेल. आपल्याकडे दरवर्षी काही नवीन रोग जन्माला येत असतात. लॅबमध्ये या आजाराच्या संदर्भात तपासणी सुरु असून लॅबचा रिपोर्ट आपल्याला लवकरच प्राप्त होईल. तसेच मुंबईहून जळगावला आणखी एक डॉक्टरांचा गट पाठविण्यात येईल, असे मी या निमित्ताने सभागृहास सांगू इच्छितो.

----

....2......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबई शहरात विविध साथीच्या रोगांचा झालेला फैलाव

**मु. शी.** : मुंबई शहरात विविध साथीच्या रोगाचा झालेला फैलाव यासंबंधी सर्वश्री श्री. किरण पावसकर, डॉ.दीपक सावंत, डॉ.निलम गोऱ्हे, सर्वश्री. परशुराम उपरकर, राजन तेली, जयप्रकाश छाजेड, भाई जगताप, प्रा. सुरेश नवले, सर्वश्री. धनंजय मुंडे, सय्यद पाशा पटेल, रामनाथ मोते, संजय केळकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री. सुभाष चव्हाण, हुसेन दलवाई, दिवाकर रावते, हेमंत टकले, गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबईत तसेच उपनगरात पावसाच्या आगमनाबरोबरच मलेरिया, स्वाईन फ्लू, न्युमोनिया, डेंग्यू, गॅस्ट्रो, लॅप्टो अशा साथीच्या रोगांचा झालेला फैलाव, सहा जणांचा मृत्यू होऊन हजारो नागरिक आजारी असल्याचे दिनांक २८ जून, २०१० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, १ जून पासून २७ जून पर्यंत ७,५०० रुग्ण सरकारी तसेच खाजगी रुग्णालयात दाखल होणे, त्यामध्ये वेगवेगळया तापाने आजारी असलेले ४,६२९ रुग्ण, अनेक साथींच्या रोगांबरोबरच स्वाईन फ्लूचाही मोठया प्रमाणात फैलाव होत असणे, नुकताच एक वर्षाच्या मुलाचा स्वाईन फ्ल्यूने सायन हॉस्पीटलमध्ये झालेला मृत्यू,या आजाराने झालेला हा तिसरा मृत्यू असणे, एप्रिल, २०१० पासून ८९ जणांना एच-१, एन-१, विषाणूंची झालेली लागण, याबाबत संशोधन करुन तयार केलेली स्वदेशी लस महाराष्ट्राच्या बाजार पेठेत उपलब्ध होण्यास अजून काही महिन्यांचा कालावधी लागणार असणे, आरोग्य विभागाकडेही याबाबत निश्चित माहिती नसणे, पुण्याच्या सीरम इन्स्टिटयुटने तयार केलेली स्वाईन फ्लू प्रतिबंधक लस केंद्र सरकारने संमत केली असताना राज्य सरकारच्या अन्न व औषध प्रशासनाकडून ती वापरण्यास आवश्यक परवाना मिळण्यास होत असलेला विलंब, आरोग्य सेवकांसाठी आलेले लसीचे डोस केंद्र सरकारकडे परत पाठविण्याची वेळ येणे, या सर्वच बाबतीत शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची वा केलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

..3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान ( सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

-----------

....4.......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबई व मुंबई उपनगरातील स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना मांडलेली आहे. या लक्षवेधी सूचनेच्या अनुषंगाने शासनाने दोन पानाचे निवेदन दिलेले आहे. तीच ती माहिती देऊन विभागाने हे दोन पानाचे निवेदन तयार केलेले आहे. त्यामुळे सरकार या प्रश्नावर किती गंभीर आहे, हे दिसून येते. मी या ठिकाणी मुंबई आणि मुंबई उपनगरच्या संदर्भातील स्वाईन फ्ल्यूच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. मात्र विभागाने पूर्ण राज्याची माहिती दिलेली आहे.

सभापती महोदय, माझा प्रश्न एवढाच आहे की, राज्यात जून, 2009 पासून संसर्ग झालेल्या रुग्णांची संख्या 7306 असून मृत झालेल्यांची संख्या 473 आहे. टॅमी फ्ल्यूच्या गोळया शासनाने मोठया प्रमाणात खरेदी केल्या आहेत. केंद्र शासनाने 34300 लसी महाराष्ट्र शासनाकडे पाठविल्या आहेत. जे डॉक्टर्स, नर्स आणि कर्मचारी या रोगांच्या संसर्गात आले होते, त्यांच्यासाठी या लसी पुरविण्यात आल्या होत्या. 34300 लसींपैकी फक्त 1990 लसी वापरल्या गेल्या आहेत. स्वाईन फ्ल्यूच्या इंजेक्शन्सचा वापर करण्यापूर्वी, नाकावाटे घेतल्या जाणाऱ्या औषधाचा उपयोग सरकारी कर्मचारी करीत नव्हते, हे खरे आहे काय ? तसेच हे औषध न वापरल्यामुळे त्यांना अधिक त्रासाला सामोरे जावे लागते, हेही खरे आहे काय व त्याबाबत शासन कोणती कारवाई करणार आहे ?

सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, "नवीन बांधकामाच्या ठिकाणी धूर फवारणी व अळीनाशक फवारणी करण्यात येते. नवीन बांधकामाच्या ठिकाणी अळीनाशकांची फवारणी करण्याची जबाबदारी विकासकांवर सोपविण्यात आली आहे. ज्या विकासकांनी याबाबत उपाययोजना केलेली नाही, त्यांच्याकडून अनामत रक्कम घेऊन 10.6.2010 पासून सहाकारी सेवा संस्थांमार्फत अळीनाशक फवारणी करण्यात येते" मुंबईमध्ये मोठया प्रमणावर बांधकामे सुरु आहेत. काही बांधकामे कोर्टात अडकून पडली आहेत तर काही बांधकामे प्रलंबित मंजुरीसाठी पडून आहेत. या सर्व बांधकामांच्या ठिकाणी कोणत्याही प्रकारची फवारणी केली जात नसल्यामुळे मुंबईमध्ये स्वाईन फ्ल्यूची लागण होत आहे. वारंवार सांगूनही ज्या विकासकांनी फवारणीचे काम केलेले नाही, अशा विकासकांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ? या विकासकांना आपण काळया यादीत टाकणार आहात का ?

..5...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मुंबईपुरते सांगावयाचे झाले तर मुंबईमध्ये मे महिन्यात स्वाईन फ्ल्यूचे 37 रुग्ण पॉझिटीव्ह आढळले आहेत. 100 रुग्ण जून महिन्यात व 337 रुग्ण जुलै महिन्यात आढळून आले होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान.....

मुंबईमध्ये जानेवारी महिन्यामध्ये 2, जून महिन्यामध्ये 2 आणि जुलै महिन्यामध्ये 2 असे मिळून एकूण 6 जणांचा मृत्यू झालेला आहे. मृत्यूचे विश्लेषण केले असता औषधोपचार घेण्यास विलंब करणे हे कारण पुढे आलेले आहे. गरोदर महिला, लहान बालके, रक्तदाब, मधुमेह या आजाराने त्रस्त असलेले वयोवृद्ध यांचा यामध्ये मृत्यू झाल्याचे आढळून आलेले आहे. तसेच 4 हजार प्रायव्हेट प्रॅक्टीशनर्स आहेत त्यांच्यासांठी शासनाने प्रोटोकॉल नुसार ट्रीटमेंट देण्याचा सेन्सेटायझेशन कार्यक्रम राबविला आहे. मुंबई महनगरपालिकेच्या संबंधी देखील येथे सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. त्यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, विकासकांना परमिशन देतानाच सर्व अटी घालून दिल्या होत्या. पण त्यांचा जास्त प्रतिसाद मिळालेला नाही असे दिसते. त्यामुळे पुन्हा एकदा बिल्डर्स, डेव्हलपर्स यांना सूचना देण्यात येतील. शासनाने हेल्थ कार्ड योजना सुरू केली आहे. मुंबईत बांधकामाच्या कामावर 2500 ठिकाणी अडीच लाख मजूर काम करीत आहेत. येथे काम करणाऱ्या प्रत्येक मजुराची दर 15 दिवसांनी रक्त तपासणी करण्याचे काम शासनाच्या वतीने सुरू आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आपल्याकडे लसी आलेल्या आहेत. ज्या लसी वापरात आलेल्या नाहीत त्या आपण डॉक्टर्स, नर्स यांच्यासाठी दिलेल्या आहेत. जवळ जवळ 2000 लसी वापरल्या गेलेल्या नाहीत. हा कोटा आपल्याला ऑक्टोबर पर्यंत पुन्हा मागे पाठवायचा आहे. त्यासंबंधी शासन नेमकी कोणती भूमिका घेणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, लसी परत पाठविल्या जाणार नाहीत याची दक्षता घेतली जाईल. हेल्थ वर्कर आहेत त्यांना सुद्धा लसी देण्यासंबंधीचा आदेश शासनाने काढलेला आहे. यासंबंधी शासनाने जबरदस्ती केलेली नाही. मात्र, साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव झाला व त्यातून जर काही झाले तर ती जबाबदारी शासनावर राहणार नाही यासंबंधीचे अंडरटेकिंगसुद्धा आम्ही त्यांच्याकडून लिहून घेतले आहे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, केबिनेट मंत्री एवम् राज्य मंत्री अपने विभाग में अच्छा काम कर रहे हैं. यह लक्षवेधी मुंबई के बारे में है लेकिन मैं मंत्री महोदय से यह जानना चाहता हूं कि नागपुर तथा अमरावती विभाग में अभी बीच में मरीजों की संख्या कम हो गई थी लेकिन अब फिर से स्वाईन फ्लू से ग्रस्त मरीजों की संख्या बढ़ रही है. समाचार पत्र में ऐसा पढ़ा था कि दिल्ली में स्वाईन फ्लू को रोकने के लिए वेक्सीन विकसित हुई है. क्या इस बारे में मंत्री महोदय जानकारी देंगे ? दूसरा प्रश्न यह है कि नागपुर एवम् अमरावती विभाग में अलग-अलग या दोनों को मिलाकर रिव्यू लेने के लिए, जानकारी लेने के लिए क्या एक बैठक बुलाई जाएगी ताकि स्वाईन फ्लू की रोकथाम में मदद हो सके, क्या ऐसी कोई बैठक की जाएगी ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, मैं सम्माननीय सदस्य श्री ज़मा जी को बताना चाहता हूं कि आज की तारीख में किसी भी अस्पताल में एक भी स्वाईन फ्लू का मरीज एडमिट नहीं है. हे मी खात्रीने सांगतो. माझ्याकडे कालच्या तारखेपर्यंतचा लेटेस्ट रिपोर्ट आहे.

यानंतर श्री.अजित....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री सय्यद ज़मा : सभापति महोदय, मंत्री महोदय की जानकारी सही नहीं है. मैं आपको थोड़ी देर में फॅक्स से जानकारी मंगाकर दे सकता हूं.

श्री.सुरेश शेट्टी : आपके पास जानकारी हो तो मुझे दीजिए. सीरम इन्स्टीटयुट कंपनीने नॅसल व्हॅक्सीन काढले अशी वर्तमानपत्रात बातमी आली होती. त्याची माहिती आमच्या विभागाकडे नाही. परंतु दोन तीन कंपन्या अशाप्रकारचे व्हॅक्सीन काढण्याचा प्रयत्न करीत आहेत असे समजते.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमा यांनी सांगितले की, एच1एन1 चे रुग्ण आढळले आहेत. माननीय मंत्रिमहोदय सांगत आहे की, सध्या नागपूरातील रुग्णालयात एच 1 एन 1 चे रुग्ण नाहीत. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांना दोष देता येणार नाही. माननीय मंत्रिमहोदयांना अधिकारी जी माहिती देतात त्याप्रमाणे ते उत्तर देतात. सन्माननीय सदस्यांनी माहिती उपलब्ध करुन दिल्यास ज्या अधिकाऱ्यांनी आपणास दिशाभूल करणारी माहिती दिली त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी :सभापती महोदय, होय.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कोकणात गेल्या पाच वर्षात लॅप्टोस्पायरोसिसमुळे 9-10 व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे.. कोकणात रक्तपेढी सुरु करणार होता त्याबाबत पुढे काय झाले ? डेप्युटी डायरेक्टरचे कार्यालय ठाणे येथे असल्यामुळे कोकणात डॉक्टर्स उपलब्ध होत नव्हते. तेव्हा पूर्वी प्रमाणे कोल्हापूर येथे डेप्युटी डायरेक्टरचे कार्यालय करुन ते रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याला जोडण्यात येईल काय जेणेकरुन कोकणात डॉक्टर्स उपलब्ध होतील. तेव्हा याबाबत निर्णय होईल काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या शेवटच्या प्रश्नाचे उत्तर मी देऊ शकतो. आपण ठाणे आणि कोल्हापूर येथे डेप्युटी डायरेक्टर्सचे ऑफीस सुरु करण्याचा निर्णय घेतलेला असून त्या बाबतचे आदेश इश्यू केलेले आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, विकासकांनी बांधकामाच्या ठिकाणी स्वच्छता ठेवली पाहिजे असा नियम आहे. परंतु या नियमाचे कोणी पालन करताना दिसत नाहीत. तेव्हा मुंबई महानगरपालिका आणि नगर विकास विभागाने एक संयुक्त बैठक घेऊन जे विकासक शासनाच्या नियमांचे पालन करणार नाहीत त्यांना बांधकामाची परवानगी नाकारुन ब्लॅक लिस्टेड करण्याबाबत निर्णय घेणार काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, आज मुंबई शहरात मोठ्या प्रमाणावर इमारतींची बांधकामे सुरु आहेत. बांधकामामुळे होणाऱ्या प्रदूषणामुळे मलेरियासारखे रोग फैलावत आहेत. गेल्या वर्षभरात देशात आणि मुंबई शहरात मलेरिया रोगामुळे अनेक व्यक्तींचा मृत्यू झालेला आहे. यासंबंधी मी दोन महिन्यापूर्वी मंत्रालयात मुंबई महानगरपालिका आणि नगर विकास विभागाच्या अधिकाऱ्यांची एक बैठक घेतली होती. या बैठकीत असा निर्णय घेण्यात आला होता की, विकासकाला आय.ओ.डी.देताना मलेरिया लार्वा ट्रीटमेंट करण्याची अट घालण्यात यावी. यापूर्वी अशी अट घालण्यात आली नव्हती. दोन दिवसापूर्वी विधानसभेत हा प्रश्न चर्चेसाठी आला होता. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने ब्रिफींग घेताना मला असे कळले की, मुंबई शहरात अडीच हजार इमारतींची बांधकामे सुरु आहेत. परंतु यातील फक्त दोन टक्के विकासकांनी मलेरिया लार्वा ट्रीटमेंटचा कार्यक्रम हाती घेतला आहे. आता महानगरपालिकेने कंत्राटी पध्दतीने मलेरिया लार्वा ट्रीटमेंटचा कार्यक्रम हाती घेतला आहे. यासाठी जो काही खर्च येईल तो विकासकांकडून घेण्यात येणार आहे.. इमारत बांधकामाच्या ठिकाणी 100 ते 150 मजूर काम करीत असतात. ते बांधकामाच्या ठिकाणी राहतात, तिथेच जेवतात. त्यांच्यासाठी वेगळी शौचालयाची व्यवस्था नसते. तेव्हा बांधकामाच्या ठिकाणी काम करणाऱ्या मजुरांची दर 15 दिवसांनी रक्त चाचणी करण्यात येणार असून त्यांना हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ SBT/ KGS/ KTG/ ST/ प्रथम श्री.शिगम 15.30

श्री.सुरेश शेट्टी ...

मी प्रामाणिकपणाने आपल्याला सांगतो की, जे विकासक महानगरपालिकेला या कामामध्ये मदत करणार नाहीत, त्यांच्याविरुध्द कारवाई करावी लागेल अशा प्रकारची सूचना नगरविकास विभागामार्फत देण्यात येईल .

-------------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अंबरनाथमधील भेंडीपाडा येथील अंगणवाडीच्या
सकस आहारामध्ये आढळून आलेल्या अळया

मु.शी. : अंबरनाथमधील भेंडीपाडा येथील अंगणवाडीच्या सकस
आहारामध्ये आढळून आलेल्या अळयासंबंधी सर्वश्री सुभाष
भोईर, हुसेन दलवाई,राजन तेली,वि.प.स. यांनी दिलेली
लक्षवेधी सूचना

श्री.सुभाष भोईर ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

दिनांक 12 जून वा त्या सुमारास एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत, अंबरनाथ मधील शहरी भागातील नवीन भेंडीपाडा येथील अंगणवाडीतील 58 मुलांना दिलेल्या सकस आहारात (लापशी) अळया आढळून येणे, यामुळे विद्यार्थी व पालक यांच्यात पसरलेली घबराट व निर्माण झालेली असुरक्षितता अंगणवाडयांना देण्यात येणारा आहार सदोष असल्याच्या वारंवार निदर्शनास येणा-या घटना, अन्न पुरवठा करणा-या संघटनांवर अत्यंत कडक स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व कारवाई "

प्रा.फौजिया खान ( महिला व बाल विकास राज्यमंत्री) :सभापतीमहोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्याना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

( प्रेस : कृपया सोबत जोडलेले निवेदन छापावे )

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष भोईर : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात असे म्हटले आहे की, आहाराचा पुरवठा केलेल्या भांडयामध्ये अंगणवाडी सेविकेला एक अळी आढळून आली. पुरवठयासाठी उपलब्ध केलेल्या आहाराचा पंचनामा करुन कनिष्ठ वैज्ञानिक सार्वजनिक आरोग्य प्रयोग शाळा कोकण भवन, नवीन मुंबई येथील प्रयोग शाळेत नमुना पाठविला असून प्रयोगशाळेचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे." यावरुन लहान मुलांच्या आहाराच्या बाबतीत शासन किती गांभीर्याने पाठपुरावा करीत आहे, हे आपल्या लक्षात येईल.

सभापती महोदय, अंगणवाडयांना पोषण आहाराचा पुरवठा करण्याचे ठेके महिला बचत गटांना दिलेले आहेत. परंतु त्यांच्याकडून उप ठेकेदाराला ठेके देण्यात आलेले आहेत व ते अयोग्य ठिकाणी आहार तयार करीत असतात, अशी माझी माहिती आहे. तेव्हा अशा प्रकारे पोषण आहार पुरविण्याच्या बाबतीत ज्या महिला बचत गटांना ठेका दिलेला आहे परंतु ते उप ठेकेदाराला काम देतात आणि स्वत: काम करीत नाहीत त्याच्याविरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, हा विषय सन्माननीय सदस्यांना पूर्णपणे माहीत नाही असे दिसते. अंबरनाथमधील नवीन भेंडीपाडा येथील 82 क्रमांकच्या अंगणवाडीमध्ये सातेरी भगवती स्वयंसहाय्यता महिला बचत गटाच्या मार्फत तसेच इतर आठ अंगणवाडयांना पूरक पोषण आहाराचा पुरवठा करण्यात येतो. शनिवार दिनांक 12.6.2010 रोजी तेथे सीडीपीओ, अंगणवाडी मदतनीस वा सुपरवायझर नव्हती. त्यावेळी तेथील एका अंगणवाडी सेविकेला एक अळी आढळून आली, असे समजल्यानंतर दहा मिनिटात तेथे मिडियाचे प्रतिनिधी पोहोचले. त्यामुळे सातेरी भगवती स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे पदाधिकारी घाबरले आणि त्यांनी स्वत: होऊन असे पत्र दिले की, या कामाचा ठेका आम्हाला नको. त्याचबरोबर बाकीच्या सात ठिकाणचा ठेकासुध्दा त्यांनी बंद कला. त्या ठिकाणचा नमुना प्रयोगशाळेमध्ये तपासणी करण्यासाठी पाठविण्यात आला आहे. हा प्रकार संशयास्पद असावा, असे मला वाटते. या महिला बचत गटाकडील काम कुलस्वामिनी नावाच्या दुस-या बचत गटाकडे देण्यात आला आहे. मला येथे असे सांगावयाचे आहे की, प्रयोगशाळेकडून जेव्हा रिपोर्ट येईल, त्यानंतर या सबंधीची चौकशी केली जाईल आणि हेतूपुरस्सरपणे जर कोणी हा प्रकार केला असेल तर संबंधित अंगणवाडी सेविकेच्या विरुध्द

..4...

प्रा.फौजिया खान ......

जबाबदारी निश्चित करण्यात येईल. तसेच  असे प्रकार पुन्हा होऊ नयेत, यासाठी सर्व स्वयंसहाय्यता बचत गट अंगणवाडयांना पोषं्ण आहार पुरवितात त्यांच्यासाठी महिला व बाल कल्याण विभागाच्या मार्फत स्पष्ट मार्गदर्शक तत्वे देणे गरजेचे आहे. त्या ठिकाणचे स्वयंपाक घर कसे असावे ,त्यांचे सॅनिटेशन, क्लिननेस कशी ठेवावी यासंबंधीची एक चेकलिस्ट देऊन सीडीपीओ यांच्या माध्यमातून त्यासबंधी नियमितपणे तपासणी करणे आवश्यक आहे. आज देखील ही तपासणी होत आहे, परंतु त्याबाबतीत गाईडलाईन देण्याचे काम या विभागामार्फत केले जाणार आहे.

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय,...

**उपसभापती** : या लक्षवेधी सूचनेवर बरीच चर्चा झालेली आहे, आता मी विशेष उल्लेखाच्या सूचना घेत आहे. सभागृहाचे कामकाज तपासून पाहिल्यास आपणास सभागृहामध्ये जास्तीत जास्त बोलण्याची संधी दिलेली आहे. एका अळीने सभागृहाचा एवढा वेळ घेतला असल्यामुळे आळीपाळीने आपण सुध्दा सभागृहाचा वेळ घ्यायला लागला आहात.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी या सभागृहामध्ये शांत बसण्यासाठी आलेली नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ. नीलमताई गोऱ्हे या सभागृहामध्ये विविध प्रश्न मांडून सभागृहाच्या कामकाजामध्ये भाग घेतात. त्यांनी मांडलेल्या विविध विषयांचा वृत्तांत दूरदर्शनवर दाखविला जात असल्यामुळे या सभागृहामध्ये झालेले कामकाज महाराष्ट्रातील जनतेला समजते. त्यामुळे त्यांचा अधिकार त्यांना दिला पाहिजे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी केलेल्या स्टेटमेंटबद्दल माझे काहीही म्हणणे नाही. परंतु बऱ्याच वेळा आपलेही मुखदर्शन वेगवेगळया वाहिन्यांवरुन जनतेला होत असते याची आपण नोंद घ्यावी.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## विशेष उल्लेख

**पृ. शी.** : शासनाने शेतकऱ्यांच्या गट मोजणी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ

**मु. शी.** : शासनाने शेतकऱ्यांच्या गट मोजणी फीमध्ये केलेली भरमसाठ वाढ याबाबत श्री.चंद्रकांत पाटील,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदय, "शासनाने शेतकऱ्यांचे गट मोजणीसाठी मोजणी फीमध्ये फेब्रुवारी 2010 पासून जबरदस्त वाढ करणे, एक गट मोजताना तातडीची फी रु.2000/- केली असणे (पूर्वीचा दर रु.1000/-) साधी मोजणी दर रु.1000/- (पूर्वीचा दर रु.500/-) परंतु साधी मोजणी 2-3 वर्षे होत नसणे, विशेषत: वाटपाच्या दाव्यात 8 ते 10 गट असताना त्यामुळे वाटप करुन घेताना 20 ते 25 हजार रुपये खर्च करावे लागणे, तसेच भूमी अभिलेख यांचे कार्यालयातून मिळणाऱ्या सिटी सर्व्हेचे नकाशे, उतारे, गटाचे खाते उतारे यासाठी भरमसाठ दरवाढ केलेली असणे, तसेच दुय्यम निबंधक कार्यालय यांचेकडून कॉम्प्युटराईज्ड खरेदी पत्राच्या दस्त्याच्या नकलेस प्रती पानास 18 रुपये एवढा दर आकारला जाणे, म्हणजे एका दस्त्याच्या नकलेस 350 ते 400 रुपये खर्च येणे, मात्र ही दरवाढ 7-8 वर्षापूर्वीची असणे, तरी या दरवाढीने शेतकरी व सामान्यवर्ग भरडला जात असणे, या दरवाढीस कोणतेही लॉजीक नाही. 10 टक्के-20 टक्के अशी वाढ न करता शासनाने एकदम दुप्पट, चौपट, पाचपट अशी वाढ केलेली असणे, तरी शासनाने याकडे लक्ष देऊन ही दरवाढ कमी करण्याची नितांत आवश्यकता व तातडीने करावयाची कारवाई. अशाप्रकारे शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाच्या असलेल्या विषयाकडे या विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो."

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : ऊसतोड कामगारांनी ऊस तोडणी दरामध्ये वाढ करण्याची केलेली मागणी

**मु. शी.** : ऊसतोड कामगारांनी ऊस तोडणी दरामध्ये वाढ करण्याची केलेली मागणी याबाबत ॲड. उषा दराडे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्या ॲड. उषा दराडे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडते.

सभापती महोदय, "बीड जिल्हयातून दरवर्षी हजारो कामगार राज्यातील इतर कारखान्यावर ऊसतोड मजूर म्हणून कामासाठी जातात. महागाई निर्देशांक वाढल्यामुळे साखर कारखान्यांकडून मिळणाऱ्या पूर्वीच्या दराने ऊस तोडणी करणे ऊसतोड कामगारांना परवडणार नाही. कामगारांच्या खालील मागण्या आहेत.

चालू गळीत हंगामापासून प्रत्येक साखर कारखान्याने कामगारांना टनामागे रु.250/- वाढवून द्यावेत. ऊसतोड मुकादमांना 25% कमिशन देण्यात यावे. कामगारांना सन 2004 ते 2009 पर्यंत बिलाप्रमाणे फरक देण्यात यावा. ऊसतोड कामगारांच्या मुलांकरिता साखर शाळा सुरु कराव्यात. ऊसतोड कामगारांचा तीन लाख रुपयापर्यंत विमा उतरविण्यात यावा. ही विम्याची रक्कम राज्य व केंद्र सरकारने भरावी. या सर्व मागण्यांवर शासनाने तातडीने उपाय योजना करावी अशी विशेष उल्लेखाव्दारे मी सूचना करते."

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विजयदुर्ग किल्ल्याची पश्चिमेकडील तटबंदी ढासळणे

**मु. शी.** :विजयदुर्ग किल्ल्यची पश्चिमेकडील तटबंदी ढासळणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "शिवरायांच्या आरमाराची प्रचिती देणारा व ऐतिहासिक 800 वर्षापेक्षा अधिक काळ भक्कमपणे उभा असलेल्या विजयदुर्ग किल्ल्याची पश्चिमेकडील तटबंदी ढासळू लागल्याने विजयदुर्गवासियांमध्ये तसेच इतिहास प्रेमी नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले आहे.

सन 2005 मध्ये विजयदुर्गवासियांनी विजयदुर्ग किल्ल्याच्या अष्टशताब्दी वर्षानिमित्त महोत्सव आयोजित करुन, या किल्ल्याची महती देशवासियांनाच नव्हे तर पाश्चात्य देशापर्यंत पोहोचविली होती. त्याच ऐतिहासिक विजयदुर्ग किल्ल्याकडे पुरातत्व खाते व शासन दुर्लक्ष करीत असल्याने पुरातत्व खात्याचा कारभार पुणे येथून चालत असल्याने कोकणामधील या किल्ल्याकडे दुर्लक्ष होत आहे. विजयदुर्ग किल्ल्याच्या पश्चिमेकडील तटबंदीच्या भागावर अरबी समुद्राच्या लाटा, जोरदार धडकत असल्याने या तटबंदीचा मोठा भाग गेल्या सोमवारी खाली पडून मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे.

शेकडो वर्षे मराठी आरमाराची व शिवछत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याची गाथा सांगणाऱ्या या किल्ल्याच्या पडझडीबाबत शासनाने त्वरीत दखल घ्यावी याकडे विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधीत आहे".

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : दहिसर, मुंबई येथील संतोषनगर झोपडपट्टीवासियांना सुविधा पुरविण्याकडे मुंबई महानगरपालिकेचे झालेले दुर्लक्ष

**मु. शी.** : दहिसर, मुंबई येथील संतोषनगर झोपडपट्टीवासियांना सुविधा पुरविण्याकडे मुंबई महानगरपालिकेचे झालेले दुर्लक्ष याबाबत श्री. दिवाकर रावते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

सभापती महोदय, "संतोषनगर, दहिसर पूर्व, मुंबई येथील झोपडपट्टीत राहणाऱ्या रहिवाश्यांना मुंबई महानगरपालिकेतर्फे कोणतीही प्राथमिक सुविधा देण्यात येत नाही, शौचालयाची अतिशय दुरवस्था असणे, त्यामध्ये पश्चिम द्रुतगती महामार्गाची उंची वाढविल्यामुळे झोपडयांमध्ये पाणी शिरायला लागले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

सभापती महोदय, यांना सुविधा न मिळण्याचे कारण ही झोपडपट्टी अजून गलिच्छवस्ती म्हणून जाहीर करण्याचे राहिले आहे. गेले सात ते आठ वर्षे झाली ती गलिच्छवस्ती होण्याकरिता सर्व झोपडपट्टीधारक प्रयत्न करीत आहेत. उपजिल्हाधिकारी, बारिवली यांनी सदर झोपड्यांचे दोन वेळा सर्व्हेक्षण करुन गलिच्छवस्ती म्हणून ही झोपडपट्टी जाहीर करण्याबाबतचा अहवाल पाठविला आहे. सदरहू अहवालावर गेल्या चार वर्षापासून कोणतीही कार्यवाही न होणे, नियोजित गृहनिर्माण संस्थेचे पदाधिकारी व सदस्य यांनी वारंवार पाठपुरावा करुनही सदर झोपडपट्टी अद्यापही गलिच्छवस्ती म्हणून जाहीर न करणे, झोपडपट्टीवासियांमध्ये असलेली असंतोषाची तीव्र भावना. सभापती महोदय, या झोपडपट्टीधारकांना आहे तेथे राहता येत नाही आणि ती गलिच्छवस्ती जाहीर न झाल्यामुळे विकासही होत नाही अशा दुहेरी कात्रीमध्ये सर्व झोपडपट्टीधारक सापडलेले आहेत. या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी अशी विनंती करतो की, गेल्या चार-पाच वर्षापासून जिल्हाधिकाऱ्यांनी जो प्रस्ताव मंजूर करुन पाठविलेला आहे त्याला तातडीने मान्यता देण्यात यावी आणि या झोपडपट्टीधारकांना या यातनेतून सोडविण्यात यावे. धन्यवाद.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ ST/ 14:45

**पृ. शी.** : देवगड तालुक्यातील तांबळडेग व मिठबाव येथील अधिग्रहण करण्यात आलेल्या जमिनी मूळ मालकांना परत करणे

**मु. शी.** : देवगड तालुक्यातील तांबळडेग व मिठबाव येथील अधिग्रहण करण्यात आलेली जमिनी मूळ मालकांना परत करण्याबाबत श्री. किरण पावसकर वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचन

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूचना मांडतो.

"देवगड तालुक्यातील तांबळडेग व मिठबाव येथील समुद्रकिनाऱ्यांची सुमारे 160 एकर जमीन सरकारने 1990 च्या दशकात पर्यटनाच्या विकासासाठी एमटीडीसीच्या माध्यमातून अधिग्रहण करण्यास सुरुवात केली होती. एमटीडीसीच्या नावाखाली नंतर या जमिनी मोठया पंचतारांकित हॉटेलांच्या ताब्यात देण्याच्या हालचाली सुरु झाल्या. याकामी ओबेरॉय हॉटेल ग्रुपनेही पुढाकार घेतल्याचे स्पष्ट झाले होते. परंतु आजपर्यंत या ठिकाणी पर्यटनाच्या कोणत्याही हालचाली झाल्या नसल्याने, तसेच सरकारने 1992-93 च्या अधिग्रहणाच्या वेळी जमिनीची मोजणी, नकाशे याबाबतीत सर्व नियम धाब्यावर बसवून अधिग्रहणाच्या सर्व 11 प्रक्रिया पूर्ण केल्या. या सर्व प्रक्रियांमध्ये ग्रामस्थांना अंधारात ठेवले गेले व बऱ्याच अंशी ग्रामस्थांनी जमिनीचे पैसेही घेतलेले नसून, याच प्रकरणासारखे सध्या रायगड येथील एका जमीन अधिग्रहण खटल्यात सरकारने मूळ हेतूसाठी घेतलेल्या जमिनीचा गेली दहा वर्षे काहीच हालचाल न केल्यामुळे त्या मूळ मालकांना परत कराव्यात या निर्णयाचा आधार घेत या देवगड तालुक्यातील शेतकऱ्यांनी आपलीही 160 एकर जमीन कुठच्याही पर्यटनासाठी मागचे वीस वर्षे न वापरल्यामुळे किंवा त्यावर कुठचेही प्लॅनिंग नसल्यामुळे त्या जमिनी आपल्यालाही पुन्हा परत मिळाव्यात अशी मागणी केलेली आहे याकडे मी या शासनाचे लक्ष वेधीत आहे.

---

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** :सन 1993 ते 2000 या दरम्यानच्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वयाची अट शिथिल करुन त्यांना सेवेत समावून घेणे.

**मु. शी.** :सन 1993 ते 2000 या दरम्यानच्या पदवीधर अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या वयाची अट शिथिल करुन त्यांना सेवेत सामावून घेण्यायाबाबत श्री.भगवान साळुंखे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

"राज्य शासनाने 1993 ते 2000 च्या दरम्यान राज्यातील सुमारे 17 हजार पदवीधरांना अंशकालीन कर्मचारी म्हणून तीन-चार वर्षे अल्पस्वल्प वेतनावर राबवून घेतलेले आहे. त्यानंतर त्यांना सेवेत प्रधान्यांने सामावून घेण्याचे आश्वासन देऊन देखील अद्याप त्यांना न्याय दिलेला नाही. हे कर्मचारी सोमवार,दि. 19-7-2010 पासून आझाद मैदानावर ठिय्या आंदोलन करीत आहेत. त्यांची वयाची अट शिथिल करुन सेवेत थेट सामावून घ्यावे अशी त्यांची मागणी आहे. शासनाने त्यांच्या अंदोलनाची अद्याप दखल घेतलेली नाही. मी या निवेदनाद्वारे शासनाला अशी विनंती करतो की, किमान त्यांच्याशी वाटाघाटी कराव्यात आणि त्यांना न्याय द्यावा.

----

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : विकासकाकडून फ्लॅटधारकांची व हौसिंग सोसायटयांमध्ये राहणाऱ्या जनतेची होणारी फसवणूक.

**मु. शी.** : विकासकाकडून फ्लॅटधारकांची व हौसिंग सोसायटयांमध्ये राहणाऱ्या जनतेची होणारी फसवणूक याबाबाबत श्री. संजय केळकर,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी विशेष उल्ले□संबंधीची सूचाा दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. संजय केळकर ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूचना मांडतो.

" लोकसंख्येचा विचार केल्यास मुंबईनंतर प्रचंड नागरिकरण झालेला असा ठाणे जिल्हा आहे. नागरिकरणाबरोबर शहरातील परिसरात हौसिंग सोसायट्या, बंगलेधारक, फ्लॅट ओनर्स लोकांची संख्याही प्रचंड प्रमाणात वाढत आहे. विकासकाकडून असंघटित अशा फ्लॅट ओनर्स तसेच हौसिंग सोसायट्यांमध्ये राहणाऱ्या जनतेची फसवणूक होण्याचे प्रमाणही वाढलेले आहे. एकदा ताबा दिल्यावर विकासकाचे या बाबींकडे होणारे दुर्लक्ष तसेच विकासकांच्या आशीर्वादाने सोसायटी, फ्लॅट परिसरात अतिक्रमण होणे तसेच अभिहस्तांतरण न करणे ज्यामुळे फ्लॅटची,गाळ्याची किंवा सोसायटीमधील घरांची मालकी सभासदांची परंतु सदर बिल्डीग ज्या जागेवर उभी आहे तिची मालकी मूळ मालकाची अथवा विकासकाची यातून भविष्यात प्रश्न निर्माण होणार आहेत. फ्लॅट विक्री करारात मान्य केलेल्या अनेक बाबी बिल्डर अपूर्ण सोडतात व फ्लॅटधारकांची फसवणूक होते. यावर उपाय म्हणून महापालिकेने फ्लॅट मंजूर करताना त्या विकासकांच्या पूर्ण बांधकामाची माहिती, त्याने बांधलेल्या बिल्डींगमध्ये स्थापन सोसायटींचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करणे, त्याच्यावर अनिवार्य करावे तसेच पूर्ण बांधकामात काही अपूर्णता राहिल्यास कायद्यातील तरतुदींचा भंग समजून त्यांच्यावर कारवाई करावी, तसेच संस्था स्थापनेच्या वेळेस अभिहस्तांतरण (कन्व्हेअन्स डीड) झाले नसल्यास विकासकाच्या नवीन फ्लॅटला महापालिकेने मंजुरी देऊ नये. सदर विषय महत्वाचा असल्याने तो मी आज सभागृहात विशेष उल्लेखाव्दारे उपस्थित करीत आहे.

---

यानंतर श्री. बरवड....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : माथेरान येथे पर्यटकांचा झालेला मृत्यू

**मु. शी.** : माथेरान येथे पर्यटकांचा झालेला मृत्यू याबाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" दिनांक 3 एप्रिल, 2010 रोजी माथेरान येथील थंड हवेच्या ठिकाणी पर्यटनाच्या स्थळी गेलेले जोडपे व बायकोची 22 वर्षीय मैत्रीण गेली सायंकाळी 6 वाजण्याच्या दरम्यान वन ट्री हिल या पॉईंटवर पोहोचले असता व हसत-खेळत पॉईंटची पाहणी करीत असताना तीनही पर्यटक तोल जाऊन दरीत पडणे, सदर पर्यटकांपैकी नवरा व बायकोची मैत्रीण यांचा जागीच मृत्यू होणे, तर बायको गंभीर जखमी होणे, जखमी पर्यटक महिलेने दूरध्वनी करुन नातेवाईकांशी संपर्क साधून झालेल्या घटनेचा वृत्तांत देण्यात येणे, मात्र पर्यटनस्थळी सुरक्षेची कोणतीच उपाययोजना करण्यात न येणे, मृत पर्यटकांच्या कुटुंबियांना तसेच जखमींना कोणतीच मदत न मिळणे, त्यामुळे पर्यटकात पसरलेला असंतोष व चिडीची भावना, याबाबत शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया"

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सर्वच पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांचे मृत्यू वाढत आहेत. त्या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेची योग्य ती काळजी घेतली जात नाही. त्यादृष्टीने मी या अत्यंत महत्वाच्या विषयाच्या संदर्भात आपल्या परवानगीने हा विशेष उल्लेख केलेला आहे.

----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ. शी.** : नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात औषधांचा निर्माण झालेला तुटवडा

**मु. शी.** : नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात औषधांचा निर्माण झालेला तुटवडा याबाबत श्री. हेमंत टकले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : मा□□□य सदस्य श्री. हेमंत टकले यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री. हेमंत टकले ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"नागपूर येथील इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात औषधांचा निर्माण झालेला तुटवडा, तेथ्ील रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन औषधे खरेदी करण्याची करण्यात आलेली सक्ती, गरीब रुग्णांच्या नातेवाईकांना बाहेरुन औषधे आणण्याची क्षमता नसल्यामुळे रुग्णांवर होत असलेले विपरित परिणाम, त्यामुळे रुग्णांमध्ये व नाईवाईकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, सध्या नागपूरमध्ये पावसाळ्यात विविध साथीच्या रोगांचा फैलाव होत असल्यामुळे इंदिरा गांधी शासकीय रुग्णालयात पुरेशा प्रमाणात औषधांचा साठा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यातील कुटुंब कल्याण संस्थेला देण्यात येणारे अनुदान प्राप्त न होणे

**मु. शी.** : राज्यातील कुटुंब कल्याण संस्थेला देण्यात येणारे अनुदान प्राप्त न होणे याबाबत श्री. मोहन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासंबंधीची सूचना मांडतो.

" राज्यातील कुटुंब कल्याण संस्थेला देण्यात येणारे अनुदान प्राप्त झाले नसल्याने राज्यातील सुमारे 100 ते 250 कर्मचाऱ्यांचे सुमारे गेल्या सहा वर्षापासून वेतन थकले आहे. तसेच या कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्याही अद्याप प्रलंबित आहेत. अनुदान प्राप्त झाले नसल्याने कुटुंब कल्याण संस्था आर्थिक संकटात आल्या आहेत. त्यामुळे अनेक संस्था गेल्या वर्षापासून बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. सन 2004 पासून कुटुंब कल्याण कर्मचाऱ्यांसाठी संस्थांना देण्यात येणारे अनुदान राज्य शासनाकडून थकले आहे. त्याचे प्रस्ताव मंत्रालयाकडे पाठविण्याचे आदेश असतानाही शासकीय कार्यालयातील लालफितीत अडकले असल्याने कर्मचारी वेतनापासून वंचित राहिले आहेत व त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अतिशय खालावली असून त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशा अतिशय महत्वाच्या व गंभीर विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

---

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचा मुद्दा

**उपसभापती** : सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी मागितलेली आहे. त्यांनी आपला औचित्याचा मुद्दा मांडावा.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. काल आषाढी एकादशी होती. पंढरपूरला संपूर्ण् राज्यातील लोक दूरवरुन पायी येत असतात. आपले लोकप्रतिनिधी सुध्दा त्या ठिकाणी जात असतात. माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते त्या ठिकाणी विठ्ठलाची महापूजा होते. त्या महापूजेला मंत्री, खासदार, आमदार तसेच बाहेरच्या राज्याचे माजी मुख्यमंत्री सुध्दा उपस्थित असतात. आम्ही गेली 15-20 वर्षे त्या वारीला जात असतो. यावेळेला 6 दिवस आधी आमचा कार्यक्रम त्या ठिकाणी पाठविलेला होता. शेवटच्या दिवशी ज्या वेळेला माझ्या कार्यालयातून तेथील आरडीसीला फोन गेला त्यावेळी तेथील आरडीसीच्या पी.ए.ने सांगितले की, प्रोटोकॉलमध्ये तुम्ही कोठेही बसत नाही. तशा प्रकारचे परिपत्रक नाही. त्यामुळे तेथील सुटमध्ये मला तुम्हाला आरक्षण देता आले नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

त्यांनी नम्रपणे सांगितले. त्यांनी कोणतीही अरेरावी केली नाही. मी ज्यावेळी तेथे पोहोचलो त्यावेळी मंत्र्यांच्या पी.ए.साठी एक ऑर्डिनरी सूट दिला होता त्याच्या बाजूच्या सुटमध्ये तुम्हाला रहावे लागेल असे मला त्यांनी सांगितले. विधानसभेचे माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे यांनी आधीच एका हॉटेलमध्ये राहण्याचे स्वत: बुकिंग करुन ठेवले होते, ते दरवर्षीच करतात. परंतु आरडीसीने अशाप्रकारचे उत्तर दिले आहे. आतापर्यंत अडचण आली नाही. त्यांनी मला असे उत्तर दिल्यानंतर मी त्यांच्याकडून जी.आर.मागविला. दिनांक 24 मे, 2010 रोजीचा हा सुधारित जी.आर.आहे. पत्रकारांसाठी सरकारने हा सुधारित जी.आर.काढला आहे. त्यामधील क्रम पुढील प्रमाणे आहेत, 1) महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल, 2) मुख्यमंत्री 3) विधानपरिषदेचे सभापती, विधानसभेचे अध्यक्ष, उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती 4) लोकायुक्त 5) मंत्री 6) उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती 7) विधानपरिषदेचे उपसभापती व विधानसभेचे उपाध्यक्ष 8) राज्यमंत्री 9) विधिमंडळांच्या समित्यांचे सभासद 10) लोकप्रतिनिधी खासदार व आमदार 11) राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी 12) केंद्र शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी व कर्मचारी 13) राज्य शासनाचे कामावर नसताना येणारे अधिकारी व कर्मचारी. म्हणजे अधिकारी कामावर नसले तरी त्यांचा यामध्ये क्रम लावण्यात आला आहे. 14) इतर राज्य शासनाचे शासकीय कामानिमित्त दौ-यावर असणारे अधिकारी व कर्मचारी 15) माजी खासदार, आमदार, स्वातंत्र्य संग्राम सेनानी, राज्य शासनाचे सेवानिवृत्त अधिकारी 16) अधिस्वीकृत पत्रकार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राज्य शासनाचे पुरस्कारप्राप्त अपंग व गुणवंत कामगार, राज्य व केंद्र शासन पुरस्कारप्राप्त 17) खाजगी व्यक्ती. यामध्ये कोठेही विरोधी पक्ष नेत्याचा उल्लेख केलेला नाही. काही ठिकाणी अडचण येते, काही ठिकाणी येत नाही. परवा कोठेही प्रोटोकॉल पाळला गेला नाही. लायजनिंग ऑफिसर नाही, कोणी अधिकारी भेटण्यास तयार नाही, तुम्ही कोठे थांबलात, कोणत्या ठिकाणी थांबलात, दर्शनाला कसे जाणार आहे असे आम्हाला कोणीही विचारले नाही. विरोधी पक्ष नेत्यांना घटनात्मकदृष्या मिळालेले हे स्थान आहे. त्यामुळे त्यांचा दर्जा नेमका काय आहे, तो कोठे आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर....

या जी.आर.मध्ये मंत्र्यांचा उल्लेख आहे, त्यांच्याबरोबरच दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्ष नेते असे नमूद करावयास पाहिजे. यासंदर्भात स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. विरोधी पक्ष नेत्यांचे या राज्यात काही स्थान आहे की नाही ? घटनेद्वारे हे मिळालेले स्थान आहे, त्यामुळे प्रोटोकॉलमध्ये त्यांचा उल्लेख का नाही ? याबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांना बोलले पाहिजे आणि या जी.आर.मध्ये दुरुस्ती केली पाहिजे.

श्री.अशोक चव्हाण : सभापती महोदय, कालच आषाढी एकादशीच्या यात्रेनिमित्त आम्ही सर्वजण पंढरपूरला गेलो होतो. मी काल दक्षता घेतल्यामुळे दर्शनासाठी कोणालाही अडचण आली नाही. मागील वेळी अडचण आली होती म्हणून यावेळी मी काळजी घेतली होती हे मला सांगितले पाहिजे. त्यामुळे यासंबंधीची वृत्तपत्रात अशी बातमी आली की, मुख्यमंत्री आणि मानाचे प्रथम वारकरी यांच्याबरोबरच विरोधी पक्ष नेतेही होते. सर्वांनाच पांडुरंगाचे दर्शन व्हावे अशी आम्ही दक्षता घेतली होती. महाराष्ट्रामध्ये आम्ही दोघांनीही मिळून काम केले तर कोठेच अडचण येणार नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उल्लेख केलेला मुद्दा महत्वाचा आहे. पंढरपूरला रेस्ट हाऊसच कमी पडतात, ही वस्तुस्थिती आहे. पंढरपूरचे रेस्ट हाऊस लहान आहे. तेथे आषाढी एकादशीच्या निमित्ताने येणा-या व्हीआयपींची संख्या खूप आहे. मुख्यमंत्री, मंत्री हे आल्यानंतर तेथील अधिका-यांना कोणाला प्राधान्य द्यावे असा प्रश्न निर्माण होतो. त्यातून विनाकरण नाराजी निर्माण होते. कोणालाही हेतुपूरस्सर डावलण्याचा उद्देश नसतो.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. अशोक चव्हाण...

पंढरपूरला येणा-यांची संख्या मोठी आहे. तेथील सुटची संख्या वाढविण्याची आवश्यकता आहे. ते काम आम्ही तातडीने हाती घेणार आहोत. विश्रामगृहाचा विस्तार करुन अनेक लोकांना तेथे सामावून घेण्याचा आमचा प्रयत्न राहील. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी प्रोटोकॉलचा उल्लेख करुन त्यामध्ये विरोधी पक्षनेत्याचा उल्लेख नसल्याचे सांगितले. याबाबतीत निश्चितपणे लक्ष घातले जाईल आणि प्रोटोकॉल ऑर्डर पाळली जाईल.

**उपसभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.30वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.55 ते 4.30 मध्यंतर)

---

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मध्यंतरानंतर**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट मंत्री उपस्थित नाहीत, त्यामुळे सभागृहाची बैठक स्थगित करावी.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सभागृहामध्ये कॅबिनेट दर्जाचे मंत्री उपस्थित नसणे हे या सभागृहाच्या दृष्टीने शोभादायक नाही. आपण शासनाला ताकीद दिली पाहिजे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक दहा मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायंकाळी ४.३५ ते ४.४५ वाजेपर्यंत स्थगित झाली.)

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगिती नंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी )**

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**तालिका सभापती** : कार्यक्रम पत्रिकेवरील क्रमानुसार सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली नियम 97 अन्वये चर्चा पुढे ढकलण्यात आली आहे. आता विधेयके चर्चेला घेण्यात येतील.

श्री. दिवाकर रावते : महोदय, विरोधी पक्षाकडून आलेल्या अल्पकालीन चर्चेवर सभागृहात चर्चा होणार होती परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी विनंती केल्यानुसार ती चर्चा पुढे ढकलली असून ती चर्चा सोमवार, दिनांक 26 जुलै, 2010 रोजी घेण्याचे ठरले आहे. त्याऐवजी आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेला विरोधी पक्षाकडून आलेला दुसरा प्रस्ताव चर्चेसाठी घ्यावा, अशी आमची विनंती आहे. तसेच मागील अधिवेशनात विरोधी पक्षाकडील प्रस्ताव झाले नव्हते तसे आता होऊ नये म्हणून हा प्रस्ताव चर्चेसाठी घ्यावा, अशी मी सूचना करतो.

श्री. आर.आर.पाटील : महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेत क्रमाने दाखविलेली दोन्ही विधेयके आज सभागृहात पारित करावीत व त्यानंतर नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने दिलेला प्रस्ताव चर्चेला घ्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : दोन विधेयके घेण्यासाठी बराच वेळ लागेल.

श्री. आर.आर.पाटील : ठीक आहे, किमान एक विधेयक तरी चर्चेसाठी घ्यावे.

श्री. दिवाकर रावते : ठीक आहे, विधेयक क्र. 61 हे विधेयक आज चर्चेसाठी घ्यावे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी (सुधारणा) विधेयक

**L. A. BILL NO. LXI OF 2010.**

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LAND REVENUE CODE, 1966 AND THE MAHARASHTRA RESTORATION OF LANDS TO SCHEDULED TRIBES ACT, 1974)

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्य मंत्री) : महोदय, विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 61-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री. प्रकाश सोळंके : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 61-महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 यात आणखी सुधारणा करण्यासाठी हे विधेयक सभागृहात मान्यतेसाठी आणलेले आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, 1966 च्या कलम 36 मध्ये राज्यातील आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या कोणत्याही प्रकारच्या हस्तांतरणास निर्बंध घालण्यात आले आहेत. तसेच कलम 36 (अ) नुसार आदिवासी खातेदारांच्या जमिनीच्या हस्तांतरण शासनाच्या पूर्वपरवानगीने करण्याची तरतूद यामध्ये आहे. सदर अधिनियमाखाली करण्यात आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल नियम, 1975 मधील नियमानुसार अशा हस्तांतरणाला परवानगी दिली जाते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके .....

महाराष्ट्र अनुसूचित जाती जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, 1976 या कायद्यान्वये दिनांक 1.4.1957 ते 7.6.1974 या कलावधीमध्ये ज्या आदिवासी खातेदारांच्या जमिनीचे बिगर आदिवासी व्यक्तीकडे हस्तांतरण झाले असल्यास सदर जमीन मूळ आदिवासी खातेदार किंवा त्याचे वारसास प्रस्थापित करण्याची, अर्ज करण्याची मुदत 30 वर्षाची होती. ही मुदत दिनांक 6.7.2004 रोजी संपलेली होती. यामध्ये जी कायदेशीर तरतूद आहे त्या प्रमाणे जिल्हाधिका-यांना स्वत:हून ही प्रकरणे सुमोटो काढण्याचे अधिकार दिलेले होते. परंतु या प्रकरणामध्ये शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, मुदत संपली म्हणून अशी काही प्रकरणे जिल्हाधिकारी कार्यालयाने निकाली काढली होती. म्हणून मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार समितीची पंचेचाळिसावी बैठक दिनांक 15.7.2009 रोजी सहयाद्री अतिथीगृहात घेण्यात आली होती. जमीन हस्तांतरणाची मुदत 2004 मध्ये संपुष्टात आल्यामुळे ती पूर्वलक्षी प्रभावाने 30 वर्षे वाढवून द्यावी अशी चर्चा झाली व या चर्चेच्या अंती माननीय मुख्य मंत्रीमहोदयांनी सदर अधिनियमात पूर्वलक्षी प्रभावाने पुढील 30 वर्षासाठी मुदतवाढ देण्याचा प्रस्ताव करावा असे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे या प्रस्तावाला मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी मिळाल्यानंतर हे विधेयक चर्चेसाठी आलेले आहे. या ठिकाणी मला आपल्या निदर्शनास एकच गोष्ट आणून द्यावयाची आहे की, 1974 मधील तरतुदीनुसार आदिवासी जमातींना त्यांच्या जमिनी प्रत्यार्पित करण्यासंदर्भात 26,528 नोंदीत प्रकरणे होती त्यापैकी 16,628 प्रकरणामध्ये आदेश झाले आणि त्याप्रमाणे 24,430 हेक्टर जमिनी आदिवासींना प्रत्यार्पित करण्यात आलेल्या आहेत. आदिवासी लोकांच्या दृष्टिकोनातून, खातेदारांच्या दृष्टिकोनातून त्यांच्या जमिनीचे हस्तांतरण बिगर आदिवासी लोकांना होऊ नये यासाठी हा कायदा होणे गरजेचे आहे त्यामुळे मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, आपण या विधेयकाला पाठिंबा द्यावा व हे विधेयक संमत करावे.

प्रश्न प्रस्तुत झाला.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, उशिरा जाग कशी येते त्याचे हे विधेयक एक जिवंत उदाहरण आहे. आपले सरकार कस चालले आहे हे पाहण्याचे काम काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष श्री. माणिकराव ठाकरे यांचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. माणिकराव ठाकरे हे ज्या यवतमाळ जिल्हयातून येतात त्या यवतमाळ जिल्हयात 42 टक्के आदिवासी राहतात. मला आपल्याला एकच प्रश्न विचारावयाचा आहे की, वहिवाट आणि वहिवाटीतून हस्तांतर हा विषय महसूल विभागात येतो. आपण या बिलामध्ये आदिवासींसाठी पुन्हा 30 वर्षाची मुदतवाढ दिलेली आहे ती चांगली गोष्ट आहे. जमीन हस्तांतरणाची मुदत 2004 मध्ये संपुष्टात येणार आहे हे आपल्याला 2004 मध्ये, 2003 मध्ये सुध्दा समजले होते त्यामुळे या जागृत सरकारने ही मुदत संपण्याच्या अगोदरच्या अधिवेशनामध्ये हे विधेयक आणावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

काही कारणांमुळे राहून गेले असेल तर ठीक आहे. पण चार वर्षे आपल्याला जाग आली नाही. त्यामुळेच आता आपण हे विधेयक पूर्वलक्षी प्रभावासह आणले आहे. उशिराने विधेयक आणून हे विधेयक मंजूर करावे असे सरकार आता आम्हाला सांगते. म्हणजे शासनाला शेवटी शेवटी जाग आली आहे. म्हणून मला असे विचारावयाचे आहे की, याचे खापर आपण कुणावर तरी फोडणार आहात की नाही ? यास कोण जबाबदार आहेत ? आपण कायदे निर्माण केल्यानंतर प्रशासन यंत्रणा त्याची अंमलबजावणी करते. त्यामुळे याबाबत कोणाची तरी जबाबदारी असली पाहिजे की नाही ? माझे असे म्हणणे आहे की, शासनाचा कुठल्याही अधिकाऱ्यावर कसलाही दबाव नाही. बांधिलकी नाही. कुठल्याही अधिकाऱ्याला माझे उत्तरदायित्तव आहे असे वाटत नाही. याचे कारण आपण अधिकाऱ्यांकडून अनेक अनैतिक कामे करून घेतात. म्हणूनच ते अधिकारी आपल्याला घाबरत नाही. त्यामुळेच एक विचित्र अवस्था प्रशासकीय यंत्रणेमध्ये निर्माण झालेली आहे. विधेयकावर किती चर्चा करायची यावर सुद्धा आपण निर्बंध आणतात. ते चुकीचे आहे. कर्मचाऱ्यांच्या चौथ्या, पाचव्या, सहाव्या वेतन आयोगावर येथे चर्चा होते. तेव्हा सरकारला घाम फुटतो. त्यामुळे वेतन आयोग त्यांना द्यावा लागतो. नाही तर मग शासकीय कर्मचारी आंदोलन करतात. वेतन आयोग देण्याबद्दल दु:ख नाही. पण शासकीय अधिकारी कामाची जबाबदारी का पाळत नाही ? ही आमची व्यथा आहे.

"वहिवाटीचे हस्तांतरण झाल्याच्या दिनांकापासून तीस वर्षाच्या आत" या मजकुरा ऐवजी "6 जुलै 2004 पासून तीस वर्षाच्या आत" हा मजकूर दाखल करण्यात येणार आहे. यासाठी आदिवासीला अर्ज करावा लागणार आहे. मुळात येथे प्रश्न असा आहे की, आदिवासी अर्ज कसा काय करणार ? शेवटी शिक्षण हा एक महत्त्वाचा भाग आहे. त्यासाठी कोणती यंत्रणा उभी केली आहे ? आदिवासींना कोणते अधिकार दिले आहेत हे सांगण्यासाठी सरकारने यंत्रणा उभी केली आहे काय ? असल्यास, आनंद आहे. आदिवासींना त्यांचा हक्क देणे आज गरजेचे आहे. आदिवासी अज्ञानी आहे. वषानुवर्षे अशिक्षित आहे. त्यांच्या अशिक्षितपणाचा फायदा घेऊन हे वर्षानुवर्षे राहून गेले. वन जमिनींचा प्रश्न सुद्धा सोडविण्याचा प्रयत्न या शासनाने केला होता. हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते......

विषय शासनाच्य जाहीरनाम्यात देखील होता. पण त्यासंबंधातील विधेयक अजून आमच्या समोर आलेले नाही. आपण करणार नाही असे मी म्हणत नाही. आदिवासींसाठी आपण काही गोष्टी कबूल केल्या आहेत. आज त्या गोष्टींची त्यांना गरज आहे. हे विधेयक आणल्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. पण हे विधेयक त्यांनी उशिराने आणले आहे. उशिराने सुचलेले शहाणपण आहे. मंत्री बदलले, पण अधिकारी मात्र तेच आहेत. त्यामुळे कुणाची तरी जबाबदारी आहे की नाही ? सदर विधेयक विलंबाने का आले ? याची विचारणा आपण करणार की नाही ? कुठे तरी नियंत्रण होत नाही तो पर्यंत प्रशासन हलत नाही. शासनाच्या चांगल्या कामगिरीकरिता आम्ही बसलेलो नाही, तर खराब कामगिरी दाखविण्यासाठी आम्ही बसलेलो आहोत. आपण चांगले काम केले तर निश्चितपणे स्वागत करू. आदिवासी, भटक्या जमाती यांचा फायदा कसा होईल यासाठी आपण येथे झगडत असतो. उणीदुणी काढण्यासाठी सभागृहात येत नाही. येणाऱ्या सरकारला पुढच्या 30 वर्षांनी यात सुधारणा करण्याची आवश्यकता भासणार नाही एवढ्या क्षमतेने विधेयकातील तरतुदी अमलात आणाव्यात एवढीच विनंती करण्यासाठी मी उभा आहे. धन्यवाद.

.............

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्ष नेता): सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक येथे आणण्यात आले आहे.

ज्येष्ठ सन्मानीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे हे विधेयक आणण्यास उशीर झालेला आहे. खरे म्हणजे सन 2002 मध्ये त्याची मुदत संपली होती. असे असताना सन 2002 ते 2010 पर्यंत म्हणजे आठ वर्षाच्या कालावधीनंतर आता सुधारणा करण्यात येत आहे. सरकारने सुधारणा आणली ही चांगली बाब आहे. या विधेयकाला आमचा विरोध नाही. फक्त आक्षेप असण्याचे कारण म्हणजे या विधेयकाची मुदत सन 2002 मध्ये संपली असताना सन 2010 मध्ये सुधारणा करण्यात आली आहे. आदिवासींच्या जमिनी बळकविण्याचे प्रकार वर्षानुवर्षे सुरु आहेत. मधल्या आठ वर्षाच्या कालावधीत अनेक घडामोडी होऊन गेल्या. आदिवासी पट्टयामध्ये राहणाऱ्या आदिवासींच्या हजारो एकर जमिनी गिळंकृत करण्यात आल्या आहेत. मी आपणास नाशिक जिल्ह्यातील उदाहरण देतो. नाशिक जिल्ह्यातील आदिवासी पट्टयातील आदिवासींच्या हजारो एकर जमिनी उद्योगपतींनी हस्तांतरण करुन घेतल्या आहेत. परंतु त्याठिकाणी कोणत्याही प्रकारचे उद्योग सुरु केलेले नाहीत. असे प्रकार महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सुरु आहेत. आपण आता सुधारणा केल्यानंतर असे प्रकार होणार नाहीत. परंतु गेल्या आठ वर्षाच्या कालावधीत आदिवासींच्या जमिनी हस्तांतरीत झाल्या त्या त्यांना परत करण्यात येतील काय असा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे. सरकारने जर वेळीच सुधारणा आणली असती तर ही वेळ आली नसती. तेव्हा यापुढील कालावधीत अशाप्रकारची चूक होणार नाही याची काळजी सरकारने घ्यावी.

सभापती महोदय, आदिवासींवर वर्षानुवर्षे अन्याय होत आहे. त्याच्यापर्यंत कोणत्याही प्रकारच्या सोयीसुविधा पोहचत नाहीत. तो वर्षानुवर्षे दरिद्री अवस्थेमध्ये आहे. त्यांच्यामध्ये अज्ञान आहे आणि या अज्ञानाचा फायदा सरकारी अधिकारी, उद्योगपती, जमीनदार घेत असून ते आदिवासींची लूट करीत आहेत. आदिवासींना त्यांच्या हक्काच्या जमिनी मिळाल्या पाहिजेत. सरकारने आदिवासींना जे पट्टे दिले आहेत ते त्यांना मिळाले पाहिजेत अशी मागणी करुन माझे दोन शब्द पूर्ण करतो.

-------

..2.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त): सभापती महोदय, याठिकाणी सन 2010 चे वि.स.स. क्रमांक 61- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी (सुधारणा) विधेयक 2010 मांडण्यात आले आहे त्याचे मी अभिनंदन करतो आणि या विधेयकास पाठिंबा देतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासींच्या जमिनी मोठ्या प्रमाणावर गिळंकृत करण्यात आलेल्या आहेत. यामध्ये फक्त व्यावसायिक किंवा उद्योगपती आहेत असे नव्हे तर सर्व पक्षातील लोकांनी कब्जा करण्याचे काम केलेले आहे. आदिवासीची जमीन 30 वर्षापूर्वी हस्तांतरित झाली असेल आणि त्याने जिल्हाधिकारी यांचेकडे ती जमीन परत मिळण्यासाठी अर्ज केल्यास ती जमीन त्याच्या नावावर करावी अशी कायद्यात तरतूद आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नाशिक येथील उदाहरण दिले. मी आपणास ठाणे जिल्ह्यातील येऊर हिलचे उदाहरण देतो. येऊर हिल प्रकरण आपणा सर्वांना माहीत आहे. आदिवासींच्या जमिनी परत देण्याची सुरुवात आपण येऊर हिलपासून केली पाहिजे. तेथे आदिवासींच्या जमिनींवर मोठमोठे बंगले बांधलेले आहेत. सर्व पक्षाच्या लोकांनी आदिवासींच्या जमिनी घेतल्या आहेत.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड गुरुनाथ कुलकर्णी..

त्यामुळे " तेरी भी चूप आणि मेरी भी चूप "असे प्रकार सगळीकडे चालू आहेत. अशा पध्दतीने जर सगळीकडे कारभार चालू असेल तर ते बरोबर नाही. या ठिकाणी जे विधेयक मांडण्यात आलेले आहे, त्याचे मी समथर्न करतो. त्याचबरोबर एक चांगले विधेयक या सभागृहामध्ये आणण्याची वेळ या सभागृहामध्ये आपल्यावर आली असल्यामुळे मी माननीय मंत्रिमहोदयांचे देखील अभिनंदन करतो. या विधेयकावरील चर्चेच्या निमित्ताने मला माननीय मंत्रिमहोदयांना एक विनंती करावयाची आहे. ज्या ज्या ठिकाणी आदिवासींच्या जमिनी गिळंकृत करण्याचे प्रकार या राज्यात झालेले असतील त्या प्रकरणामध्ये या कायद्याचा बडगा दाखवून, येऊर येथील जमिनीसहित सर्व मूळ आदिवासींना जमिनी द्याव्यात. एखाद्या ठिकाणी अनधिकृतपणे जर झोपडपट्टी उभी राहिली तर त्या ठिकाणी बुलडोझर लावून झोपडपट्टी उद्ध्वस्त केली जाते. परंतु आदिवासींच्या जमिनी बळकावून बांधकाम केलेल्यांना मात्र सरक्षण दिले जाते. ठाणे वा अन्य ज्या ज्या ठिकाणी अनधिकृत बांधकाम करण्यात आले आहे, त्या ठिकाणी बुलडोझरचा वापर करुन ती बांधकामे पाडण्यात येतात. आपल्यामध्ये जर हिंमत असेल तर ठाण्यातील येऊर भागात असणारे सर्व बंगले बुलडोझर लावून जमीनदोस्त करावे आणि या जमिनी आदिवासींना देऊन टाकाव्यात. सभापती महोदय, या विधेयकाचे समथर्न करीत असतांना मी आताच सांगितल्याप्रमाणे, कार्यवाही करावी अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

--------------

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे ( महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा नियुक्त ) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि.क्रमांक 61 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी सुधारणा विधेयक 1974 या ठिकाणी मांडण्यात आलेले आहे. त्यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या विधेयकावर बोलत असतांना मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे. माननीय मंत्रिमहोदयांना आणि अन्य सान्माननीय सदस्यांना याची कल्पना असेल की, महाराष्ट्रात भूमिहीन आदिवासींचा लढा प्रचंड प्रमाणात झाला होता. कॉम्रेड गोदाताई परुळेकर यांचा गाजलेला अनुभव आहे, जेव्हा माणूस जागा होतो.... या लढयातून आदिवासींना जमिनी मिळाल्या होत्या. मात्र या कुळांना जमिनीचा हक्क मिळाल्यानंतर, त्यांचा हक्क पुन्हा काढून घेण्याचा फार मोठा धोका निर्माण होण्याची शक्यता होती. या आदिवासींचा लढा गेले वीस वर्षे ठाणे जिल्हयात, रायगड जिल्हयात आणि महाराष्ट्रात अन्य ठिकाणी सुरु होता . भूमिहीन हक्क संघर्ष समिती, त्याचबरोबर श्री.रावी भुस्कुटे हे अत्यंत अभ्यासू,लेखक आणि विचारवंत आहेत. त्यांनी आणि विधान सभा सदस्य श्री. विवेक पंडित व त्यांच्या अन्य कार्यकर्त्यांनी 1990 सालापासून आतापर्यत जवळजवळ 20 वर्षे ठाणे जिल्हयामध्ये आणि रायगड जिल्हयामध्ये शेकडो परिषदा आणि शेकडो आंदोलने केली आहेत. आदिवासींची जी मूळ जमीन आहे, ती जमीन आदिवासीना कूळ म्हणून मिळालेली आह. त्यामध्ये या कायद्याच्या संदर्भात अंमलबजाणी व्हावी, याकरिता अनेक आंदोलने झाली आहेत. सहा वर्षानंतर उशिरा का होईना, मात्र या सर्व जमिनी आदिवासींच्या ताब्यात रहाव्यात, या दृष्टीकोनातून हे विधेयक आणण्याचा जो निर्णय शासनाने घेतला आहे, तो निर्णय योग्य प्रकाराचा आहे, असे मला वाटते. परंतु एक दोन मुद्याच्या संदर्भात मला आपले लक्ष वेधावयाचे असल्यामुळे, मी या ठिकाणी ते मुद्दे मांडू इच्छिते.

सभापती महोदय, व्याकरणाच्या संदर्भात बोलावयाला माला आवडत नाही. परंतु भाषा सोपी असावी, असा आग्रह असतांना देखील या विधेयकात जमिनी प्रत्यार्पित " असा उल्लेख करण्यात आलेला आहे. या शब्दा ऐवजी " आदिवासीना जमिनी परत मिळण्यापासून " अशा प्रकारचे सोपे शब्द वापरावयास पाहिजे होते. हा कायदा आदिवासींसाठी करण्यात आला असल्यामुळे, त्यांना

..3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ ST/ 17:05

डॉ.नीलम गो-हे ......

समजेल अशी सोपी भाषा वापरणे आवश्यक आहे. या आदिवासींना जर हेच कळले नाही की, आपण कूळ होतो, आता आपण कुळाचे मालक झालो आहोत आणि आता मालकाचे कायम मालकच राहणार आहोत तर या विधेयकामुळे काहीही उपयोग होणार नाही. या सर्व गोष्टी आदिवासींपर्यंत पोहोचविण्याकरिता सोपी भाषा वापरली पाहिजे. आता आदिवासींच्या जमिनीच्या संदर्भात कायदा झ ााला आहे. यासबंधीची माहिती आदिवासी भागामध्ये काम करणा-या संघटना, आदिवासाी लोकप्रतिनिधी यांच्यापर्यत सुटसुटीतपणे आणि सोप्या पध्दतीने कसा पोहोचविला जाणार आहे, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. सभापती महोदय, गेल्या पाच सात वर्षामध्ये आदिवासी चळवळींचा जोर थोडा - फार मंदावलेला आहे. आता अनेक कार्यकर्त्यांची पिढी संपून गेली आहे. अनेक कार्यकर्ते आजारपणामुळे जर्जर झालेले आहेत. ठाणे आणि रायगड जिल्हयातील परिस्थिती तर अशी आहे की, अशा प्रकारच्या कायद्याची मागणी येथे काम करणाऱ्या लोकांनी अनेक वर्षे केली. या कायद्याची अंमलबजावणी झाल्यानंतर मधल्या सहा वर्षाच्या काळात मुदत संपली म्हणून कोणी तरी जमिनीवर कब्जा केला किंवा आपण मालक होतो म्हणून दुस-या आदिवासीलाच ती जमीन दिली असेल, अशा प्रकारच्या घटना ज्या ठिकाणी घडल्या असतील त्या घटनांचा आढावा शासन कशा प्रकारे घेणार आहे, असा प्रश्न मला माननीय मंत्रिमहोदयांना विचारावयाचा आहे. मी स्पष्टपणे बोलू इच्छिते की, यामध्ये आणखी एक भाग असून आदिवासींच्या काही आश्रमशाळा रायगड आणि ठाणे जिल्हयात हायवे लगत आहेत. माझ्या माहितीनुसार, त्यातील एका आश्रमशाळेकडे पाच ते दहा एकर जमीन होती.

यानंतर श्री. सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे...

परंतु या 10 एकर जमिनीला कोटयवधी रुपयांचा भाव आल्यानंतर काही लोकांनी एनजीओंचे नाव घेऊन त्या आश्रमशाळा विकत घेतल्या आहेत. त्या आदिवासी आश्रमशाळांतील शिक्षकांचा पगार आम्ही भागवू शकत नाही असे त्या संस्थांचे लोक सांगतात. ज्या लोकांनी ध्येयवादाने प्रेरित होऊन या आश्रमशाळा उभ्या केल्या त्यामध्ये श्री. प्रवीण पाटकर सारख्या कार्यकर्त्यांनी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. या आश्रमशाळा प्रामाणिकपणे शासनाच्या नियमाप्रमाणे चालवितांना त्या कशाप्रकारे पुढे चालवावयाच्या हा प्रश्न निर्माण झाला आहे. आज त्या आश्रमशाळांवर वेगवेगळया पध्दतीने लोकांकडून दबाव आणला जात आहे. या आश्रमशाळा हायवेलगत असल्यामुळे त्या आदिवासींच्या नावाने विकत घेण्यात येत आहेत. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हा कायदा करीत असतांना ज्या ज्याठिकाणी भूखंडाना भाव येत आहे, त्याठिकाणी खरा आदिवासी कशावरुन उभा केला जाईल?

सभापती महोदय, या विधेयकामध्ये संगणकीकरणाचा उल्लेख करण्यात आला आहे. जे मूळ आदिवासी होते त्या सर्वांची नोंदणी आपण संगणकावर केली आहे काय? भूमि अभिलेख्यामध्ये केली आहे काय? याठिकाणी भीमा वरठा नावाचा दुसरा आदिवासी उभा करुन तो मूळचा कूळ आहे, मूळचा आदिवासी आहे असे दाखविले जाईल. आज आपण संगणकावर 7/12 चे उतारे देत आहोत, दस्तावेजाची नोंदणी करण्याचे काम संगणकावर करीत असतांना त्याठिकाणी फोटो काढले जातात आपले अंगठयाचे ठसे घेतले जातात. त्यामध्ये हे बिल्डर किंवा कॉट्रॅक्टर त्याठिकाणी आदिवासीला उभा करीत असतांना तो मूळचा भीमा वरठा हा आदिवासी आहे की नाही, याची खात्री कोण देणार आहे? म्हणून याबाबतीत नियम बनवीत असतांना माननीय जिल्हाधिकाऱ्यांनी दक्षता घेतली पाहिजे की, त्या गावच्या आदिवासी समितीकडून किंवा त्याठिकाणी आदिवासींच्या हक्कांसाठी संघर्ष करणाऱ्या संघटनांच्या मदतीने मूळ कुळांची नावे पुन्हा त्यांच्याकडे गेलेली आहेत की नाहीत हे पहाणे आवश्यक आहे त्याकडे मला आपले लक्ष वेधावेसे वाटते.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा असा की, ठाणे जिल्हयाबरोबर महाराष्ट्राच्या अन्य भागात सुध्दा मूळ आदिवासींच्या हस्तांतरणासंदर्भातील कायदा आहे. तेथील आदिवासींकडेच मूळ राहिले पाहिजे. सभापती महोदय, तिसऱ्या मुद्यामध्ये आपण म्हटले आहे की, "जिल्हाधिकारी कालमर्यादा समाप्त झाल्याच्या सबबीखाली या अधिकारांचा वापर करत नाहीत आणि ती प्रकरणे निकालात काढत नाहीत," याचा अर्थ असा की,आपले अधिकारी जास्तीत जास्त टोकाला जाऊन कायद्याच्या



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे...

कक्षेमध्ये आदिवासींच्या हिताची भूमिका घेत नसतील तर आदिवासींच्या बाजूने आपली राजकीय इच्छाशक्ती उभी रहात नाही काय? याबाबत आपण या विधेयकामध्ये कबूली दिली आहे. आणि म्हणून आदिवासींच्या प्रश्नासाठी जिल्हाधिकारी काम करीत आहेत की नाही हे विभागीय आयुक्तांचे पहाण्याचे काम आहे. विभागीय आयुक्तांनी या संदर्भात सर्व जिल्हाधिकाऱ्यांचा आढावा घेऊन काही कारणांमुळे ज्याठिकाणी प्रकरणे प्रलंबित राहिली असतील, शेकडो आदिवासींनी आपले अर्ज वाजत गाजत जाऊन आमच्या या जमिनी आहेत अशाप्रकारे जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. त्या सर्व अर्जांचा रिव्हयू घेऊन मूळच्या आदिवासींनाच त्या जमिनी मिळाल्या पाहिजेत. त्याचे वाटप जिल्हाधिकाऱ्यांच्या कार्यालयात करण्याऐवजी मंत्रिमहोदयांनी गाव पातळीवर किंवा तालुका पातळीवर जनता दरबार घेऊन केले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून मूळच्या आदिवासींना त्या जमिनी मिळाल्या पाहिजेत यादृष्टीने आपण पावले उचलली पाहिजेत याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते. धन्यवाद.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि.स.वि. क्रमांक 61 ला पाठिंबा देण्यासाठी व शासनाचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे एक चांगले विधेयक असल्यामुळे त्याला विरोध करण्याची आवश्यकता नाही. या विधेयकाचे स्वागत करीत असतांना मी एका बाबीचा याठिकाणी उल्लेख करतो. या विधेयकाच्या उद्देश व कारणे यामधील शेवटच्या चार ओळीमध्ये "कोणत्याही अकृषिक प्रयोजनासाठी वापरात आणण्यात आली नसेल" म्हणजे जर अशी जमीन अकृषिक झाली असेल व ती अकृषिक केल्यानंतर त्यावर बांधकाम केले नाही, कारखाना उभा केला नाही, घर बांधले नाही, आश्रमशाळा बांधली नाही तर या जमिनीचे काय ? याबाबत स्पष्टपणे खुलासा झाला पाहिजे. जर ती जमीन अकृषिक असेल तर त्याठिकाणी हा कायदा लागू होतो की नाही ही महत्वाची बाब आहे. यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून कालमर्यादा संपण्याच्या सबबीखाली आपल्या अधिकाराचा गैरवापर करणार नाहीत यासाठी हे विधेयक आणले आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

त्याच प्रमाणे स्पोन्टेनिअसली आदिवासी शेतकऱ्याचा अर्ज नसताना देखील जिल्हाधिकारी ती कार्यवाही करु शकतील ही देखील या विधेयकात चांगली बाब मांडलेली आहे. अकृषिक जमिनीच्या संदर्भातील स्पष्टीकरण शासनाने द्यावे. जमीन अकृषिक होत नसेल तर हा कायदा बदलून अकृषिक जमिनीचे हस्तांतरण आदिवासींना देण्याच्या संदर्भात शासन विचार करील काय? सभापती महोदय, एवढेच दोन मुद्दे मला या ठिकाणी मांडावयाचे होते. धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय,अधिनियम,1974 मध्ये सुधारणा करण्यासाठी जे विधेयक या सभागृहासमोर आलेले आहे त्याचे निश्चितपणे स्वागत करावयास पाहिजे. हे विधेयक उशिरा आणलेले असले तरी ते आदिवासींच्या हिताचे आहे. या विधेयकाच्या संदर्भात मी दोनच मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय, ज्या ठिकाणी मोठया प्रमाणात नागरिकरण झालेले आहे आणि ज्या ठिकाणी आदिवासींच्या जमिनी आहेत त्या ठिकाणी जमिनी भोवतीच सगळया गोष्टी चाललेल्या आहेत. जमिनीचे घोटाळे असतील किंवा जमिनीच्या संदर्भातील गुन्हेगारी असेल ही आदिवासींच्या जमिनीच्या संदर्भात चाललेली आहे. ठाणे शहराच्या सबंधात सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी येऊरचा उल्लेख केला. येऊर येथील जमिनीचा विषय गेले 20 वर्षे गाजणारा विषय आहे. या ठिकाणी आदिवासींच्या नावावर बंगले आहेत ते दुसऱ्यांच्या नावावर झालेले नाहीत पण आदिवासी त्या ठिकाणी नोकर म्हणून काम करीत आहेत आणि धनदांडगे त्या परिसरात रहात आहेत. अशा परिस्थितीत शासन काय करणार आहे? ती जागा फिजिकली हस्तांतरीत झालेली असेली तरी कागदोपत्री हस्तांतरीत झालेली नाही त्या जागांचे काय होणार आहे?. ती जमीन आदिवासीची असताना सुध्दा त्यांना त्या ठिकाणी नोकर म्हणून दाखविण्यात आले आहे. अशा प्रकारची कायद्यातील पळवाट येऊरमध्ये बघायला मिळते.

सभापती महोदय, घोडबंदर या भागात मोठया प्रमाणात इमारती व बंगले झालेले आहेत. आदिवासींना धाकदपटशा दाखवून कागदोपत्री फेरफार करण्यात आलेले आहेत. सात/बाराच्या उताऱ्यावर अशा प्रकारचे फेरफार केल्याचे या आदिवासींना माहीत नाही. त्या ठिकाणचा तलाठी हेच सगळे उद्योग करीत असतो. त्याच्याकडे असलेले दुसरे काम करायचे सोडून तो बॅग घेऊन हेच काम करीत फिरत असतो. धनदांडग्यांना त्या ठिकाणी जमीन दाखवयची आणि आदिवासीकडून ती घ्यायची. त्यानंतर त्या आदिवासींना हप्त्या हप्त्याने पैसे देत रहायचे, उरलेले पैसे बुडवायचे असे सगळे प्रकार त्याठिकाणी चालू आहेत. सभापती महोदय, या ठिकाणी कायदा करण्यात येतो पण त्याची अंमलबजावणी होत नाही हा यामधील दोष आहे. आदिवासीच्या जमिनीच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांनी यादी लावली पाहिजे. आदिवासी शासनाकडे अर्ज घेऊन येणार नाही. त्याला याबाबतीत काहीही कळणार नाही. ते त्याला कोणी तरी जाऊन सांगावे लागेल, त्याला अर्ज लिहून द्यावा लागेल मग तो येईल. जिल्हाधिकारी कार्यालयाला याची माहिती आहे. म्हणून या बाबतीत





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर.....

स्वत: प्रशासनाने पुढाकार घेतला तर या कायद्याची खऱ्या अर्थाने अंमलबजावणी होईल आणि त्या भागातील आदिवासीला न्याय मिळू शकेल. म्हणून अंमलबजावणीच्या बाबतीत यामध्ये दुरुस्ती करावी आणि तशा प्रकारचे नियम करावेत एवढेच या निमित्ताने सांगतो. हा कायदा आवश्यक आहे. चांगला आहे. उशिरा का होईना पण आलेला आहे. आदिवासींच्या हिताकरिता आहे परंतु त्याची अंमलबजावणी निश्चितपणे कठोरपणे करणे आवश्यक आहे. एवढेच या निमित्ताने सांगतो. धन्यवाद.

----

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, या बिलाला समर्थन देत असताना काही मुद्दे मांडून आदिवासींना कशी मदत होईल याबद्दल आपल्याला विचार करावा लागेल. म्हणून मी महत्वाचे दोन मुद्दे या ठिकाणी मांडते. एका बाजूला नक्षलवादी चळवळीने जोर धरलेला असताना हे बिल आलेले आहे याचा आनंद आहे. पण हे करीत असताना ठाणे जिल्हा यामध्ये अग्रभागी आहे. आपण अहमदाबाद हायवेने जावयास निघतो त्यावेळी डहाणू, पालघर, तलासरी तसेच वसई विरार पासूनचा जो मधला भाग आहे त्या भागामध्ये कारगीच्या झोपड्या बांधून आदिवासी मंडळी राहात असल्याचे दिसते. त्या हायवेने जात असताना ज्या कारगीच्या झोपड्या आहेत त्या सर्व झोपड्या धनदांडग्यांनी घेऊन त्या ठिकाणी मॉल्स उभे होत आहेत, मोठमोठी हॉटेल्स उभी होत आहेत त्याचप्रमाण् बंगले तयार होत आहेत. या ठिकाण्ी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तलाठी नावाचा जो प्राणी आहे तो गडबड करीत असतो. त्या भागामध्ये राहणारा जो आदिवासी आहे त्याच्या त्या जमिनी आहेत. त्यांना जागरुक करुन त्या जमिनी त्यांच्या नावावर करणे जरुरीचे आहे. त्या ठिकाणी जी सगळी गावे आहेत तेथील आदिवासींच्या मुलींना तेथील धनदांडगे नोकरी देतात आणि त्या मुलींशी खोटे-खोटे लग्न लावून त्यांच्या जमिनी हे सगळे धनदांडगे घेतात, ही वस्तुस्थिती कोणीही नजरेआड करुन चालणार नाही. ते आदिवासींच्या मुलींशी लग्न लावून त्यांच्या जमिनी आपल्या नावावर करुन घेतात. नंतर ती आदिवासी मुलगी कोठे गेली, तिचे काय झाले हे कोणालाही कळत नाही. यामध्ये सरकारने जागरुक होऊन त्याच लोकांना या जमिनी मिळतील यादृष्टीने जिल्हाधिकारी असतील, प्रांत अधिकारी असतील किंवा इतर संबंधित अधिकारी असतील त्यांनी डोळसपणे काम करण्याची वेळ आलेली आहे. एवढी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपविते.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2010 चे वि. स. वि. क्रमांक 61 यावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. समाजातील अत्यंत दुर्लक्षित असलेल्या आदिवासींच्या संदर्भातील या बिलामध्ये जी उद्देश व कारणे दिलेली आहेत ती अत्यंत चांगली आहेत. या बिलाचे मी स्वागत करतो. पण माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे हे बिल उशिरा आणलेले आहे. या बिलाच्या उद्देश व कारणामध्ये पृष्ठ क्रमांक 6 वर मुद्दा क्रमांक 3 मध्ये असे म्हटले आहे की, 6 जुलै, 2004 पासून आणखी तीस वर्षाची कालमर्यादा वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. जर हा कायदाच करावयाचा असेल तर मग हे परमनंट का करीत नाही ? यामध्ये 30 वर्षाची कालमर्यादा का घातली ? हे परमनंट केले असते तर योग्य झाले असते. मधल्या काळामध्ये जर फेरबदल करावा लागला तर शासन बिल आणून फेरबदल करु शकते. या बिलामध्ये जी 30 वर्षाची कालमर्यादा दिलेली आहे ती वगळली पाहिजे आणि हा कायदा परमनंट केला पाहिजे. आदिवासींना जेव्हा जेव्हा गरज असेल किंवा जेव्हा ते सुशिक्षित होतील आणि आपल्या पायावर उभे राहतील त्यावेळी या बिलामध्ये बदल केला जाऊ शकतो आणि त्यांना न्याय दिला जाऊ शकतो.

सभापती महोदय, यानंतर मला कूळ कायद्याचा विषय मांडावयाचा आहे. पृष्ठ क्रमांक 9 वर मुद्दा क्रमांक 4 मध्ये साडेचार टक्के दराने रक्कम दिली गेली पाहिजे असे म्हटले आहे. मला असे वाटते की, यामध्ये आजचा जो बाजारभाव आहे त्याचा विचार केलेला नाही. फार जुन्या काळामध्ये या जमिनीच्या किमती फार कमी असतील किंवा नगण्य असतील. त्यावेळी 1 हजार रुपये, 2 हजार रुपये किंवा पाच हजार रुपये यापेक्षा जास्त किंमत असणार नाही. परंतु हे बिल आणत असताना बाजार भावाच्या दृष्टीने विचार केला गेला पाहिजे. आजचा बाजारभाव आणि सरकारचा दर निर्धारित करुन त्यामध्ये सामंजस्याने किंमत ठरविली पाहिजे. तरच शेतकऱ्याला कोठे तरी न्याय मिळेल. जर आदिवासीने आदिवासीची जमीन घेतली असेल किंवा आदिवासीने गैर आदिवासीची जमीन घेतली असेल तर त्यामध्ये होणारा जो अन्याय आहे तो राज्य सरकारने थांबविला पाहिजे. त्याबाबतीत सुयोग्य निर्णय घेण्याचे अधिकार जिल्हाधिकारी, आयुक्त यांना दिले पाहिजे जेणेकरुन त्या शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा अन्याय होणार नाही. समजा एक आदिवासी दुसऱ्या

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ ST/

श्री. केशवराव मानकर .......

आदिवासीवर अन्याय करीत असेल तर या कायद्याला काहीही अर्थ राहणार नाही. जर आदिवासी शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर आजच्या बाजारभावाने त्यांना पैसे मिळाले पाहिजेत. मग आपण ठरविल्याप्रमाणे दिले तरी चालतील. परंतु त्या काळातील किंमत 1 हजार रुपये असली तरी त्या जमिनीचा आजचा बाजारभाव दोन ती अडीच लाख रुपयांपेक्षा कमी नाही. आदिवासी शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये असे माझे मत आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर....

हे बिल अतिशय चांगले व योग्य आहे. परंतु या बिलामध्ये ज्या उणिवा आहेत त्याबाबत शासनाने ठोस निर्णय घ्यावा, नियम तयार करुन आदिवासी शेतक-यांना न्याय द्यावा अशी आग्रहाची भूमिका मांडतो आणि या बिलाचे स्वागत करुन मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.रामदास कदम (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी वि.स.वि.क्रमांक 61 सभागृहासमोर मांडण्यात आले आहे. या विधेयकावर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या बिलाचे सगळयांनीच स्वागत केले आहे. आदिवासींच्या हिताचे हे बिल आहे, याबद्दल कोणतेही दुमत असण्याचे कारण नाही. अनेक सन्माननीय सदस्यांनी असे म्हटले आहे की, 2004 साली हा कायदा संपुष्टात आला आहे, त्यानंतर 6 वर्षांनी त्यासंबंधीचे हे विधेयक सभागृहासमोर आलेले आहे. सहा वर्षे हे सरकार झोपले होते काय ? उशिरा सुचलेले हे शहाणपण आहे. अन्य समाजाचे हे विधेयक असते तर हा विलंब झाला असता का ? अन्य समाजाच्या हिताचे असते तर कायद्याची मुदत संपल्याबरोबर तातडीने बिल आणले असते. परंतु आदिवासींशी संबंधित हा कायदा असल्यामुळे 2004 मध्ये कायदा संपल्यावर 2010 मध्ये विधिमंडळात हे बिल आणले जाते ही बाब सरकारला शोभादायक आहे अशातील भाग नाही. राज्यामध्ये सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे होत असताना एका बाजूला दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या वाढत असताना मागील 50 वर्षामध्ये हा आदिवासी कोठे आहे, याची जाण सरकारला आहे की नाही याबद्दल मला शंका आहे. मागील अधिवेशनामध्ये आम्ही सांगितले होते की, समाजकल्याण व आदिवासी विभागाचा पैसा अन्य विभागाकडे वळविला जातो. त्यांचे याठिकाणी कोणी आहे की नाही, त्यांच्या प्रश्नांना कोणी दाद देणार आहे की नाही ? हा कायदा चांगला असला तरी सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी मांडलेला मुद्दा महत्वाचा आहे. जी जमीन अकृषिक झाली त्याचे काय, धनदांडग्यांना सूट देणार आहे काय, बांधकाम झाले नसेल तर त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ? याठिकाणी माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. काशिमिरा येथील आदिवासींच्या जमिनी लाटून धनदांडग्यांना देण्यात आल्या आहेत. त्याबाबतची 6 प्रकरणे मी शासनाकडे दिलेली आहेत. त्याबाबत साधे उत्तर दिले गेले नाही. आदिवासींबद्दल हे शासन किती उदासीन आहे ते यातून स्पष्ट होत आहे. या बिलातील विषय चांगला आहे. शासनाला उशिरा जाग आली आहे. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांनी एखाद्या आदिवासी आश्रमशाळेला भेट दिली तर बरे

3.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ ST/

श्री.रामदास कदम.....

होईल. मी अनेक आदिवासी आश्रमशाळांना भेट दिलेली आहे. तेथील अवस्था कशी असते ते मी पाहिलेले आहे. आदिवासी आश्रमशाळांमध्ये, मागासवर्गीयांच्या आश्रमशाळांसाठी तांदूळ व गव्हाची खरेदी केली जाते त्याची चौकशी करुन बघावे. त्यामध्ये मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. त्यासंबंधी मी प्रश्न उपस्थित केलेला आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागात इयत्ता दहावीपर्यंत केवळ 20 टक्केच विद्यार्थी पोहोचतात. एका बाजूला जमिनीचे संरक्षण करीत असताना दुस-या बाजूला स्वातंत्र्य मिळून 50 वर्षापेक्षा अधिक काळ लोटला असतानाही आदिवासी कोठे आहे याचे शासनाला भान आहे असे मला वाटत नाही. इयत्ता दहावी पर्यंत केवळ 20 टक्के विद्यार्थी पोहोचतात. सरकार याचा गांभीर्याने विचार करणार आहे की नाही ? कोणाला तरी पोसण्याची काम सुरु आहे. आदिवासी आश्रमशाळेतील मुलांना गणवेश दिला जात नाही. शाळेमध्ये गळती सुरु आहे, रस्त्यात खड्डे पडले आहेत, वर्ग खोल्यांना खिडक्या नाहीत, दरवाजे नाहीत. या आदिवासींचा विकास करण्यासाठी सहा वर्षानंतर हे बिल आणले आहे. हे बिल तात्काळ मंजूर झाले पाहिजे, याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. परंतु मागील 6 वर्षात जे जे निर्णय झाले असतील त्याची तपासणी करुन आदिवासींविरुध्द जे निर्णय झाले असतील ते रद्द करणे आवश्यक आहे. त्याबाबतचा निर्णय घेण्यात यावा अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि या बिलाचे स्वागत करुन माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

-----

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद ज़मा ( विधानसभा द्वारा निर्वाचित ) :सभापति महोदय, मैं इस बिल का समर्थन करने के लिए खड़ा हुआ हूं. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, 1966 तथा महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यर्पित करण्यासाठी अधिनियम, 1974 में जो संशोधन सरकार करने जा रही है, उसका मैं स्वागत करता हूं. इस अधिनियम के अनुसार जमीन प्रत्यर्पित करने के लिए अर्जी करने के लिए और तीस साल अवधि बढ़ाई जा रही है. इस बात का स्वागत करता हूं. अन्य सब बातें ठीक है. मुझे सिर्फ इस बात की जानकारी चाहिए कि अगर नॉन-एग्रीकल्चरल उपयोग के लिए किसी आदिवासी की जमीन किसी गैर-आदिवासी ने ली है और वह गैर-आदिवासी उस जमीन का उपयोग कमर्शियल कार्य के लिए कर रहा हो, उस जमीन से आय प्राप्त कर रहा हो, और पुरानी दर से कीमत अदा की है तो क्या उस जमीन की बढ़ी हुई कीमत को ध्यान में रखते हुए आदिवासी को अतिरिक्त कीमत देने का प्रावधान हो सकता है ? कृपया मंत्री महोदय इस बात की जानकारी दें. धन्यवाद.

.....

2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2010चे वि.स.वि. क्रमांक 61 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता आणि महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिनी प्रत्यार्पित करण्यासाठी (सुधारणा) विधेयक येथे आणलेले आहे. या विधेयकावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री अरुण गुजराथी, संजय केळकर, केशवराव मानकर, दिवाकर रावते, एस.क्यू.जमा, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी आपले विचार व्यक्त करीत असताना अशा प्रकारचे विधेयक आणल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले त्याबद्दउल मी या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो. त्यांनी एका चांगल्या विधेयकाच्या संदर्भात मनमोकळेपणाने पाठिंबा दिलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी हे विधेयक उशिरा आणल्या बद्दल खेद व्यक्त केला. या निमित्ताने मला एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे आदिवासीधारकाची जमीन बिगर आदिवासीकडे हस्तांतरित झालेली असेल तर ती मूळ आदिवासीधारकाकडे प्रत्यार्पित करण्यासाठी जिल्हाधिका-यांना स्वाधिकारात चौकशी करण्यासाठी कायद्यामध्ये कालमर्यादा विहित केलेली नाही. म्हणून शासनाने वेळोवेळी परिपत्रके काढून जिल्हाधिका-यांना त्याबाबतीत सूचना दिलेल्या आहेत. ही 30 वर्षाची मुदत चौकशीसाठी नसून जमीन प्रत्यार्पित करण्यासाठी आहे. जिल्हाधिकारी हे स्वाधिकारात अशा जमिनीच्या संदर्भात चौकशी करु शकतात. त्याला कायद्याने कोणतेही बंधन नाही हे मला सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यायचे आहे. या संदर्भात महसूल व वन विभागाने दिनांक 14 जुलै 2009 रोजी जे परिपत्रक काढलेले आहे त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. या परिपत्रकामध्ये असे म्हटलेले आहे की, कोणत्याही अशा प्रकारच्या जमिनीच्या बाबतीत जिल्हाधिका-यांनी त्यांच्या स्वाधिकारामध्ये चौकशी कराण्यासाठी कोणतीही कालमर्यादा नाही. अशा प्रकरणांच्या चौकशीचे अर्ज जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकारामध्ये घेऊन त्यावर उचित निर्णय घ्यावा. तसेच असे आदिवासींच्या जमिनीसंबंधीचे अर्ज जिल्हाधिका-या शिवाय कोणीही निकाली काढू नये असेही परिपत्रकामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी जमिनीच्या अकृषिक वापराबाबत चौकशी करता येते की नाही असा मुद्दा उपस्थित केला. या संदर्भात शासनाने

..3..



MSS/ ST/ पूर्वी श्री. खंदारे 17:30

श्री. प्रकाश सोळंके...

दिनांक 1 ऑगस्ट 2003 ला काढलेल्या परिपत्रकाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधतो. त्यामध्ये असे स्पष्टपणे सांगितलेले आहे की, अकृषिक वापर होत असताना सुध्दा जिल्हाधिका-यांना त्याची निश्चितपणे चौकशी करता येईल. त्या जमिनी आदिवासींना प्रत्यार्पित करता येतील. तेव्हा जमिनी अकृषिक असो अथवा कृषिक असो, कोणत्याही जमिनीची जिल्हाधिकारी चौकशी करु शकतात. मूळ आदिवासी जमिनीचे बेकायदेशीररित्या हस्तांतरण झालेले आहे असे जिल्हाधिका-यांना वाटले तर त्या जमिनी प्रत्यार्पित करण्याची कारवाई जिल्हाधिका-यांनी करणे अपेक्षित आहे.

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.........

सन्माननीय सदस्यांनी ठाणे जिल्हयातील व रायगड जिल्हयातील आदिवासीबहुल भागामधील काही प्रकरणे या चर्चेच्या निमित्ताने उपस्थित केली आहेत. मला एक गोष्ट सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, १९७४ साली हा कायदा अस्तित्वात आला. हा कायदा करताना १९५७ ते १९७४ पर्यंतच्या कालावधीत जे काही हस्तांतर झाले त्या हस्तांतराबाबतचा निर्णय प्रामुख्याने जिल्हाधिकाऱ्यांनी घ्यावा अशी त्यांच्यावर जबाबदारी टाकण्यात आली होती. १९७४ साली कायदा केल्यानंतर शासनाच्या परवानगीशिवाय कोणालाही जमिनीचे हस्तांतर करता येणार नाही. परवानगी न घेता जर जमिनीचे हस्तांतर झाले तर जिल्हाधिकाऱ्यांना ते आपोआप रद्द करता येईल आणि त्या जमिनी आदिवासींना प्रत्यार्पित करता येतील. मी यापूर्वी आकडेवारी दिली त्यानुसार १९५७ ते १९७४ पर्यंतच्या कालावधीत जे काही हस्तांतर झाले त्याबाबतची फारच थोडी प्रकरणे शिल्लक आहेत. त्याचे प्रमाण १ ते २ टक्के इतके असून या प्रकरणांची चौकशी होण्याची आवश्यकता आहे.

श्री.दिवाकर रावते : ठाकूर कॉम्प्लेक्सची उभारणी करण्यात आली. त्यासाठी कोणाची जमीन घेण्यात आली याची चौकशी करणार आहात का?

श्री.प्रकाश सोळंके : कायद्यातील तरतुदी मी सभागृहासमोर मांडल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी याठिकाणी जे काही प्रश्न उपस्थित केले त्याबाबत शासनाच्या वतीने निश्चितपणे चौकशी करण्यात येईल आणि कारवाई करण्याबाबत योग्य असे आदेश दिले जातील.

श्री.दिवाकर रावते : ठाकूर कॉम्प्लेक्स ज्यांनी उभे केले आहे ती व्यक्ती एवढी मोठी आहे की, त्या व्यक्तिला शासन हात लावू शकत नाही.

श्री.प्रकाश सोळंके : कोण किती मोठा आहे यापेक्षा त्यांनी जर कायद्याचे उल्लंघन केले असेल आणि ती बाब सन्माननीय सदस्यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली तर निश्चितपणे त्याबाबत चौकशी करुन कारवाई केली जाईल. याठिकाणी एक चांगले विधेयक विधानपरिषद सभागृहासमोर आलेले आहे. सभागृहाने या विधेयकाला पाठिंबा दिला त्याबद्दल मी सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो आणि सभागृहाने एकमताने हे विधेयक मंजूर करावे अशी विनंती करतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

..२..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड २ व ३ विधेयकाचे भाग झाले.

खंड १, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक-६१ संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उपसभापती** : सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक-६१ संमत झाले आहे.

----

नंतर ३व्ही.1...

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>पंढरपूर येथे वारकऱ्यांना परतीच्या प्रवासासाठी एस.टी. बसेस उपलब्ध नसणे</u>**

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला नुकताच पंढरपूर येथून दूरध्वनी आला आहे. पंढरपूर येथील एस.टी. डेपोमध्ये शेकडो वारकरी परतीच्या प्रवासासाठी एस.टी. बसेसच्या अभावी अडकून पडले आहेत. परभणी येथे जाणाऱ्या तीन एस.टी. बसेस प्रवाशांनी भरलेल्या आहेत, परंतु त्या गंतव्य स्थानाकडे अद्याप सोडण्यात आलेल्या नाहीत. सुमारे 700 वारकरी सकाळी 11.00 वाजल्यापासून एस.टी. बसेसच्या प्रतिक्षेत उभे आहेत. परंतु त्यांना परतीच्या प्रवासासाठी एस.टी. बसेस उपलब्ध नाहीत. म्हणून माननीय परिवहन मंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या प्रश्नामध्ये लक्ष घालून आपल्या संपर्क माध्यमाद्वारे नेमकी परिस्थिती काय आहे ती पाहून उपाययोजना करावी.

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, याबाबत योग्य ती उपाययोजना करण्यात येईल.

-------

**<u>कामकाज पत्रिकेवरील वि.स.वि.क्र.1 संबंधी</u>**

**उपसभापती** : कामकाज पत्रिकेवरील वि.स.वि.क्रमांक-1 चर्चेला घ्यावयाचे काय ?

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सभागृहात नियम 260 अन्वये मुंबईतील विविध समस्यांबाबतचा प्रस्ताव चर्चेला घेण्याचे हे विधेयक चर्चेला घेण्यापूर्वीच ठरले होते परंतु माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी विनंती केली त्यानुसार एक विधेयक मंजूर करण्यास आम्ही सहकार्य केले आहे. म्हणून प्रथम मुंबईच्या समस्यांवरील प्रस्ताव प्रथम चर्चेला घ्यावा व त्यानंतर कामकाज पत्रिकेवरील वि.स.वि.क्रमांक-1 हे चर्चेला घ्यावे, अशी माझी विनंती आहे.

**उपसभापती** : ठीक आहे.

--------

....2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई शहराची विविध समस्यांमुळे झालेली दुरवस्था

**मु.शी.**: मुंबई शहराची विविध समस्यांमुळे झालेली दुरवस्था या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, दिवाकर रावते, विनोद तावडे, रामदास कदम, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, श्री. रामनाथ मोते, डॉ. नीलम गोऱ्हे, श्री. किरण पावसकर, वि.प.स. यांचा प्रस्ताव

श्री. रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो :--

"देशाची आर्थिक राजधानी समजल्या जाणाऱ्या मुंबई शहराची विविध समस्यांमुळे दुरवस्था होजे, अनधिकृत झोपडपट्टयांना वारंवार संरक्षण देत गेल्यामुळे मुंबईत येणाऱ्या लोंढ्यात वाढ होणे, वाढत्या लोंढ्यांमुळे मुंबईतील नागरी सुविधांवर अतिशय विपरित परिणाम होणे, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) मुंबई महानगर विकास प्राधिकरण, मुंबई नागरी वाहतूक प्रकल्प, यांचे अनेक प्रकल्प रेंगाळल्यामुळे तसेच त्यासाठीचा निधी न मिळाल्यामुळे मुंबई, नवी मुंबई, ठाणे व रायगड मधील अनेक बांधकामे अर्धवट स्थितीत राहाणे व त्यामुळे वाहतुकीची प्रचंड कोंडी होणे, पावसाळयात पाणी तुंबण्याची गंभीर समस्या निर्माण होणे, मोडकळीस आलेल्या इमारतींचे प्रस्ताव वर्षानुवर्षे रखडणे, गैरमार्गाने एफ्एस्आय मिळवून गिरण्यांच्या जमिनीवर टॉवर व मॉल उभे राहिले तरी तेथील गिरणी कामगारांना त्यांची हक्काची देणी न मिळणे, अनावश्यक स्कायवॉकच्या वाढत्या संख्येमुळे अनावश्यक खर्चात वाढ होणे, त्यांचा वापर न होणे, त्यामुळे जनतेत तीव्र नाराजी असणे, मुंबई, नवी मुंबई-ठाणे-रायगड परिसरात अलिकडच्या काळात भरमसाठ मॉलस् उभे राहाणे, यातील बहुसंख्य मॉल्सचे बांधकाम अनधिकृत असणे, बहुतेक मॉल्सनी आपले दस्ताऐवज शासनदरबारी सादर न करणे व शासनाचे लक्षावधी रूपयांचे मुद्रांक शुल्क बुडविणे, याबाबतचा मेराणी समितीचा अहवाल लागू न करणे, नवी मुंबई, ठाण्यातील अनेक भूखंड सिडकोने आय्.टी.पार्क वा अन्य सबबीखाली विकासकांना अत्यल्प मोबदल्यात दिल्यामुळे शासनाचे अब्जावधी रूपयांचे नुकसान होजे, सदर भूखंड विक्रीची चौकशी करण्यासाठी शासनाने नेमलेल्या शंकरन् समितीने तसेच नंदलाल समितीने भूखंड विक्रीबाबत झालेल्या संशयास्पद व्यवहारावर ठपका ठेवलेले अहवाल सादर केल्यानंतर त्यावर कारवाई करण्यास शासनाकडून हेतुपुरस्सर

...३....

श्री. रामदास ि दिम .....

दुर्लक्ष होणे, एस.आर.ए. च्या प्रकल्पात बोगस झोपडपट्टीधारकांची नावे घुसवून विकासकांनी जादा चटईक्षेत्र लाटल्याचे अनेक प्रकार सतत उघडकीस येणे, पूर्व-पश्चिम उपनगरात शेकडो एकरचे भूखंड ठराविक विज ासज ांना देऊन मराठी भाषिकांना देशोधडीला लावणे, शहरात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या बांगलादेशीय नागरिकांविरोधात कठोर स्वरूपाची कारवाई न होणे, त्यांना बोगस शिधापत्रिका देण्यात येणे, बोगस शिधापत्रिकांच्या आधारे राहणाऱ्या या लोकामुळे तसेच वाढत्या लोंढयामुळे स्थानिकांचे अस्तित्व धोक्यात येणे व त्यामुळे त्यांच्यात मुंबईला वेगळे करण्याचा डाव असल्याचा संशय निर्माण होणे आणि या सर्व समस्या सोडविण्यात शासनास आलेले अपयश लक्षात घेता याबाबत करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

महोदय, मुंबईच्या समस्यांवर या सभागृहात यापूर्वी देखील अनेक वेळा चर्चा झालेल्या आहेत. पण एक गोष्ट मला खेदाने नमूद करावीसी वाटते की, या मुंबईच्या विकासाच्या जेवढ्या चर्चा सभागृहात आजपर्यंत झाल्या त्या सगळ्या वांझोट्या चर्चा ठरल्या असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. अनेक वेळा माननीय मुख्यमंत्री तसेच संबंधित मंत्र्यांकडून फक्त आश्वासनेच मिळाली पण दुर्दैवाने त्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात झाली नाही, ही गोष्ट देखील सभागृहात मला सांगायला हवी.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, मुंबई हे सात बेटांपासून तयार झालेले शहर आहे. मुंबईचे क्षेत्रफळ 437 चौ. कि.मी.चे असून मुंबईला समुद्राने सगळया बाजूने वेढलेले आहे. मुंबईचे शांघाय करण्याची या शासनाने अनेक वेळा घोषणा केलेली आहे. मुंबईच्या लोकसंख्येच्या बाबतीत मला मुद्दाम सांगावयास पाहिजे की, 1961 मध्ये मुंबईची लोकसंख्या 41 लक्ष 68 हजार होती, 1971 मध्ये मुंबईची लोकसंख्या 60 लक्ष होती. 1981 साली ती 93 लक्ष 90 हजार झाली, 1991 मध्ये मुंबईची लोकसंख्या 99 लक्ष 25 हजार झाली, 2001 मध्ये 1 कोटी 19 लक्ष 14 हजार झाली, सन 2006 मध्ये मंबईची लोकसंख्या 1 कोटी 35 लक्ष झाली आणि मला दुर्दैवाने सांगावे लागते की, आज मुंबईची लोकसंख्या 1 कोटी 50 लक्षाच्या वर गेलेली आहे. मुंबईमध्ये प्रतिदिन 350 कुटुंबे बाहेरुन येत असतात असे सर्व्हेमध्ये म्हटलेले आहे. मुंबईमध्ये 1 कोटी 50 लाख लोक राहतात व त्यातील 60 टक्के लोक हे झोपडपट्टीत राहत असतात.

सभापती महोदय, एक गोष्ट मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, मुंबई महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. मुंबई महानगरपालिकेला "सोन्याची अंडी देणारी कोंबडी" म्हटले जाते. संपूर्ण देशातून केंद्रसरकारला जेवढा महसूल जातो त्याच्या 40 टक्के महसूल मुंबईमधून केंद्रशासनाला जात असतो. एकटया मुंबईतून 40 टक्के महसूल केंद्रसरकारकडे जात असतो. केंद्रसरकारला मुंबईतून 60 हजार कोटी व राज्य शासनाला 40 हजार कोटी रुपये महसूल दर वर्षी मिळत असतो. केंद्रशासनाला 40 टक्के महसूल देणा-या मुंबईची आज काय अवस्था आहे ? मुंबईची आजची अवस्था जागतिक प्रतवारीत कोलंबोच्याही मागे आहे. M/S Humman Resources Consutant च्या सर्व्हे रिपोर्टमध्ये असे म्हटले आहे की, 350 शहरापैकी मुंबई शहराचा क्रमांक जागतीक क्रमवारीत 129 वा लागतो. राजकीय, सामाजिक, आर्थिक या क्षेत्राचा अभ्यास करुन हा निष्कर्ष काढलेला आहे. अहवालात मुंबईचा नंबर 129 वा लागलेला असतांनाही "आम्ही प्रगती करीत आहोत" असे म्हणून आमच्याच हाताने पाठ थोपटून घेतली जात आहे.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, सन 2001 मध्ये जी जनगणना झाली त्यामध्ये मुंबईत 33.5 टक्के, मुंबई उपनगरात 46 टक्के, ठाणे जिल्हयात 81 टक्के, नाशिक जिल्हयात 49 टक्के, पुणे जिल्हयात 72 टक्के एवढी लोकसंख्येची वाढ झालेली आहे. मुंबईमध्ये 58 टक्के लोकसंख्या ही परप्रांतियांची आहे. एकवेळेला "मुंबई तुमची भांडी घासा आमची" असे म्हटले जात होते परंतु यामध्ये मी आता जाणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, दहा वर्षापूर्वी दादर,नायगाव,परळ,लालबाग येथे 60 टक्के मराठी माणसांची वस्ती होती. दुर्दैवाने आज त्या भागात 20 टक्केच मराठी माणूस शिल्लक राहिला आहे. ही आमच्या मुंबईची अवस्था आहे. 25 वर्षापूर्वी माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे यांनी हे लोंढे थांबवा असे सांगितले होते. ते जर थांबविले नाही तर मराठी माणूस मुंबईमध्ये शिल्लकच राहणार नाही, अशा प्रकारची भूमिका घेतली होती. त्यावेळी माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे हे संकुचित विचारांचे आहेत असे बोलले जात होते. पण आज तीच भूमिका महाराष्ट्राच्या माननीय मुख्यमंत्र्यांना घ्यावी लागली आहे. सन्माननीय मंत्री श्री.जयंत पाटील यांना सांगावे लागले की, हे लोंढे थांबविले पाहिजेत, नाही तर कोणी तरी कृपाशंकर उद्या महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होईल. त्यांना सभागृहामध्ये हे सांगावे लागले. ही वेळ कोणी आणली आहे ? येथे वांझोटी चर्चा करून काहीही फायदा होत नाही. मी खालच्या सभागृहात वारंवार तसे बोललो आहे. शेवटी अंमलबजावणी शासनाच्या माध्यमातून झाली पाहिजे. मराठी भाषेच्या प्रस्तावावर माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. मराठी भाषा वाचविण्यासाठी शासनाने स्वतंत्र खाते निर्माण केले आहे. त्यासाठी दहा कोटी रूपयाची तरतूद देखील केली आहे. त्यावर देखील मी बोलणार आहे.

सभापती महोदय, आज टक्केवारी काय सांगते ? इतर राज्यामधून महाराष्ट्रात आलेल्या उत्तर भारतीयांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे 28.5 टक्के आहे. त्यांना आपण का थांबवू शकत नाही ? माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे. त्यांनी माझ्या सोबत मुंबईमध्ये फेरफटका मारावा. यासाठी त्यांनी 3-4 तासांचा अमूल्य वेळ द्यावा. मुंबईच्या मुख्य रस्त्यावर किती झोपड्या आहेत ते त्यांना दाखवितो. आमचे गट नेते श्री.दिवाकर रावते यांनी विनंती केली होती की, मराठी भाषेविषयी, महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधातील चर्चा सकाळी घेऊ नका. मी आज सकाळी 9.30 वाजता निघालो असून येथे दुपारी 1.00 वाजता पोचलो. इच्छा असूनही मला सभागृहातील चर्चेमध्ये भाग घेता आला नाही. आपण सकाळी 9.00 ते 10.00 या वेळात चर्चा कशाला घेता ? सकाळी चर्चेसाठी आमदार किती असतात ? आपले म्हणणे रेकॉर्डवर आणण्यासाठी येथे चर्चा करणे चुकीचे आहे. ही वेदना आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.......

सभापती महोदय, मुंबईमध्ये बांगलादेशीय सुद्धा येत आहेत. मुंबईतील कोणता फूटपाथ मोकळा आहे तो आपण मला दाखवावा. मुंबईत प्रतिदिन 350 लोक येत आहेत. ते कुठे राहतात ? त्यांना दैनंदिन गरजा भागविण्यासाठी लागणारे पाणी ते कुठून आणतात ? ते शोधण्यासाठी आपल्याकडे वेळ नाही. येथे फक्त चर्चा करायची. मुंबईतील दहिसर येथे गणपत पाटील नगर आहे. तेथे 7 हजार अनधिकृत झोपड्या आहेत. मी विधान सभेचा विरोधी पक्ष नेता असताना तीन वेळा तेथे भेट दिली आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्री.भारवि. 17:55

श्री.रामदास कदम....

त्याठिकाणचे व्हिडिओ शुटींग केलेले आहे. तेथे असलेल्या तिवरांच्या झाडांची कत्तल करुन, तेथे भराव टाकून झोपड्या बांधलेल्या आहेत. सहा महिन्यात तेथे सात हजार झोपड्या बांधण्यात आल्या. विधानसभेत विरोधी पक्ष नेता असताना मी हा प्रश्न अनेकवेळा मांडलेला आहे. अनधिकृत बांधकामाबाबत अनेकवेळा पत्रव्यवहार केले, परंतु अनधिकृत झोपडपट्टयांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. अनधिकृत बांधकाम तोडण्यासाठी आम्हाला पोलीस संरक्षण देण्यात यावे अशाप्रकारची महानगरपालिकेची नोटीस तेथील पोलीस स्टेशनला गेल्यास तेथील पोलीस इन्स्पेक्टर लिहितो की, आमच्याकडे पोलीस बळ कमी असल्यामुळे अनधिकृत बांधकामे तोडण्यासाठी आम्ही पोलीस संरक्षण देऊ शकत नाही.

सभापती महोदय, आपण मुंबईतील परप्रांतीयांचे लोंढे कधी थांबविणार आहात ? परप्रांतीय लोंढे मुंबईच्या वाट्याचे 40 टक्के पाणी चोरत आहे, त्यामुळे मुंबईतील लोकांना 30 टक्के पाणी कपात सहन करावी लागत आहे. हे कधी थांबणार आहे ? मुंबईत यापुढे एकही अनधिकृत झोपडी उभी राहणार नाही, अनधिकृत झोपडी उभी राहिल्यास त्या भागातील पोलीस इन्स्पेक्टर आणि वॉर्ड अधिकाऱ्यास ताबडतोब निलंबित करण्यात येईल असे माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी काही महिन्यांपूर्वी सांगितले होते. परंतु आजपर्यंत किती इन्स्पेक्टर्स व वॉर्ड अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. अजूनपर्यंन एकाही अधिकाऱ्यावर कारवाई झालेली नाही. परंतु अनधिकृत झोपड्या अनेक झाल्या. एखाद्याने बैठ्या घरावर एक मजला चढविल्यास पोलीस अधिकारी तेथे लगेच पोहोचतात. वाळुची वाहतूक करणाऱ्या ट्रकचा मागोवा ते लगेच घेतात. कारण तेथे त्यांना हप्ता मिळतो. काही हाय-वे च्या बाजूला झोपड्या नाहीत कारण त्याठिकाणी हप्ता नाही. आपण मुंबई शहराचे शांघाय करावयास निघालो आहोत. परंतु शांघाय तर सोडाच, आपण मुंबई देखील स्वच्छ ठेवू शकत नाही. तेव्हा या सर्व बाबींकडे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी लक्ष द्यावे अशी माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे.

..2.

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, मराठी भाषेचा वापर सर्व शासकीय कार्यालयामध्ये करण्यासाठी अनेकवेळा ठराव मंजूर करण्यात आले. न्यायालयामध्ये मराठी टंकलेखक उपलब्ध नाहीत म्हणून न्यायालयात मराठीचा वापर होत नाही. आपण मला सहा महिन्यांची मुदत द्यावी. सहा महिन्यात मराठी टंकलेखक उपलब्ध करुन न्यायालयात मराठी भाषेत कामकाज केले जाईल असे तत्कालीन वित्त व नियोजन मंत्री श्री.जयंत पाटील यांनी मला लेखी पत्र दिलेले आहे. मराठी भाषे संदर्भातील प्रस्ताव चर्चेसाठी येईल त्यावेळी मी हे सर्व बोलणार आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरात अनेक अनधिकृत झोपडपट्टया होत आहेत तसेच तेथे अनेक दादा निर्माण होत आहेत. या दादांचे आपण काय करणार आहात ? पदपथावरील झोपड्याचे पुनर्वसन करण्याचा निर्णय महानगरपालिकेने शासनाची परवानगी घेऊन करावा असे सरकारने सांगितले. यामध्ये शासनाचा संबंध काय आहे ? मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था आहे. शासनाची घुसघोरी कशासाठी चालू आहे ?

मुंबईतून केंद्र सरकारला 40 टक्के महसूल जातो. तेव्हा मुंबईच्या विकासासाठी केंद्र सरकारकडून प्रतिवर्षी 10 हजार कोटी रुपये मिळविले तर मुंबईतील समस्या सुटतील. परंतु शासन असे करणार नाही कारण मुंबई आणि ठाणे महानगरपालिका शिवसेना आणि भाजपाच्या ताब्यात आहे. "महानगरपालिका आमच्या ताब्यात द्या मग आम्ही आपणास पैसे मिळवून देऊ" असे सरकारकडून सांगण्यात येते. याला लोकशाही म्हणतात काय ? "आम्ही वाढपी आहोत" असे सांगितले जाते. आपण आपल्या घरातील वाढत आहात काय ? मुंबई आणि ठाणे महानगरपालिका शिवसेना आणि भाजपाच्या ताब्यात आहे म्हणून मागच्या बाजूने म्हणजे एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून अधिकार घेण्यात आले. .

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

VTG/ प्रथम श्री.अजित शिगम 18.00

श्री.रामदास कदम....... ..

मुंबईला तुम्ही प्रांत कधी पासून केले आहे ? मुंबई हा काही वेगळा प्रांत आहे काय ? सभापती महोदय, मी आपल्या मार्फत शासनाला सांगू इच्छितो की, मुंबई प्रांत वेगळे करण्याची कोणाची हिंमत नाही. मुंबईसह महाराष्ट्र राज्य होण्यासाठी 105 हुतात्मे झाले होते. परंतु आता असा निर्णय घेतला आहे की यापुढे एम.एम.आर.डी.ए.ने पाण्याच्या प्रश्नात लक्ष घालावयाचे,धरणे सुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच बांधावयाची आहेत. मुंबई महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये ठाणे महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये अलिबाग पासून वसई, विरार ,नालासोपा-यापर्यंत एमएमआरडीएने सगळी कामे करावयाची आहेत मग त्या भागातील महानगरपालिकेने काय झक मारावयाची काय ? त्या महानगरपालिकेने फक्त झाडू मारण्याचे काम करावयाचे काय ? या महानगरपालिकेने नेमकी कोणती कामे करावयाची आहेत ? एम.एम.आर.डी.ए.कडे पाणी पुरवठयाचे काम जर देण्यात येणार असेल तर मुंबई महानगरपालिकेकडे कोणते काम राहणार आहे ? सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये मेट्रो रेल्वे येणार आहे. तिचे कामसुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच करावयाचे आहे. रेल्वेचे कामसुध्दा एम.एम.आर.डी.ए.ने करावयाचे आहे. मुंबई, ठाणे, अलिबाग येथील मोठे पूल सुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच बांधावयाचे आहेत. रस्ते सुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच बांधावयाचे आहेत इतकेच नव्हे तर या पुढे घरांचे कामसुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच करावयाचे आहे. मग मुंबई महानगरपालिकेने नेमकी कोणती कामे करावयाची आहेत ?सगळी कामे जर एम.एम.आर.डी.ए. करणार असेल तर ठाणे आणि मुंबई महानगरपालिका कशासाठी हवी आहे ? आपण कोणते कारस्थान करीत आहात हे कोणाला काही कळत नाही काय ? सर्वजण दूधखुळे आहेत आणि कोणालाही अक्कल नाही असे आपल्याला वाटते काय ? मघाशी मागच्या मुख्यमंत्र्याच्या संदर्भात बोललो असतांना आपण हसलात परंतु आज आपण काय करीत आहात ? मुंबईतील कचरा फक्त मुंबई महानगरपालिकेने काढावयाचा व तो कचरा त्यांनी ताब्यात घ्यावयाचा आहे. कचरा डेपोच्या नावाने जागा ताब्यात घ्यावयाची आणि तेथे टॉवर बांधण्यासाठी कचरा डेपोची जागा द्यावयाची असे प्रकार आज सुरु आहेत. या राज्याचे जेवढे बजेट आहे तेवढे बजेट एम.एम.आर.डी.ए. ला दिलेले आहे. म्हणजेच नाला सोपा-यापासून, ठाण्यापासून, मुंबई पासून, अलिबाग पासून पुढचा वेगळा प्रांत घडविला जात आहे. त्यामध्ये "मुंबई प्रांत " असे लिहिलेले आहे. तेव्हा हा सगळा भाग एम.एम.आर.डी.ए.,खाली आणून मुंबई प्रांत घडविला जात आहे परंतु आम्ही तसे होऊ देणार नाही

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....... ..

मुंबईसाठी 105 हुतात्मे झाले आहेत आणि यापुढेही हजारो हुतात्मे होतील .परंतु महाराष्ट्रापासून मुंबई प्रांत हा वेगळा होऊ शकणार नाही असा इशारा मी माननीय मुख्यमंत्र्यांना देऊ इच्छितो . आज जे काही चालले आहे ते आम्हाला सगळे समजते. या पुढची आपली वाटचाल काय आहे हे देखील आम्हाला कळते. एम.एम.आर.डी.ए.साठी वेगळा सचिव आणि वेगळा सीईओ दिला आहे. मुंबई महानगरपालिका वेगळी करण्याचा जर आपला डाव असेल तर तो थांबवा असे मला आपल्याला सांगावयाचे आहे. पाणी पुरवठा करण्याचे आणि घरे बांधण्याचे काम सुध्दा एम.एम.आर.डी.ए.करणार असेल तर मुंबई महानगरपालिका कशासाठी हवी आहे.? पाणी, रेल्वे, रस्ते, पूल इत्यादी सर्व कामे एम.एम.आर.डी्.ए.करणार आहे. शहरातील कचरा मुंबई महानगरपालिकेने गोळा करुन त्यांच्या ताब्यात द्यावयाचा आणि कच-याची विल्हेवाट फक्त एम.एम.आर.डी.ए.ने लावावयाची आहे. घरेसुध्दा एम.एम.आर.डी.ए.नेच बांधावयाची आहेत.असे जर असेल तर शासन आणि महानगरपालिका कोणती कामे करणार आहेत हे आम्हाला समजले पाहिजे.हे सर्व उपद्व्याप कशासाठी चालले आहेत ? हे सर्व प्रकार थांबविण्यात यावे अशी मी या चर्चेच्या निमित्ताने शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मला मुंबईतील कोळीवाडयासबंधी बोलावयाचे आहे.कोळी आणि आगरी हे मुंबईचे मूळ नागरिक आहेत. मुंबईच्या 100 कोळीवाडयांच्या विकासासंदर्भात सीआर.झ्ेड.संबंधी कोणता निर्णय घेण्यात येणार आहे याचे उत्तर देखील माननीय मुख्यमंत्र्याकडून मिळणे गरजेचे आहे असे मला सांगावयाचे आहे.समुद्र किना-यालगत मोक्याच्या जागेवर कोळीवाडे आहेत. कोळी लोकांची मासे सुकविण्याची जागा वेगळी असते,जाळया ठेवण्याची आणि होडी ठेवण्याची जागा देखील वेगळी असते याची आपल्याला कल्पना आहेच. मुबईतील जो मूळ नागरिक आहे त्या कोळी बांधवावर अन्याय होता कामा नये. त्याच्या संदर्भात कोणता निर्णय घेण्यात येणार आहे हे आम्हाला समजले पाहिजे. कोठे तरी त्यांना 500 स्क्वेअर फुटाचा फलॅट बांधून देणार आहात काय ?मुंबईची सात बेटे असून त्यातील कोळी बांधव हा मुंबईचा पहिला नागरिक आहे. त्याला आम्ही उद्ध्वस्त होऊ देणार नाही. म्हणून कोळी समाजाच्या संदर्भात नेमका कोणता निर्णय घेण्यात येणार आहे हेसुध्दा आम्हाला समजणे गरजेचे आहे.

3..

श्री.रामदास कदम.......

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. मुंबईतून प्रतिदिन 4 हजार 573 मे.टन इतका घनकचरा जमा होत असतो..

नंतर श्री.सरफरे

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

आणि म्हणून या घन कचऱ्याची विल्हेवाट आपण कशापध्दतीने लावणार आहात? त्यासाठी कोणती उपाय योजना करणार आहात हे समजणे गरजेचे आहे. मुंबईमध्ये दररोज घरटी 470 लिटर पाण्याचा वापर केला जातो. मुंबईला दररोज जेवढे पाणी लागते त्यामध्ये 1030 दशलक्ष लिटर पाण्याची कमतरता आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून अधिक निधी आणण्यासाठी कोणती उपाय योजना करणार आहात हे स्पष्ट होणे आवश्यक आहे. सभापती महोदय, यानिमित्ताने एक गोष्ट माननीय मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे. 1992 साली डॉ. माधव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या समितीने दिलेल्या अहवालानुसार भातसा धरणातील अतिरिक्त पाणी सन 2007-09 पर्यंत मुंबईमध्ये आणण्यासाठी 1500 ते 1700 कोटीच्या निधीची आवश्यकता असे सांगण्यात आले होते. त्याकरिता आपण कोणती उपाय योजना केली आहे? हे अतिरिक्त पाणी जर मुंबईमध्ये आले तर मुंबईची 20 टक्के पाण्याची गरज आपण भागवू शकतो. आज आपणास 15 टक्के पाण्याची कपात करावी लागत आहे ती आपण थांबवू शकतो. त्यासाठी आपण कोणती उपाय योजना करणार आहात ते समजले पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई शहरामध्ये 16 हजार इमारती मोडकळीस आलेल्या आहेत. या इमारतींच्या संदर्भात आपण गेल्या दहा वर्षापासून चर्चा करीत आहोत. केंद्र सरकारकडून निधी घेऊन या मोडकळीस आलेल्या इमारतींचा निश्चितपणे विकास करु अशाप्रकारचे आश्वासन अनेक वेळा देण्यात आले. विशेषत: या इमारतींपैकी 51 इमारती अति धोकादायक आहेत. त्यामधील 860 कुटुंबे अति धोकादायक म्हणून शासनाने घोषित केली आहेत. त्याबाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे? या अनुषंगाने मी माननीय मुख्यमंत्र्यांना विचारु इच्छितो की, या पावसाळयामध्ये 20 हजार झोपडया धोक्याच्या सावटाखाली आहेत. या झोपडयांवर टेकडी आणि डोंगराचा भाग कधीही कोसळून त्याखाली या झोपडया केव्हाही जमीनदोस्त होतील अशाप्रकारचा अहवाल महानगरपालिकेने शासनाकडे पाठविला आहे. त्या दृष्टीने या सर्व 10 हजार 281 झोपडयांना संरक्षण देण्याची आवश्यकता आहे, त्याही बाबतीत शासनाची नेमकी भूमिका काय आहे?

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे की, म्हाडाच्या गाळयांमध्ये अल्पसंख्यांकांना 2 टक्के आरक्षण देण्याची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केल्याचे वर्तमानपत्रामध्ये वाचावयास मिळाले. माझा माननीय मुख्यमंत्र्यांना सवाल आहे की, अल्पसंख्यांकांना म्हाडाच्या गाळयांमध्ये 2 टक्के वेगळे आरक्षण आपण कशासाठी देत आहात? आपण अशाप्रकारे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. रामदास कदम.....

जाती-जातीमध्ये भांडणे लावण्याचे काम कशासाठी करीत आहात? एका बाजूला सर्व धर्मसमभावाची घोषणा करीत असतांना दुसऱ्या बाजूने मुंबईतील अल्पसंख्यांकांना 2 टक्के वेगळे आरक्षण ठेवता. तर मग आपण आदिवासी आणि मागासवर्गीयांसाठी देखील वेगळे आरक्षण ठेवावे. केवळ निवडणुकीवर डोळा ठेवून आपण अल्पसंख्यांकांना आरक्षण देण्याचा निर्णय घेत आहात. अशाप्रकारे निर्णय घेऊन जाती-जातीमध्ये तेढ निर्माण करण्याचे पाप कशासाठी करीत आहात याचे उत्तर आपण देणे आवश्यक आहे. सभापती महोदय, म्हाडाच्या विषयावर माझे सहकारी माननीय सदस्य श्री. किरण पावसकर सविस्तरपणे बोलणार आहेत त्यामुळे त्यावर मी जास्त बोलणार नाही. परंतु मला एक गोष्ट सांगितली पाहिजे की, म्हाडामध्ये अडीच वर्षे काम केल्यानंतर त्या अधिकाऱ्यांची आपण बदली करतो. परंतु त्याठिकाणी असे अनेक अधिकारी आहेत त्यांची दहा ते पंधरा वर्षे सेवा झाल्यानंतर त्यांना एकाच ठिकाणी कशासाठी ठेवले आहे? आज मी याठिकाणी जबाबदारीने सांगतो की, शासनाकडून म्हाडाकडे जो निधी जातो त्यामधील 60 टक्के निधी फाईलसाठी व अधिकाऱ्यांसाठी खर्च होत आहे आणि 40 टक्के निधी प्रत्यक्षात खर्च होत आहे. या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांना आकडेवारीनिशी पटवून देईन.

सभापती महोदय, मी 20 वर्षे माझ्या खेड मतदारसंघातील आमदार होतो, त्यानंतर मी पहिल्यांदा मुंबईला आलो. ज्यावेळी माझा आमदार फंड मी येथील काही लोकांसाठी दिला त्यावेळी श्री. राणे नावाच्या एका अधिकाऱ्याने मला सांगितले की, साहेब या आमदार निधीमधील 70 टक्के पैसे हे फाईलवर खर्च होतात. म्हणजे काय? तर ते म्हणाले की, हे पैसे खालपासून वरपर्यंत अधिकाऱ्याना द्यावे लागतात. व फक्त 30 टक्के खर्च विकास कामावर होत असतो. हे ऐकून मी अवाक झालो. आमदार फंडामधील 70 टक्के निधी हे अधिकारी खात असतील आणि हे एका आमदाराला, एका माजी विरोधी पक्षाच्या नेत्याला जे.ई. सांगत असेल तर त्याची हिंमत कशी होते. म्हणून म्हाडाच्या या सर्व अधिकाऱ्यांची चौकशी होणार आहे की नाही. यापूर्वी जो जो निधी खर्च झाला त्याची आपण चौकशी करणार आहात की नाही. सभापती महोदय, मी माननीय मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयासमोर उपोषणाला बसणार आहे. मी हे जबाबदारीने बोलत आहे. अशाप्रकारे 70 टक्के निधी खाणारे अधिकारी कोण आहेत? या सर्व अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी आपण करणार आहात की नाही? या सर्व अधिकाऱ्यांच्या मालमत्तेची चौकशी होऊ द्या असा माननीय मुख्यमंत्र्यांकडे मी आग्रह धरतो. (यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

फाईलवर खर्च होतो म्हणजे काय? सभापती महोदय, कुंपणच शेत खात आहे अशी अवस्था आहे. सभापती महोदय, मला या विषयावर खूप बोलावयाचे होते पण आपण दोन-तीन वेळा वेळ संपल्या घंटा वाजविलेली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांना या विषयावर बोलावयाचे आहे. म्हणून मी शेवटचा मुद्दा मांडून माझे भाषण पूर्ण करतो.

मुंबई कशी आहे? मुंबई थिल्लरपणाला टाळया देते, उथळपणाला उचलून धरते,भपक्याने भारावते, उच्चभ्रूंना मुजरा करते, कुमार्गींना खुणावते आणि पडणाऱ्याला लोटून देते. पण तीच मुंबई, चढणाऱ्याला हात देते, शोधणाऱ्याला वाट दाखवते, यशाची पाठ थोपटते, सत्यनिष्ठेला सलाम करते व दिव्यत्वाला हात जोडते. म्हणूनच मुंबई सावरायला कोणाची गरज नाही. पण, तिला आकार द्यायला राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.

सभापती महोदय, या महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्याचे कारस्थान करण्यात येत आहे ते तात्काळ थांबवावे अन्यथा मराठी माणसाला रस्त्यावर उतरावे लागेल एवढेच सांगतो आणि माझे भाषण पूर्ण करतो. जय हिंद. जय महाराष्ट्र.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या सभागृहात उपस्थित केलेला आहे. त्या प्रस्तावावर काही सूचना करण्याकरिता मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे आवेशपूर्ण भाषण ऐकले. त्यांनी आपल्या भाषणात शेवटचा मुद्दा असा मांडला की, "शेवटी हे सर्व कारस्थान मुंबई स्वतंत्र करण्यासाठी आहे." सभापती महोदय, मी जवळ जवळ सात-आठ वर्षापासून या सभागृहात आहे. मुंबईच्या संदर्भात या सभागृहात चर्चा होत असतात. मुंबई स्वतंत्र करावी किंवा मुंबई तोडून घेणे या खोलात मी जाऊ इच्छित नाही पण या संदर्भाती चर्चा मी गेली सात-आठ वर्षे ऐकत आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच श्री. प्रमोद नवलकर ज्यावेळी या सभागृहात होते त्यावेळी देखील या सभागृहात हा प्रस्ताव मांडण्यात आलेला आहे. सभापती महोदय, मी 1969 सालापासून मुंबईच्या निरनिराळया जडणघडणीमध्ये सहभागी झालेलो आहे. वेगवेगळया चळवळीच्या माध्यमातून, विद्यापीठातील चळवळीच्या माध्यमातून, युवक चळवळीच्या माध्यमातून किंवा पक्ष संघटनेचे काम करीत असताना आणि गेली आठ वर्षे या सभागृहाचा सदस्य म्हणून काम करीत असताना या मुंबई शहराच्या जडणघडणीमध्ये माझा सहभाग राहिलेला आहे.

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. परशुराम उपरकर )**

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

1974 मध्ये पहिल्यांदा मुंबईतील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाले. मला आठवते की, त्यावेळी श्री. वसंतराव नाईक हे या राज्याचे मुख्यमंत्री होते आणि श्री. प्रभाकर कुंटे राज्यमंत्री होते. श्री. प्रभाकर कुंटे यांच्या नेतृत्वाखाली 1974 मध्ये पहिल्याप्रथम मुंबईतील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाले आणि शासनाने त्यांना फोटोपास देण्याचा निर्णय घेतला. शासनाने फक्त सर्वेक्षणच केले नाही तर प्रत्येक झोपडीधारकाला फोटोपास दिला आणि उद्या जर मुंबई शहरामध्ये सोयीसुविधा द्यावयाच्या असतील तर आधी या झोपडपट्टीवासीयांना दिल्या जातील याला मान्यता दिली. मला आठवते की, श्री. वसंतराव नाईक मुख्यमंत्री असताना 1972-73 नंतर मुंबईमध्ये एकही झोपडपट्टी वाढू दिली जात नव्हती. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांना सांगू इच्छितो की, या ठिकाणी झोपड्या वाढता कामा नये अशी सक्त ताकीद त्यावेळी या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी दिलेली होती. जर झोपडपट्टी वाढली तर त्या ठिकाणच्या वॉर्ड ऑफीसरला आणि स्थानिक पोलीस स्टेशनला जबाबदार धरले जात होते. त्यावेळी या ठिकाणी झोपडपट्टी यावयात नको आणि ती येता कामा नये अशी सक्त ताकीद दिलेली होती. इंदिराजी गांधी पंतप्रधान असताना आणीबाणीच्या काळामध्ये झ ोपडपट्टीतील गरिबांना काही मिळत नाही अशी ओरड केली होती. तानसा येथे आमच्या युवक काँग्रेसचे मोठे शिबिर झाले होते. त्या शिबिरामध्ये आम्ही प्रामुख्याने मागणी केली होती आणि तत्कालीन मुख्यमंत्री श्री. वसंतराव नाईक यांना भंडावून सोडले होते. त्यावेळी श्री. मोहन धारिया असतील किंवा राज्याचे मंत्री श्री. शरद पवार असतील, त्यावेळी गरिबांना काहीही दिले जात नाही याबाबत आम्ही चळवळ केली होती. त्यावेळी श्रीमती इंदिराजी गांधी यांनी झोपडपट्टयांच्या विकासासाठी फक्त 5 कोटी रुपये दिले. त्यावेळी मुंबईतील झोपडपट्टयांना काही तरी देण्याचा निर्णय झाला. 1974 मध्ये मुंबईतील झोपडपट्टयांचे सर्वेक्षण झाल्यानंतर त्यांना फोटोपास दिले गेले. त्यानंतर 1980 साल आले. राजकारणामध्ये माणसांची डोकी मोजली जातात. त्यामुळे सुदैवाने म्हणा किंवा दुर्दैवाने म्हणा या ठिकाणी जी परिस्थिती निर्माण झाली त्याला प्रत्येक पक्ष आणि प्रत्येक पक्षाचे कार्यकर्ते जबाबदार आहेत. त्या ठिकाणी आम्ही जबाबदारी घेतली तशीच 1995 ला तुम्ही ती जबाबदारी घेतली. दोन्ही बाजूने ही जबाबदारी घेतलेली आहे. 1980 मध्ये पुन्हा झोपडपट्टयांचे

...2...

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी .....

सर्वेक्षण करण्याचे ठरले. त्यानंतर 1985 साल आले, 1990 साल आले. 1995 मध्ये शिवसेना-भारतीय जनता पक्षाचे सरकार राज्यामध्ये आले. 1995 ला झोपडपट्ट्या कायम करण्याचा निर्णय घेतला. मुंबईमध्ये जे लोंढे येतात किंवा जे परप्रांतीय येतात त्याचे मुख्य कारण काय आहे ?

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम आता सभागृहात उपस्थित नाहीत. 1995 च्या अगोदर शिवसेनेने या मुंबई शहरामध्ये 40 लाख लोकांना मोफत घरे देण्याचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यांनी सांगितले होते की, तुम्ही आम्हाला सत्तेवर आणा आम्ही तुम्हाला मोफत घरे देऊ. ही हकीकत आहे. It is a matter of fact. It is a matter of record. आम्ही मुंबई शहरामध्ये झोपडपट्टीवासीयांना 40 लाख घरे देऊ हा तुमचा कार्यक्रम होता. मुंबईतीलच नव्हे तर या देशातील लोकांना वाटले की, आपल्याला आणखी काय पाहिजे ? सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी त्यांना सांगू इच्छितो की, 40 लाख घरे बांधण्याचे तर सोडूनच द्या त्यावेळी आपण 2 हजार घरे सुध्दा बांधली नाहीत. आपले 4 मंत्री गेले तरी त्यांना योजना करता आली नाही. शेवटी श्री. सुरेश जैन आले आणि त्यांनी काही तरी करण्याचा प्रयत्न केला आणि या ठिकाणी चार पाच हजार घरे निर्माण झाली.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

हा इतिहास आहे. तुम्ही रेकॉर्ड काढून पहावे. देशातील लोकांना काय वाटले ? आम्हाला आणखी काही नको. डोक्यावर छप्पर मिळाले, मोफत घर मिळत असेल तर त्यांना आणखी काय पाहिजे ? घराचा प्रश्न सुटला तर रस्त्यावर पान पट्टी विकून सुध्दा पोट भरु शकतो. चणे फुटाणे विकून सुध्दा पोट भरु शकतो. मी त्यावेळी वकिली करीत होतो. मंत्रालयाच्या परिसरातील एका भैय्याला अटक करण्यात आली होती. त्याला जामीन पाहिजे होता. ते प्रकरण माझ्याकडे आले होते. तुम्ही मला सोडविण्यासाठी माझे वकील पत्र घ्यावे अशी विनंती त्याने मला केली होती. त्या केससाठी मी एस्प्लनेड कोर्टात गेलो. त्याठिकाणी 5000 रुपयांच्या पर्सनल शुअरिटी बॉण्डवर त्याला सोडून देण्यात आले. ही गोष्ट 1980 सालातील असावी. त्या भैय्याला मी त्यावेळी विचारले होते की, तू 5 हजार रुपये भरशील काय ? तुला कोणी जामीन देणार नाही. तो मला म्हणाला होता की, माझ्या अकाऊंटमध्ये 90 हजार ते 1 लाख रुपये आहेत. मला बॉण्ड नको, मी रोख रक्कम भरण्यास तयार आहे, परंतु मला बाहेर काढावे. म्हणजे पान पट्टीचा धंदा करणा-या माणसाकडे त्यावेळी 1 लाख रुपये होते. सांगण्याचा हेतू हा आहे की, पान पट्टीचा धंदा करणारा भैय्या सुध्दा मुंबईत खूप पैसा कमवितो. भाजीपाला विकणारा माणूस सुध्दा भरपूर पैसा कमवितो. त्यांच्याजवळ खूप पैसा असल्यामुळे त्यांचे शौकही तेवढेच असतात. अशा लोकांना मोफत घर देण्याची घोषणा केल्यामुळे मुंबईतील लोकसंख्या वाढली, त्यामुळे मुंबई नासली.

सभापती महोदय, काल मी 'मुंबई ऑन सेल' नावाच्या पुस्तकाच्या प्रकाशनाच्या कार्यक्रमाला गेलो होतो. त्याठिकाणी मुंबईबद्दल चर्चा झाली होती. आज मुंबईत खऱ्या अर्थाने झोपडपट्टयांचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्याची खरी सुरुवात 1995 सालच्या घोषणेमुळे झाली. आज मुंबईची लोकसंख्या दीड कोटी कोटी झाली आहे. मुंबईत अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. वाहतुकीच्या समस्येने गंभीर रुप धारण केले आहे. कांदिवलीहून येण्यासाठी मला 4 तास लागतात असे सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी सांगितले. चेंबूरहून येण्यासाठी मला 2 तास लागतात. ही वस्तुस्थिती आहे. सभागृहाची वेळ सकाळी 10.30 ची असेल तर सकाळी 8.30 वाजता घर सोडले तर येथे वेळेवर पोहोचता येते.

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी....

सभापती महोदय, मुंबईतील गिरण्या नष्ट झाल्या आहेत. गिरण्याच्या जमिनींवर मोठमोठे टॉवर्स उभे राहिले आहेत. त्या टॉवर्समध्ये मराठी माणूस रहात नाही. आज मुंबई शहरासाठी एमएमआरडीएच्या माध्यमातून निरनिराळया योजनांसाठी 1 लाख 30 हजार कोटी रुपये खर्च केले जात आहेत. मग मोनो रेल असेल, मेट्रो रेल्वे असेल असे महत्वपूर्ण प्रकल्प राबविले जात आहेत. हे काम मुंबई महानगरपालिकेला कधीही जमले नसते. एका रस्त्याच्या रुंदीकरणाचे कामही मुंबई महानगरपालिकेला करता येत नाही. आज एमएमआरडीएकडे अमाप पैसा असल्यामुळे ते ही कामे करु शकतात. शासनाकडून मुंबईकरांना पुढील 5-10 वर्षांचे चित्र दाखविले जाते. त्यादृष्टीकोनातून मुंबई शहरासंबंधी शासनाच्या माध्यमातून चांगले प्रयत्न होत आहेत.

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 18:25

(ॲड. गुरुनाथ कुलकर्णी...

या मुंबईची जशी विरोधी पक्षाला काळजी आहे तशी ती सत्ताधारी पक्षाला देखील आहे. विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी सांगितले की आता रस्त्यावरही झोपड्या होत आहेत. मुंबईचे सर्व पदपथ हॉकर्सनी व्यापलेले आहेत. पदपथावर चालायला जागा नाही इतके हॉकर्स आहेत. मुंबईमध्ये एकूण किती हॉकर्स आहेत, किती हॉकर्सकडे लायसन्स आहे याची आकडेवारी कोणाकडे आहे काय ? ही हॉकर्सची संख्या वाढली. याला शासन जबाबदार आहे काय ? हॉकर्सनी पदपथावर बसावे की न बसावे हे पाहाण्याची जबाबदारी कोणाची आहे ? गेल्या 17 वर्षापासून या मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना-भाजपची सत्ता आहे. सभापती महोदय, आज मुंबई स्वच्छ ठेवण्याची, मुंबईचा कारभार चांगला करण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे आहे तीच मंडळी जर मुंबईतील वाढणा-या झोपडपट्टीबाबत, मुंबईतील अस्वच्छतेबाबत तक्रार करणार असतील तर मग आम्ही कुणाकडे बघायचे ? ग्रामीण भागातील आमदार, खासदाराला जसे काम असते तसे ते मुंबईतील आमदार, खासदाराला नसते. मुंबईच्या विकास कामामध्ये मुंबईतील आमदार किंवा खासदाराचा कोणताही सहभाग नसतो. मुंबईची सर्व कामे ही मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक करीत असतात. अगदी स्वच्छता राखण्यापासून ते सर्व प्रकारची परवानगी देण्यापर्यन्तची सर्व कामे मुंबई महानगरपालिका करीत असते. मुंबई महानगरपालिका ही गेल्या 17 वर्षापासून शिवसेना-भाजप युतीकडे आहे. त्यामुळे मुंबई आणि भाजपच्या सन्माननीय सदस्यांना मागील 17 वर्षामध्ये झोपडपट्टी निर्मूलनासाठी, शहरात येणारे लोंढे थांबविण्यासाठी, पदपथावर हॉकर्स येऊ नयेत यासाठी कोणकोणत्या उपाययोजना केल्या, कोणकोणत्या योजना राबविल्या याचा लेखाजोखा द्यावा लागेल. केवळ सरकारला दोष देऊन चालणार नाही.

सभापती महोदय, मुंबई केन्द्रशासित करण्याचे प्रयत्न सुरु आहेत असे या ठिकाणी बोलले गेले. हे मुंबई शहर घेऊन जाण्याची कोणाचीही हिमंत नाही. मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याची कोणाचीही हिंमत नाही. हा भाग तोडला जाईल, तो भाग तोडला जाईल... म्हणजे अशा प्रकारे भाग तोडणे हे कोणाच्या मर्जीवर आहे काय ? दिल्ली केन्द्रशासित होती, ते राज्य झाले. गोवा केन्द्रशासित होता, तेही राज्य झाले. तेव्हा मुंबईची काळजी विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्यांनी

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

करण्याची आवश्यकता नाही. Mumbai is part and parcel of Maharashtra. Mumbai is integral part of Maharashtra. तेव्हा मुंबई महानगरपालिकेची जी जबाबदारी तुमच्यावर सोपविलेली आहे ती तुम्ही व्यवस्थित पार पाडावी एवढीच अपेक्षा व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मुंबईच्या झालेल्या दुरवस्थेच्या संबंधात नियम 260 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी आणलेला आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये जी झोपडपट्टी निर्माण झालेली आहे याला सर्वस्वी मुंबई महानगरपालिकेतील राज्यकर्ते जबाबदार आहेत. मुंबईतील नगरसेवकांनी आणि अधिका-यांनी ठरविले तर मुंबईमध्ये एकही वीट लागू शकत नाही. मला याचा अनुभव आहे. माझ्या घराच्या वेळी मुंबई महानगरपालिकेतील राज्यकर्त्यांनी आणि अधिका-यांनी एवढा त्रास दिला की तो मी कधीच विसरु शकणार नाही. आता येथे सांगितले जाते की, झोपडपट्टी हटविण्यासाठी पोलीस बळ मिळत नाही. परंतु कोणत्याही कामाबाबत महानगरपालिकेमध्ये तक्रार केली तर त्याची दखल घेतली जात नाही ही वस्तुस्थिती आहे. वैशालीनगर येथील बांधकामाबाबत तेथील 600 लोकांनी महानगरपालिकेकडे तक्रार केली असतानाही महानगरपालिकेने कोणतीही दखल घेतली नाही.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत........

थातूरमातूर कारवाई करुन निघून जातात आणि पुन्हा झोपड्या उभ्या राहतात. झोपडपट्टया वाढू न देण्याची जबाबदारी पूर्णत: महापालिकेची आहे. त्यांनी या संदर्भात नियंत्रण ठेवले तर या शहरामध्ये झोपडपट्टया वाढणार नाहीत. या शहरामध्ये झोपडपट्टया वाढण्यास महापालिकेतील राज्यकर्ते जबाबदार आहेत. त्यांनी या शहरातील अनधिकृत बांधकामे ऑथोराईज करण्याचे काम केले आहे. त्यामुळे या शहरात परप्रांतीयांचे लोंढे वाढू लागले. आज या शहरामध्ये हॉकर्सचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. पूर्वी मुंबई महापालिकेला तीन महिन्याचे २१ रुपये भाडे दिले तर कुठेही स्टॉल लावण्यास परवानगी मिळत होती. महापालिकेकडून अधिकृतपणे लायसन्स दिले जायचे आणि तुम्ही तुमचा स्टॉल उभारायचा अशी पध्दत होती. पूर्वी या शहरामध्ये रस्ते मोठे होते, फुटपाथ मोठे होते. त्यामुळे फुटपाथवर स्टॉल उभारण्याचे काम झाले. १९६८ पासून मुंबई महापालिकेने स्टॉल उभारण्यास परवानगी देण्याची पध्दत सुरु केली. त्यामुळे या शहरातील वाहतुकीचा आणि रहदारीचा प्रश्न गहन बनलेला आहे. पादचाऱ्यांना चालण्यास फुटपाथ शिल्लक राहिलेले नाहीत. आज या शहरात कुठेही लोक धंदा करीत आहेत. अनधिकृतपणे धंदा करण्यास फुटपाथ मोकळे आहेत, रस्ते मोकळे आहेत. त्यामुळे या शहरात परप्रांतीयांचे लोंढे वाढू लागले आहेत. लोंढे वाढण्याचे हेच मुख्य कारण आहे. आज मुंबई शहरातील नागरिकांना चालण्यास रस्त्यावर जागा उपलब्ध नाही. वेळेवर या समस्येवर नियंत्रण ठेवले गेले असते तर परप्रांतीयांचा लोंढा वाढला नसता.

सभापती महोदय, आज वारंवार सांगितले जाते की, महापालिकेची जबाबदारी असताना मुंबई शहरातील कामे एमएमआरडीए करीत आहे. मी स्वत: एमएमआरडीएच्या कार्यालयात गेलो होतो. तिथे चार-पाच कॉन्ट्रॅक्टर बसलेले होते. मी त्यांना विचारले की, तुम्ही कामे कशी करता? तुम्हाला किती कट द्यावा लागतो? ते म्हणाले की, आम्हाला काहीही द्यावे लागत नाही. एमएमआरडीएची कामे मिळविण्यासाठी पैसे द्यावे लागत नाहीत. एमएमआरडीएच्या कामाची क्वॉलिटी चांगली असावी लागते, त्याप्रमाणे आम्ही कामे करतो. नेमके त्याच्या उलट महापालिकेत कारभार चालतो. महापालिकेची कामे देण्याबाबत मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालतो. कॉन्ट्रॅक्ट मिळविण्यासाठी रिंग पध्दत वापरली जाते. मी कोणत्याही कॉन्ट्रॅक्टरचे नाव घेऊ इच्छित नाही. अन्यथा नाव घेतले तर संबंधित कॉन्ट्रॅक्टरविरुध्द ॲक्शन घेतली जाईल. त्या कॉन्ट्रॅक्टरने

...२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत........

सांगितले की, आम्ही महापालिकेच्या नाले बांधकामाची कामे करावयास घेतली तर आम्हाला खूप पैसे मिळतात. आम्ही केलेली कामे पहावयास कोणी येत नाही. माती काढली तर दगड काढले असे दाखविण्यात येते. मी स्वत: बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर आहे, तुम्ही माझ्याकडे काम करावयास तयार आहात का? असे मी त्यांना विचारले. ते म्हणाले की, आम्हाला बिल्डिंगची कामे करण्याची गरज नाही. तुमच्याकडून जमीन घ्यायची, महापालिका, राज्य शासन यांच्याकडून विविध प्रकारच्या परवानग्या मिळवायच्या, टॅक्स भरायचा आणि त्यातून आम्हाला किती फायदा मिळणार? त्यापेक्षा महापालिकेचे कॉन्ट्रॅक्ट मिळाले तर आम्हाला खूप फायदा होतो. एवढ्या प्रमाणात महापालिकेच्या कामामध्ये भ्रष्टाचार होतो. त्यामुळेच राज्य शासनाला या शहरातील महत्वाची विकास कामे एमएमआरडीएकडे सोपवावी लागली. एमएमआरडीए मार्फत क्वॉलिटी वर्क केले जाते. त्यामुळे या शहरातील रस्त्यांची सुधारणा झाली. चांगल्या दर्जाच्या पुलाची उभारणी झाली.

सभापती महोदय, या शहरातील पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर बनलेला आहे. शहरात नव्याने उभारण्यात येणाऱ्या प्रत्येक इमारतीमध्ये रेन हार्वेस्टिंगच्या माध्यमातून पावसाचे पाणी साठविण्याची सक्ती करण्यात आली. परंतु सरसकट सर्व भागात ही सक्ती यशस्वी होऊ शकत नाही. वर्सोवा परिसरामध्ये जमिनीखाली काही फुटावर पाणी लागते. कारण समुद्र आणि खाडी जवळ आहे. त्या भागात हार्वेस्टिंग होऊ शकत नाही. कारण जमिनीखाली क्षाराचे प्रमाण अधिक आहे. परंतु मुंबई महापालिकेच्या इमारत प्रस्ताव विभागामध्ये पैसे दिले की, रेन हार्वेस्टिंग यंत्रणा न उभारताही सरसकट सीसी दिली जाते. पैसे दिले की प्लॅन मंजूर केले जातात. प्लिंथपर्यंतचे डॉक्यूमेंट चेक न करता पुढील बांधकामास परवानगी दिली जाते. महापालिका कायद्यात तरतूद आहे त्यानुसार प्लिंथ सीसी, नंतर पहिल्या मजल्याची सीसी, नंतर दुसऱ्या मजल्याची सीसी दिली जाते. परंतु आज महापालिकेमध्ये नवीन इमारतींच्या बांधकामास परवानगी देताना मोठया प्रमाणात भ्रष्टाचार होत आहे. इमारतींना परवानगी देण्याचे काम महापालिकेकडून सक्षमपणे होत नसेल तर हे काम दुसऱ्या एखाद्या संस्थेकडे दिले जावे अशी मी शासनाला विनंती करतो. भ्रष्टाचारामुळे सर्वसामान्य नागरिकांना स्वस्त घरे मिळू शकत नाही. मुंबई शहरामध्ये अनेक ठिकाणी सार्वजनिक उपयोगासाठी भूखंड आरक्षित ठेवण्यात आले होते. परंतु महापालिकेतील राज्यकर्त्यांनी डेव्हलपमेंट प्लॅनचा विचार न करता अनेक ठिकाणी आरक्षण बदलण्याचे काम केले.

..३..



SGB/ 18:30

श्री.विजय सावंत........

सभापती महोदय, आजपर्यंत कोणत्याही सरकारने महापालिका क्षेत्रात पब्लिक हाऊसिंगसाठी ४० टक्के आरक्षण ठेवण्याची तरतूद केलेली नव्हती. लँड सिलिंग कायदा आला त्यावेळी पब्लिक हाऊसिंगसाठी १० टक्के आरक्षण होते. परंतु सुप्रीम कोर्टाने ताशेरे ओढल्यानंतर हे १० टक्के आरक्षण ५ टक्क्यावर आणण्यात आले. मुंबईतील जून्या इमारतींचा मोठया प्रमाणात पुनर्विकास सुरु झालेला आहे. परंतु सर्वसामान्य लोकांना पुनर्विकासामध्ये घरे कशी मिळू शकतील? ४० टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. शासनाने जी.आर.काढला. परंतु कोणी ऑब्जेक्शन घेतले नाही. तो जी.आर. फायनल व्हायचा आहे. जागा खाजगी मालकाची असताना ४० टक्के आरक्षण ठेवायचे आणि लोकांना मोफत घरे द्यायची हा कुठला न्याय आहे? आज या शहरामध्ये सर्वसामान्य नागरिकांच्या सोयीसाठी आवश्यक असणाऱ्या सुविधा महापालिकेने पुरविल्या पाहिजेत. या शहरातील उद्यानासाठी राखीव असलेल्या भूखंडांवर झोपड्या उभ्या राहिलेल्या आहेत.

नंतर ४जी.१.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विजय सावंत ......

ज्या ज्या ठिकाणी गार्डनसाठी आरक्षित भूखंड होते त्या सर्व ठिकाणी झोपड्या झालेल्या आहेत. अशा प्रकारे महापालिकेला प्लॉट सांभाळता न आल्याने झोपड्यांची संख्या वाढली आहे. त्याचा परिणाम शासनाचा खर्च वाढण्यात झाला आहे. आज मुंबईतील रस्त्यावर सुध्दा झोपड्या आहेत. स्लम रिडेव्हलपमेंटची स्कीम महापालिकेनेच प्रथम आणली परंतु त्याची अमलबजावणी मात्र शासनाला नाईलाजास्त करावी लागत आहे. कारण तसे केले नाही तर शहरात हाऊसिंगचे धोरण शासन राबवू शकणार नाही. त्याचबरोबर मुंबईत आणि मुंबईच्या बाहेर देखील एफएसआय सारखाच असायला पाहिजे होता. शासनाने तो सारखा करण्याचा प्रयत्न देखील केला परंतु टीडीआर माफिया मुंबईत काही ठिकाणी बसलेले आहेत. ते हा टीडीआर पूर्वी बिल्डरांना विकत होते त्याचा दर पूर्वी 100 ते 1200 रुपये एवढाच होता परंतु या माफियांमुळे हा दर आता 3000 ते 3500 पर्यंत गेला आहे त्यामुळे अशा योजना राबविणे शक्य होत नाही. हे थांबविण्यासाठी शासनाने प्रयत्न केला असता या टीडीआर माफियांनी त्याला कोर्टात चॅलेंज केले व ते जिंकले. मग आपण सुप्रीम कोर्टात गेलो पण वेळ काढण्यासाठी त्यांनी तेथे मोठमोठे वकील लावून वेळ काढण्याचे प्रयत्न सुरुच ठेवले. तेथून प्रकरण खाली आल्यानंतर जज्मेंट घेण्यासाठी दोन-तीन महिने लागले, अशा प्रकारचे विविध पातळीवर या टीडीआर लॉबीने प्रयत्न केले आहेत. वास्तविक यासंबंधीचा कायदा केला तर ही टीडीआर लॉबी आपल्याला थांबविता येईल. अशा प्रकारे या शासनाचे झोपडपट्टी कमी करण्याचे धोरण असून त्यासाठी महापालिका एमएमआरडीए पेक्षा अधिक चांगले काम करु शकत नाही. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी नियम 260 अन्वये सभागृहात चर्चेसाठी आणलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, या प्रस्तावामध्ये अनेक विषय अंतर्भूत आहेत. त्यात मुंबई व परिसरातील विकासाशी संबंधित एमएमआरडीए, वाहतूक, एसआरए असे हे विषय आहेत. मी प्रामुख्याने एमएमआरडीएच्या विषयावर बोलणार आहे. गेल्या अनेक अधिवेशनांमध्ये या सभागृहात एमएमआरडीएसंबंधी सातत्याने चर्चा होत असून आपण त्यावर बोलत आहोत. लोखो लाकांचे मोर्चे सुध्दा काढत आलो. ठाणे जिल्हा हा एमएमआरडीएमध्ये अंतर्भूत आहे की नाही हे सन 2005 पर्यंतही एमएमआरडीएला समजले नाही. परंतु ज्यावेळेस जिल्ह्यातील लोकांनी प्रचंड आंदोलने उभी केली त्यावेळेस एमएमआरडीएच्या लक्षात आले की, ठाणे जिल्हा सुध्दा या क्षेत्रात समाविष्ट आहे. एमएमआरडीएची स्थापना प्रामुख्याने मुंबई व परिसरातील नियोजन करण्याच्या दृष्टीने सुनियोजित अशा प्रकारचा विकास करण्यासाठी झालेली आहे. परंतु स्थापनेपासून आजपर्यंत यामध्ये जे कोणी अधिकारी अथवा सदस्य बसले आहेत त्यांना फक्त मुंबईच दिसत होती. तोपर्यंत एमएमआरडीएच्या अखत्यारित ठाणे जिल्हा, रायगड जिल्ह्यातील रायगड, उरण, पनवेल आणि अलिबाग हा भाग आहे असे फक्त म्हटले जात होते. त्यामुळे हजारो कोटी रुपयाचा निधी आमच्या ठाणे जिल्ह्याला दिला जात नव्हता. अशा प्रकारे 4355 कि.मी. चा परिसर असलेला एमएमआरडीएचा भाग, ज्याची स्थापना सन 1975 मध्ये झाली तेव्हापासून सन 2005 पर्यंत ठाणे जिल्ह्याला वंचित ठेवण्याचे पाप या प्राधिकरणाने केले आहे. त्यामुळे ठाण्याचा संपूर्ण विकास खुंटला आहे. आम्ही सातत्याने विचारत आलो की ठाणे जिल्ह्याचा विकासाचा अनुशेष नेमका किती आहे, या जिल्ह्यावर किती खर्च करावयास पाहिजे होता आणि प्रत्यक्षात किती झाला ? पण त्याचे उत्तर आजपर्यंत मिळाले नाही. मी या चर्चेच्या निमित्ताने पुन्हा अशी मागणी करतो की, सन 1975 सालापासून आजपर्यंत ठाण्याचा विकासाचा अनुशेष किती होता आणि आजच्या परिस्थितीत तो किती आहे ? हा आमचा अधिकार असून तो आम्हाला मिळालाच पाहिजे म्हणून या प्रश्नाच्या उत्तराची अपेक्षा मी करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

1.13 कोटी रुपयांचे प्लॅनिंग एमएमआरडीएने केलेले असून एमएमआरडीए एवढे पैसे खर्च करणार आहे. हे पैसे आपण कोठे, किती खर्च करणार आहात ? ज्यावेळेस आपण नियोजन करता त्यावेळेस मुंबईच्या जवळ ठाणे जिल्हा आहे व त्या ठिकाणी जर नियोजन केले नाही किती मोठया अडचणींना तोंड द्यावे लागेल ते आता कोठे शासनाला समजायला लागले आहे. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम म्हणतात की, कांदिवलीवरुन मुंबईला यावयास 4 तास लागतात तर एमएमआरडीएच्या दुस-या टोकावरुन मुंबईत येण्यासाठी किती वेळ लागत असेल याचा विचारच केलेला बरा. त्यावेळेस हा विचार का केला गेला नाही ? केवळ एकमेकांच्या उखाळया-पाखाळया काढून हा प्रश्न संपणार नाही. एक म्हणेल मुंबई महापालिकेची जबाबदारी आहे, एक म्हणेल एमएमआरडीएची जबाबदारी आहे, एक म्हणेल राज्यशासनाची जबाबदारी आहे. परंतु एमएमआरडीएच्या ठाणे जिल्हयाची लोकसंख्या 1.25 कोटी इतकी आहे. मुंबई एवढीच ठाणे जिल्हयाची लोकसंख्या आहे. ठाणे जिल्हयात 7 महापालिका व 13 नगरपालिका असून ठाणे जिल्हयातील 1000 गावे एमएमआरडीएच्या कक्षेत आहेत. ठाणे जिल्हयाकडे एमएमआरडीएचे, शासनाचे लक्ष जात नाही त्याचे डोळे फुटलेले आहेत का ? ठाणे जिल्हयामध्ये वाहतुकीच्या दृष्टीने फ्लायओव्हर ब्रीज पाहिजे, स्कायवॉकची आवश्यकता आहे,निरनिराळया ठिकाणी धरणांची आवश्यकता आहे. एमएमआरडीएने आणि शासनाने लक्ष न दिल्यामुळे ठाणे जिल्हयात अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झालेला आहे. मुंबईचे प्रवेशद्वार ठाणे जिल्हा असून ठाणे जिल्हयातूनच लोक मुंबईमध्ये प्रवेश करीत असतात. असे असतांनाही ठाणे जिल्हयाला वंचित ठेवण्यात आले आहे. शासनाने महानगर पालिका स्थापन केल्या, आताच वसई-विरार केली. ठाणे जिल्हा हा एकमेव जिल्हा असा आहे की, देशातील एकाही जिल्हयात 7 महापालिका नाहीत त्या केवळ ठाणे जिल्हयातच आहेत. ठाणे जिल्हयाच्या वाढत्या नागरीकरणाकडे बघून शासनाने आणि एमएमआरडीएने अधिक लक्ष देऊन अधिक निधी खर्च केला पाहिजे. आता महानगर पालिकांना जेएनएनयुआरएमची योजना सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून केंद्रसरकार 25 टक्के, राज्यसरकार 25 टक्के व उर्वरित 50 टक्के स्थानिक स्वराज्य संस्थानी पैसे टाकावयाचे आहेत.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

ठाणे जिल्हयाच्या महापालिका आधीच अडचणीत आहेत त्या 50 टक्के खर्च कसा काय करु शकतील ? महापालिकांना कर्जबाजारी करण्याचे धोरण एमएमआरडीए करीत आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. उलट एमएमआरडीएने महापालिकांना कर्ज नाही तर अनुदान दिले पाहिजे. कारण आमचा बॅकलॉग आहे. आमच्या वाटयाचे पैसे तुम्ही दिलेले नाहीत. असे असतांना आम्हाला पैसे देऊन प्रोजेक्ट पूर्ण करावयास सांगणार असाल तर ते जमणार नाही. अनेक महापालिकांकडे त्यांच्या कामगारांना पगार देण्यासाठी पैसे नाहीत. या ठिकाणी मोठमोठे प्रोजेक्ट दिसतात परंतु या ठिकाणी पुढील पाच वर्षात भयानक परिस्थिती निर्माण होणार आहे. पुढील पाच वर्षात कर्जाची परतफेड करण्यासाठी या महापालिकांकडे पैसे राहणार नाहीत. कर्मचा-यांचे पगार देण्यासाठी पैसे नाहीत तर ते कर्जफेड कशी काय करणार ? त्यामुळे माझी मागणी आहे की, एमएमआरडीएने कर्ज न देता अनुदानाच्या रुपाने महापालिकांना पैसे दिले पाहिजे कारण तो आमचा अधिकार आहे. एमएमआरडीएचा जो कारभार आहे तो पारदर्शक आहे का ? भाईंदर महापालिकेच्या रस्त्यांचे काम 50 टक्के सुध्दा पूर्ण झालेले नाही असे असतांना एमएमआरडीए 25 कोटी रुपये देऊन मोकळी झालेली आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून रस्ते तयार झाले व त्याबाबत एमएमआरडीएने जो हिस्सा घेतला त्याचे पैसे सुध्दा देऊन मोकळे झाले या सगळया गोष्टीची चौकशी झाली पाहिजे अशी या निमित्ताने मी मागणी करतो. एमएमआरडीएचा पैसा म्हणजे कोणाच्या घरचा पैसा नाही तर मुंबईचे भूखंड विकून तुमच्याकडे जो पैसा आलेला आहे तो जनतेचा पैसा आहे. विकासासाठी हा पैसा देण्यात आलेला आहे. परंतु अशा पध्दतीने खर्च होत असेल तर ते योग्य राहणार नाही. लोकांना कोणतीही सुविधा उपलब्ध न करता एमएमआरडीए पैसे देऊन मोकळी झालेली आहे त्यामुळे याबाबत चौकशी होण्याची नितांत आवश्यकता आहे. शासन नेहमी पॉप्युलर घोषणा करीत असते मग त्या निवडणुकीच्या वेळेस असो किंवा अन्य वेळेस असो. ठाणे जिल्हयात आम्ही अशी धरणे बांधू, तशी धरणे बांधू.

मी परवा सुध्दा सभागृहात सांगितले होते की, ठाणे जिल्हयातील छोटी व मोठी अशी एकूण 16 प्रकल्पांची कामे प्रलंबित आहेत. केद्राच्या वन खात्याची परवानगी न घेतल्यामुळे हे प्रकल्प प्रलंबित आहे. आपल्याला

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर ....

केंद्रशासनाची परवानगी घेण्यासाठी अजून किती वर्षे लागणार आहे ? एखाद्या धरणाची किंमत 700 कोटी रुपये असेल तर 10 वर्षात या त्या धरणाची किंमत तीनपट, चारपट होत असते. शेवटी हे पैसे कोणाचे आहेत ? त्यामुळे एमएमआरडीए आणि शासनाने गंभीरपणे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शासन रोज स्टेटमेंट करीत असते की, आम्ही शाई धरणाचे काम करणार, पोशीर धरण करणार, निरनिराळया धरणाच्या माध्यमातून आम्ही मुंबईला पाणी आणणार, ठाणे जिल्हयाला पाणी देणार.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

परंतु, कुठलेही काम पूर्ण होऊ शकले नाही. MMRDA ला पैसे दिले तरी काम पूर्ण होऊ शकणार नाही. काम पूर्ण करण्यासाठी इच्छा शक्ती लागते. 15 वर्षानंतर पाण्यासाठी युद्ध होणार आहे. मुंबई-ठाण्यामध्ये पाणी कपात आहे. पुण्यामध्ये तर पाण्याची तीव्र टंचाई आहे. जो पर्यंत वन विभाग धरणांसाठी परवानगी देणार नाही तो पर्यंत आपले पुढचे व्हिजन पूर्ण होणार नाही. भविष्यात आपल्याला अनेक गोष्टींना सामोरे जावे लागणार आहे. मुंबईतील पूर रेषेसंबंधी माधव चितळे समिती गठित करण्यात आली होती. मिठीला नदीमुळे मुंबईत पूर परिस्थिती निर्माण झाल्यामुळे मिठी नदी प्राधिकरण स्थापन करण्यात आले. ठाण्यामध्ये उल्हास नदी आहे. पण त्यासाठी प्राधिकरण होत नाही. उल्हास नदीच्या पात्रातील गाळ काढण्यासाठी निधी देखील दिला जात नाही. अशा प्रकारे आपण अन्याय करत गेला तर ज्या उद्देशासाठी MMRDA ची स्थापना करण्यात आली त्यालाच हरताळ फासला जाईल. विकासासाठी MMRDA ची स्थापना करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मुद्रांक शुल्कासंबंधी देखील मी बोलणार आहे. ठाणे जिल्ह्यात मुद्रांक शुल्काची अनेक प्रकारची प्रकरणे आहेत. रेडीरेकनर प्रमाणे स्टॅम्प डयुटी न घेता कमी दराने स्टॅम्प डयुटी घेण्यात आली आहे. अशा प्रकारची फक्त 10 प्रकरणे मी शासनाकडे दिली. या प्रकरणात एकूण 1 कोटी 74 लाख रूपये शासनाकडे महसुलापोटी भरण्यात आले नव्हते. सदर रक्कम वसूल करण्याचे आदेश शेवटी शासनाला काढावे लागले. ठाणे शहरामध्ये एकूण 79 हजार अशी प्रकरणे आढळतील की, रेडीरेकनर पेक्षा कमी दराने स्टॅम्प डयुटी भरली आहे. या प्रकरणातील संपूर्ण रक्कम वसूल केली तर शासनाला जवळ जवळ 100 कोटी रूपयांचे उत्पन्न मिळू शकेल. ज्यावेळी ही बाब मी सभागृहात उपस्थित केली होती त्यावेळी माननीय महसूल मंत्र्यांनी देखील मान हलविली होती. यामध्ये लॅक्युना आहे हे त्यांनी देखील मान्य केले होते. मुद्रांक शुल्क विभाग महसूल गोळा करण्यास दिरंगाई करीत आहे. 79 हजार प्रकरणातील महसूल वसूल करे पर्यंत विद्यमान शासकीय अधिकारी निवृत्त होतील. मुद्रांक शुल्क विभागातील अधिकाऱ्यांनी बिल्डरशी संगनमत करून शासनाचा कोट्यवधी महसूल बुडविण्याचे काम केले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर.....

म्हणून माझी येथे मागणी आहे की, या सर्व प्रकरणातील स्टॅम्प डयुटी शासनाने तातडीने वसूल करावी. शासकीय अधिकाऱ्यांनी राजद्रोह केला आहे. असे कृत्य ज्यांनी जाणीवपूर्वक केले आहे. त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला पाहिजे. शासनाने सदर रक्कम वसूल करायची म्हटले तर नुसत्या ठाणे शहरातून शासनाला 100 कोटी रूपये मिळतील. ठाणे जिल्ह्यातील प्रकरणांची चौकशी केली तर त्याहून अधिक रककम मिळू शकेल. तेव्हा या कामासाठी वेगळे पथक नेमून तातडीने सर्व कागदपत्रांची छाननी झाली पाहिजे व त्याप्रमाणे रक्कम वसूल झाली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, मुंबई-ठाणे मधील मोडकळीस आलेल्या अनेक इमारती पावसाळ्यामध्ये कोसळत असतात. त्यात राहणाऱ्या नागरिकांना नुकसान भरपाई द्यावी लागते. ठाणे शहरातील वागळे इस्टेट या भागातील मोडकळीस आलेल्या इमारतीतील 25 हजार लोकांचे एक निवेदन माननीय मुख्यमंत्र्यांना दिले आहे. मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणाऱ्या लोकांसाठी शासनाने काही तरी केले पाहिजे. सभागृहामध्ये आश्वासन देऊन काम होत नसेल तर तो सभागृहाचा अवमान आहे. नागपूर अधिवेशनामध्ये माननीय नगरविकास मंत्र्यांनी सर्वंकष असे धोरण जाहीर करू असे जाहीर केले होते. त्यामुळे मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणारे रहिवासी शासनाच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले आहेत. शासन कशा पद्धतीने विकास करणार आहे, याकडे डोळे लावून बसले आहेत. उद्या इमारत पडली तर पर्यायी निवाऱ्याची सोय सुद्धा करण्यात आलेली नाही. ज्या 25 हजार लोकांनी निवेदन दिले आहे, त्यासंबंधी शासनाने या निमित्ताने धोरण जाहीर करावे अशी मी या निमित्ताने विनंती करीत आहे. विधिमंडळामध्ये दिलेला शब्द शासन पाळत नसेल तर तो या सार्वभौम सभागृहाचा अवमान आहे. तेव्हा शासनाने धोरण जाहीर करावे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. आपण मला येथे बोलण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद.

.............

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) :सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी नियम 260 अन्वये जो प्रस्ताव मांडलेला आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरात वाहतुकीचा प्रश्न, पाण्याचा प्रश्न, परप्रांतीयांच्या लोंढ्याचा प्रश्न, नोकऱ्यांचा प्रश्न, विद्यार्थ्यांचा शाळा-कॉलेजातील प्रवेशाचा प्रश्न इत्यादी प्रश्न तर आहेच, परंतु सर्वात महत्वाचा प्रश्न म्हणजे मुंबईत येणाऱ्या प्रत्येक नागरिकाला घराचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर भेडसावत आहे. घरांच्या प्रश्नाबाबत बोलावयाचे झाले आणि ज्या संस्थेवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही अशी त्या संस्थेचे नाव आहे म्हाडा. म्हाडामधील भ्रष्टाचाराबाबत बोलू तेवढे कमीच आहे. माननीय शिवसेनाप्रमखांनी 1995 मध्ये झोपडपट्टीवासियांना मोफत घर योजनेची घोषणा केली होती. त्यातून एस.आर.ए.स्कीमचा जन्म झाला. झोपडपट्टयांचे निर्मूलन करुन तेथील लोकांनी झ ोपडपट्टीमध्ये न राहता,त्यांना चांगल्या प्रकारच्या घरात कसे राहता येईल. त्यांचे राहणीमान कसे सुधारता येईल....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांना कदाचित माहीत नसेल म्हणून मी सांगतो की, माननीय श्री.शरद पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असताना माननीय शिवसेनाप्रमुख श्री.बाळासाहेब ठाकरे त्यांच्याकडे मोफत घराची योजना घेऊन गेले होते. राज्यात सत्ता आल्यानंतर झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देऊ अशी ती योजना होती. सन्माननीय सदस्य जे सांगत आहेत तशी योजना नव्हती. माननीय बाळासाहेब ठाकरे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांना भेटून मोफत घरांची योजना सादर केली होती आणि त्यासंबंधीचे फोटो वर्तमानपत्रात आले होते..

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : 1995 च्या निवडणुकीत 40 लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देण्याचा शिवसेना पक्षाचा अजेंडा होता...

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना मी धन्यवाद देतो. माझ्या नॉलेजमध्ये काही फरक करण्यापेक्षा आपण आपल्या सन्माननीय सदस्यांना सांगाल तर बरे होईल...(अडथळा). माननीय शिवसेना प्रमुखांनी मुंबईतील झोपडपट्टीतील लोकांचे राहणीमान सुधारावे, त्यांनी देखील इमारतीमध्ये रहावे, झोपडपट्टयांच्या जागी चांगल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर..

इमारती कशा होतील या उद्देशाने मोफत घरांची घोषणा केली होती. माननीय शिवसेना प्रमुखांनी ही घोषणा मते मिळविण्यासाठी केली नव्हती..(अडथळा)..याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी सांगितले की, ... असे विचार तत्कालीन मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांचे होते. राज्यामध्ये जे काही झाले ते त्यांनी केले की यांनी केले यावर सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले. मी त्यांना धन्यवाद देतो....

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी सांगू इच्छिते की, चाळीस लाख झोपडपट्टीवासियांना मोफत घरे देण्याचा अजेंडा शिवसेना-भाजप पक्षाचा होता असे सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले. तर सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी असे सांगितले की, माननीय बाळासाहेब ठाकरे ती योजना घेऊन माननीय श्री.शरद पवार यांच्याकडे गेले होते. माननीय श्री.शरद पवार यांचा तो अजेंडा होता असा त्याचा अर्थ होत नाही.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे ...

तेव्हा आपण वाक्य रचना नीट ऐकत जा. अन्यथा निष्कारण गैरसमज निर्माण होत असतो.

श्री.किरण पावसकर :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे वाक्य मी नीट ऐकले आहे. दोघानी जी काही मते सांगितली होती ती देखील मी नीट ऐकली होती. त्यावर आम्ही असेही मत सांगितले होते की, होय, शिवसेना प्रमुख म्हणाले नाहीत असे मी म्हणत नाही. माननीय शिवसेना प्रमुखांनी विचार मांडले होते आणि माननीय शिवसेनाप्रमुखांचा उद्देश काय होता, हे सुध्दा मी सभागृहात सांगितले होते. त्यांचा वाईट उद्देश नव्हता. त्यांच्या उद्देशातून एस.आर.ए.ची योजना जन्माला आली होती. झोपडपट्टीधारकांना आज जी चांगली घरे मिळत आहेत, त्याचे सगळे श्रेय शिवेसना प्रमुख माननीय श्री. बाळासाहेब ठाकरे यांनाच द्यावे लागेल. याबाबतीत कोणाच्याही मनात दुमत नाही. परंतु त्याचबरोबर या राज्याची सत्ता 50 वर्षापासून एका पक्षाकडे होती, त्यातील साडेचार वर्षे शिवसेना - भारतीय जनता पक्षाकडे सत्ता होती. परंतु आपण प्रत्येक गोष्टीसाठी साडेचार वर्षाकडे बोट दाखवत आहात. साडे चव्वेचाळीस वर्षे आपल्याच पक्षाकडे सत्ता होती. परंतु अशा प्रकारची चांगली योजना हाती घेण्यासबंधीची बाब आपल्या सरकारच्या लक्षातच आली नाही काय ? झोपडपट्टी धारकांना चांगली घरे देण्याची योजना आपल्या सरकारच्या लक्षात इतकी वर्षे का आली नाही ? मुंबई पुणे हा सहा पदरी मार्ग करावा हे आपल्या सरकारच्या का लक्षात आले नाही ? एखादी योजना राबविल्यानतर आपंण वारंवार असे सांगत असता की अमुक ही योजना श्री शरदचंद्र पवार यांची होती, आमच्या सरकारची होती वा आमच्या मुख्यमंत्र्यांची होती .

सभापती महोदय, मुंबईच्या संदर्भात बोलत असतांना मी आपणास सांगू इच्छितो की, आज मुंबईची स्थिती लक्षात घेण्यासारखी आहे. साडेचार वर्षे शिवसेना व भारतीय जनता पक्षाच्या हातात सत्ता असतांना त्या सरकारने वा माननीय शिवसेना प्रमुखांनी अनेक चांगले निर्णय घेतले होते.

झोपडपट्टी धारकांना मोफत घरे देण्याची योजना ,मुंबई शहरासाठी 55 उड्डाण पुले तयार करण्याची योजना इत्यादी अनेक योजना त्या काळात घेण्यात आल्या होत्या. आज या चर्चेच्या निमित्ताने अनेक सन्माननीय सदस्य असे सांगत आहेत की, मला या ठिकाणी येण्यास तीन तास किंवा चार तास लागले आहेत. मी सरकारला आणि सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांना सागू इच्छितो की,

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर ...

साडेचार वर्षाच्या काळात मुबईमध्ये जर 55 उड्डाण पूल बांधण्यात आले नसते तर सकाळी घरातून निघालेले सन्माननीय सदस्य संध्याकाळपर्यत देखील सभागृहात पोहोचू शकले नसते. युतीच्या शासनाने साडेचार वर्षाच्या काळात जे काम केले, ते काम मागच्या सरकारला गेल्या चव्वेचाळीस वर्षात जमले नाही. यामध्ये माझ्या मनात काहीही दुमत नाही.

ॲड.उषा दराडे (बसून) : त्यावेळी सगळा महाराष्ट्र अंधारात होता.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, 2010 पर्यत महाराष्ट्र भारनियमन मुक्त होणार आहे, असेही सांगितले गेले आहे. त्यानंतर 2012 पर्यंत भारनियमन मुक्त होणार आहे असे सांगितले गेले. अशाप्रकारे भार नियमन मुक्त महाराष्ट्रासाठी वारंवार मुदतवाढ घेण्यात येते.

एक सन्माननीय सदस्य (बसून): आज ऊर्जा मंत्र्यांचा वाढदिवस आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आज माननीय उर्जा मंत्र्यांचा वाढदिवस आहे व त्यांनी असे सागितले आहे की, 2012 सालापर्यत संपूर्ण राज्याला मी वीज देणार आहे. माननीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतांना त्यांनी असे सांगितले होते की, 2010 पर्यत महाराष्ट्र भार नियमन मुक्त करण्यात येईल. त्यानंतर आता महाराष्ट्र 2012 रोजी भारनियमन मुक्त होईल असे सांगण्यात येत आहे. 2012 च्या वाढदिवशी पुन्हा असे सांगण्यात येईल की, 2015 साली भारनियमन मुक्त महाराष्ट्र करण्यात येईल. अशा प्रकारची मुदत वाढ घेण्याची आपल्याला मुभा आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज अंधार मंत्र्यांचा वाढदिवस आहे, असे म्हटल्याबद्दल मी सन्माननीय सदस्या ॲड उषा दराडे यांना धन्यवाद देतो.

श्री.किरण पावसकर .: सन्माननीय सदस्य, अजित दादा सारख्यां चागले काम करणा-या मंत्र्याला अंधार मंत्री असे आपण म्हणू नका.

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, आज अंधारमंत्र्यांचा वाढ दिवस आहे असे मी म्हणाले नाही. श्री अजित दादा चांगल्या प्रकारे काम करणारे मंत्री आहेत. मी असे म्हणाले होते की, साडेचार वर्षे आपण महाराष्ट्राचे वाटोळे केले होते आणि महाराष्ट्र अंधारात बुडवला होता.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



VTG/ SBT/ ST/ प्रथमश्री.शिगम 18.55

श्री किरण पावसकर : आपण त्याना अंधार मंत्री म्हणाला होता. परंतु आपण त्यांना असे म्हणू नका, ते एक कर्तबगार मंत्री आहेत. शासनासाठी ते चांगले काम करीत आहेत. आज त्यांचा वाढदिवस आहे. त्यामुळे आमच्या पक्षातर्फे मी त्यांना शुभेच्छा देऊ इच्छितो. त्यांनी महाराष्ट्राला असा शब्द दिला आहे की, 2012 पर्यत महाराष्ट्राला भारनियमन मुक्त करण्यात येईल. त्याप्रमाणे त्यांनी 2012 पर्यत महाराष्ट्र जरुर भार नियमन मुक्त करावा, त्यासाठीदेखील मी त्यांना शुभेच्छा देतो..

सभापती महोदय, यानंतर मला म्हाडाच्या संदर्भात बोलावयाचे आहे. म्हाडाविषयी जेवढे बोलू तेवढे कमीच आहे. म्हाडाबद्दल कॅगने जो अहवाल दिला होता  व जे काही ताशेरे मारले होते त्यासबंधी वारंवार वृत्तपत्रात उल्लेख आलेला आहे. अंधेरी येथील आरटीओच्या भूखंडाच्या विकासातून  ठेकेदाराला 73 कोटी रुपयांचा फायदा झाला होता. यासंबंधी वृत्तपत्रात उल्लेख आला होता. त्याचबरोबर  जास्त उंचीच्या इमारतींना परवानगी देता येत नाही. परंतु इमारत हाय राईज समितीचे सदस्य श्री.शैलेश माहिमतुरा यांच्या करामती शासनासमोर  आणि जनतेसमोर आलेल्या आहेत. त्यांनी केलेल्या करप्शनसंबंधी चौकशी सुरु आहे.  मागच्या दहा वर्षात श्री.माहिमतुरा यांनी किती इमारतींना परवानगी दिली हे पडताळून पाहण्यात येईल, असे म्हणण्यास माननीय मुख्यमंत्री तयार नाहीत. तेव्हा त्यांनी किती इमारतींना परवानगी दिली आहे, हे पडताळून पाहण्यात येणार आहे काय  ? फक्त त्यांना निलंबित करुन काहीही होणार नाही.  तर माहिमतुरा यांनी ज्या इमारतींना परवानगी दिली आहे, त्याची पडताळणी करुन त्यांच्यावर सरकार कारवाई करणार आहे काय ?

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

त्यांच्यावर कारवाई करणार असाल तर मागील सर्व प्रस्ताव आपण तपासून पहाणार आहात काय? सभापती महोदय, म्हाडाचे जे दोन प्रस्ताव आले आहेत त्यामधून या सरकारची म्हाडासंदर्भात काय नीती आहे हे कळून येईल. आजही म्हाडाच्या काही इमारतींमध्ये 225 चौरस फूट आकारमानाची सदनिका दिली आहे. त्या इमारती आता डेव्हलपमेंटला आल्या आहेत. त्यामध्ये ओशिवरा किंवा ठाण्यातील जुनी झालेली इमारत असेल. या जुन्या झालेल्या इमारतीमधील सभासद आज आपला कारभार कसा करीत आहेत? या सोसायटयांचे आजही कन्वेअन्स झालेले नाही. ज्या प्रस्तावित सोसायटया आहेत, त्या विकासकाबरोबर मिटींग करीत आहेत. त्यांच्या जनरल बॉडीच्या बैठका घेतल्या जात आहेत. त्या बैठकीमध्ये 225 चौरस फूटाऐवजी 1000 चौरस फूटाचे घर मिळावे, 1400 किंवा 1800 चौरस फूटाचे घर मिळावे अशी मागणी केली जात आहे, तसे ठराव संमत केले जात आहेत. आणि विकासकाकडून त्याला परवानगी दिली जात आहे. या प्रकरणी म्हाडाचे डेप्युटी रजिस्ट्रार डॉ. किशोर मांडे यांच्याबरोबर मी परवा बोललो आहे. त्यांना विचारले की, तुमच्याकडे अशापध्दतीचे प्रपोजल आले आहे काय? त्या प्रपोजलबाबत संपूर्ण माहिती माझ्याकडे आहे.

ओशिवरा येथे रॉयल सँड नावाची सहकारी संस्था आहे. रविवारी त्या संस्थेच्या जनरल बॉडीची मिटींग होती. त्या बैठक्ीसाठी डॉ. किशोर मांडे यांनी आपली माणसे पाठविली होती. त्यांना मी विचारले की, तुमचा नियम काय आहे?शासनाच्या नवीन 33.5 च्या धोरणानुसार 225 चौरस फूटाच्या एलआयजी वापरातील जागेवरील सभासदांना जास्तीत जास्त फक्त 485 चौरस फूटाचा फ्लॅट दिला जाऊ शकतो. मी त्यांना विचारले की, तुम्ही त्याठिकाणी म्हाडाचे अधिकारी म्हणून जात आहात.? तुम्ही 33.5 च्या नियमानुसार 1000 किंवा 1400 चौ.फूटाचा फ्लॅट मागू शकत नाही. असे तेथील लोकांना आपण समजावून सांगणार काय? तेव्हा मी नक्की प्रयत्न करतो, परंतु माझ्यावर सुध्दा दबाव आहे असे ते मला म्हणाले. ही मालमत्ता म्हाडाची असल्यामुळे हा दबाव कोठून आहे? त्यावर इमारत उभी करणार आहात ते काम तुम्ही विकासकाला देणार आहात, त्यामधून विकासक करोडो रुपयांचा फायदा घेऊन जाणार आहे. त्यासाठी जर तुमच्यावर दबाव असेल तर तो कुणाचा आहे? त्या सोसायटीच्या जनरल बॉडीच्या बैठकीसाठी आपण एक अधिकारी म्हणून जाता, तर मग त्याठिकाणी 33.5 हा नियम सांगण्याची अधिकाऱ्यांची जबाबदारी नाही काय? आणि हा नियम असतांना सुध्दा आपण 1000, 1200 व 1400 चौरस फूटासाठी ठराव संमत केले व त्यांना म्हाडाने मंजूरी दिली



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ SBT/ ST/

श्री. किरण पावसकर...

आहे. अशाप्रकारे म्हाडाच्या माध्यमातून आपणही खिरापत कशी काय वाटत आहात? यामध्ये करोडो रुपयांचा भ्रष्टाचार आहे. यापूर्वी आलेल्या 25 प्रस्तावांना मान्यता देण्यात आली आहे, त्याबाबतीत डॉ. मांडे म्हणतात की, ज्या सोसायटयांचे कन्व्हियन्स झाले आहे, ज्या सोसायटया रजिस्टर्ड झालेल्या आहेत त्यांना आम्ही मान्यता दिली आहे. आणि ज्या सोसायटयांचे कन्व्हियन्स झालेले नाही त्या सोसायटयांची मालकी म्हाडाकडे असतांना ती मालमत्ता कुणीतरी दुसरा, तिसऱ्याला विकत आहे. आणि त्यामधून करोडो रुपयांचा फायदा घेतला जात आहे. त्यामध्ये म्हाडाचे नुकसान होत आहे. याबाबतीत मंत्रिमहोदयांना माझा प्रश्न आहे की, याबाबतीत आपले नियम केवळ कागदावर न रहाता त्याची अंमलबजावणी होणार आहे की नाही? ज्यांनी या नियमाची अंमलबजावणी न करता करोडो रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे त्या सोसायटया ताब्यात घेऊन म्हाडा आणि विकासक यांच्या मार्फत त्याचा विकास करणार आहात काय? एक आमदार म्हणून या अधिकाऱ्यांबरोबर मी बोलत असतांना त्यावर त्यांच्याकडून अशी उत्तरे मिळत असतील तर त्यांच्यावर सुध्दा आपण निलंबनाची कारवाई करणार काय? निलंबनाच्या कारवाईची मागणी करीत असतांना म्हाडाच्या किती अधिकाऱ्यांना निलंबित करावयाचे हाही एक प्रश्न आहे. म्हाडाच्या कार्यालयामध्ये जाऊन लाचलुचपत प्रतिबंधक खात्याने म्हाडाच्या अधिकाऱ्यांना रंगेहाथ पकडले. ते सर्व अधिकारी पुन्हा म्हाडाच्या कार्यालयात कामावर आले आहेत. या सभागृहामध्ये माननीय गृहमंत्री श्री.आर.आर. पाटील यांनी सांगितले होते की, अधिकारी पकडला गेल्यानंतर तो कोर्टामधून सुटतो, त्याला पुन्हा कामावर घ्यावे लागते याबाबतीत आपण काहीही करु शकत नाही. दुर्भाग्याची गोष्ट अशी की, तो अधिकारी नियमानुसार सुटत असला तरी ज्या खात्यामधील ज्या खुर्चीवर बसून तो काम करीत होता, प्राईम पोस्टींगवर बसून तो पैसे कमावित होता, त्याच्या बाजूची कुठलीतरी गोडावूनमधील खुर्ची तरी त्याला द्या. तेवढे तरी शासनाच्या हातामध्ये आहे. म्हाडाच्या ज्या ज्या अधिकाऱ्यांना आतापर्यंत भ्रष्टाचारामध्ये पकडले आहे त्या अधिकाऱ्यांना त्याच जागेवर किंबहुना त्यापेक्षा वरच्या जागेवर बसविले आहे. तर मग हे अधिकारी त्या जागेवरुन खरोखरच शासनासाठी पैसे जमा करीत आहेत काय?

(यानंतर श्रीमती थोरात)

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

SMT/ ST/ SBT/ प्रथम श्री. सरफरे.... 19:05
श्री किरण पावसकर...

त्यांना त्या जागेवर बसविणारे मंत्री कोण आहेत? हा पण विचार करावा लागेल. त्याबाबतीत फक्त अधिकाऱ्यांवर कुऱ्हाड उचलून चालणार नाही. याचा फायदा घेऊन निलंबित अधिकारी, अभियंता, खोतकर, पिंपळे, येवले हे सर्व अधिकारी पुन्हा तिकडे येऊन बसलेले आहेत. दहिसर, चुनाभट्टी येथे पुनर्विकासाचे काम करणारे सर्व इंजिनियर्स पुन्हा तिकडे येऊन बसलेले आहेत. या विषयी लोकसत्तेने वारंवार अवाज उठवूनही कुठल्याही प्रकारचा फरक पडलेला नाही. शासनाचे अधिकाऱ्यांवर कुठच्याही पध्दतीचे बंधन राहिलेले नाही. कदाचित हे अधिकारी ज्या परवानग्या शासन देऊ शकात नाही अशा परवानग्या देऊन भ्रष्टाचारातून पैसा जमवून त्यातील काही हिस्सा शासनाला पाठवत असतील असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. याठिकाणी असणारे अधिकारी आणि याला कारणीभूत असणारे मंत्री किंबहुना या मंत्र्यांचे देखील निलंबन करावे लागेल तरच या म्हाडाला थोडेफार भ्रष्टाचार मुक्त करता येईल.

सभापती महोदय, मी आपल्यासमोर फक्त एक घटना सांगतो. गोरेगावला मध्यप्रदेश चॅरिटेबल ट्रस्ट आहे. खरे म्हणजे तो ट्रस्ट एका केंद्रीय मंत्र्याच्या बहिणीचा आहे. केंद्रातील कॉंग्रेसचे मंत्री सुबोधकांत सहाय यांची बहीण श्रीमती कांचन सहाय यांना हा सर्वात मोठा असा भूखंड देण्यात आला. 7500 चौ.मी.चा हा भूखंड आहे. सदर मध्यप्रदेश चॅरिटेबल ट्रस्टने या भूखंडाचे दोन तुकडे करुन त्यातील एक तुकडा मध्यप्रदेश चॅरिटेबल ट्रस्टसाठी श्री. केरावा यांना दिला आणि दुसरा रेंबो फाऊंडेशनला परस्पर विकून टाकलेला आहे. पुन्हा हाच प्रकार आहे. भूखंड म्हाडाकडून मंजूर करुन घेण्यात येतात. म्हाडाने यासंबंधात काही नियम केले पाहिजेत. या सभागृहाला नियम तयार करण्याचा अधिकार आहे. ज्या ट्रस्टला हा भूखंड दिला असेल मग तो एज्युकेशन पर्पजसाठी दिला असेल तर त्याप्रमाणे त्यावर स्वत:ची शाळा-कॉलेज उभे करावयास पाहिजे आणि जर ते तसे करु शकत नसतील तर त्यांनी पुन्हा तो भूखंड म्हडाकडे परत करावा. मध्यप्रदेश चॅरिटेबल ट्रस्टने भूखंड घेऊन त्याचे दोन तुकडे करुन दहा पटीने जास्त पैसे घेऊन दोन वेगवेगळया पार्ट्यांना दिलेले आहेत. असे असताना शासन त्याच्या बाबतीत कोणतीही कारवाई करु शकत नाही. एवढे हे शासन हतबल झालेले आहे. म्हाडाच्या भूखंडाच्या वाटपाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी श्री. भूजबळ भूखंडाचे श्रीखंड असे म्हणत होते. पण आता हे श्रीखंड कितपत खात सुटलेले आहेत. कारण आता या सात आयलॅंड असलेल्या मुंबईमध्ये कुठेही

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

जागा शिल्लक राहिलेली नाही. म्हाडाच्या रुपाने जी जागा शिल्लक आहे तीच रीडेव्हलपमेन्टसाठी घेऊन काम करावे लागेल पण ते काम करण्याची जबाबदारी शासन किंवा राजकीय नेते घेणार आहेत काय? सभापती महोदय, मला या ठिकाणी दुर्दैवाने सांगावे लागते की, हे सरकार म्हाडाच्या भ्रष्टाचारी अधिकाऱ्याच्या पाठीशी उभे आहे. जर हे भ्रष्टाचारी अधिकारी पुन्हा पुन्हा त्या पदावर येणार असतील तर या विभागामध्ये चांगल्या उद्देशाने काम करणारे जे चांगले अधिकारी आहेत त्यांचे मनोबल शासन वाढवत नसून त्यांचे खच्चीकरण करीत आहे. म्हाडामध्येही काही चांगले अधिकारी आहेत पण या चांगल्या अधिकाऱ्यांना आपण काम करायला देत नाही असा स्पष्ट आरोप करुन मी माझे दोन शब्द थांबवतो.

---

...3.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी या ठिकाणी नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर बोलण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मुंबईसारख्या शहराबद्दल बोलण्यासारख्या बऱ्याचशा गोष्टी आहेत. सन्मानीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, या मुंबई शहरामध्ये 40 लाख झ ोपडपट्टीवासियांना मोफत घरे देण्याची योजना जाहीर झाली. आणि संपूर्ण देशात एक संदेश गेला की, कोणीही यावे आणि या मुंबई शहरात अनधिकृत झोपडया उभ्या कराव्यात आणि त्यांना मोफत घरे मिळतील. सभापती महोदय, 40 लाख या आकडयावर बोलण्यासारखे खूप आहे. मी सन्माननीय सदस्य ॲड. कुलकर्णी यांना सांगू इच्छितो की, 40 लाख घरे नाही तर झोपडपट्टीत राहणाऱ्या जनतेची 40 लाख लोकसंख्या धरली आणि त्या लोकसंख्येला झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी जर घरांची आवश्यकता असेल तर माझ्या माहितीप्रमाणे साधारणत: 8 लाख घरे त्या काळात बांधणे अत्यंत आवश्यक होते. सभापती महोदय, मी एक इंटरेस्टिंग गोष्ट आज या सभागृहासमोर ठेवणार आहे आणि 40 लाख घरांची घोषणा कशी राजकीय होती याचे मूर्तीमंत उदाहरण मी या ठिकाणी सांगणार आहे.

यानंतर श्री. बरवड

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे ...

सभापती महोदय, जगामध्ये सिंगापूरसारख्या शहरामध्ये काही वस्त्यांची पुनर्बांधणी करण्याचा कार्यक्रम त्या देशाने घेतला. संपूर्ण जगाने त्या कार्यक्रमाकडे पाहिले. त्यांचा स्पीड एका वर्षामध्ये 50 हजार घरे बांधण्याचा होता. या ठिकाणी एका घरामध्ये सरासरी 5 लोक धरले तरी 40 लाख लोकसंख्येसाठी आपल्याला साधारणत: 8 लाख घरे पाच वर्षामध्ये बांधण्याची गरज होती. म्हणजे एका वर्षात पावणेदोन लाख घरे बांधण्याची गरज होती. एवढी घरे जर खऱ्या अर्थाने या ठिकाणी बांधावयाची असतील तर या मुंबई शहरामध्ये जे कॅल्क्युलेशन्स आम्ही एक्स्पर्टसच्या माध्यमातून केले होते त्यातील एक अभ्यासक म्हणून मी काही प्रयत्न केला होता त्यातून असे लक्षात आले की, या मुंबई शहरामध्ये एका दिवशी 18 हजार ट्रक वेगवेगळे बांधकाम साहित्य घेऊन येणार होते. शिवाजी पार्क सारख्या ठिकाणी एखाद्या राजकीय पक्षाची जाहीर सभा असली आणि त्या ठिकाणी 500 किंवा 1 हजार ट्रक जर आले तर मुंबई शहरातील वाहतुकीची काय वाताहत होते हे आपण पाहिले असेलच. सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांनी सांगितले की, मला कांदिवलीवरुन सकाळी निघावे लागले आणि मी दुपारी 1.00 वाजता या ठिकाणी पोहोचलो. मी या मुंबई शहराचे सुदैव समजतो की, इतक्या गतीने पावणेदोन लाख घरे एका वर्षात मुंबई शहरामध्ये बांधण्याचा कार्यक्रम झ ाला नाही. केवळ वाहतुकीचाच प्रश्न नाही तर त्यासाठी लागणारे जे साहित्य आहे मग स्टील असेल, सिमेंट असेल, मजूर असतील किंवा इतर ज्या गोष्टी बांधकामासाठी लागतात, त्या गोष्टींचा पुरवठा करण्याची जी गरज त्यावेळी प्रचंड प्रमाणात वाढली असती त्यामुळे त्या वस्तूंचे दर किती वाढले असते याचा आपण विचार करण्याची गरज नाही.

आज आपण या ठिकाण्ी वाहतुकीच्या समस्येबाबत सांगितले. सभापती महोदय, वाहतूक स्लो होते त्याचे कारण केवळ लोकसंख्या वाढली किंवा गाड्यांची संख्या वाढली हेच आहे काय ? त्याच्या नियोजनामध्ये कोठे तरी कमतरता आहे. मी ब्रिचकँडीवरुन या ठिकाणी येतो. मी स्वत: गाडी चालवतो. माझ्या गाडीचा स्पीड काय असतो ? माझ्या गाडीचा सरासरी स्पीड ताशी दहा किलोमीटर राहतो. त्याची अनेक कारणे आहेत. मी आपल्याला छोटेसे उदाहरण देतो. विल्सन कॉलेजपासून या ठिकाणी समुद्र किनाऱ्याच्या मार्गाने येताना प्रत्येक टप्प्यावर मग विल्सन



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

श्री. प्रकाश बिनसाळे .....

कॉलेजच्या ठिकाणी असाल किंवा वेगवेगळे जिमखाने आहेत त्याच्या समोर असाल, तेथे रस्त्यांची काय अवस्था आहे ? आपण थोडासा स्पीड घेतला की एखादा बम्प येतो. जवळजवळ स्पीडब्रेकरच्या पध्दतीचाच तो बम्प असतो. म्हणून ज्या स्पीडने आपण गाडी आणतो त्यानंतर जशी स्पीडब्रेकरच्या ठिकाणी गाडी थांबवावी लागते त्या पध्दतीने त्या बम्पच्या ठिकाणी गाडी स्लो करावी लागते. मग मागची व्यक्ती गाडी स्लो करते. त्यानंतर संपूर्ण ट्राफीक हाजीअलीच्या टोकापर्यंत जाते. आजपर्यंत कधीही या रस्त्यांची निगा राखली गेली नाही. कधी कोणत्याही अधिकाऱ्याला वाटले काय की, या रस्त्याचा जो सरफेस आहे तो कधी तरी व्यवस्थित करणार आहोत ? आपण दहाचा स्पीड 20 चा करा 25 चा करा पण काही तरी उद्दिष्ट ठरवा. त्या स्पीडने गाडी जाणार असेल तर त्या रोडचा सरफेस त्या पध्दतीचा स्मूथ असला पाहिजे.

सभापती महोदय, आपण या मुंबई शहरातील सिग्नल सिस्टीम पाहिली तर काय दिसते ? ड्रायव्हर म्हणणार की, साहेब, एक सिग्नल तोड़ देंगे तो आगे के सभी सिग्नल क्लिअर मिलेंगे. असे का होते ? आज संपूर्ण जगामध्ये आपण सिग्नल सिस्टीमचा अभ्यास केला तर अनेक नवीन टेक्नॉलॉजीच्या माध्यमातून, गाड्यांची जी डेन्सीटी आहे त्याच्या माध्यमातून आता सिग्नल ऑपरेट होतात. ज्या रस्त्याला जास्तीतजास्त गाड्या आहेत तिकडचा सिग्नल जास्तीतजास्त चालतो. त्या गाड्यांचा एक लॉट निघाला की पुढच्या सिग्नलला आल्यानंतर तो लॉट ताबडतोब पुढे निघतो. त्यामुळे गाड्यांचा जो फ्लो आहे तो व्यवस्थित राहतो. हे कोण करणार ? राजकीय लोक करणार की अधिकारीवर्ग करणार ? महानगरपालिका करणार की सरकार करणार या वादात मी जाऊ इच्छित नाही.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

आज मुंबई महानगरपालिकेमध्ये वाहतूक व समन्वय विभाग आहे. तो विभाग काय करीत आहे ? त्याचा केव्हा तरी आढावा घेणार आहे की नाही ? मुंबई शहराच्या अनेक समस्या आहेत. पिण्याच्या पाण्याच्या समस्येबद्दल रोज वर्तमानपत्रातून वाचतो. पिण्याच्या पाण्याच्या लाईनमधून पाण्याची गळती होत असते. या पाईप लाईन्स 100 वर्षापूर्वीच्या आहेत. वरळी सारख्या ठिकाणचा संपूर्ण रस्ता खचला आहे. सांडपाण्याची लाईन ब्रिटिशांच्या काळातील आहे. ती बदलण्याचे प्रयत्न आतापर्यंत का करण्यात आले नाहीत ? मुंबई महानगरपालिकेने हे काम का केले नाही ? या मुंबईचे महानगरपालिकेने पालकत्व स्वीकारलेले आहे. त्याचा अभ्यास करुन कालबध्द कार्यक्रम लोकांसमोर का ठेवला जात नाही ? केवळ एमएमआरडीएला दोष देण्याचा प्रयत्न केला जातो. याठिकाणी 55 उड्डाण पुलांचा उल्लेख करण्यात आला आहे. एमएसआरडीसीने हे पूल बांधले आहेत. वरळी-वांद्रे सागरी पूल बांधल्यामुळे सगळयांचा वेळ वाचला आहे. एमएमआरडीएने रस्त्यांच्या रुंदीकरणाचा कार्यक्रम घेतला नसता, द्रुतगती मार्ग बांधण्याचा कार्यक्रम घेतला नसता तर मुंबईची काय अवस्था झाली असती याचा कधी विचार केला आहे काय ? मुंबई महानगरपालिकेला 100 वर्षांचा इतिहास आहे. हे कार्यक्रम महानगरपालिका हाती घेणार आहे की नाही ? मुंबईतील रस्त्यांची दुर्दशा झालेली आहे, ती सुधारणार आहे की नाही ? चेंबूरहून मुंबईला यावयाचे झाले तर अनेक बायपास पास करुन यावे लागते. अनेक ठिकाणी इंटरलॉकिंगचे रस्ते खचलेले आहेत. कोणत्याही रस्त्यावरील सरफेस चांगला नाही, त्याची देखभाल होणार आहे की नाही, हे कोणी पाहणार आहे की नाही ? ज्या पध्दतीने मुंबई महानगरपालिका कारभार करीत आहे ते पाहता शासनाने त्याची दखल घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, मुंबईचे अनेक महत्वाचे प्रश्न मी मांडू इच्छितो. आम्ही सर्वजण मुंबईबद्दल अत्यंत पोटतिडीकीने बोलत आहोत. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी मुंबई महानगरपालिकेत अनेक वर्षे काम केले आहे. या महानगरपालिकेचा डेव्हलपमेंट प्लॅन अनेक वर्षापासून सुरु आहे. त्यातून किती जमिनी संपादित केल्या आहेत ? डी.पी.मधील किती जमिनी आहेत ? मुंबईच्या विकासासाठी किती जमिनी खरेदी केल्या, त्यासाठी अर्थसंकल्पात किती तरतूद

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ SBT/ ST/

श्री.प्रकाश बिनसाळे....

केली हा एक संशोधनाचा विषय आहे. दोष देणे सोपे असते. मी दोष देण्यासाठी बोलत नाही. परंतु त्याचाही विचार झाला पाहिजे. मुंबई शहराच्या विकासासाठी राजकारण बाजूला ठेवून गांभीर्याने विचार केला तर येणाऱ्या भविष्य काळामध्ये मुंबईतील समस्या सोडविण्यासाठी शासन निश्चितपणे हातभार लावू शकते असा मला विश्वास वाटतो.

सभापती महोदय, मुंबईत जुन्या इमारतींचा प्रश्न याठिकाणी मांडला गेला. गेली अनेक वर्षे गृहनिर्माण क्षेत्र व वेगवेगळया ठिकाणी कामे करीत असताना मुंबईच्या जुन्या इमारतींचा प्रश्न समजून घेण्याचे मी काम केले आहे. मी सरकारचे अभिनंदन करतो. शासनाने ब्लॉक डेव्हलपमेंटचा कार्यक्रम हाती घेतला आहे. हे ब्लॉक डेव्हलप का होत नव्हते ? गिरगाव सारखे ठिकाण घेतले तर हरकिसनदास हॉस्पिटलच्या समोर दोन मोठे टॉवर्स उभे रहात आहेत. त्या दोन टॉवर्समधील अंतर खूप कमी आहे. 20-25 मजल्यांचे टॉवर्स बांधण्याची परवानगी देत असताना दोन इमारतीमधील अंतर किती असावे याला काही नियम आहेत. ते धाब्यावर बसविण्यात आले आहेत. दोन इमारतीमध्ये केवळ 10-15 फूट अंतर ठेवले जाते. मग एखादी दुर्घटना घडली तर फायरब्रिगेडची गाडी तेथे कशी पोहोचणार ? सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले की, मुंबई शहरामध्ये आमदारांना काही काम नाही. कारण मुंबई शहरात महानगरपालिकेने काम केले पाहिजे. मुंबईच्या ज्या समस्या आहेत त्यामध्ये महानगरपालिकेने लक्ष घालून त्या सोडविण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. सरकारने एमएमआरडीएच्या व एमएसआरडीसीच्या माध्यमातून मुंबई महानगरपालिकेला हातभार लावून मुंबईच्या समस्या सोडविण्यासाठी एक पाऊल टाकलेले आहे. त्यामुळे मुंबईतील जनता सरकारला धन्यवादच देईल. एवढे बोलून मी येथेच थांबतो. जय हिंद.

------

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, या मुंबई शहराचा देशाची आर्थिक राजधानी म्हणून गौरव केला जातो. मुंबई शहरामध्ये तीन-चार एजन्सी काम करीत आहेत. त्या एजन्सीद्वारे मुंबईचा विकास करण्याचे काम किती झाले आणि मुंबई भकास करण्याचे काम किती झाले यावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न मी करणार आहे. मी पहिल्यांदा या मुंबई शहरातील हौसिंग बोर्ड नावाच्या संस्थेचा उल्लेख करते. कारण मी कन्नमवारनगर येथील हौसिंग बोर्डाच्या कॉलनीमध्ये रहाते. हौसिंग बोर्डाच्या अखत्यारित रिपेअर बोर्ड, स्लम बोर्ड, मुंबई बोर्ड आणि कोकण बोर्ड अशी 4 बोर्डस् आहेत. हौसिंग बोर्डामध्ये जे अधिकारी बसतात त्यांच्या संबंधित असलेले अधिकारी मंत्रालयामध्ये बसतात. या मंडळींना लोकांच्या कामामध्ये किती रस आहे हे जर आपण हौसिंग बोर्डाच्या सर्व इमारतीमध्ये जाऊन फेरफटका मारला तर दिसून येईल. या मंडळींना लोकांच्या कामामध्ये जराही रस नाही. मुंबई गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्ष श्री. अमरजित मनहास यांनी थोडीशी शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. हे अधिकारी असे काही ताठ्यामध्ये वावरतात की जणुकाही तेच सर्वज्ञ आहेत. अशा प्रकारचे चित्र तुम्हा आम्हाला हौसिंग बोर्डाच्या परिसरामध्ये बघायला मिळते.

मी ज्या वस्तीमध्ये राहाते तेथील दोन उदाहरणे मी आपणास देते. 30 ते 43 क्रमांकाच्या इमारती तेथे आहेत. महाराष्ट्र हौसिंग बोर्डाच्या विकासाच्या संदर्भात मी श्री. सदाशिवराव तिनईकर यांचे नाव आवर्जून घेईन. त्यांनी हौसिंग बोर्डाच्या कामात मोलाचे योगदान दिलेले आहे. या एकाच अधिका-याने महाराष्ट्र सरकारमध्ये चांगले काम केलेले आहे.त्या इमारतीतील घरांची किंमत 6 हजार रुपये होती. त्या इमारती आता जुन्या झाल्या आहेत. आता नव्या कायद्यानुसार त्या ओनरशिपच्या व्हाव्यात, त्या चार मजली व्हाव्यात, त्यांचे बांधकाम पुनर्रचित इमारतीप्रमाणे व्हावे अशा प्रकारचा एक फतवा निघाला. विकासक कोण आहे या चर्चेमध्ये मी जाणार नाही. 10-10 मजल्याच्या इमारतींचे टॉवर्सना हौसिंग बोर्ड परवानगी देते. परंतु कन्नमवार नगरला आजही 15-20 वर्षापूर्वीची 24 इंचाची जी जुनी पाईप लाईन टाकलेली आहे त्यातूनच पाण्याचा पुरवठा होत आहे. तेव्हा हौसिंग बोर्डाने इतक्या वर्षात काय सुधारणा केली असे जर कोणी विचारले तर त्याचे उत्तर शून्य मिळते. हौसिंग बोर्ड 10-10 मजली इमारत बांधत आहे. परंतु ज्या लोकांना आपली





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

घरे खाली करायला लावली ते लोक आज कुठे गेले याचा हौसिंग बोर्डातील अधिका-यांना पत्ता लागणार नाही, ही आजची दुर्दशा आहे. रिपेअर बोर्डाची देखील तीच परिस्थिती आहे. रिपेअर बोर्डाने खूप इमारती बांधल्या. मुंबई शहरातील कोसळलेल्या इमारतीमधील लोकांना पर्यायी घरे देण्यासाठी त्या इमारती बांधल्या. त्या वेळी काँग्रेसच्या सरकारने उदात्त हेतूने हा निर्णय घेतला. मी आजच माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र दिले. पावसाळयामध्ये ज्या इमारती कोसळतील त्या इमारतीमधील लोकांना पर्यायी घरे देण्याचे ठरले.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.......

परंतु हे सगळे करीत असताना हाऊसिंग बोर्डातील काही अधिकारी आणि काही दलाल मंडळींच्या माध्यमातून जून्या इमारतीमध्ये राहणारा मूळ भाडेकरु आज बेघर झालेला आहे. हा मूळ भाडेकरु आज कुठे आहे? त्याच्या ताब्यात घर मिळाले का? या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच आहे. मूळ भाडेकरुंसाठी नव्याने बांधलेली घरे आज कोणाच्या ताब्यात गेली आहेत? याबाबत सरकारने संशोधन केले पाहिजे आणि चांगूलपणाने केलेल्या कामाचा गौरव करण्यासाठी मूळ भाडेकरुंना घरे मिळवून द्यावीत अशी मी आग्रहाची मागणी करते.

सभापती महोदय, मुंबई महापालिका ही या शहरातील एक महत्वाची संस्था आहे. आज मुंबई शहरामध्ये मोठमोठया इमारती उभ्या रहात आहेत. नव्याने उभ्या राहणाऱ्या इमारतींचे प्लॅन्स मंजूर करताना या इमारतींसाठी ज्या पायाभूत सुविधांची आवश्यकता आहे त्या संदर्भात सरकारने किंवा महापालिकेने काय उपाययोजना केली आहे? अशा इमारतींसाठी फायर ब्रिगेडची, पिण्याचे पाणी, रस्ते यांची व्यवस्था करण्यासाठी तरतूद केली आहे का? मागील काळात या देशातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका म्हणून मुंबई महानगरपालिकेकडे पाहिले जात होते. आज ही महानगरपालिका शून्यात गणली जात आहे. मी अनेक वर्षे या संस्थेत काम केले आहे. कांद्याचा पापुद्रा काढावा तशाप्रकारे काल वरळी येथील रस्त्याला भगदाड पडल्याचे आपण सर्वांनी पाहिले. शहरातील रस्त्यांची अवस्था पाहिली तर फारच भयावह स्थिती असल्याचे दिसून येईल. यातून काय निष्पन्न होणार आहे हा चिंतेचा विषय आहे.

सभापती महोदय, आज मुंबई शहरात वेगवेगळ्या साथीच्या रोगांनी थैमान घातले आहे. साथीच्या रोगाच्या संदर्भात महापालिका आयुक्तांचे स्टेटमेंट आम्ही वाचले. परंतु महापालिकेतील सभागृह नेत्यांचे किंवा सत्ताधारी पक्षाच्या प्रमुखांचे स्टेटमेंट ऐकिवात नाही. आज मुंबई महापालिका विकलांग झालेली आहे. एमएमआरडीएच्या नावाने गळे काढले जातात. एमएमआरडीए या संस्थेने आपल्या विकास कामांच्या माध्यमातून या शहराला सावरण्याचा प्रयत्न केला आहे. जे चांगले आहे त्याला चांगले म्हणण्याऐवजी गळे काढण्याचा प्रयत्न होतो तो योग्य नाही असे मला वाटते. हाऊसिंग बोर्डामध्ये जो कारभार चालला आहे त्याबाबत शासनाने सतर्कतेने लक्ष दिले पाहिजे आणि भ्रष्ट काम करणारी जी मंडळी आहेत त्यांना त्यांची जागा दाखवून द्यावी एवढे बोलून वेळेअभावी मी माझे भाषण संपविते.

-----

नंतर 4आर.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे (नामनियुक्त) : महोदय, नियम 260 अन्वये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात मुंबईच्या समस्यांवर चर्चा करण्यासाठी अत्यंत चांगला प्रस्ताव आणून या समस्यांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. या प्रस्तावावर अनेक सन्माननीय सदस्यांची चांगली भाषणेही झाली आहेत. विशेष करुन सन्माननीय सदस्य ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी मुंबईचा मागचा इतिहास सांगून या शहरातील विविध समस्यांवर प्रकाशझोत टाकला आहे. आज माननीय मंत्री श्री. अजितदादा पवार यांचा वाढदिवस आहे म्हणून प्रकाशाचाच दिवस आहे. या चर्चेच्या निमित्ताने मी म्हाडाच्या बाबतीत माझे विचार व्यक्त करणार आहे. म्हाडाच्या बाबतीत सभागृहात अनेक तक्रारी करण्यात आल्या परंतु मी तर असे समजतो की, म्हाडा म्हणजे मुंबईला मिळालेले वरदानच आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. सन 1962 मध्ये ज्यावेळेस भाडेकरुसंबंधी कायदा पास झाला, त्यानंतर भाडेकरुंना संरक्षण मिळाले. तसेच त्याचा परिणाम असा झाला की, मुंबईतील चाळी व घरे बनविण्याचे काम बंद पडले. अशी घरे बांधून भाडयाने देण्याचे काम बंद पडल्यामुळे गिरणी, कारखाना, महानगरपालिका तसेच मंत्रालयात काम करणारे चतुर्थश्रेणीचे कामगार मग जाणार कोठे हा प्रश्न निर्माण झाला. मग हा कामगार हळुहळु झोपडपट्टीकडे शिफ्ट होऊ लागला. त्याचा परिणाम मुंबईत झोपडयांचा वाढण्यात झाला. तत्पूर्वी म्हाडाने गोरेगांव, विक्रोळी, बांद्रा, घाटकोपरसारख्या ठिकाणी लहान लहान घरे बनविली आणि हीच घरे प्रामुख्याने मुंबईतील या कामगारांना वरदान ठरली, हे लोक अशा घरांमध्ये राहू लागले. सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई या सुध्दा म्हाडाच्याच घरात विक्रोळी येथे राहतात. विक्रोळी येथे म्हाडाची प्रचंड मोठी वसाहत आहे. तेथे गेल्यानंतर खरोखरच असे वाटते की, मुंबईत मराठी माणूस कोठे ना कोठे तरी राहतो असे चांगले काम म्हाडाने केले असून त्यामुळेच कामगारांना दिलासा मिळाला आहे. सन 1975 नंतर म्हाडाने सुध्दा अशा वसाहती बनविण्याचे काम बंद केले म्हणून मुंबईत झोपडपट्टयांचा विळखा वाढला. पण झोपडपट्टीच्या संदर्भात मात्र सन 1975 पूर्वी असा कायदा अस्तित्वात होता की, झोपडीत राहणाऱ्यांना पाण्याचा एकही थेंब द्यावयाचा नाही. त्यावेळेस पाण्यासाठी वणवण फिरताना ही झोपडीत राहणारी मंडळी पहायला मिळत होती. पण तत्कालीन पंतप्रधान स्व. इंदिरा गांधी यांनी मात्र सन 1975 मध्ये कायदा केला आणि झोपड्यांमधून राहणाऱ्या लोकांना दिलासा दिला. त्यांच्या नावावर सर्व्हे होऊन झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांना फोटो पास

....2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ...........

मिळाले व त्याच्या आधारे झोपडपट्टी सुधार समितीची स्थापना आपल्या सरकारने केली. या समितीची नियुक्ती केल्यानंतर झोपडपट्टीमधून रस्ते, नळ कनेक्शन, वीज पुरवठा इ. सुविधा पुरविल्या जाऊ लागल्या......

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांचे अभिनंदन करतो की आज पहिल्यांदाच ते शासनाच्या बाजूने आपले विचार व्यक्त करीत आहेत.

श्री. राम पंडागळे : महोदय, मी पुढे बोलणारच आहे. पण अशा सुविधा मिळू लागल्याने हा हा म्हणता मुंबईत झोपड्यांची संख्या वाढू लागली. पण ही वाढ होत असताना ज्याप्रमाणे आपण त्यातील माणसांना गुन्हेगार समजतो त्याचबरोबर महापालिका देखील तितकीच दोषी आहे. एक फूट जागा जरी झोपड्यातून वाढविण्याचा प्रयत्न झाला तर महापालिकेचे अधिकारी ताबडतोब तेथे पोहचतात आणि बरोबर हप्ता घेतल्याशिवाय तो झोपडीधारक वाढवू शकत नाही. अशा प्रकारे संपूर्ण महापालिका याला जबाबदार असल्याचे म्हटले तरी चालेल. महापालिकेतील भ्रष्ट अधिकारी मग ते वॉर्ड ऑफिसर असोत अथवा अन्य अधिकारी असोत ते हप्ता घेतात म्हणूनच झोपड्यांमध्ये वाढ झालेली आहे.....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

मध्यंतरी माजी मुख्यमंत्री श्री. अंतुले साहेबांनी झोपडपट्टी उठवण्याचा प्रयत्न केला होता परंतु त्या दिवशी तुफान पाऊस पडला व त्यामध्ये एका मुलाचा मृत्यू झाला व त्याची बातमी वर्तमानपत्रांनी इतकी उचलली की, झोपडपट्टी उठवण्याचा प्रयत्न त्याचवेळी थांबला गेला. कुलाबा ते दादर पर्यंत फुटपाथवर आता एकही झोपडे नसल्यामुळे मी शासनाला धन्यवाद देतो. खरे म्हणजे यासाठी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे साहेबांनी सुध्दा शासनास धन्यवाद दिले पाहिजे. एकवेळेस विरोधी पक्षाकडून असे बोलले जात होते की, झोपडपट्टीतील लोक चो-या करतात, ट्रक मधील धान्य काढतात....

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे यांनी विरोधी पक्षाच्या संदर्भात जे विधान केलेले आहे ते कामकाजातून काढून टाकण्यात यावे.

**उपसभापती** : आपण दर वेळेस सन्माननीय सदस्यांना पाठिंबा देत असता, आता त्यांना थोडे बालू द्या.

श्री. राम पंडागळे : सभापती महोदय, झोपडपट्टीवासियांच्या संदर्भात जे जे बोलले आहे त्याच्या संदर्भात माझ्याकडे लिस्ट आहे. कृपया माझे म्हणणे आपण ऐकून घ्यावे. या शासनाने कुलाबा ते दादर पर्यंतच्या झोपडया पाडल्या नाहीत तर या झोपडयांच्या संदर्भात चांगले नियोजन करुन या ठिकाणच्या झोपडयांचे दुस-या ठिकाणी पुनर्वसन केले गेले. विरोधी पक्ष नेहमी एमएमआरडीच्या विरोधात बोलतात परंतु महानगरपालिका जे करु शकली नाही ते एमएमआरडीएने करुन दाखवले आहे. महानगरपालिकेकडे विकासाचे नियोजनच नव्हते. विरोधी पक्ष नेहमी घणाघाती बोलतात मुंबई केंद्र शासित होणार, केंद्र शासित होणार परंतु आपण असे स्वप्न दिवसा पाहू नका. जोपर्यंत या राज्याचे मा.मुख्यमंत्री श्री. अशोक चव्हाण आणि गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील आहेत, आदरणीय श्री. शरदचंद्र पवार व माननीय श्रीमती सोनिया गांधी आहेत तोपर्यंत मुंबईला हात लावण्याची हिंमत कोणीही करु शकणार नाही. आम्ही सर्व खंदे कार्यकर्ते त्यांच्या बाजूने आहोत. मुंबईला हात लावण्याचे सोडून द्या परंतु मुंबईकडे वाकडया नजरेने पाहण्याची देखील कोणी हिंमत करु शकणार नाही एवढे मी या निमित्ताने सांगतो.

..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे....

महाराष्ट्र राज्याचे सरकार मुंबईच्या जनतेसाठी काही तरी करत आहे असे वाटावयास लागले आहे. एमएमआरडीएच्या वतीने मुंबईमध्ये मोनोरेलचे जे काम सुरु आहे ते काम वाखाणण्यासारखे आहे. त्यामुळे तावडे साहेब, माझ्या भाषणानंतर आपण सुध्दा या शासनाचे अभिनंदन करा. मुंबईमध्ये एमएमआरडीएने जे काम केलेले आहे ते वाखाणण्यासारखे आहे. ज्या पध्दतीने शासनाने आणि एमएमआरडीएने विकासाचे नियोजन केलेले आहे त्याबद्दल विरोधी पक्षाने सुध्दा सरकारचे अभिनंदन करावे एवढे बोलतो व माझे लांबलेले भाषण येथेच थांबवतो.

------

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राम पंडागळे साहेबांनी म्हटल्या प्रमाणे मी शासनाचे अभिनंदन नक्कीच करतो, कारण रामभाऊ सारख्या गरिबांसाठी लढणा-या माणसाच्या डोळयात सुध्दा धूळ फेकण्याची क्षमता या सरकारने मिळवली आहे यासाठी मी सरकारचे मनापासून अभिनंदन करतो. या चर्चेस माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या उत्तराचे काय होते हा प्रश्नच आहे. त्याचे कारण असे आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी याच विषयाच्या संदर्भात दिनांक 21 एप्रिल, 2010 रोजी विधानसभेत जे उत्तर दिलेले आहे ते मी येथे वाचून दाखविणार आहे. त्यांनी सांगितले होते की, 1995 पर्यंतच्या झोपडपट्टया, मुंबईत येणारे लोंढे, सन 2000 सालापर्यंतच्या झोपडपट्टयांच्या संदर्भात न्यायालयाच्या निर्णयाच्या आधीन राहून त्या नियमित करण्याची भूमिका शासनाने व्यक्त केली वगैरे... परंतु खरे म्हणजे यासंदर्भात शासनाने प्रतिज्ञापत्र सादर करावयास पाहिजे होते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

शासनाने एक तर ही तरी भूमिका घेतली पाहिजे किंवा ती तरी घेतली पाहिजे. श्री.रामभाऊ पंडागळे आपली मागणी जाहीरनाम्यामध्ये आली. पण कोर्टामध्ये प्रतिज्ञापत्र मात्र सादर करण्यात आले नाही. आपण फक्त झोपडपट्टीवासियांची मते घेतली. त्यामुळेच मी असे म्हणालो की, शासनाने श्री.पंडागळे यांच्या डोळ्यात धूळ फेकली. उपग्रहाच्या माध्यमातून यावर नियंत्रण ठेवण्याचा शासनाचा मानस आहे. हा मानस पुढे किती वर्षे चालणार आहे हे सांगितले तर बरे होईल. यामध्ये एकही पाऊल शासनाने पुढे टाकलेले नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे हे वाहतुकीवर बोलले आहेत. मोटार वाहन अधिनियमामध्ये विविध सुधारणा करणे आवश्यक आहे. कायद्यात वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर दंडात्मक कारवाईची तरतूद फारच कमी आहे. त्या विषयी गेल्या 4-5 महिन्यात शासनाने काही केले आहे काय ? ट्रॅफिक रेग्युलेशन, डेडिकेटेड लेनचा वापर या विषयात शासनाने काही केले काय ? माननीय मुख्यमंत्री सभागृहात बोललो त्याप्रमाणे त्यांनी एक पाऊल तरी पुढे गेले पाहिजे की नाही ? मिठी नदी पुनवर्सनच्या कामासाठी काही कालावधी लागत आहे हे मला मान्य करावे लागेल. पण हे काम अतिशय गतीने पूर्ण झाले पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे. अजूनही मिठी नदीची पूर्वीसारखीच स्थिती आहे. नवी मुंबई विमानतळाचा पहिला टप्पा 2013मध्ये होईल असे देखील सांगितले आहे. सिडकोसंबंधी दोन दिवस टाईम्स ऑफ इंडियाने विषय लावून धरला आहे. त्यासंबंधी माननीय विरोधी पक्ष नेते बोलणार आहेत. त्यामुळे त्या विषयामध्ये मी जात नाही. संरक्षण विभागाच्या आणि रेल्वेच्या जागेवर एसआरएची योजना लागू करण्यासंबंधी आम्ही केंद्र शासनाशी बोलणार आहोत. अजून साधे पत्र देखील त्यानंतर केंद्र सरकारला गेलेले नाही. पालकमंत्री काही तरी करतील असे वाटले होते. पण त्या चर्चेनंतर एकही पत्र केंद्र सरकारकडे गेलेले नाही. कन्व्हेन्सचे बिल हो-नाही, हो-नाही करत अखेर मंजूर झाले. पण त्याचे रूल्स अजून बनलेले नाहीत. या गोष्टीला तीन वर्षे झाली आहेत. उपनगरामधील लोक याची वाट पहात आहेत. मार्च महिन्याच्या शेवटी आदेश निर्गमित केले जातील असे सांगितले होते. अजूनही ते निर्गमित केलेले नाहीत. माननीय मुख्यमंत्र्यांनी मागच्या वेळी केलेल्या भाषणाच्या मुद्यांसंबंधी अजूनही अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे आजच्या उत्तरानंतर काय होईल हे सांगता येत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

मुख्यमंत्री हे महाराष्ट्र राज्याचे प्रमुख असतात. त्यांनी सभागृहाला आश्वासन दिल्यानंतर चार महिन्यामध्ये किमान एक तरी फाईल नाचली पाहिजे होती. ते पण झाले नाही.

सभापती महोदय, आज एमएमआरडीएचे काम कसे चालले आहे ? जेट एअरवेजने 800 रूपयाला एक भूखंड मिळविला. नॉर्मल बिड करून हा भूखंड दहा कोटी रूपये भरून मिळविला. पण त्यानंतरचे पुढचे पैसे भरले नाही. म्हणून त्यांना नोटीस दिली गेली. तीन महिन्यांनी त्यांनी पहिला हप्ता भरायला पाहिजे होता. तो त्यांनी भरला. यासाठी त्यांच्याकडून व्याज देखील आकारले नाही. माझ्या माहितीप्रमाणे एमएमआरडीएच्या बैठकीमध्ये माननीय उप सभापतींनीच हा विषय काढला होता. पण त्याही वेळी काही झाले नाही.

**उप सभापती** : सदर रक्कम लवकर वसूल करावी असे मी सांगितले होते, पण श्री.शेलार यांनी सांगितले की, त्यांना मुदतवाढ द्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझा असा मुद्दा आहे की, जेट एअरवेज 800 कोटी रूपयाचा भूखंड गोदरेज कंपनीला 1200 कोटी रूपयाला विकत आहे. एमएमआरडीएला मुळात 2000 कोटीचा तोटा आहे. त्यांचे 8000 कोटीचे बजेट आहे. लंडनच्या धर्तीवर घटनात्मक पद्धतीने मुंबई, चेन्नई, कोलकत्ता, दिल्ली शहरांमध्ये ही ऑथोरिटी निर्माण केली आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

कारण त्या शहरातील लोड कमी व्हावा ही बेसिक कल्पना आहे. आसपासच्या उपनगरात किती पैसा खर्च झाला, ली कमिटीच्या अहवालाचे काय झाले हे सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी सांगितलेले आहे त्यामध्ये मी जात नाही. एम.एम.आर.डी.ए.चे दोन हजार कोटी रुपयांचे बजेट लॉसमध्ये आहे.एम.एम.आर.डी.ए.चेआर्थिक नियोजन करण्याचे काम के.पी.एम जी.कंपनीकडे दिलेले आहे. ही के.पी.एम.जी.कंपनी कोणी आणली, कशासाठी आणली हे माहीत नाही. परंतु या कंपनीने एम.एम.आर.डी.ए.चे आर्थिक नियोजन केलेले नाही. ही कंपनी कोणत्याही प्रकारचे काम करीत नसताना त्यांना का ठेवण्यात आले आहे ? त्या कंपनीच्या परफार्मन्सचे कोणी ऑडीट करणार आहे की नाही याचा विचार झाला पाहिजे.

सभापती महोदय, एम.एम.आर.डी.ए.मुंबई महानगरपालिकेच्या अधिकारावर अतिक्रमण करीत आहे असे आम्ही येथे वारंवार सांगत आहोत. याचे कारण रस्ते, पूल इत्यादी कामे मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यातून गेली म्हणून नाही तर एम.एम.आर.डी.ए.मेट्रो रेले किंवा मोनो रेल असेल त्याठिकाणच्या 50 मीटरच्या आसपास खड्डा खोदायचा असेल तर त्यासाठी महानगरपालिकेची परवानगी घेण्याऐवजी एम.एस.आर.डी.सी.कडून परवानगी घ्यावी लागते. म्हणजे महानगरपालिकेच्या बेसिक अधिकारांवर आणखी एक प्लानिंग ऑथॉरीटी आणून बसविली आहे हा आमचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांचे विधानसभेतील भाषण वाचून दाखविले. या सभागृहात महसूल मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले होते की, "मुंबईतील नॉन ॲग्रीकल्चरल टॅक्स या महिन्याच्या अखेरीस रद्द करु...." नॉन एग्रीकल्चरल टॅक्स रद्द करेंगे, ऐसा बताया था. लेकिन माननीय नसीम खान जी, आपको पता होगा कि हम सब प्रकार के टॅक्स भर रहे हैं और अब नॉन एग्रीकल्चरल टॅक्स भी भरना पड़ेगा. नॉन एग्रीकल्चरल टॅक्स रद्द करेंगे, ऐसी घोषणा की गई थी लेकिन आज तक वह घोषणा पूरी नहीं हुई. माझ्याकडे अंधेरी-आकुर्ली रोडवरील काजूपाड्याचा विषय आहे त्यावर मी नंतर बोलणार आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

सभापती महोदय, रेन्टल हाऊसिंग स्कीमचा बराच गाजावाजा झाला. मागील अधिवेशनात मी हा मुद्दा उपस्थित केला होता. रेन्टल हाऊसिंग स्कीममध्ये चार एफ.एस.आय. देण्यासंबंधीची नवीन स्कीम एम.एम.आर.डी.ए.ने आणली. मग तो अलिबाग येथील भाग असेल किंवा एमएमआरडीएच्या रिजनमधील भाग असेल, तेथील विकासकाने या स्कीमसाठी अर्ज केला तर त्यास चार एफ.एस.आय.कसा द्यावयाचा हे अधिकाऱ्यांना माहीत नसल्यामुळे कोणतेही प्रपोझल पुढे गेले नाही. एमएमआरडीएलने टीपीएस 1208/एमएमआर/सीआर 389/08/युडी 12 प्रमाणे नियम ठरविला परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. कारण तेथे अधिकारी/कर्मचाऱ्यांची कमतरता आहे तसेच तेथील अधिकाऱ्यांना स्कीमची जास्त माहिती नाही. तेव्हा आपण हे सर्व करीत नाही तोपर्यंत रेन्टल हाऊसिंग स्कीमची घोषणा हवेतच राहणार आहे.

सभापती महोदय, कुर्ला येथील भारत कोल कंपाऊडमधील अनधिकृत बांधकामांचा विषय येथे वारंवार चर्चिला गेला आहे. .

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे ..

या सदर्भात मुंबई महानगरपालिकेच्या एका अभियंत्याने यांच्या प्रेशरमुळे आत्महत्या केली होती. या बाबतीत वारंवार तक्रारी करण्यात आल्या होत्या. तरीसुध्दा स्थानिक लोकप्रतिनिधीच्या दबावामुळे अनधिकृत बांधकाम आणि अनधिकृत गाळयासंबंधी कोणतीही कारवाई झाली नाही हे गाळे कोणत्या तरी लोकप्रतिनिधीचे पैसे कमाविण्याचे साधन झालेले आहे त्यामुळे काहीही कारवाई होत नाही. तेथील अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात त्या भागातील लोकांनी सातत्याने तक्रारी करुन देखील अनधिकृत बांधकाम दूर करण्यात आलेले नाही.

सभापती महोदय, मुंबईमध्ये सरकारचे काम कशा पध्दतीने चालले आहे हे समजावे यासाठी मी काही उदाहरणे देत आहे. सभापती महोदय, म्हाडाचा विषय सन्माननीय सदस्य श्री किरण पावसकर यांनी या ठिकाणी मांडला आहे. ओशिवरा येथील 26 हजार चौरस मिटरच्या टीटबीट नावाच्या व्यवहाराची चर्चा पुष्कळ झाली होती. म्हाडाच्या जागा कशा पध्दतीने वाटल्या गेल्या होत्या, कोणाला वाटल्या गेल्या, का वाटल्या गेल्या ज्यूड रोमालिया बिल्डर्सच्या फायद्यासाठी टीटबीटच्या नावाखाली भूखंड कसे वितरीत करण्यात आले होते याची सगळी चर्चा म्हाडाच्या कार्यालयात गेल्यानंतर आपल्याला ऐकावास मिळते.त्याचबरोबर अप्सरेला घर मिळते परंतु शाहीर श्री विठ्ठल उमाप यांना मिळत नाही .श्री.चंद्रकांत खोत यांच्या सारख्या साहित्यिकांना घर मिळत नाही . सरकारच्या मनामध्ये अप्सरा भरते आणि तिला मात्र म्हाडाचे घर मिळते शाहीर श्री.विठ्ठल उमाप डफली वाजवत बसले आहेत परंतु त्यांना मात्र घर मिळत नाही.

**उपसभापती** :शाहीर श्री विठ्ठल उमाप यांच्या घराच्या अर्जाला आजच माननीय मुख्यमंत्र्यानी मंजुरी दिली आहे त्यामुळे आता पुढची प्रक्रिया पार पडेल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अशा प्रकारे श्री.उमाप यांच्या अर्जाला यापूर्वी तीन मुख्यमंत्र्यांनी मंजुरी दिली होती त्यासबंधीची सर्व कागदपत्रे माझ्याकडे आहेत ती मी आपल्याला दाखवू काय ? श्री.उमाप यांच्या अर्जावर आतापर्यत तीन मुख्यमंत्र्यांनी सहया केल्या आहेत परंतु त्यांना अद्याप घर मिळालेले नाही . अप्सरा मनामध्ये भरल्यानंतर मात्र तिला ताबडतोब घर मिळते या विषयाच्या खोलामध्ये मला जावयाचे नाही. मी फक्त त्याचा उल्लेख केला आहे. ज्यांना घर दिले होते त्यासुध्दा कलाकार आहेत त्यामुळे मला त्यांच्याबाबतीत काहीही आक्षेप नाही ज्याप्रमाणे त्यांना घर दिले आहे त्याचप्रमाणे इतरही कलाकारांना घर द्यावे एवढेच माझे म्हणणे आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत.माननीय सदस्यांनी आता असे सागितले की एखादी अप्सरा मनामध्ये भरली की तिला घर देण्यासंबंधी ताबडतोब आदेश दिला जातो. अशा प्रकारे बोलण्याची ही पध्दत बरोबर नाही .सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारचे टोमणे मारणे बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख् केला आहे तो कामकाजातून काढून टाकण्यात यावा.

**उपसभापती** : ठीक आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दहा टक्के कोटयातील घरे देण्याच्या प्रक्रियेमध्ये किंवा विशेष कोटयातील घरे देण्याच्या प्रक्रियेमध्ये फक्त माननीय मुख्यमंत्री असतात असे नाही. ही प्रक्रिया करण्यामध्ये अनेक जण असतात .या विषयाच्या संदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांचे नावसुध्दा घेतलेले नाही आणि माझ्या मनात तो उद्देशही नाही. ही घरे देण्यामध्ये जी काही प्रक्रिया होत असते त्यामध्ये शाहीर श्री.उमाप यांचे नाव प्रलंबित आहे. त्या त्या वेळच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या अर्जावर सहया करुन अद्यापही श्री उमाप यांना घर मिळालेले नाही केवळ माननीय मुख्यमंत्र्यांमुळे त्यांना घर मिळालेले नाही असे नाही तर त्यासंबंधीची प्रक्रिया करणारी जी खालची जी रचना आहे तिच्यामुळे त्यांना घर मिळाले नाही. एखाद्या अभिनेत्रीच्या बाबतीत मात्र घाई घाईने प्रक्रिया पूर्ण केली जाते आणि शाहीर उमापांच्या बाबातीत मात्र ही प्रक्रिया लवकर पूर्ण होत नाही. माननीय मुख्यमंत्र्यांच्या संदर्भात माझा बोलण्याचा उद्देश नाही. परंतु काही जणांसाठी गतीने प्रक्रिया पूर्ण केली जाते आणि काही जणांच्या बाबतीत दिरंगाई होते एवढेच मला सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,मुंबईतील अनेक ठिकाणी पुनर्विकासाची कामे सुरु आहेत. सरकारी मुद्रण कामगार नगरातील विषयासबंधी मी त्या त्या विभागाच्या मंत्र्यांबरोबर यापूर्वी वाररंवार बोललो आहे पावसाळयामध्ये तेथील कर्मचा-यांना घरे रिकामी करण्यास सांगण्यात आले आहे त्यांची राहण्याची दुसरीकडे व्यवस्था नाही. ज्या पध्दतीने रि डेव्हलपमेन्टमध्ये आकृती नावाच्या बिल्डरला मोठया प्रमाणावर फायदा होण्यासाठी प्रयत्न केले जातात अशा प्रकाराचे अनेक विषय मला येथे मांडावयाचे आहेत.मागच्या वेळी ताज लॅन्डस् एण्ड समोर जे सी रॉक हॉटेल होते त्यांसबंधीा सी.आर. झेडच्या अनुषंगाने मी मुद्दा मांडला होता. त्यासबंधी असे सांगण्यात आले होते की सीआरझ ेडच्या नियमानुसार ग्राऊन्ड फलोअर वगळता वरचे बांधकाम पाडता येते आणि ते रिडेव्हलप करता येते....

नंतर श्री.सरफरे

अशुध्दित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

मी परवाच्या दिवशी त्याठिकाणी जाऊन पाहिले असता ते बांधकाम जमिनीपर्यंत पूर्णपणे साफ झ ााल्याचे मला आढळले. माननीय नगर विकास राज्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये उत्तर देतांना सांगितले की, तळमजला न पाडता सी.आर. झेडच्या नियमाप्रमाणे वर बांधकाम होईल. परंतु आम्ही त्याचे शूटींग केले आहे, त्याचे फोटो काढले आहेत व ते सरकार दरबारी जमा केले आहेत. ही वस्तुस्थिती मी याठिकाणी सांगत आहे. अशाप्रकारे स्पेशल ट्रिटमेंट कशासाठी दिली जाते? या सर्व प्रश्नांची उत्तरे माननीय मुख्यमंत्र्यांच्या उत्तराच्या भाषणामध्ये आली तर जनतेला किमान या मुंबईच्या प्रश्नांमध्ये या सरकारला प्रामाणिकपणे काही करावयाचे आहे असे वाटेल. मागील अधिवेशनामध्ये दिलेल्या उत्तरानंतर हे शासन चार पावले पुढे गेले आहे असे आपल्याला वाटेल. त्याप्रमाणे सत्ताधारी बाजूकडून किंवा विरोधी बाजूकडून मांडलेल्या मुद्यांविषयी केवळ घोषणा न होता प्रत्यक्षात या मुंबईच्या चर्चेच्या निमित्ताने काही मिळणार आहे की नाही? या चर्चेच्या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांच्या त्या उत्तराची आज मुंबईकर वाट पहात आहेत, एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : सभापती महोदय, मुंबईच्या विविध प्रश्नासंबंधी चर्चा करण्याकरिता या सभागृहामध्ये नियम 260 अन्वये प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या प्रश्नासंबंधी अर्थसंकल्पिय अधिवेशनामध्ये, पावसाळी अधिवेशनामध्ये व त्यानंतर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये मुंबईच्या प्रश्नासंबंधी निश्चितपणे चर्चा होत असते. आता माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी मागील अधिवेशनामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांनी या चर्चेच्या निमित्ताने सभागृहामध्ये केलेले भाषण वाचून दाखविले. सभापती महोदय, या सभागृहामध्ये आम्ही ग्रामीण भागातून आलेले सदस्य आहोत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे मुंबईमध्ये रहातात. त्यामुळे आम्ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नासंबधी बोलण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु आज मुंबईच्या समस्या दिवसें दिवस वाढत आहेत. या शहरामध्ये पिण्याच्या पाण्याचा, झोपडपट्टयांचा, रस्ते वहातुकीचा, अनधिकृत बांधकामांचा, भूखंड घोटाळयांचा, नागरी सुविधांचा प्रश्न असो या सर्व प्रश्नांवर अनेकदा चर्चा घडवून आणली आहे. ही चर्चा आम्ही ऐकली आहे. व त्या चर्चेवरील माननीय मुख्यमंत्र्यांचे, शासनाचे उत्तर ऐकले आहे. त्यावर प्रचंड प्रमाणात टिकाही झालेली आहे. विरोधी बाकावरुन ठराव करण्यात आले, न्यायालयाकडून ताशेरे ओढण्यात आले. परंतु या शासनाच्या कारभारामध्ये कोणत्याही प्रकारची सुधारणा झालेली नाही. अशाप्रकारे प्रत्येक अधिवेशनामध्ये मुंबईचे प्रश्न चर्चेला आलेले आहेत. ही चर्चा करीत असतांना काही नवीन धोरण स्वीकारले गेले पाहिजे, यासाठी आमचा प्रयत्न असतो. मुंबईच्या विविध प्रश्नांची व्याप्ती फार मोठी आहे. आणि म्हणून मुंबईच्या विविध प्रश्नांचा समावेश असलेला सर्वसमावेशक असा हा प्रस्ताव सभागृहापुढे चर्चेला ठेवण्यात आलेला आहे.

याठिकाणी माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी एमएमआरडीए व म्हाडाच्या संदर्भात अनेक मुद्दे मांडले त्याचप्रमाणे समोरच्या बाजूकडून मुंबईतील वहातुकीच्या समस्यांच्या बाबतीत सुध्दा काही मुद्दे मांडले गेले. या समस्या आम्ही रोज अनुभवीत आहोत.त्याचबरोबर या मुंबईमध्ये रोज भूखंड घोटाळा सुरु आहे. या निमित्ताने माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, "कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे" याप्रमाणे पूर्वी झालेल्या अनेक घोटाळयांची आपण तड लावणार की नाही? सभापती महोदय, आजच्या सभागृहातील या चर्चेची वेळ साधून "टाईम्स" आणि "सांज महानगर" या वर्तमानपत्रामध्ये बातमी छापून आली आहे. या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ KTG/

श्री. पांडुरंग फुंडकर...

बातमीमध्ये असे म्हटले आहे की, "सिडकोची जागा विकून मारला 275 कोटींचा डल्ला", नव्या मुंबईतील आलिशान पाम-बीच रस्त्यावर पंच तारांकित हॉटेलच्या उभारणीसाठी सिडकोकडून घेतलेल्या 12 एकर जमिनीपैकी 6 एकर जमीन रेसिडेन्शिअल झोनमध्ये परिवर्तीत करुन 275 कोटी रुपयांचा नफा मिळविल्याची घटना उघडकीस आली आहे." आणि हे केवळ सिडकोच्या कृपेमुळे घडले.

(यानंतर श्रीमती थोरात)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

आणि त्याचा 250 कोटी रुपयाचा फटका सिडकोला बसलेला आहे. सभापती महोदय, सिडकोचे हे एक प्रकरण नाही. आपण मला वेळ देणार असाल तर मी या ठिकाणी 50 प्रकरणे मांडू शकतो. सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने मी एक मागणी करणार आहे. गेल्या पाच वर्षामध्ये सिडकोकडून भूखंडाचे जे व्यवहार झाले त्या भूखंडाच्या व्यवहाराची चोकशी करुन महाराष्ट्र सरकारने त्यासंबंधीची एक श्वेतपत्रिका जाहीर करावी. अशा प्रकारची जाहीर मागणी मी याठिकाणी करीत आहे.

सभापती महोदय, या सभागृहामध्ये आम्ही अनेक वेळा सिडकोसंबंधी प्रश्न उपस्थित करतो. मागच्या दोन अधिवेशनामध्ये यासंबंधी प्रश्न उपस्थित केले आणि त्याला शासनाकडून उत्तरेही देण्यात आली सिडको नावाचा हा प्रकार शासनाने जमिनी विकण्यासाठी निर्माण केलेला सेल आहे की काय? अशा प्रकारची शंका मनामध्ये येते. के. रहेजा कॉर्पोरेशन प्रा. लिमिटेड या विकासकाला सिडकोने सॉफ्ट वेअरसाठी जागा दिली. तो भूखंड त्यासाठी आरक्षित होता. 30621 चौ.मी. भूखंडाचे विना निविदा वाटप केले. माननीय मुख्यमंत्री महोदय, कदाचित हे आपल्या काळातील नसेल. या भूखंडाच्या वाटपामध्ये सिडकोने अनेक अनियमितता केल्या. सॉफ्टवेअरसाठी आरक्षित असलेल्या भूखंडाचे आरक्षण बदलले. वाशीसारख्या अतिशय मोक्याच्या ठिकाणी विना निविदा हा भूखंड देण्यात आला. 1.5 असलेला एफ.एस.आय. 3 पर्यंत वाढविण्यात आला व त्याकरिता फक्त 3250 रुपये मीटर एवढी अतिरिक्त रक्कम आकारण्यात आली. या ठिकाणी छोटया छोटया फ्लॅटला चांगली डिमांड आहे असे चिफ इकॉनॉमिस्ट यांनी स्पष्ट नमूद करुन एवढा मोठा भूखंड विना निविदा विकण्यास हरकत घेतली. चिफ इकॉनॉमिस्टने हरकत घेतल्यानंतर सुध्दा त्या भूखंडाचे वाटप करण्यात आले. त्या विषयी सभागृहात चर्चा घडवून आणली. त्यानंतर शासनाने शंकरन समितीची नियुक्ती केली. शंकरन समितीने वाशी येथील भूखंडामध्ये सिडकोचे कोटयावधी रुपयाचे नुकसान झाल्याचा अहवाल सादर केला. ही शंकरन समिती आम्ही नेमलेली नव्हती. शंकरन समिती शासनाने नेमलेली होती. शंकरन समितीने जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये स्पष्ट म्हटलेले आहे की, ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यामुळे सिडकोचे कोटयवधी रुपयाचे नुकसान झाले त्या अधिकाऱ्याकडून या नुकसानीची वसुली करण्यात यावी अशी त्यांनी शिफारस केली. परंतु त्यावर

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

कुठलीही कारवाई झाली नाही त्यामुळे आम्ही पुन्हा हा विषय सभागृहासमोर आणला. शंकरन समितीने शिफारस केली की, सदर भूखंडाचे वाटप तात्काळ रद्द करण्यात यावे व दोषी अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी. अधिकाऱ्यांना हाताशी धरुन सिडकोचे कोटयवधी रुपयाचे नुकसान करणाऱ्या के.रहेजा या विकासकाला काळया यादीत टाकण्यात यावे. याबाबत उत्तर देताना तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी असे म्हटले की, शंकरन समितीचा अहवाल शासनाने गंभीरतेने घेतला असून त्यावर निश्चितपणाने कारवाई केली जाईल. सभापती महोदय, या शंकरन समितीच्या अहवालावर काय कारवाई केली हे माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये संगितले पाहिजे. सभापती महोदय, दोन-चार प्रकरणे सांगून मी माझे भाषण संपविणार आहे. माझी मूळ मागणी कायम रहाणार आहे. ती म्हणजे गेल्या पाच वर्षात सिडकोने भूखंडाचे जे व्यवहार केलेले आहेत त्याची श्वेतपत्रिका हिंमत असेल तर शासनाने प्रसिध्द करावी. रहेजा प्रकरणी शासनाने अधिकाऱ्यावर कुठलीही कारवाई आतापर्यंत केली नाही.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर .....

या सिडकोच्या अधिकाऱ्यांचा हौसला वाढला. त्यांचा मनमानी कारभार वाढला. सिडकोच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरुन विकासकांनी आणखी स्वत:चे उखळ पांढरे करुन घेतले. भूपेश शहा नावाचे सद्‌गृहस्थ आहेत. त्यांनी अधिकाऱ्यांना हाताशी धरले. सर्व नियमांना बगल देऊन त्यांनी एक फार मोठा भूखंड हडपण्याचा प्रयत्न केला. तेही प्रकरण आम्ही या सभागृहामध्ये आणले. त्यावेळी माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर माझ्याकडे आहे. त्यांनी त्यावेळी असे उत्तर दिले की, सेक्रेटरी लेव्हलवर त्याची चौकशी केली जाईल. बेंजामीन नावाच्या अधिकाऱ्याकडे त्याची चौकशी दिली. आतापर्यंत त्या चौकशीचा अहवाल आला नाही. वारंवार या सभागृहात विचारणा करुन सुध्दा तो अहवाल येत नाही. वाघवली, जिल्हा रायगड येथील संपादित जमिनीच्या मोबदल्यात भुपेश शहा यांना बेलापूर येथील डोंगरच भूखंड म्हणून देण्यात आला आणि त्यामध्ये सिडकोने अत्यंत विद्युतगतीने निर्णय घेतले. साडेबारा टक्के अंतर्गत भूखंड मिळविण्यासाठी हजारो गरजू शेतकरी सिडकोकडे अजूनही चकरा मारत आहेत. पण त्या जमिनीचा मोबदलाही त्यांना मिळत नाही आणि जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के जमीनही मिळालेली नाही. अधिकारी दाद देत नाहीत. पण भूपेश शहा या विकासकासाठी मात्र एकाच दिवशी ट्राइपार्टाइट ॲग्रिमेंट करण्यात आले. त्याच दिवशी सिडकोची मान्यता घेण्यात आली. त्याच दिवशी वाशी महापालिकेने बांधकामाची परवानगी दिली. पर्यावरण विभागाचे नाहरकत प्रमाणपत्र घेतले नाही. नाहरकत प्रमाणपत्र न घेता त्यांना बांधकामाची परवानगी देऊन टाकली. हा सर्व व्यवहार एकाच दिवशी झाला. एकाच दिवशी विद्युतगतीने एका बिल्डरसाठी अशा पध्दतीने शासन आणि शासनाचे अधिकारी काम करतात यामध्ये काय रहस्य आहे ? मौजे वाघवली येथील जमिनीचे सातबारा बघितले असता पीक पाहणी कॉलममध्ये ओसाड अशी नोंद आहे. ही नोंद जमीन पाण्याखाली असल्यामुळे करण्यात आली परंतु तरी सुध्दा सिडकोच्या अधिकाऱ्यांनी ही पाण्याखालील ओसाड जमीन साडेबारा टक्केकरिता पात्र ठरविली. पण ही पात्र ठरविलेली जमीन शेतकऱ्यांना दिली नाही. ती जमीन शेतकऱ्यांना दिली असती तर आम्ही समजू शकलो असतो. पण ही जमीन यासाठी पात्र ठरविली की, हा भूखंड त्यांना भूपेश शहा यांना द्यावयाचा होता. म्हणून ती जमीन पात्र ठरविण्यात आली. प्रकल्पग्रस्त भूधारकांना ज्या नोडवरुन

श्री. पांडुरंग फुंडकर .....

त्यांची जमीन संपादित केली आहे त्याच नोडमध्ये किंवा शक्य नसल्यास त्याच्या खालील नोडमध्ये भूखंड वाटप करण्याचे सिडकोचे धोरण आहे. परंतु त्या भूपेन शहासाठी धोरणही बदलले. म्हणजे अधिकारी यामध्ये किती पुढे चालले आहेत, किती गतीने काम करीत आहेत हे दिसून येते. धोरण बदलण्याचे कामही अधिकारीच करीत आहेत. धोरण बदलल्यामुळे हा जो 50 हजार 500 चौरस फुटाचा प्लॉट आहे तो भूपेन शहा यांना देण्यात आला. या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्यात आली. त्यांचे काम थांबविण्यात आले. आम्ही या ठिकाणी ओरड केली. लक्षवेधी सूचना आणली. ते काम त्यावेळी अर्ध्यावर थांबले पण अजूनही बेंजामीन समितीचा अहवाल सभागृहासमोर आलेला नाही. याची चौकशी होऊन हा अहवाल आला असेल तर माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याबाबत या ठिकाणी ताबडतोबीने सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, अशा प्रकारचे प्रकरण ओबेरॉय यांचे आहे. म्हणजे मोठमोठे बिल्डर्स कशा पध्दतीने काम करीत आहेत आणि कशा पध्दतीने या मुंबईच्या जमिनीचे लचके तोडत आहेत याची ही उदाहरणे आहेत. काही प्रकरणे आताच आपल्याला सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी सांगितली. ओशिवरा येथील प्रश्न आहे. सीटीएस-1, 38(2) मधील भूखंड क्रमांक 120 वर बांधकाम करण्याची परवानगी नगरविकास विभागाने दिली व सदर प्लॉट सीआरझेड-2 मध्ये मोडत असल्याने मेनग्रोव्हजपासून 50 मीटरचा बफर झोन ठेवण्याची अट परवानगीमध्ये टाकली परंतु हा मॅनग्रोव्हज कमी करुन 50 मीटरचा बफर झोन ठेवण्याचा प्रयत्न त्या ठिकाणी करण्यात आला. त्यानंतर मुंबई महानगरपालिकेने 18 जुलै, 1998 रोजी सदर प्लॉटवर इमारत उभी करण्याची परवानगी दिली. उपरोक्त परवानगी खालील प्रमाणे होती.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

पोडियमची उंची 10.6 मीटर होती, स्टीलची उंची 17 पॉईण्ट अधिक 10 मजले. परंतु या ओबेरॉयने काय केले ? ओबेरॉय या विकासकाच्या आर्किटेक्टने बिल्डिंगच्या प्लॅनला जी परवानगी दिली होती ती बदलून मागितली. त्यानंतर दुसरा प्लॅन दिला. पोडियमची उंची 10.6 मीटर स्टीलची उंची 30 पॉईण्ट आणि 13 मजले अशी परवानगी मागितली. या प्लॅनमध्ये पाय-या, लिफ्ट व लॉबीचा भाग एफएसआयमध्ये समाविष्ट होता. परंतु उपलब्ध टीडीआर वापरुन परवानगी मागण्यात आली. सभापती महोदय, या विकासकाला परवानग्या देण्यात आल्या त्यानुसार काम न करता सर्व नियम धाब्यावर बसवून पाय-या, लिफ्ट, लॉबी या सर्वासाठी टीडीआर वापरण्यात आला. त्यानंतर पुन्हा 38 मजल्यांसाठी परवानगी मागण्यात आली. पहिल्यांदा 10 मजल्यांसाठी, नंतर 13 मजले व नंतर 38 मजल्यांसाठी परवानगी मागण्यात आली. त्यानंतर त्यांना 36 मजल्यांपर्यंत बांधकाम करण्याची परवानगी देण्यात आली. अशाप्रकारे बी.एम.सी.ने परवानगी दिल्यानंतर विकासकाने आर्किटेक्टमार्फत जुन्या प्लॅनमध्ये 3 वेळा बदल केला. नियमामध्ये हे अपेक्षित आहे का ? 3 वेळा मूळ प्लॅनमध्ये बदल करुन, अधिका-यांना हाताशी धरुन प्रत्येक साईटवर अनेक अनियमितता केल्या आहेत. त्याची चौकशी करण्यात यावी अशी मी मागणी करतो. या विकासकाने इमारतीत लिफ्ट ठेवली नाही, जिना ठेवला नाही, गॅलरीच ठेवल्या नाहीत आणि दोन फ्लॅटचा प्लॅन होता त्याऐवजी एक फ्लॅट करण्यात आला. अशा पध्दतीने या संपूर्ण इमारतीमध्ये त्याने कोट्यवधी रुपये कमविले. नियम बदलणारे व परवानगी देणारे अधिकारी कोण आहेत ? यासंबंधी माननीय मुख्यमंत्री महोदय चौकशी करणार आहेत का ? जे अधिकारी दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई केली जाणार आहे काय ?

सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी मुद्रण कामगारांचा प्रश्न मांडला आहे. या मुद्रण कामगारांना बेघर करुन अंधेरी येथील मोक्याचा भूखंड देण्यात आला आहे. त्या कामगारांचा काय दोष आहे ? हे मुद्रण कामगार तेथे वर्षानुवर्षे रहात होते. त्या कामगारांना दुसरीकडे शिफ्ट करुन जागा देतो असे सांगण्यात आले. तो भूखंड ताब्यात घेऊन बिल्डरला देण्याचे घाटत आहे. फाईव्ह स्टार हॉटेलसाठी सरकारी भूखंड मोफत दिले जातात. त्याची माहिती माझ्याजवळ आहे, परंतु ते

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.पांडुरंग फुंडकर.....

वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. परंतु जागा दिलेल्या आहेत. 1973, 1967, 1942, 1991 या वर्षांमध्ये अशा पध्दतीने जागा दिल्या आहेत. या जागांचे 50 हजार, 60 हजार रुपये भाडे ठरविण्यात आले आहे आणि मोफत जागा दिल्या आहेत. अशा पध्दतीने भूखंडांची अनेक प्रकरणे आहेत....

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते नियम 260 अन्वये मुंबईच्या समस्यांवर मांडण्यात आलेल्या प्रस्तावावर बोलत आहेत. त्यांनी अतिशय चांगले विचार मांडले आहेत. त्यांनी हा प्रस्ताव उपस्थित केल्यामुळे आम्हाला देखील त्यावर बोलण्याची संधी मिळाली आहे. या प्रस्तावावर बोलत असताना मुंबईच्या समस्यांवर, मुंबईतील नागरी सुविधांवर ताण पडत आहे त्यासंबंधी, एमएमआरडीएसंबंधी ते बोलतील अशी अपेक्षा होती. परंतु ते बिल्डरसंबंधीचे मुद्दे मांडत आहेत..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी काय बोलावयाचे याचे मार्गदर्शन सन्माननीय सदस्यांकडून घ्यावयाचे काय ?

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी कृपया खाली बसावे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मुंबईचे मूळ प्रश्न आहेत ते का निर्माण झाले ? मुंबईत एवढे प्रश्न निर्माण होण्याची कारणे काय आहेत, ती तुम्ही शोधणार आहे का ? मुंबईमध्ये परप्रांतियांचे लोंढे येत आहेत त्यांना थोपविण्याची सरकारमध्ये क्षमता नाही. मुंबईच्या नागरी सुविधांवर ताण पडत आहे, त्यामुळे मुंबईतील जे मूळ रहिवासी आहेत त्यांना नागरी सुविधा मिळत नाहीत. सर्वसामान्य माणसांसाठी सरकारने सिडको नावाची संस्था निर्माण केली आहे. या सिडकोचे लचके बिल्डर तोडत असतील तर त्याबाबत आम्ही सभागृहात बोलावयाचे नाही का ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 20:15

(श्री. पांडुरंग फुंडकर...

सभापती महोदय, अशा प्रकारची अनेक प्रकरणे मी या ठिकाणी मांडू शकतो. मी माननीय मुख्यमंत्र्यांना या निमित्ताने विनंती करणार आहे की, जे झारीतील शुक्राचार्य आहेत ज्यांच्यामुळे हे सरकार बदनाम होत आहे, ज्यांनी सिडकोमध्ये अब्जावधी रुपयाचा व्यवहार केलेला आहे, जे अधिकारी दोषी आहेत त्यांच्यावर आपण कारवाई करावी, त्यांच्या मालमत्तेची चौकशी करावी. इतकेच नाही तर सिडकोच्या संपूर्ण व्यवहाराची चौकशी करण्यासाठी शासनाने श्वेतपत्रिका काढावी अशी मागणी करुन मी माझे भाषण संपवितो.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 260 अन्वये मुंबईच्या विविध समस्यासंबंधीची चर्चा या ठिकाणी उपस्थित करण्यात आली. या विषयी महत्वपूर्ण चर्चा होईल आणि त्यातून शासनाला मूलभूत आणि धोरणात्मक स्वरुपाचे काही सुझाव मिळतील, शासनाला काही मार्गदर्शन होईल असे अपेक्षित होते. मी या संदर्भात काही भाष्य करणार नाही कारण सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी हा प्रस्ताव आणलेला आहे. या चर्चेमध्ये काही धोरणात्मक स्वरुपाचे विषय आले असते तर बरे झाले असते. तथापि, ज्या ज्या विषयाच्या संदर्भात या ठिकाणी विचारणा केली गेली त्याचे उत्तर देण्याचा आणि त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न मी करणार आहे. माझ्या उत्तराने त्यांचे पूर्ण समाधान होणार नसले तरी मी ते करण्याचा प्रयत्न करणार आहे. मुंबईच्या विषयी ज्या काही कल्पना मांडल्या गेल्या त्यामध्ये मुंबईमध्ये येणारे लोंढे हा विषय प्रमुख आहे. मुंबईमध्ये येणा-या लोंढयांच्या बाबतीत खूप चर्चा होते. या मुंबईच्या संदर्भात नेमके काय सुरु आहे, किंबहुना शासनाच्या माध्यमातून ज्या ज्या गोष्टी सुरु आहेत त्यासंदर्भात मी आणि माझ्या सहका-यांनी या सदनामध्ये उत्तरे दिलेली आहेत. तरीही या मुंबईच्या समस्याबाबत शासनाने काय काय केले हे सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच हे स्पष्ट केले आहे की, मुंबईमध्ये येणा-या लोकांच्या बाबतीत आपण घटनेने बांधले गेलो आहोत. घटनेने जे काही अधिकार दिलेले आहेत त्यानुसार मुंबईला कोणी यावे, कोणत्या राज्यातील आणि कोणत्या देशातील माणसाने यावे याबाबतीत कायद्याने कोणतेही बंधन घातलेले नाही आणि घालणारही नाही हे मी सुरुवातीलाच स्पष्ट केलेले आहे. मर्यादित मुद्दा एवढाच आहे की, जो कोणी येईल तो कायदेशीररित्या आला पाहिजे, कोठेही अतिक्रमण न करता कायद्याप्रमाणे राहिला पाहिजे आणि त्याने महाराष्ट्रातील कायद्याचे उलंघन करता कामा नये, अशी आमची मूलभूत भूमिका राहाणार आहे. घटनेने देशातील नागरिकाला जे काही अधिकार दिलेले आहेत त्यानुसार जो कोणी या महाराष्ट्रामध्ये आणि मुंबईमध्ये येईल त्याच्या बाबतीत घटनेतील तत्वे स्वीकारण्याची महाराष्ट्राची भूमिका आहे. सर्वांना एकाच गोष्टीची चिंता आहे. ती म्हणजे मुंबईची जी काही आजची परिस्थिती आहे त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मुंबईचा विकास कशा पध्दतीने झाला पाहिजे, त्यासाठी कोणत्या गोष्टी अपेक्षित आहेत आणि त्याबाबतीत आपण जे जे काही प्रयत्न करीत आहोत आणि जे प्रयत्न करण्याची नितांत गरज आहे ते मी येथे स्पष्ट करणार आहे.

..3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

सभापती महोदय, मुंबईतील लोकसंख्येच्या संदर्भात 1993मध्ये इरिगेशन विभागाचे तत्कालीन सचिव  श्री.माधवराव चितळे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली गेली.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ KTG/ 20:20

श्री.अशोक चव्हाण......

मुंबईसाठी आवश्यक असणारा पाणीपुरवठा विचारात घेता आज दररोज साधारणपणे ३३८२ द.ल.घ.मी. पाणी मुंबई शहरासाठी लागते. यंदाच्या पावसाची अवस्था आपण अनुभवली आहे. गेल्या वर्षी पाऊस कमी झाल्यामुळे मुंबईच्या पाणी पुरवठयामध्ये १५ टक्के कपात करावी लागली. आज दररोज २९०० द.ल.घ.मी.पाणी मुंबईसाठी द्यावे लागत आहे. यंदा पावसाला बऱ्यापैकी सुरुवात झालेली आहे. महिना-दीड महिन्यात चांगल्यापैकी पाऊस झाला तर मुंबईच्या पाणी पुरवठ्यामध्ये जी कपात केली आहे ती निश्चितपणे यापुढे करावी लागणार नाही. परंतु त्या व्यतिरिक्त जे नवीन स्त्रोत आयडेंटिफाय केले आहेत त्यामध्ये मध्य वैतरणा, गारगाई, पिंजाळ आणि काळू हे चारही प्रकल्प हाती घेण्याबाबत शासन मुंबई महापालिकेला मदत करीत आहे. एमएमआरडीएमार्फत मोठया प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. या चारही प्रकल्पाच्या माध्यमातून मुंबई शहरासाठी पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे, याकरिता चांगल्या पध्दतीने वाटचाल सुरु आहे. प्रत्येक प्रकल्पाच्या कामाला चांगल्या पध्दतीने गती देण्याची शासनाची भूमिका आहे. मध्य वैतरणा पाणीपुरवठा प्रकल्पाच्या कामासाठी भरपूर निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. मे, २०१० पर्यंत ८१७ कोटी रुपये इतका या प्रकल्पाच्या कामावर खर्च झालेला आहे. आतापर्यंत या प्रकल्पाचे ४२ टक्के काम पूर्ण झालेले आहे. गारगाई व पिंजाळ प्रकल्पाच्या कामांसाठी ५ कोटी रुपयांची तरतूद २०१०-२०११ या वर्षामध्ये करण्यात आली असून ज्याप्रमाणे गरज भासेल त्या पध्दतीने आर्थिक मदत केली जाईल.

सभापती महोदय, मुंबईमध्ये पाण्याची वितरण व्यवस्था मजबूत करण्याची गरज आहे. पाईपलाईन्स जून्या झालेल्या आहेत. मुंबई शहर, पश्चिम आणि पूर्व उपनगरातील पाईपलाईन्स बदलण्याचे काम वेगाने सुरु आहे. आतापर्यंत मुंबई शहरात २,८३,२०५ मीटर जलवाहिन्या बदलण्याचे तर पश्चिम उपनगरात १,१०,५३० मीटर व पूर्व उपनगरात ४५,०८४ मीटर जलवाहिन्या झपाट्याने बदलण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याचप्रमाणे भूमीगत बोगद्याद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी ७१५ कोटी रुपये किंमतीची कामे मलबार हिल ते क्रॉस मैदान, मरोशी ते रुपारेल कॉलेज, वेरावळ जलाशय ते आदर्शनगर-यारी रोड पर्यंतची कामे मोठया प्रमाणात सुरु आहेत. मुंबई शहरासाठी लागणाऱ्या पाणीपुरवठ्यामध्ये कमतरता भासू नये यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. नागरीकरण वाढत जाणार आहे. नागरीकरण वाढत असताना मुंबईमध्ये पाण्याची कमतरता भासू

..२..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण......

नये यादृष्टीने शासन प्रयत्न करीत आहे. जो कोणी मुंबईत येतो तो अधिकृतरित्या मुंबईमध्ये राहिला पाहिजे. मुंबईमध्ये देऊ केलेला कर भरला पाहिजे. चुकीच्या मार्गाने न जाता मुंबईमध्ये रेंटल हाऊसिंग असो, एसआरए, म्हाडाची जी कामे सुरु आहेत त्याठिकाणी तयार होणाऱ्या घरांमध्ये अधिकृतरित्या लोकांनी वास्तव्य केले पाहिजे. अनधिकृतपणे अतिक्रमणे न वाढविता सगळ्या गोष्टीमध्ये शासनाचे प्रामाणिक प्रयत्न सुरु आहेत. विशेषत: मुंबई शहराचा पाणीपुरवठा हा सगळ्यात महत्वाचा विषय आहे. महानगरपालिका आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नातून कामे केली जात आहेत. विशेषत: एमएमआरडीएचा जो विषय आहे त्या विषयावर मी येणार आहे. एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबई शहराच्या विकासाकरिता निश्चितपणे प्रयत्न करण्याची शासनाची तयारी आहे.

सभापती महोदय, जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान या केंद्र शासनाच्या योजनेच्या माध्यमातून मोठया प्रमाणात या राज्याला निधी उपलब्ध करुन दिला गेला आहे. संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य हे क्रमांक एकचे राज्य आहे. ज्या राज्याला जेएनएनयुआरएमच्या माध्यमातून सगळ्यात जास्त पैसा केंद्र शासनाने उपलब्ध करुन दिलेला आहे. केंद्र शासनाने या योजनेद्वारे मुंबई शहरासाठी सगळ्यात जास्त आर्थिक फायदा दिलेला आहे. फेब्रुवारी, २००६ मध्ये जे प्रकल्प मंजूर झाले त्यामध्ये नागरी पायाभूत सुविधा, शहराचे सौंदर्यीकरण, आरोग्य, शिक्षण, गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधारणा, पर्यटन या क्षेत्रातील सगळ्या कामासाठी जेएनएनयुआरएम अंतर्गत प्राप्त होणारा निधी खर्च करताना त्यासोबत एमएमआरडीए देखील भाग घेत आहे. महापालिकेने अन्य सगळी कामे हाती घेण्याबाबत राज्य शासनाने सहकार्याची भूमिका घेतली आहे.

सभापती महोदय, घनकचरा व्यवस्थापन हा अतिशय महत्वाचा विषय आहे. घनकचरा आणि मुंबई शहरातील सांडपाणी याचा उल्लेख मी यासाठी करतो की, ख-या अर्थाने मुंबईमध्ये पाण्याची गरज आहे ती जर भागवायची असेल तर पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कामासाठी मुंबईमध्ये पाणी वापरले जाते त्या पाण्याबाबत आपल्याला जरुर विचार केला पाहिजे.

नंतर ५सी.१....

अमुद्रित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण........

त्या प्रयत्नाचाच भाग म्हणून मध्यंतरी रेल्वेलाही सांगितले होते की, पिण्याच्या पाण्याचा वापर वॅगन धुण्याकरिता किंवा डबे धुण्याकरिता करु नये. तसेच गार्डनमध्ये देखील पिण्याच्या पाण्याचा वापर करु नये. पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त अन्य कामासाठी हे पाणी न वापरता त्या पाण्यामध्ये बचत व्हावी म्हणून मुंबईमध्येच नव्हे तर संपूर्ण राज्यातील महापालिकांच्या माध्यमातून अशा पाण्याचे रिसायकलिंग करावे. जेणेकरुन सांडपाणी म्हणून आपण समुद्रात सोडतो किंवा महापालिकांचे सांडपाणी नदीत सोडले जाते अशा पाण्याचा वापर पुन्हा रिसायकलिंगच्या माध्यमातून करता येईल. तसेच नद्यांमध्ये असे पाणी सोडल्यामुळे नदीचे पाणी सुध्दा दूषित होते हा राज्याच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न होऊ लागला आहे, त्यावर हा एक चांगला उपाय आहे. मध्यंतरी सिंगापूरमध्ये आपल्या अधिकाऱ्यांना तेथील पब्लिक युटिलिटी बोर्डने जी सुविधा केली आहे तेथील पाण्याचा पुनर्वापर कसा होतो याचा अभ्यास करण्यासाठी पाठविले होते. त्याच माध्यमातून मुंबई महापालिकेचे जे सांडपाणी समुद्रात सोडले जाते ते थांबवून त्याचे शुध्दीकरण करुन पिण्याच्या व्यतिरिक्त अन्य कामासाठी वापरता यावे ही शासनाची भूमिका आहे. त्यातून हे पाणी रिसायकलिंगच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिले तर पिण्याच्या पाण्याचा दुरुपयोग आपल्याला वाचविता येईल. मुंबईतील वाढते नागरिकरण लक्षात घेता तसेच या शहराची वाढती पाण्याची गरज पाहून जी डेफिसीट आहे ती आपल्याला यातून भागविता येईल अशीही शासनाची भूमिका असून त्यादृष्टीने शासनाने पाऊल उचलले आहे. नगरविकास विभाग यामध्ये एक नोडल डिपार्टमेंट म्हणून काम करीत असून त्याच धर्तीवर राज्यातील इतरही महापालिकांनी असे प्रकल्प हाती घ्यावेत अशी शासनाची भूमिका आहे. त्याचबरोबर मुंबईच्या बाबतीत आणखी शासन असाही प्रयत्न करीत आहे की, समुद्राच्या पाण्याचे डिसॅलिनेशन, नि:क्षारीकरण करुन त्या पाण्याचा उपयोग सुध्दा पिण्याच्या पाण्याव्यतिरिक्त गरज भागविण्यासाठी करता येईल. अर्थात ही प्रक्रिया थोडी महागडी आहे. असे असले तरी काही प्रमाणात आपल्याला तोटा भरुन काढण्यासाठी या प्रक्रियेचा उपयोग करुन घेता येतो. म्हणून पाण्याचे रिसायकलिंग आणि डिसॅलिनेशन अशा प्रकारचे दोन्ही प्रयत्न मुंबईच्या दृष्टीने उपयुक्त आहेत आणि त्यादृष्टीने शासनाने धोरणात्मक निर्णय घेतला असून लवकरच पुढील कार्यवाही केली जाईल.

....2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महोदय, मुंबईतील घनकचऱ्याच्या व्यवस्थापनाच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी चिंता व्यक्त केली आहे. आज हा प्रश्न अनेक मोठमोठ्या शहरांमधून भेडसावतो आहे. ही समस्या ज्या पध्दतीने वाढत आहे आणि या घनकचऱ्याची विल्हेवाट झाली नाही तर मोठ्या प्रमाणात आंदोलने होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो असेही सांगण्यात आले आहे. मुंबईमध्ये गोराई येथे घनकचऱ्याचा प्रकल्प आपण हाती घेतला होता त्याचे काम सन 2009 मध्येच पूर्ण झाले आहे. देवनारमध्ये असा प्रकल्प घेण्याची शासनाची भूमिका असून 12 नोव्हेंबर, 2009 पासून तो सुरु झाला असून तो प्रकल्प देखील दोन वर्षात पूर्ण होईल. त्यानंतर अंजूर येथे सुध्दा असाच प्रकल्प प्रस्तावित आहे व तो देखील यावर्षी सुरु होईल. मुलुंड आणि कांजूरमार्ग येथे विद्युत वहन स्थलांतरित करण्याचा विषय आहे. अशा प्रकारे हे सर्व घनकचऱ्याचे व्यवस्थापन आहे त्यासाठी वेगवेगळ्या विभागांनी मदत करण्याचे ठरविले आहे. त्यात महापालिका आणि महसूल विभागाच्या माध्यमातून हा प्रयोग आपण करीत आहोत. तसेच यासाठी शासकीय जमीन सुध्दा महापालिकेला उपलब्ध करुन देत आहोत. अशा प्रकारे या कामाला गती मिळणार आहे. घनकचऱ्याचे व्यवस्थापन, पाण्याचे रिसायकलिंग यातून मुंबई शहरातील समस्यांवर परिणामकारक रित्या कशी मात करता येईल यासाठी शासनाचा हा प्रयत्न आहे. मुंबईत विशेषत: अतिवृष्टी झाली त्यावेळेस जेथे पाणी तुंबल्याचे नजरेस येते आणि यातून मार्ग काढण्यासाठी तसेच या सर्व भागात काम करण्यासाठी 1500 कोटी रुपये देण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे व त्यासाठी 1200 कोटी रुपये केंद्रशासनाच्या वतीने 100 टक्के अनुदान ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी मिळाले. अशा प्रकारे आतापर्यंत कधी मिळाले नव्हते तेवढे पैसे केंद्राच्या वतीने माननीय पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या वतीने मिळाले आहेत. यापूर्वी स्व. राजीव गांधीच्या माध्यमातून धारावी प्रकल्पासाठी 1200 कोटी रुपये एवढी रक्कम पीएमजीएसवाय या योजनेच्या माध्यमातून मिळाली. मला खात्री आहे की, मुंबईत प्रति घंटा 50 मि.मि. पाऊस पडल्यानंतर ठिकठिकाणी जे पाणी भरते त्यातून आपल्याला रिलीफ मिळेल. तसेच या पाण्याचा निचरा करण्याच्या दृष्टीने याच योजनेच्या माध्यमातून एकूण 58 कामे हाती घेतली असून त्यातील 38 कामे प्रगतीपथावर आहेत आणि 11 कामांचे टेंडर सादर केले आहेत. सांगण्याचा उद्देश असा आहे की, महानगरपालिकेला हे सर्व पैसे केंद्रशासनाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अध्यक्षांचे प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण.....

सभागृहात मात्र अशी ओरड होते आहे की, एमएमआरडीए काय करते आहे ? केंद्रशासन काय करते आहे ? यासंदर्भात मी मुद्दाम नमूद करु इच्छितो की, महानगरपालिका कोणत्या पक्षाची आहे अशी भूमिका आम्ही कधीही स्वीकारली नाही. तर आपल्या व संपूर्ण राज्याच्या दृष्टीने मुंबई महत्वाची आहे, मुंबईच्या कामाकरिता जेवढा पैसा पाहिजे तो पैसा मग एमएमआरडीए असो, राज्य शासन असो किंवा केंद्रशासन असो महानगरपालिका कोणत्या पक्षाची आहे अशी भूमिका न स्वीकारता जेवढी मदत पाहिजे तेवढी मदत करण्याची शासनाची भूमिका आहे. मुंबईमध्ये हिंदमाता आणि एलफिन्स्टन रोड येथे पावसाचे पाणी साचते, त्या पाण्याचा निचरा करण्यासाठी सध्या जी कामे सुरु आहेत ती पूर्ण झाली तर या भागात पाणी साचणार नाही. अलिकडे एमएमआरडीएचा विषय सभागृहात नेहमी येऊ लागला आहे. एमएमआरडीएच्या चर्चेचा हेतू काय आहे हे मला तरी काही समजत नाही. एमएमआरडीएच्या माध्यमातून आज 1 लक्ष 9 हजार 687 कोटी रुपयांची कामे मुंबईमध्ये विविध स्तरावर सुरु आहेत. एवढा पैसा देण्यासाठी महानगरपालिकेकडे निधी आहे का असा प्रश्न मला समोर बसलेल्या सन्माननीय सदस्यांना करावयाचा आहे. एमएमआरडीए नसती तर 1 लक्ष 9 हजार 687 कोटी रुपये मुंबई महानगरपालिका उभी करु शकली असती का ? याचा कोठेतरी विचार करणे आवश्यक आहे. अशा प्रकारे आज मुंबई व परिसरात 1 लक्ष 9 हजार 687 कोटी रुपयांची कामे एमएमआरडीच्या माध्यमातून विविध स्तरावर होत आहेत. एमएमआरडीएने हाती घेतलेली ही कामे 2010 ते 2014 पर्यंत पूर्ण होणार आहेत. सन 2010 ते 2014 पर्यंत मुंबई नागरी परिवहन प्रकल्प -1, मुंबई नागरी परिवहन प्रकल्प -2, मेट्रो रेल्वे वर्सोवा ते अंधेरी-घाटकोपर-चारकोप-बांद्रा-मानखुर्द हा 32 कि.मी. चा प्रकल्प, कुलाबा ते बांद्रा 20 कि.मी. मेट्रोचा प्रकल्प, नवीन मुंबई मेट्रो बेलापूर-तळोदा विमानतळ 25 कि.मी. आदि प्रकल्प पूर्ण होणार आहेत. मोनोरेल जेकब सर्कल-वडाळा-चेंबूर रोड, 20 कि.मी. जून 2011 पर्यंत पूर्ण होणार आहे. ठाणे-कल्याण-भिवंडी 25 कि.मी.चे काम सन 2014 पर्यंत पूर्ण होणार आहे. सन 2010 पर्यंत आपण स्कायवॉकचे काम केलेले असून त्याबबत तक्रारी आल्यामुळे काही ठिकाणचे स्कायवॉकचे काम रद्द करण्यात आलेले आहे. उड्डाण पुलासाठी 531 कोटी रुपये खर्च येणार असून सन 2010 च्या अखेरपर्यंत ही कामे पूर्ण होणार आहे. 6

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण ........

उन्नत मार्गांचे काम डिसेंबर 2011 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. मल्टी नोडल कॉलीडॉर अलिबाग ते विरारचे काम 2014 पर्यंत पूर्ण होणार आहे. भाडे तत्वावरील 5000 घरे 2014 पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. प्रादेशिक भराव भूमी क्षेत्राचे काम सन 2013 पर्यंत पूर्ण होणार आहे. मला एवढेच सांगावयाचे आहे की, विविध प्रकारची 23 कामे एमएमआरडीएच्या माध्यमातून मुंबईमध्ये सुरु आहेत. या कामांचा विचार केला तर मुंबई महानगरपालिकेची काय अवस्था आहे ? आज मुंबई महानगरपालिकेचे बजेट 6000 कोटी रुपयांनी मायनस आहे. कालच माझ्याकडे मुंबई महानगरपालिकेचा प्रस्ताव आला की, आम्हाला कर्ज काढण्यासाठी परवानगी द्या, आमच्याकडे आता प्रकल्पांची कामे करण्यासाठी पैसे नाहीत. मुंबई महापालिकेला पैसे दिले तर त्या पैशाची परतफेड कशी होईल असे विचारले असता त्याला महानगरपालिका उत्तर देऊ शकत नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, एमएमआरडीए ही एजन्सी काही मुंबई महानगरपालिकेची स्पर्धक नाही. उलट एमएमआरडीएची भूमिका महानगरपालिकेला मदत करण्याची आहे. एमएमआरडीएचा चेअरमन मुख्यमंत्री आहे म्हणून त्याला विरोध करावयाचा का ? एमएमआरडीएमध्ये महापौर आहेत, स्टँडींग कमिटीचे चेअरमन, महानगरपालिकेचे इलेक्टेड प्रतिनिधी आहेत असे असतांना एमएमआरडीए ही महानगरपालिकेशी स्पर्धा करते की, एमएमआरडीएच्या माध्यमातून महानगरपालिकेला मदत होते हा सवाल मला मुद्दामहून उपस्थित करावयाचा आहे. एमएमआरडीएची चर्चा सकारात्मक पध्दतीने व्हावी, अशी माझी अपेक्षा आहे. यामधून तुम्हाला काही मिळवायचे आहे आणि आम्हाला काही मिळवायचे आहे अशातला भाग नाही, परंतु मुंबईचे चांगले होणार असेल, भले होणार तर मुंबईचा या माध्यमातून विकास करण्यामध्ये काय गैर आहे? मला मुद्दाम विचारावयाचे आहे की, ही चर्चा दोन्ही सभागृहात वारंवार उपस्थित केली जाते ती निष्फळ स्वरुपाची चर्चा आहे. मी तर असे म्हणेन की, एमएमआरडीएचा निधी हा मुंबई पुरता मर्यादित नाही तर संपूर्ण मुंबईच्या संपूर्ण एमएमआरडीएच्या रिजनमध्ये हा पैसा खर्च होतो आहे. वसई-विरार ते कल्याण-भिवंडी पर्यंत एमएमआरडीएचा पैसा खर्च होत आहे. मुंबईचे नागरीकरण ज्या पध्दतीने वाढत चालले आहे ते पाहता इतर भागाकडे आज आपण लक्ष दिले नाही तर पुढील 5-7 वर्षामध्ये या भागाचा विकास करावयाचा म्हटला तरी विकास करता येणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

MMRDA ची भूमिका सकारात्मक आहे. MMRDA च्या माध्यमातून मुंबईतील विविध भागांचा विकास करण्यासाठी पैसा उपलब्ध होणार आहे. MMRDA चे जे भूखंड आहेत ते विकून आपल्याला पैसा मिळणार आहे. भूखंड विक्री हा MMRDA च्या निधीचा मुख्य स्रोत आहे. तो निधी MMRDA च्या क्षेत्रातील विकास कामासाठी वापरण्यात येणार आहे  हे मला येथे मुद्दाम सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, या प्रस्तावामध्ये मुंबईतील मॉल्स आणि टॉवर्सचा देखील उल्लेख आहे. त्यावर फारशी काही चर्चा झाली नाही.  आज महाराष्ट्राचा विचार केला तर सर्व्हीस इंडस्ट्रीमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येत आहे. आज ही वाढ 60 टक्क्याच्या आसपास गेली आहे. ही वाढ आपण थांबवू शकत नाही. एकेकाळी मुंबईमध्ये मालाचे उत्पादन होत होते. एकंदरीत बाजारपेठेतील वातावरण लक्षात घेता सर्व्हीस इंडस्ट्री मोठ्या प्रमाणावर वाढत जाणार आहे. आय.टी.क्षेत्रात वाढ होणार आहे.  सर्व्हीस इंडस्ट्रीमध्ये वाढ झाल्यामुळे महाराष्ट्राला जो कर मिळत होता त्याला मर्यादा आली आहे. जीएसटीच्या माध्यमातून महाराष्ट्रासाठी अधिक पैसा केंद्राकडून मिळावा म्हणून आम्ही केंद्र शासनाला विनंती केली आहे. केंद्र शासन देखील अनुकूल आहे. यासाठी केंद्र शासनाला संसदेसमोर जाऊन घटनात्मक बदल करावा लागेल. सर्व्हीस इंडस्ट्री वाढत असल्यामुळे रोजगार निर्मिती अधिक होत आहे.

सभापती महोदय, मॉल्सचा देखील उल्लेख करण्यात आला आहे. मॉल्सच्या बांधकामाची जबाबदारी शासनाची नसून त्या त्या महानगरपालिकेची आहे. त्यांनी मॉल्सचे काम योग्य होते किंवा कसे हे पहायचे आहे. बांधकाम अधिकृत आणि किंवा अनधिकृत आहे हे महानगरपालिकेने पहायचे आहे.  अधिकृत बांधकाम असेल तर त्यावर आपल्याला निर्बंध घालता येणार नाही. तसेच, कोणत्याही मॉल्सच्या अनधिकृत बांधकाम तोडण्याच्या कारवाईला शासनाने स्थगिती दिलेली नाही. बेकायदेशीर काम असेल तर ते जरूर थांबवता येईल. तेव्हा सर्व्हीस इंडस्ट्रीच्या माध्यमातून रोजगार निर्माण होणार असेल तर आपण सकारात्मक दृष्टीने विचार केला पाहिजे, एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण....

सभापती महोदय, SRA संबंधी देखील येथे चर्चा झाली. येथे बोगस झोपडीधारकांचा देखील उल्लेख झाला. सभागृहामध्ये मुंबईतील सन 2000 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्याची भूमिका मांडली आहे. यासंबंधी मी असे सांगू इच्छितो की, सदर विषय हा सर्वोच्च न्यायालयामध्ये प्रलंबित आहे. 1995 पर्यंतच्या झोपड्या आपण नियमित केल्या आहेत. आपण सन 2000 पर्यंतच्या झोपड्या नियमित करण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाकडे मागितली आहे. यासाठी सर्वोच्च न्यायालयात अंतरिम अर्ज दाखल केला आहे. त्यावर एकदा सुनावणी देखील झालेली आहे. मात्र, पुढची तारीख आपल्याला अद्यापि मिळालेली नाही. त्यामुळे शासनाने कोणतीही कारवाई केली नाही असे म्हणणे चुकीचे आहे. कायद्यात बदल करावयाचे म्हटले तर आपल्याला सुप्रीम कोर्टाचे निर्बंध आहेत. म्हणून सर्वोच्च न्यायालयाचा अवमान न होता सन 2000 पर्यंतच्या झोपड्या नियमित झाल्या पाहिजे ही भूमिका आम्ही स्वीकारली आहे. या प्रकरणासंबंधी सर्वोच्च न्यायालय जो काही निर्णय देईल त्याच्या अधीन राहूनच निर्णय घेतला जाईल. कायद्यात बदल करावा लागला तर तो सभागृहाच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न करू. यासाठी ॲडव्होकेट जनरलचे मत सुद्धा घेऊ. न्यायालयाचा अवमान न होता कायद्यामध्ये बदल करण्याची भूमिका माझ्या शासनाची राहणार आहे. 2000 नंतरचा झोपड्यांना संरक्षण देणे हा विषय चिंतेचा आहे. आता आपण जनगणनेचे काम सुरू केले आहे. 2000 पासून 2010 पर्यंत जे काही बदल झालेले आहे, ती संख्या नेमकी किती आहे हे निश्चित होणार आहे.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण...

अनधिकृत बांधकामे तोडली पाहिजेत यामध्ये दुमत असण्याचे कारण नाही. ज्या अधिकाऱ्यांच्या कालावधीत अनधिकृत बांधकामे झाली त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे आणि कायद्यात तशी तरतूद आहे. मग तो अधिकारी नगरपालिकेचा असो वा त्या पोलीस स्टेशन हद्दीतील पोलीस अधिकारी असो ज्या हद्दीत अनधिकृत बांधकामे झाले त्यास ते जबाबदार आहेत या भूमिकेशी मी कायम आहे. आजही तीच माझी भूमिका आहे. अनधिकृत बांधकामासंदर्भात कायदे आहेत त्या अनुषंगाने जरुर कारवाई करण्यात येईल. अनधिकृत बांधकाम सर्वेक्षणाचे काम पाच-दहा वर्षांनी होत होते. परंतु आता दर दोन वर्षाला लॅण्ड ऑडीट केले पाहिजे. दर दोन वर्षांनी सॅटेलाईटच्या माध्यमातून कुठे अतिक्रमण झाले आहे वा कुठे अतिक्रमण वाढलेले आहे याची माहिती घेऊन ज्या भागात अतिक्रमण वाढले असेल त्या भागातील वॉर्ड ऑफीसर व पोलीस स्टेनशनचे प्रमुख यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात येईल. अतिक्रमणाबाबत किती केसेस झाल्या त्याची माहिती माझ्याकडे आहे. परंतु आतापर्यंत अनधिकृत बांधकामाबाबत अधिकाऱ्यांना दोषी ठरवून त्यांच्यावर कारवाई केल्याची यादी नाही, हे मला मान्य करावे लागेल. ज्याच्या हद्दीत अनधिकृत बांधकामे होतील तेथील अधिकाऱ्यावर कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे. गेल्या दहा वर्षात जी अनधिकृत बांधकामे वाढली आहेत त्याचा शोध घेऊन त्याबाबत कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, झोपडपट्टयांच्या सर्वेक्षणामध्ये अनेक बोगस गोष्टी घडतात. जे लोक पात्र नाहीत त्यांच्या नावाचा देखील समावेश असतो किंबहुना ज्यांची झोपडपट्टीमध्ये नावे नाहीत त्यांची देखील नावे टाकली जातात. तसेच नाव एकाचे असते आणि फोटो दुसऱ्याचा असतो अशाप्रकारच्या अनेक केसेस झालेल्या आहेत. अशाप्रकारच्या गोष्टींना आळा बसण्यासाठी आपण आता बायोमेट्रीकच्या माध्यमातून सर्वेक्षण करणार आहोत. त्याचे मॉनेटरींग चांगल्या पध्दतीने होईल अशी शासनाची भूमिका राहणार आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सी.आर.झेड.चा मुद्दा उपस्थित झाला. काही सन्माननीय सदस्यांनी कोळीवाड्याचा मुद्दा उपस्थित केला. मुंबईत विशेषत: जो कोळी समाज आहे तो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण..

मुंबईत वर्षानुवर्षे राहत आहे. कोळीवाड्यातील इमारती अतिशय जुन्या व मोडकळीत आलेल्या आहेत. त्या इमारतींची पुनर्बांधणी करायची असेल तर सी.आर.झेड.चा कायदा त्यामध्ये अडचणीचा ठरतो. यासंदर्भात सांगू इच्छितो की, परवाच मी केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश यांच्याशी मुंबईच्या आणि अन्य प्रश्न संदर्भात चर्चा केली. त्यावेळी मी त्यांना विनंती केली की, सी.आर.झेड.च्या प्रकल्पांबाबत आपणास काही विचार करावा लागेल. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, या संदर्भात केंद्र सरकारची भूमिका सकारात्मक आहे. मुंबईतील विशेषत: कोळी बांधवांच्या बाबतीत जे काही प्रश्न निर्माण झालेले आहेत त्यामध्ये सरकारचा सहभाग 51 टक्के राहणार असेल तर केंद्र सरकार जरुर परवानगी देईल. मुंबईतील कोळीवाड्यायतील जुन्या इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात सी.आर.झेड ची अडचण न येता तो प्रश्न मार्गी लागेल. यासाठी आम्हाला केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागणार आहे.

सभापती महोदय, इमारतींच्या पुनर्बांधणी संदर्भात म्हाडाच्या अधिनियमात अ,ब आणि क अशा तीन गटात वर्गीकरण केलेले आहे. अ गटात 1940 पूर्वीच्या इमारतींचा समावेश आहे, ब गटात 1940 ते 1950 पर्यंत आणि क गटात 1950 ते 1970 मधील इमारतींचा समावेश आहे. पुनर्बांधणी करावयाची इमारत किमान 40 वर्षे जुनी असली पाहिजे असा नियम होता. त्या नियमात आता आपण बदल करीत आहोत. आता सर्व वर्गवारी बाजूला करुन ज्या इमारती 1969 पर्यंतच्या आहेत त्या सर्व इमारतींना पुनर्विकासाची सुविधा उपलब्ध करुन देणार आहोत. या निर्ण्यामुळे जुन्या आणि मोडकळीस आलेल्या इमारतींचा प्रश्न मार्गी लागेल आणि या इमारतींच्या पुनर्विकासामध्ये जी अडचण होती ती दूर होणार आहे. या निर्णयामुळे मुंबईतील जवळपास 19 हजार 600 इमारतींना याचा फायदा होणार आहे.

यानंतर श्री.गायकवाड..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्री ...........

2010 सालापासून अगोदरच्या 40 वर्षाचा हिशोब केला तर साधारणपणे 1969 साल येते आणि यापूर्वी ठरविण्यात आलेली वर्गवारी रद्द करुन आता नव्याने 1969 सालचा निकष लावण्यात येत आहे त्यामुळे आता हा प्रश्न मार्गी लागणार आहे.असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर बोलत असतांना मघाशी काही सन्माननीय सदस्यांनी एम.एम.आर.डी.ए. कोण कोणती कामे करणार आहे या ंसंबंधीचा उल्लेख् केला होता . त्याबाबतीत मला असे सांगावयाचे आहे की ,एम.एम.आर.डी.ए.ला मॅनडेट काय आहे ? मुंबई शहरामध्ये पायाभूत सुविधा निर्माण करीत असतांना जी परवडणारी घरे आहेत ज्याला आपण अफोर्डेबल हाऊसिंग म्हणतो अशी पाच लाख घरे बांधण्याची शासनाची भूमिका आहे. या प्रकल्पातून 160 चौरस फुटाची घरे विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. त्यामध्ये दुर्बल घटक आणि अत्यल्प उत्पन्न गटातील व्यक्तीना दरमहा 800 ते 1500 रुपये आकारुन भाडे तत्वावर घरे देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. मुंबई शहरामध्ये अतिक्रमण होऊन झोपडया वाढतात यासबंधी सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य नेहमीच मुद्दा उपस्थित करीत असतात .मुंबईमध्ये आज जागा आहे काय ? हा खरा प्रश्न आहे. मुंबईमध्ये जागा नसल्यामुळे एक तर
झोपडया बांधाव्या लागतात किंवा फुटपाथवर झोपावे लागते किंवा रेल्वे स्टेशनवर झोपावे लागते. मुंबई शहरामध्ये राहण्याचा प्रश्न फार मोठा आहे. मुंबईमध्ये नोकरी मिळावी काही रोजगार मिळावा या उद्देशाने मुंबइर्मध्ये येणारा वर्ग मोठया प्रमाणावर आहे. म्हणूनच ज्याला अफोर्डेबल घरे म्हणता येतील अशी घरे म्हाडाच्या माध्यमातून वा एम.एम.आर.डी.ए.च्या माध्यमातून बांधण्यात येणार आहेत. महाराष्ट्र चेंबर ऑफ हाऊसिग इंडस्ट्रिज यांनीसुध्दा हीच भूमिका स्वीकारली आहे. मुंबईमध्ये जे खाजगी डेव्हलपर्स आहेत त्यांनीसुध्दा मुंबईमध्ये अफोर्डेबल हौसिंग मोठया प्रमाणावर बांधण्याची भूमिका स्वीकारलेली आहे.त्यामुळे मुंबईमध्ये जेव्हा मोठया प्रमाणावर भाडयाची घरे उपलब्ध होतील त्यातून मुंबईमध्ये अतिक्रमणाचा प्रश्न काही प्रमाणात दूर होईल. अर्थात हा प्रश्न 100 टक्के दूर होईल असे मी म्हणणार नाही. परंतु अफोर्डेबल हौसिंगच्या माध्यमातून ज्या ज्या लोकांना मुंबईमध्ये भाडे तत्वावर राहण्याची इच्छा आहे त्यांना भाडेतत्वावर राहण्यासाठी निश्चितपणे फायदा होईल हे मला मुद्दाम या ठिकाणी नमूद करावयाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्री ...........

सभापती महोदय,एम.एम.आर.डी.ए.च्या संबंधीचे अनेक मुद्दे आहेत परंतु त्या सर्वच मुद्दाचा खुलासा करावयाचे झाल्यास त्यामध्ये बराच वेळ जाईल म्हणून महत्वाच्या मुद्दाचा मी थोडक्यात उल्लेख करणार आहे. आज मुंबईमध्ये जी काही कामे चालू आहेत त्यातून निश्चितच मुंबईच्या विकासासाठी फायदा होईल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी इतरही काही उल्लेख या चर्चेच्या निमित्ताने केला होता. काही सन्माननीय सदस्यांनी प्रकरण निहाय किंवा व्यक्तिगत स्वरुपाचे देखील काही मुद्दे मांडले आहेत . त्याबाबतीतील शासनाची भूमिका मी या ठिकाणी स्पष्ट करणार आहे. सभापती महोदय, मुंबईच्या प्रश्नाच्या निमित्ताने ही चर्चा उपस्थित करण्यात आली होती त्यामध्ये शंकरन समितीच्या अहवालापासून सिडकोच्या कारभारापर्यंत काही सन्माननीय सदस्यांनी तक्रारी केल्या होत्या. त्याबाबतीत श्ंासनाची भूमिका मला या ठिकाणी मुद्दाम नमूद करावयाची आहे. सिडकोच्या संदर्भात कालच्या टाईम्स ऑफ इंडियामध्ये आलेल्या एका बातमीचा उल्लेख माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी केला होता. त्याबाबतीत मला एका गोष्टीचा उल्लेख करावयाचा आहे.त्या प्रकरणामध्ये शासनाचा उल्लेख झाला होता. परंतु त्यासंबंधीचे शासनाकडे कोणतेही प्रकरण मंजुरीसाठी आलेले नाही हे प्रथम मला येथे सांगावयाचे आहे त्यामुळे शासनाच्या स्तरावर यासांबंधीचा निर्णय झाला होता असे म्हणणे चुकीचे होईल. याबाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की , श्री.गिल नावाचे सिडकोचे जे तत्कालिन एम.डी.होते ते मार्च महिन्यात सेवा निवृत्त झाले आहेत आणि त्यांनी निवृत्त होत असतांना काही निर्णय घेतले होते असा उल्लेख कालच्या वृत्तपत्रामध्ये आला होता. त्यासबंधीचा विषय देखील सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री पांडुरंग फुंडकर यांनी सभागृहात उपस्थित केला होता.त्याबाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की, श्री गिल यांनी निवृत्त होण्याच्या अगोदर सहा महिन्यात भूखंड वाटपाच्या बाबतीत निर्णय घेतले असतील ,जमिनीच्या एकंदरीत वापराच्या बाबतीत काही फेरबदल केले असतील किंवा टेंडर कंडीशनमध्ये काही बदल केले असतील अशा सगळया प्रकरणांना मी या ठिकाणी स्थगिती देत आहे आणि या प्रकरणांना स्थगिती देऊन नगरविकास विभागाच्या सचिवांची एक सदस्यीय समिति नेमून त्या समितीच्या माध्यमातून या सर्व प्रकरणांची सविस्तर चौकशी केली जाईल

3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय मुख्यमंत्री ...........

.त्या प्रकरणाची सत्यता पडताळून पाहिली जाईल आणि त्यामध्ये जर अनियमितता झाली असेल तर कारवाई केली जाईल..

नंतर श्री.सरफरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

कुणी कुणाला भूखंडाची विक्री करतो, किंवा आरक्षणामध्ये कसे बदल केले जातात हे सर्व चौकशीचे विषय आहेत. वर्तमानपत्रामध्ये छापून आलेल्या बातम्यांची सत्यता पडताळून पाहिली जाईल. टेंडरमधील अटींचे उल्लंघन झाले काय? या सर्व बाबींची चौकशी करण्यात येईल. आणि म्हणून केवळ हाच निर्णय नाही तर ते सेवानिवृत्त होण्यापूर्वी सहा महिन्यांचे सर्व निर्णय आम्ही स्थगित करु एवढेच मला सांगितले पाहिजे. यामध्ये अनुभव असा आहे की, जे काही आरक्षणामध्ये बदल केले जातात त्याबाबत शासनाकडे अहवाल येतात. त्यामध्ये मुंबई महानगरपालिकेला सुध्दा आपली प्रक्रिया पूर्ण करावी लागते. डीसी रुलच्या कलम 37 मध्ये बदल करण्याचा ठराव मुंबई महानगरपालिक ा संमत करते. आणि शासनाच्या अंतिम निर्णयासाठी ही प्रकरणे शासनाकडे पाठविण्यात येतात. एकंदरीत आपण ज्या स्पेशल प्लॅनिंग ॲथॉरिटीज निर्माण केलेल्या आहेत, त्यामध्ये एमएमआरडीए असेल, सिडको असेल, किंवा अन्य एसपीए शासनाने नियुक्त केलेल्या आहेत. त्याठिकाण्ी सर्व नियमांमध्ये बदल करण्याची भूमिका परस्पर घेतली जाते. त्या नियमांमध्ये सुध्दा बदल करण्याची शासनाची भूमिका आहे. जेणेकरुन भविष्यात त्यांच्या स्तरावर चुकीचे निर्णय होणार नाहीत याकरिता सर्व कामांमध्ये आपल्याला पारदर्शकता कशी आणता येईल यासाठी काही निर्णय घ्यावे लागतील. त्यामध्ये जे काही लॉजिकली असेल त्याप्रमाणे त्यांनी भूमिका घ्यावी. त्यामध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शासनाकडून हरकती व सूचना मागवून नंतर त्यामधील सत्यता तपासून घेतली जाईल. आणि म्हणून येत्या दोन ते तीन महिन्यामध्ये नवीन धोरण स्वीकारण्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन त्यामध्ये बदल केले जातील हे मला याठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे. अशाप्रकारे या तीन गोष्टींच्या बाबतीत सहा महिन्यापूर्वी जे काही निर्णय घेतले गेले असतील ते निश्चितपणे थांबविले जातील. आणि चौकशीअंती त्यामधून जे स्पष्ट होईल त्याप्रमाणे अंतिम निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, मुंबईच्या विमानतळाचा उल्लेख अनेक माननीय सदस्यांनी केला . मुंबईमध्ये नवीन विमानतळ झाले पाहिजे ही शासनाची भूमिका आहे. मुंबईच्या विमानतळाबाबत निर्णय घेत असतांना त्याठिकाणी पर्यावरणाचा विषय अडचणीचा झाला आहे हे आपल्याला मान्य करावा लागेल. तो विषय अजून सुटलेला नाही. आमचे अधिकारी कालच त्याठिकाणी जाऊन पहाणी करुन आले. आज त्या विमानतळाच्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत यापेक्षा जास्त विमाने उतरविणे आणि टेकऑफ करणे धोक्याचे झाले आहे. परंतू मुंबईची वहातूक वाढत चालली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

माननीय केंद्रीय वहातूक मंत्री श्री. प्रफुल्ल पटेल यांनी मागे एकदा निवेदन केले होते की, या विमानतळावर अधिक विमाने उतरविण्यासाठी आपल्याला या विमानतळाची क्षमता आता वाढविता येणार नाही. आणि म्हणून मुंबईमध्ये दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ होणे अगत्याचे आहे. आहे त्या जागेपैकी जवळ जवळ 80 टक्के जमीन ताब्यात आलेली आहे. पर्यावरणाचा प्रश्न अजूनही मार्गी लागलेला नाही. याबाबत मी स्वत: जाऊन याबाबत पाठपुरावा करीन. आपल्याला हा प्रश्न निश्चितपणे मार्गी लावावा लागेल. तो प्रश्न मार्गी लागण्यासाठी जे काही प्रयत्न करणे अगत्याचे आहे, त्यामध्ये पर्यावरणाची काही अडचण येणार नाही हे लक्षात घेता या सर्व गोष्टींमध्ये मी स्वत: जातीने लक्ष घालीन. आणि त्यामधून हा सर्व प्रश्न मार्गी लावण्याकरिता मी स्वत:हून प्रयत्न करीन. सभापती महोदय, सिडकोच्या अन्य प्रकरणांबाबत माननीय सदस्यांनी याठिकाणी उल्लेख केला. त्याचप्रमाणे शंकरन समितीचा उल्लेख माननीय सदस्यांनी केला. त्याबाबत मला सांगितले पाहिजे की, साधारणपणे 2003-04 या वर्षामधील जी प्रकरणे आहेत. त्यामध्ये शंकरन समितीने 83 केसेस तपासल्या. त्यापैकी 50 प्रकरणे गंभीर स्वरुपाची होती, 11 प्रकरणे संशयास्पद होती, 22 प्रकरणांमध्ये अनियमितता नव्हती. जी 50 प्रकरणे गंभीर स्वरुपाची होती, त्यापैकी 13 प्रकरणांचे वाटप रद्द करण्यात आले आहे. तसेच, फरकाची रक्कम घेऊन 22 प्रकरणे नियमित करण्यात आली आहेत. आणि इतर 7 प्रकरणे नियमित करण्यात आली आहेत. तसेच, न्यायालयाच्या आदेशानुसार अजून 6 प्रकरणे नियमित करण्यात आली असून 1 प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणांच्या बाबतीत शासनाने भूमिका घेतली आहे. या सर्व प्रकरणांची चौकशी पूर्ण झाली आहे. त्यामध्ये आढळलेल्या दोषींवर कारवाईसुध्दा झालेली आहे. त्यामुळे शासन या प्रकरणांचे समर्थन करीत आहे अशातला भाग नाही. शासनाने ज्या ज्या लोकांवर कारवाई केलेली आहे, त्याची यादी मोठी असल्यामुळे मी ती पटलावर ठेवली असती. आणि म्हणून यामध्ये जे जे संबंधित लोक आहेत त्या सर्व लोकांवर कारवाई करण्याची शासनाची भूमिका आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांनी वाघिवली येथे भूपेंद्र शहांना साडे बारा टक्के चांगली जमीन देण्यात आली असा उल्लेख केला. ज्यांची जमीन संपादित करण्यात आली ती हलक्या प्रतीची होती. त्या बदल्यात दुसऱ्यांना देण्यात आलेली साडे बारा टक्के जमीन अतिशय चांगली होती. म्हणून याबाबत मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, या प्रकरणाची चौकशी सुरु केली असून आम्ही तो संपूर्ण निर्णय रद्द केला आहे. आपणास हे सांगावयास हरकत



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

नाही की, मी स्वत: या प्रकरणाचा आढावा घेतला. आणि ज्यावेळी हे प्रकरण लक्षात आले त्यावेळी मी तो निर्णय रद्द केला. या प्रकरणी चौकशी लावण्यात आली असून ही पध्दत आता बदलण्यात येत आहे.

(यानंतर श्रीमती थोरात)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

जी जमीन संपादित करण्यात येते त्याच्या व्हॅल्यूएशनची जमीन त्यांना देता आली पाहिजे ही भूमिका घ्यावी लागणार आहे. त्याठिकाणी पुनर्वसनाचे प्रश्न आहेत. सर्वजणच काही भूपेंद्र शहा नाहीत. शासन जमिनी संपादित करीत आहे.त्यामुळे महाराष्ट्रातील सर्व प्रकल्प होत आहेत. म्हणून जमिनीच्या संपादनाच्या प्रक्रियेचा विचार करावा लागेल. या पर्टीक्युलर प्रकरणामध्ये अनियमितता दिसून आली म्हणून हे प्रकरण रद्द करण्यात आले आहे. या प्रकरणात चौकशीअंती जे स्पष्ट होईल त्याप्रमाणे पुढची कारवाई नक्की करता येईल. परंतु सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, या सगळया प्रक्रियेमध्ये एका नवीन पध्दतीने पारदर्शकता आणून जी जमीन संपादित होत आहे ती तेवढयाच व्हॅल्यूएशनप्रमाणे देता यावी, अशा प्रकारची भूमिका साधारणपणे रहणार आहे. या बाबतीत शासन प्रयत्नशील आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या जमिनीवर असलेल्या झोपडयांच्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आला. एस.आर.ए.ची योजना मार्केट ड्रिव्हन योजना आहे. एस.आर.ए.च्या प्रकल्पाला रिअल इस्टेटची चांगली मागणी असेल तरच ती यशस्वी होणार. डेव्हलपर एस.आर.ए.योजनेंतर्गत घरे बांधतात कारण त्यांना स्वत:ला त्या ठिकाणी फ्री सेल कॉम्पोनन्ट मिळतो. आणि बाकीची घरे शासनाला विनामूल्य देतो.त्यातून झोपडपट्टीधारकांना विनामूल्य घरे देण्यात येतात, अशी ही योजना आहे. परंतु केंद्र शासनाच्या जमिनीवर राज्य शासनाचा हक्क नाही म्हणून मी स्वत: माननीय पंतप्रधानांना याबाबतीत पत्र लिहिले आहे. रेल्वेच्या जमिनींचा प्रश्न आहे त्यामुळे रेल्वे मंत्र्यांना पत्र लिहिलेले आहे. मुंबईमध्ये केवळ हा विषय महाराष्ट्र शासनापुरता मर्यादित नाही तर केंद्र शासनाच्या जमिनीवर आणि रेल्वेच्या जमिनीवर देखील अतिक्रमणे झालेली आहेत. त्या जमिनीवर देखील राज्य शासनाने ज्या तत्वावर एस.आर.ए.ची योजना स्वीकारलेली आहे त्याच तत्वावर केंद्र शासनाने सुध्दा ही भूमिका स्वीकारावी अशी मागणी केलेली आहे. या बाबतीत त्यांच्याकडून अद्याप प्रतिसाद मिळालेला नाही. याबाबतीत प्रयत्न करावा लागणार आहे. ही योजना समजून सांगून यासाठी जो काही निधी मिळेल तो त्यांनी घ्यावा, त्या बाबतीत राज्य शासनाची काही तक्रार रहाणार नाही. माननीय पंतप्रधानानी महाराष्ट्रातील या योजनेचा उल्लेख स्वत: देशाच्या पातळीवर केलेला आहे. महाराष्ट्र राज्यातील आणि देशातील झोपडपट्टी निर्मूलनाचा

...2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण...

विषय माननीय पंतप्रधानांनी हाती घेतलेला आहे. त्यामुळे हा निर्णय महत्वाचा ठरणार आहे. मला वाटते की, यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे, तो निश्चतपणे केला जाईल. त्यासंबंधात पत्रव्यवहार झालेला आहे पण त्याला अद्याप प्रतिसाद मिळाला नसल्यामुळे प्रयत्न करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, डिम्ड कन्व्हेअन्सच्या बाबतीत अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला. यासंदर्भात यापूर्वी दोन्ही सभागृहात चर्चा झाली होती आणि तो प्रस्तावही शासनाने मान्य केला होता. कारण बिल्डर्सनी ज्या इमारती लोकांकडे सुपूर्द केल्या आहेत त्या इमारतींचे ते डिम्ड कन्व्हेअन्स करुन देणार नसतील तर डिम्ड कन्व्हेअन्स असल्याचे मानण्यात यावे आणि ती इमारत त्या सोसायटीच्या मालकिची व्हावी, आणि त्या ठिकाणी उपलब्ध असलेला एफ.एस.आय. त्या सोसायटीला उपलब्ध व्हावा अशा प्रकारची कल्पना आहे. सभापती महोदय, ज्यावेळी हा विषय शासनाने हाती घेतला त्यावेळी अनेक प्रस्ताव येत आहेत पण त्यामध्ये काही नवीन प्रश्न निर्माण झालेले आहेत. अर्थात ते मार्गी लावण्यासाठी विचार करुन निर्णय घ्यावा लागणार आहे. एखाद्या ले-आऊटमध्ये एकच इमारत नाही तर अनेक इमारती असतील आणि अजूनही काही जागा शिल्लक असेल तर त्या ले-आऊटमध्ये दुसरी इमारत डेव्हलप करण्याच्यावेळी सर्वांची एन.ओ.सी. लागणार असेल तर मुंबईतील प्रकल्प मार्गी लागणार नाहीत अशा काही लोकांच्या तक्रारी आलेल्या आहेत. त्या इमारतीपुरते डिम्ड कन्व्हेअन्स करा पण त्या पूर्ण ले-आऊटमधील सोसायटी जर एक असेल आणि उर्वरित कामासाठी त्या सगळयांची एन.ओ.सी. लागणार असेल तर त्या भागात डेव्हलपमेन्ट होणार नाही हा प्रश्न नव्याने समोर आल्यामुळे तो प्रश्न अद्याप मार्गी लागू शकला नाही. ही यातील सगळी पाश्र्वभूमी आहे. त्याबाबतत अंतिम नोटिफिकेशन काढत असताना हा बदल करावा लागेल. फक्त त्या इमारतीपुरता विचार करावा लागेल. पूर्ण ले-आऊटचा विचार केला तर इतर इमारतीच्या बाबतीत सुध्दा एन.ओ.सी. मिळविण्याकरिता काय होऊ शकते याचा आपण विचार करु शकता. म्हणून ते करणे उचित नाही अशी शासनाची धारणा आहे. म्हणून हे करीत असताना त्या इमारतीपुरती त्या ले-आऊटला डिम्ड कन्व्हेअन्सची परवानगी द्यावी अशा प्रकारची भूमिका मला या ठिकाणी सांगावयाची आहे.

...3..





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अशोक चव्हाण....

सभापती महोदय, गणपत पाटील नगरचा उल्लेख अनेक वेळा करण्यात आलेला आहे. बाकीच्या अशाच नगरांचा उल्लेख झाला असता तर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम मला बरे वाटले असते. सभापती महोदय, गणपत पाटील नगर बाबत सांगावयाचे तर या ठिकाणच्या नगरसेविका काँग्रेस पक्षाच्या आहेत तो विषय वेगळा आहे त्यावर मला अधिक बोलायचे नाही.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. उच्च न्यायालयाचा आदेशाचा भंग करुन या ठिकाणी अतिक्रमण करण्यात आलेले आहे. माझ्या समक्ष एका उत्तर भारतीय नागरिकला विचारले की, आप यहां कभी आये हो, तेव्हा तो म्हणाला मै तीस दिन पहले आया हूं. सभापती महोदय, माझ्या डोळयासमक्ष मॅनग्रोव्हजवर भर टाकून त्याठिकाणी सहा महिन्याच्या आत सात हजार परप्रांतीय वसले आहेत. म्हणून मी याबाबतीत अनेक वेळा उल्लेख केलेला आहे तसेच मी स्वत: त्या ठिकाणी तीन वेळा भेट दिलेली आहे. माझ्याकडे पोलीस स्टेशनची सहा पत्रे आहेत. आमच्याकडे पोलीस नसल्यामुळे आम्ही ही वसाहत तोडण्यासाठी पोलीस बंदोबस्त देऊ शकत नाही, असे पोलिसांनी कळविलेले आहे. म्हणून मी गणपत पाटील नगरचा उल्लेख सतत करीत आहे. हा उल्लेख आताच केलेला नाही तर खालच्या सभागृहात विधानसभेत देखील मी हा उल्लेख केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

पदपथाच्या बाबतीत सुध्दा मी आपल्याला म्हटले की मला तीन चार तास द्या, आपण मुंबईत खाजगी गाडीतून फेरफटका मारु.. त्या ठिकाणी काँग्रेसचे नगरसेवक आहेत म्हणून गणपत पाटील नगरचा मी उल्लेख केला असे नाही.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, त्या ठिकाणी काँग्रेसचा नगरसेवक आहे की कोण आहे हा प्रश्न नाही. कोणताही नगरसेवक असला तरी जे बेकायदेशीर असेल ते बेकायदेशीरच आहे. त्यामुळे ती माझी भूमिका नाही. सांगण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, या गणपत पाटील नगरमध्ये सुध्दा मोठ्या प्रमाणावर लोक राहतात. हे अतिक्रमण आहे हे मान्यच करावे लागेल. पण त्यामध्ये 1995 पर्यंतचे किती आहते, 2000 पर्यंतचे किती आहेत याची माहिती घ्यावी लागेल. आपण मुंबईसाठी जी भूमिका स्वीकारलेली तीच भूमिका त्यांना सुध्दा लागू आहे. मध्यंतरीच्या काळात त्या ठिकाणी किती घरे आहेत, केव्हाची घरे आहेत याबाबतीत माहिती घेण्याच्या दृष्टीने सर्व्हे करण्याचा निर्णय घेत असताना काही ठिकाणी मोठा मथळा छापून आला की, त्या ठिकाणचे मॅनग्रोव्हज नष्ट करुन झालेल्या कामाच्या बाबतीत शासन समर्थन करीत आहे. अशी भूमिका अजिबात नाही. मी त्याचा खुलासा केला नाही पण सभागृहामध्ये मुद्दाम सांगावयास हरकत नाही की, त्या ठिकाणी वास्तव्य करणारे जे काही लोक आहेत ते केव्हापासून त्या ठिकाणी राहतात, त्यामध्ये 2000 सालातील किती आहेत, 1995 चे किती आहेत, त्यांच्या नंतरचे किती आहेत हे सर्व आपण बघतो. मुंबईमध्ये आपण ज्या ठिकाणी कारवाई करतो त्या ठिकाणी अशी माहिती आपण घेतो. त्याचा सर्व्हे करतो. त्या सर्व्हेमध्ये, जॉइन्ट मेझरमेंटमध्ये किती जमीन आहे, किती लोकांनी अतिक्रमण केलेले आहे ही माहिती बेसिकली घ्यावी लागेल आणि जे पात्र असतील ते पात्र आहेत असा निर्णय यामध्ये आपल्याला घ्यावा लागेल.

डॉ. नीलम गोऱ्हे : शिवसेनेचे कार्यकारी अध्यक्ष श्री. उद्धवजी ठाकरे आपल्याला विधान भवनमध्ये भेटावयास आले होते त्यावेळी गणपत पाटील नगरचा उल्लेख आमच्या महापौर श्रीमती शुभा राऊळ यांनी केला होता. वारंवार यावर चर्चा झाली आणि त्यावेळेला सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी हेच उत्तर दिले की, मी सर्व्हे करुन हे अतिक्रमण तोडण्यासाठी प्रयत्न करतो, कारवाई करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST/

डॉ. नीलम गोऱ्हे .....

तसेच आपण आम्हाला आश्वासन दिले होते की, मुंबई महानगरपालिकेला अतिक्रमण तोडण्यासाठी जर अतिरिक्त सुरक्षा दल लागले, विशेष पोलीस फोर्स लागला तर त्यासाठी आम्ही परवानगी देऊ.

श्री. अशोक चव्हाण : सभापती महोदय, असे उपप्रश्न मध्येच आले तर चर्चा पूर्ण होऊ शकणार नाही. आपली चर्चा झालेली आहे आणि आता मी उत्तर देत आहे. माझा मुद्दा एवढाच आहे की, जो नियम मुंबईच्या इतर क्षेत्रासाठी आहे तोच नियम गणपत पाटील नगरासाठी आहे. त्यासाठी वेगळी भूमिका स्वीकारण्याचा प्रश्नच नाही. मुंबईमध्ये इतर नगरांमध्ये किंवा इतर वॉर्डांमध्ये किंवा इतर क्षेत्रामध्ये शासनाने किंवा महानगरपालिकेने जी भूमिका स्वीकारलेली आहे तीच भूमिका गणपतपाटील नगराकरिता निश्चितपणे राहील. कायद्यामध्ये कुठलाही अपवाद करण्याची भूमिका राहण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. त्यामुळे वेगळ्याने काही करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही. मघाशी सन्माननीय सदस्यांनी तो प्रश्न उपस्थित केला होता म्हणून मी याबाबतचा उल्लेख या ठिकाणी केला.

सभापती महोदय, या ठिकाणी मघाशी सी-रॉकचा उल्लेख झाला. त्या ठिकाणी सीआरझेडमध्ये ग्राऊंड फ्लोअर डिमॉलिश केले पाहिजे असे काही रिस्ट्रिक्शन नाही. त्यातील एक मुद्दा महत्वाचा आहे की, त्यामध्ये पर्यावरणाच्या बाबतीत जी काही परवानगी द्यावी लागते ती केंद्र शासनाच्या अखत्यारितील गोष्ट आहे. हा निर्णय राज्य शासन घेणार नाही. ज्याची किंमत पाच कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे ती सगळी प्रकरणे केंद्र शासनाकडेच जातात. त्यामुळे या प्रकरणात राज्य शासन मान्यता देईल असा काही प्रश्न नाही. नियमामध्ये जे काही बसेल त्याप्रमाणे होईल. सीआरझेडमध्ये असल्यामुळे त्यावर रिस्ट्रीक्शन आहे आणि ग्राऊंड फ्लोअर डिमॉलीश केल्याशिवाय काही होणार नाही यामध्ये काही सत्यता नाही. त्या बाबतीत काही चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मुद्दाम ही माहिती देत आहे.

सभापती महोदय, दुसरा एक उल्लेख या ठिकाणी कोणत्या हेतूने केला गेला हे मला माहीत नाही. मला मुद्दाम सांगितले पाहिजे की, काही सन्माननीय सदस्यांनी मघाशी श्री. विठ्ठल उमप यांच्या बाबतीत उल्लेख केला. मी रेकॉर्डवर जी माहिती देत आहे ती तपासून घेऊन चुकीची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ ST

श्री. अशोक चव्हाण .....

असेल तर रेकॉर्डवरुन काढून टाकू. त्याला माझी काही हरकत राहणार नाही. परंतु माझ्याकडे जी माहिती आता उपलब्ध आहे त्याप्रमाणे श्री. विठ्ठल उमप यांच्या दोन मुलांना मुलूंड येथे हरीओम नगरमध्ये आणि कल्याणमध्ये तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सदनिका वितरित केल्याची माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. ही माहिती चुकीची असेल तर आपण ती मागे घेऊन नवीन माहिती घेऊ. त्याबद्दल माझी तक्रार नाही. परंतु ही माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यांच्या बाबतीत काही वेगळी भूमिका आहे असे नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी उल्लेख केला. मला हे समजत नाही की, मराठी चित्रपट कलावंतांच्या बाबतीत जर कोणी घरे दिली असतील तर आजपर्यंत कोणत्याही शासनाने कलावंत असतील, स्वातंत्र्यसैनिक असतील, आमदार असतील, पत्रकार असतील, सगळ्यांच्या बाबतीत जी भूमिका घेतली आहे तीच भूमिका मराठी कलावंतांच्या बाबतीत असण्यामध्ये काय गैर आहे ? ज्या पध्दतीने या ठिकाणी सगळ्या गोष्टींना वेगळे स्वरुप दिले जाते ते प्रॉपर टेस्टमध्ये नाही. ते योग्य पध्दतीचे नाही. अशा प्रकारे या ठिकाणी उल्लेख होणे अत्यंत चुकीचे आहे. अशा प्रकारचा उल्लेख होणे मला योग्य वाटत नाही. फक्त खुलासेवार माझी भूमिका मी या ठिकाणी स्पष्ट करीत आहे. सन्माननीय त्यांना ते आवडले असेल तर माझी काही तक्रार नाही. पण या ठिकाणी असा उल्लेख होऊ नये अशी माझी अपेक्षा निश्चितच राहणार आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी रहेजाचे प्रकरण सांगितले. ते प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

यानंतर श्री. खंदारे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

न्यायप्रविष्ट प्रकरण असल्यामुळे त्यासंबंधी कोर्टामध्ये जो निकाल लागेल त्याच्या अधीन राहून पुढील विषय हाताळला जाईल. ओबेरॉय कन्स्ट्रक्शनने एफएसआयचे उल्लंघन केले असे सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी म्हटले आहे. माझ्याकडे मुंबई महानगरपालिकेचाच अहवाल आहे. त्या अहवालानुसार आपण म्हणता त्याप्रमाणे एफएसआयचे उल्लंघन झालेले नाही असे म्हटलेले आहे. महानगरपालिका आयुक्तांनी असे सांगितले आहे की, याबाबतची पूर्ण चौकशी करुन आठवडयामध्ये अहवाल देतो. परंतु सकृतदर्शनी जो अहवाल प्राप्त झालेला आहे त्यामध्ये या केसमध्ये एफएसआयचे उल्लंघन झालेले नाही असे नमूद केलेले आहे.

सभापती महोदय, मी महत्वाच्या मुद्यांसंबंधी उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. काही मुद्यांसंबंधी माझ्याकडे सध्या माहिती उपलब्ध नाही, परंतु त्याबाबत सन्माननीय सदस्यांना माहिती पाहिजे असेल तर ती देण्यास मी तयार आहे. (अडथळा) सन्माननीय सदस्यांनी व्हेग तक्रारी करु नयेत, मला स्पेसिफिक उदाहरण सांगावे. त्याबाबत मी जरुर माहिती घेईन. सन्माननीय सदस्यांनी भाषणाच्या वेळी स्पेसिफिक उदाहरणे दिली असतील त्याबाबतची मी माहिती घेईन. त्याबाबतीत कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. जी वस्तुस्थिती आहे ती मी सांगितली आहे.

सभापती महोदय, मुंबईच्या बाबतीत अशी भूमिका व्यक्त केली आहे की, मुंबई महाराष्ट्रापासून तोडण्याचा घाट घातला जात आहे. काही वृत्तपत्रातून त्याचा सातत्याने उल्लेख होत आहे. महाराष्ट्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आपण आहोत. महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्नासंबंधी आपण सर्वांनी एकमुखी भूमिका घेतली आहे. महाराष्ट्र-कर्नाटकच्या सीमा भागातील 865 गावांमध्ये जे मराठी बांधव रहात आहेत. तो सगळा परिसर महाराष्ट्राचा झाला पाहिजे. दोन्ही सभागृहांनी एकमताने ठराव मांडून ही भूमिका जाणीवपूर्वक घेतली असताना, सर्वपक्षीय शिष्टमंडळ माननीय पंतप्रधान यांना भेटून आलेले असताना मुंबई महाराष्ट्रापासून कोणी तोडू शकत नाही आणि कोणाचा घाट असेल तर शासन ते कदापि होऊ देणार नाही, ही शासनाची भूमिका आहे हे मला सांगितले पाहिजे. परंतु साप साप म्हणून भुई धोपटत रहावयाचे, हे उचित

2.....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अशोक चव्हाण.....

नाही. सगळयांची भूमिका एकच आहे, मुंबई ही महाराष्ट्राची आहे आणि महाराष्ट्राचीच कायम राहील. मुंबईला कोणी तोडण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. हे सरकार मुंबईला महाराष्ट्रापासून तोडू देणार नाही ही सरकारची भूमिका आहे. कारण नसताना वारंवार हा प्रश्न उपस्थित केला जातो. आपणच लोकांमध्ये नवीन विषय पेरावयाचा ही भूमिका अजिबात योग्य नाही. या सर्व प्रश्नांना मी न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी यापेक्षा अधिक काही विषय उपस्थित केले असतील, व्यक्तिगत विषय उपस्थित केले असतील त्यांना लेखी उत्तर देण्याचा माझा प्रयत्न राहील, एवढेच मी सांगून माझे दोन शब्द पूर्ण करतो. जय हिंद जय महाराष्ट्र.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांनी उत्तरातून अनेक प्रश्नांचा येथे उहापोह केला आहे. सभागृहाचा मी अधिक वेळ घेणार नाही. मुंबई महानगरपालिकेने 6 हजार कोटी रुपयांचे कर्ज घेण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. परंतु ही वेळ मुंबई महानगरपालिकेवर का यावी ? हाच माझ ा मुद्दा होता. जी मुंबई महानगरपालिका केंद्र सरकारला 40 टक्के महसूल देते. त्या महानगरपालिकेला विकासाच्या कामांसाठी निधी देण्याची जबाबदारी शासनाची नाही का (अडथळा)

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, आपण सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुलकर्णी यांना बोलण्याची परवानगी दिली आहे काय, मी राईट ऑफ रिप्लायवर बोलत आहे. तो माझा अधिकार आहे. सभापती महोदय, मुंबई महानगरपालिका ही आशिया खंडातील सर्वात मोठी महानगरपालिका आहे. म्हणून ज्या महानगरपालिकेकडून 90 हजार कोटींचा महसूल केंद्र सरकारकडे जात आहे. त्यातील वर्षातून 15 हजार कोटी रुपये महानगरपालिकेला द्यावेत. मुंबई महानगरपालिका शासनाकडे भीक मागत नाही, त्यांचा तो अधिकार आहे. राज्य शासनाची ती जबाबदारी आहे.

3....



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी दुसरा असा मुद्दा मांडला आहे की, मुंबई महानगरपालिकेला तोडण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे असे आम्ही म्हणत असतो. एमएमआरडीए या नावाची वेगळी संस्था निर्माण करण्याची गरज शासनाला का भासली ?

यानंतर श्री.शिगम.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. रामदास कदम...

मुंबई महानगरपालिका ही स्वायत्त संस्था असताना एमएमआरडीए, एमएसआरडीसी यासारख्या वेगळया वेगळया यंत्रणा मार्फत कामे का सुरु करण्यात आली ? ठाणे आणि मुंबई महानगरपालिकेचे सर्व अधिकार एमएमआरडीएच्या माध्यमातून आपल्या हातामध्ये आपण घेतलेले आहेत. आपण एमएमआरडीएच्या बैठकी संबंधीचे जे निमंत्रण पाठविले होते त्यामध्ये मुंबई प्रांत असा उल्लेख करण्यात आलेला होता. आपण कुलाब्यापासून वसई, नालासोपारा, ठाणे या भागाला प्रांत म्हणणार असाल तर त्याचा अर्थ काय होतो ? भाषावार प्रांत रचनेमध्ये प्रांत म्हणजे वेगळे राज्य समजले जाते. म्हणून मुंबई वेगळी करण्याचा आपला विचार आहे की काय असा संशय आमच्या मनात आला म्हणून मी तसा उल्लेख केला.

श्री. अशोक चव्हाण : मी प्रांत असे म्हणालो नाही. मुंबई ही महाराष्ट्राची आहे. मुंबईला महाराष्ट्रापासून कोणीही तोडणार नाही असे मी म्हणालो. तरीही रेकॉर्डवर तसे काही असेल तर ते तपासून काढून टाकू.

श्री. रामदास कदम : एमएमआरडीएच्या सभेची जी निमंत्रणपत्रिका काढली होती त्यामध्ये प्रांत असा शब्दप्रयोग केलेला होता.

श्री. पांडुरंग फुंडकर : ओबेरॉय विकासकाने एफएसआयचे व्हायोलेशन केले असा आरोप मी केलेला होता आणि त्यासंदर्भात उत्तर देताना महानगरपालिकेच्या रिपोर्टप्रमाणे व्हायोलेशन झालेले नाही असे आपण सांगितले. मी अत्यंत जबाबदारीने हे सांगितलेले आहे. तेव्हा महानगरपालिकेचा रिपोर्ट आपण पटलावर ठेवणार आहात काय ? एफएसआयचे व्हायोलेशन झाले असेल तर ज्या अधिका-याने चुकीचा रिपोर्ट दिलेला आहे त्याच्यावर आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री. अशोक चव्हाण : या प्रकरणाची संपूर्ण माहिती घेतली जाईल आणि काही चूक असेल तर त्याबाबतीत कारवाई केली जाईल.

**उपसभापती** : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(उपसभापती....

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 23.7.2010 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल. सकाळी 11 ते 12.30 वाजेपर्यन्त सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल. या बैठकीत आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये दाखविण्यात आलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेत युवकांचे स्थान भक्कम करण्यासाठी सर्वांगीण धोरण ठरविण्याच्या प्रस्तावावर चर्चा होईल. त्यानंतर दुपारी 12.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्री 9 वाजून 12 मिनिटांनी शुक्रवार, दिनांक 23.7.2010 रोजीच्या सकाळी 11.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

----

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही